बाबा कदम

घूमरैया

बूमरँग

भाग १

बाबा कदम

दिलीपराज प्रकाशन

प्रकाशक
राजीव बर्वे
मॅनेजिंग डायरेक्टर,
दिलीपराज प्रकाशन प्रा. लि.
२५१ क, शनिवार पेठ,
पुणे ४११ ०३०.

© सौ. कुमुदिनी वीरसेन कदम
'आनंद', बालक मंदिराजवळ,
ताराबाई पार्क,
कोल्हापूर

नवीन आवृत्ती :
१५ ऑक्टोबर २००४

प्रकाशन क्रमांक : ११६०

मुखपृष्ठ :
अनिल उपळेकर
ebook : जुलै २०२०
website : www.diliprajprakashan.in
email : info@diliprajprakashan.in

सामग्री

शीर्षक पृष्ठ

१
२
३
४
५
६
७
८
९
१०
११
१२
१३
१४
१५
१६
१७
१८
१९
२०
२१

१

आता मला बोलता येत नाही. पॅरॅलिसिसच्या दुसऱ्या झटक्यांनी माझी वाचा बंद झाली आहे. पहिल्या झटक्यानं डावी बाजू निकामी झाली होती. डावा हात आणि डावा पाय, दोन्ही अवयव माझ्या या जीर्ण शरीराला जोडलेले दिसत असूनही ते निर्जीव आहेत. नशीब! अजून उजवा हात जरुरीपुरतं तरी काम देतो!

आता मला अडतिसावं वर्ष चालू आहे. वाटत होतं, निदान साठी पूर्ण व्हावी; पण ज्या गतीनं हे शरीर दुर्बल होतं आहे त्याचा विचार केला की वाटतं, ते आता अशक्य आहे! प्रत्येक उजाडणारा दिवस हा आयुष्यातला शेवटचाच दिवस आहे असं मी आता गृहित धरून चाललो आहे. या जगण्याचा मला आता उबग आला आहे. माझं सारं गतायुष्य डोळ्यांसमोर एखाद्या चलत्चित्रपटाप्रमाणे धावतं आहे. वाटतं की, मी कोण होतो, कसा जगलो, या अडतीस वर्षांत किती खटपटीलटपटी केल्या, हे जगाला सांगून टाकावं! पण काय उपयोग! रहावत नाही झालं! अजून उजवा हात निकामी नाही.

आज माझी समाजात कोणती प्रतिमा आहे? एक उच्च कुलोत्पन्न अट्टल बदमाष! हातचलाखी करून हातोहात फसवणारा जुगारी! दारुडा, वुमनायझर, रेस पंटर, ब्लॅकमेलर! या जगातली सर्व ॲन्टीसोशल विशेषण मला अगदी तंतोतंत लागू पडतील!

वयाच्या पस्तीस वर्षापर्यंत मी कोण अन् कसा वागतो, याचा विचार करायची मला सवडच मिळालेली नव्हती- इतकी गतिमान अवस्था मी भोवताली निर्माण करून ठेवली होती.

लोकांना मी 'फ्लश' खेळताना हातोहात फसवलं, लाखो रुपयांच्या उलाढाली केल्या, बायापोरींना बघता बघता मी भुलवलं, त्यामुळेच माझ्या आयुष्याची अक्षरश: धुळधाण झाली! सारंच काही अतर्क्य! पराकोटीला पोहोचलेलं! माझ्या सहवासात येणारा प्रत्येक सधन माणूस मला 'बकरा' वाटायचा. माझ्याशी परिचय होणारी प्रत्येक सुंदर स्त्री माझी शय्यासोबत करण्यासाठीच निर्माण झालेली आहे असं वाटायचं. केवळ वाटायचंच असं नाही, तर ते घडायचंदेखील! बघता बघता काय होतंय हे कळायच्या अगोदरच ती स्त्री माझ्या कह्यांत आलेली असे! माझ्या सहवासाची जादू हीच. आपण कोण, काय आहोत, त्याची त्या बायापोरींना जाणीव राहात नसे! तुम्ही म्हणाल, काय निर्लज्ज आहे हा! अशी कबुली देताना याला शरम कशी वाटत नाही? पण खरं सांगू, 'शरम' हा शब्दच माझ्या शब्दकोशात नव्हता! शरम वाटते कोणाला? आपली एखादी कृती नैतिक की अनैतिक, सत्य की असत्य, असा विवेक असणाऱ्याला! विवेकाची अन् माझी फारकत झाली होती, अगदी बालपणी! शाळेत असतानाच!

शाळेचा उल्लेख केल्यानं तुम्हाला वाटेल की, हा शाळेत जात होता, तर शिकला किती? तसा फारसा शिकलोही नाही. 'रस्टिकेट' होईपर्यंत दोन वर्षं कॉलेजात होतो, आणि 'रस्टिकेट' झालो नसतो तरीही कॉलेज सुटलंच असतं. दुसऱ्या महायुद्धाची धामाधूम सुरू होती. गावोगावी सैन्यभरतीसाठी केंद्रं उभी करण्यात आली होती. काहीतरी अफाट करायचं आणि जगाला दिपवून टाकायचं ही वृत्ती त्या वेळी बळावली होती. कॉलेजातून हकालपट्टी झाल्याचं रेकॉर्ड माझ्या सैन्यातल्या प्रवेशाला आडकाठी आणणारं होतं; पण माझे 'डॅडी' ही काही साधीसुधी असामी नव्हती. ते होते लीगल ॲडव्हायजर टु द महाराजा ऑफ भवानीनगर! राजेरजवाड्यांना सल्ला देण्याचे कौशल्य त्यांच्या मेंदूत होते! स्वत:च्या मुलाला सैन्यांत कमिशन मिळण्याच्या कामी कॉलेजांतून 'रस्टिकेट' करण्यात आलेलं आहे ही आडकाठी दूर करणं त्यांच्यासारख्या कायदेपंडिताला कठीण नव्हतं!

सैन्यात दाखल झालो तो दिवस अजूनही मला आठवतो. तो सेकंड लेफ्टनंटचा ड्रेस अंगावर चढवल्यानंतर काही क्षण मी भारावून गेलो. आरशासमोर उभं राहून मी स्वत:ची प्रतिमा न्याहाळून माझ्याच प्रतिमेला अटेन्शनची पोज घेऊन सॅल्युट ठोकला अन् म्हणालो, 'सेकंड लेफ्टनंट समर ठाकूर, यापुढं वाह्यातपणा एकदम बंद! फक्त माणसासारखं वागायचं! सैन्यात नाव कमवायचं, लेफ्टनंट, कॅप्टन, मेजर, लेफ्टनंट कर्नल, कर्नल अशा हुद्यांवरून चढतचढत शेवटी ब्रिगेडियर व्हायचं!

ब्रिगेडियर समर ठाकूर! आणखीन एक सॅल्यूट! राज-क्षत्रिय लढवय्यांचं घराणं माझं! राजस्थानातील सुरतगड आमचा मूळ गाव! तो मी अद्याप पाह्यलेला नाही. १९०१ च्या सुमारास माझे आजोबा या भवानीनगरला प्रथम आले. त्यावेळी संस्थानी जमाना होता. भवानीनगर हे दक्षिण महाराष्ट्रातलं एक प्रमुख संस्थान. पण या संस्थानच्या नरेशांना एक शाप होता. एक-दोन पिढ्या औरस संतती व्हायची. नंतर गादीचा वारसा चालवण्यासाठी जवळच्या घराण्यातील एखाद्या मुलाला दत्तक घ्यावं लागे. पण अशा दत्तक राजकुमाराच्या जीवितास अनेक धोके असत. ज्यांचा वारसा डावलला गेला असेल ते असंतुष्ट आत्मे अनेक कारस्थानं रचायचे अन् दत्तक राजकुमाराच्या जीवितास दगा व्हायचा!

या भवानीनगरच्या गादीवर एक अत्यंत उमदा राजकुमार स्थानापन्न झाला-भीमदेव! भीमासारखाच धष्टपुष्ट आणि देखणा राजकुमार होता. पण राज्यकर्त्या ब्रिटिश सरकारला कुणकुण लागली की, राजकुमारास विषप्रयोग होण्याची दाट शक्यता आहे. दिल्लीत जोराच्या हालचाली झाल्या. प्रत्येक वेळी भवानीनगरच्या गादीबद्दल निर्माण होणारी ही डोकेदुखी थांबवायची असेल तर राजकुमार भीमदेव यांना संरक्षणात ठेवलं पाह्यजे. राजकुमार 'मेजर' होईपर्यंत त्यांना ब्रिटिश अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली अत्यंत विश्वासू अशा 'नेटिव्ह बॉडीगार्ड' च्या संरक्षणात ठेवण्याची योजना आखण्यात आली. राजकुमार भीमदेव यांचे खास संरक्षक 'बॉडीगार्ड' -म्हणून नेमणूक झाली ती माझ्या आजोबांची! सुमेरसिंग ठाकूर हे माझे आजोबा! पावणेसहा फूट उंच, गोरे, गरुडासारखं नाक, मिशांची टोकं दाढीत घुसलेली, गोरा रंग आणि किंचित् तांबूस घारे असे भेदक डोळे!

राजकुमारांच्या जीवितास दगाफटका करणाऱ्यांना सुमेरसिंग ठाकुरांची भवानीनगरला नेमणूक झाल्याचं समजलं अन् त्यांची पाचावर धारण बसली. कारण सुमेरसिंग ठाकूर हे राजस्थानातलं एक बडं प्रस्थ होतं. मेवाडच्या राजघराण्याशी त्यांचे लागेबांधे होते. ब्रिटिश सरकारशी एकनिष्ठ असलेली जी काही रजपूत घराणी होती त्यांपैकी सुमेरसिंग ठाकूरांचं एक घराणं होतं. राजकुमाराच्या जीवितास कोण दगाफटका करणार आहे अशी शंका जरी आली तरी गर्दन छाटली जाईल असा फतवा काढण्यात आला होता. माझे आजोबा, सुमेरसिंग आता हयात नाहीत. माझ्या घरी त्यांचं एका ब्रिटिश चित्रकारानं काढलेलं तैलचित्र मात्र अजूनही आहे. आता ते चित्र खूप जुनं झालंय, पण माझी पैज आहे, कोणीही त्या पोर्ट्रेटमधल्या माझ्या आजोबांच्या डोळ्यांकडे एकदोन मिनिटं टक लावून पाहून दाखवावं! ते अशक्य आहे! जीर्ण झालेल्या त्या त्यांच्या पोर्ट्रेटमधल्या डोळ्यांकडे सलग एक-दोन मिनिटं टक लावून पहाता येणं अशक्य आहे, तर प्रत्यक्ष ते समोर उभे असताना काय होत असेल?

राजकुमार भीमदेव यांची कारकीर्द खूप गाजली. तसा तो राजाच अफाट कर्तृत्व घेऊन जन्माला आला होता. पण त्याला सुरक्षितपणे राज्यकारभार चालवणं सुलभ झालं ते सुमेरसिंग ठाकुरामुळं, हे कोणालाही अमान्य होण्यासारखं नाही!

आजोबा या भवानीनगरच्या वातावरणात इतके एकरूप झाले की, आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांना निवृत्त करण्यात आल्यानंतर त्यांनी इथंच स्थायिक व्हायचा आपला मानस सरकारला कळवला. लोक म्हणतात की, राजा भीमदेव यांच्यावरील असीम प्रेमामुळं त्यांनी असा निर्णय घेतला. कोणत्या का कारणानं असेना, भवानीनगरात सुमेरसिंग ठाकूर स्थायिक झाले. राजांनी त्यांना शहराच्या उत्तरेला सांबर तलावाभोवतालची उत्तम अशी पंचवीस एकर जमीन बहाल केली. जमिनीतच एका बाजूला दुमजली असा बंगला बांधून दिला.

आजोबा सुमेरसिंग रोज पहाटे पाच वाजता घोड्यावरून रपेट करायला निघायचे. असा पहाडी पुरुष अद्याप या भागांत झालेला नाही.

माझे वडील धीरजलाल हे त्यांचं एकमेव अपत्य! कुशाग्र बुद्धी आणि कल्पकता हे दोन्ही गुण डॅडींच्या ठायी होते. आजोबांनी त्यांना शिक्षणासाठी मुंबईला ठेवलं. कुठेही न अडखळता डॅडी शिकत राह्यले.

आजोबा वारले, तेव्हा मी दहा वर्षांचा होतो, पण अजूनही मला तो दिवस आठवतो. राजघराण्यांतली सर्व मंडळी आमच्या शेतातल्या बंगल्यावर जमली होती. राजा भीमदेव बंगल्यासमोरच्या विहिरीच्या कट्ट्यावर बसले होते. आजोबांच्या मृत्यूनं त्यांना फार दु:ख झालं होतं. लोक म्हणतात; राजेसाहेबांचे जनक वडील वारल्यानंतरदेखील ते इतके रडले नव्हते.

डॅडीही त्या वेळी हजर होते. पण ते रडले मात्र नाहीत. मला डॅडींचं आश्चर्य वाटलं. आता मोठेपणी मला डॅडींच्या त्या वागण्याचं गूढ उकललं! वयाच्या आठव्या वर्षी डॅडींना शिकायला बाहेर ठेवलं होतं. वर्षांतून दोनदा ते भवानीनगरला यायचे म्हणे! एकदा मेमध्ये आणि दुसऱ्यांदा दिवाळीत! महाराजांचा मुंबईत समुद्रकिनाऱ्यावर बंगला होता. त्या बंगल्यात महाराज भीमदेव यांचे चिरंजीव राजकुमार सत्त्वशील इंग्लिश गार्डियनच्या देखरेखीखाली शिकत होते. डॅडी राजकुमारांचे कंपॅनियन, पण दोघात जमीन-अस्मानाचा फरक. राजकुमारांचं शिक्षणात मुळीच लक्ष नव्हतं, तर डॅडी अभ्यासात आघाडीवर! त्या इंग्लिश गार्डियनच्या संस्कारांनी डॅडींनी केवळ इंग्रजी भाषेवरच प्रभुत्व मिळवलं असं नव्हे, तर साहेबी संस्कार त्यांच्या वागण्याबोलण्यात पुरेपूर उतरले होते.

डॅडी मुळांत काहीसे अबोल, त्यात इंग्रजी संस्कारांनी ते अधिकच अबोल बनले.

आजोबा वारले तेव्हा घरच्या इतर मंडळीनी खूप शोक केला; पण डॅडींच्या चेहऱ्यावर मात्र मला कसलाच फरक जाणवला नाही. त्यांचं सांत्वन करायला येणाऱ्याला ते म्हणत, 'Man is Mortal !' डॅडी 'लॉ' ग्रॅज्युएट होऊन आल्यानंतर नोकरी करण्यापूर्वी त्यांनी काही दिवस वकिलीही केली.

डॅडींचं दुसरं एक वैशिष्ट्य म्हणजे एरव्ही ते अत्यंत अबोल आणि घुमे वाटायचे; पण एखादा खटला चालवायला ते उभे राह्यले, की साक्षात सरस्वती त्यांच्या जिव्हेवर अवतरल्याचा भास होई. केवळ डॅडींचं इंग्रजी ऐकण्यासाठी कोर्टात गर्दी व्हायची! दिवाणी आणि फौजदारी दोन्हीही प्रांतांत डॅडींनी दोन-तीन वर्षातच आपला जम बसवला. डॅडी संस्थानी जमान्यात लहानाचे मोठे झाले होते. राजेशाही आणि संस्थानी जमाना याबद्दल त्यांना सुरुवातीस आदर होता. डॅडींच्या संस्थानी संस्काराला इंग्रजी चालीरीतींची झालर लागल्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला एक आगळंच स्वरूप प्राप्त झालं होतं.

डॅडी उंच, सडसडीत बांध्यांचे. त्या काळी जास्त केस वाढवण्याची प्रथा नव्हती; पण डॅडी मुंबईत लहानाचे मोठे झालेले, पारशी आणि खिश्चन मुलांच्या सहवासात वावरलेले, त्यांनी भवानीनगरला परतल्यानंतर कधीही फेटा अथवा टोपी घातली नव्हती.

राजे भीमदेव वारल्यानंतर त्यांचे चिरंजीव राजकुमार सत्त्वशील गादीवर आले. डॅडी आणि ते एकत्रच लहानाचे मोठे झाले होते. ज्या वेळी राजकुमार सत्त्वशील यांचा राज्याभिषेक झाला तेव्हा गोऱ्या रिजंटनं डॅडींना लीगल ॲडव्हायझर म्हणून नेमून घ्यावं अशी सूचना नरेशांना केली. माझे आजोबा सुमेरसिंग ठाकूर यांच्या मागे सत्त्वशीलराजांच्या संरक्षणाची जरी नसली तरी त्यांना मार्गदर्शन करण्याची जबाबदारी डॅडींच्यावर येऊन पडली.

डॅडींना खूप मुली सांगून येऊ लागल्या हात्या. डॅडींनी पाश्चात्य संस्कृतीचं अनुकरण जरूर तिथंच केलं. लग्नाच्या बाबतीत त्यांनी आमच्या आजीला सर्वाधिकार प्रदान केले होते. महाराष्ट्रांत नगर, नासिक, सातारा सोलापूर या भागात अनेक राज-क्षत्रिय कुटुंबं येऊन स्थायिक झालेली होती. ती कालांतराने मराठी संस्कृतीशी एकरूप होऊन गेली होती. नगरला नारायणलाल परदेशी मिलिटरीचे कॉन्ट्रॅक्टर होते. त्यांची भगिनी आजींनी डॅडींसाठी पसंत केली. डॅडींनीही आपली पसंती दर्शवली.

मी आयुष्यात इतक्या प्रचंड उलाढाली केल्या. लोकांना भुरळ पाडली याचं कारण माझं

व्यक्तिमत्त्व! प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा वारसा मला माझ्या आईवडलांकडून आलेला आहे. गोरा रंग, उंच बांधा, भव्य कपाळ, धनुष्यकृती भुवया मी आईकडून घेतल्या. तर विलक्षण स्मरणशक्ती, कल्पनाविलास, इंग्रजी भाषेवरचं प्रभुत्व हे गुण डॅडींच्याकडून मी घेतले. तुम्हाला आश्चर्य वाटेल, 'आई' हा शब्द उच्चारण्याआधी मी प्रथम 'दॅदी' म्हणायला शिकलो. डॅडी माझ्याशी घरी मराठीत क्वचितच बोलत.

ते लीगल ॲडव्हायझर झाल्यानंतर आम्ही शेतातल्या घरातून भवानीनगरला रहायला आलो. आजोबांनी भवानीच्या मंदिराजवळ एक तीनमजली वाडा खरेदी केला होता. आजोबा बहुतेक सारा वेळ राजवाड्यावरच मुक्कामाला असत. गावातला वाडा रिकामाच होता.

डॅडींना शेतातल्या घरी राहणं आवडत होतं. त्यांना सकाळ-संध्याकाळ पायी फिरण्याची सवय होती. पहाटे उठून ते फिरायला जात. फिरणं हा व्यायामाचा उत्कृष्ट प्रकार असून दिवसाकाठी किमान तीन मैल पायी फिरणाऱ्यांचं आरोग्य उत्तम रहातं अशी डॅडींची श्रद्धा होती. त्यांचं फिरणं हे एक विशिष्ट प्रकारचं असे. फिरता फिरता ते मधेच एक फर्लांगभर धावत. दुसरा त्यांचा छंद म्हणजे पोहणं. शेतासमोर बारमाही पाण्यानं भरलेली विहीर होती. उन्हाळ्यात डॅडी फिरण्याऐवजी पोहत.

वयाच्या सहाव्या वर्षी मी पोहायला शिकलो. अगदी परवा-परवापर्यंत एखादी पाण्यानं तुडुंब भरलेली विहीर दिसली की, माझे हात शिवशिवायचे! पण आता ते अशक्य आहे. माझ्या शरीराची संपूर्ण डावी बाजू निकामी झाली आहे!

दिवस चालले होते. संस्थानी जमान्यांत आमूलाग्र बदल होत होते. राजे भीमदेव यांच्या पश्चात युवराज सत्त्वशील गादीवर आले; पण त्यांच्या भोवताली स्तुतिपाठकांचा गोतावळा जमला. बुद्धीने काहीसे मंद असलेले सत्त्वशीलराजे कोणत्याच बुद्धिमान माणसाला जवळ करीत नव्हते. डॅडींचे अन् त्यांचे मतभेद व्हायला सुरुवात झाली. फार दिवस जमले नाही.

डॅडींचा स्वभाव अत्यंत सडेतोड. ते एकदा उठले आणि सरळ युवराजांकडे गेले आणि म्हणाले,-

"महाराज, आपण मला सेवेतून मुक्त करावं!"

"का? तुम्हांला कोणी बोललं का?"

"मला बोलायची तशी कोणाची हिंमत होणार नाही; पण माझं मलाच वाटतं की, लीगल ॲडव्हायझर म्हणून सल्लामसलत करण्यासारखे काही प्रश्न उरलेले नाहीत. उगाच ट्रेझरीतून दरमहा पाचशे रुपये त्या कारणासाठी घेणं काही मला पसंत नाही!"

"पण समजा, सल्लामसलतीची गरज भासली तर?"

"तर अर्ध्या रात्री आपण निरोप पाठवा, मी आपल्या सेवेस हजर आहे!"

"यापुढं काही करणार आहात काय?"

"प्रॅक्टिस करावी म्हणतो!"

"ठीक आहे!"

डॅडींचं सडेतोड वागणं आणि त्यांचा सल्ला कधी कधी सत्त्वशील राजांना रुचत नव्हता, पण तरीही तुम्ही घरी जा असं म्हणायची त्यांच्यात हिम्मत नव्हती. ते आपल्या इच्छेनं जातील तर त्यांना अडवायचं नाही असं स्वत: राजांनी ठरवूनच ठेवलेलं होतं. डॅडी निरोप घ्यायला गेले तेव्हा फारसा आग्रह झाला नाही, तो त्यामुळेच!

नोकरीतून मुक्त झाल्या दिवशी डॅडींनी स्कॉचची बाटली उघडली. तसे डॅडी अगदी नित्य नियमानं तीन पेग्ज प्यायचे. ड्रिंक्सनंतर लगेच डॅडी जेवायला उठायचे. मोजकंच पण उत्तम जेवण. मटण सूप हे रोजच्या आहारात हवंच. कधी कटलेटस्, कधी चॉप्स्, तर कधी मटन रोल्स!

आई नगरला असताना हे सारं करायला शिकली होती. आईचे मोठे भाऊ मिलिटरीचे कॉन्ट्रॅक्टर! इंग्रज अधिकारी 'इंडियन डेलिकसीज' चाखण्यासाठी नारायणलाल परदेशींच्या बंगल्यावर जायचे. त्या वेळी मदतीला ऑफिसर्स मेसवरचा कूक फर्नांडिस घरी यायचा. त्यानंच आईला हे सर्व पाश्चात्य पद्धतीचे मासांहारी पदार्थ बनवायला शिकवले होते. त्याचा उपयोग तिला

डॅडींशी लग्न झाल्यावर झाला. डॅडींचा आहारदेखील अगदी मोजका. ते नेहमी म्हणायचे, 'If you eat less you will live more !' मीदेखील मिताहारी झालो त्याचं कारण हेच! भूक लागेल तेव्हा आणि गरज असेल तितकंच खायचं, या माझ्या वागण्याचं अनेकांना आश्चर्य वाटायचं. अधाशासारखा पैसा कमवणारा मी, पण खाताना अगदी हात राखून खायचो! नाहीतरी खूप पैसे कमावणाऱ्याला देव पोटभर खाऊच देतोय कोठे?

डॅडींची प्रॅक्टिस जोरात चालू लागली. साऱ्या जिल्ह्यातून त्यांच्याकडे कामं येऊ लागली. शेवटी शेवटी त्यांना काम नको म्हणून सांगायची पाळी आली.

या सुमारास आईला तलावाकाठची थंड हवा 'सूट' होईना; तिला दमा होण्याची चिन्हं दिसू लागली. नगरसारख्या शुष्क अशा जिल्ह्यांत वयाची अठरा-वीस वर्षं घालवल्यानंतर भवानीनगरसारख्या कोकणसीमेवरच्या प्रदेशांत रहायला आल्यापासून तिच्या प्रकृतीची कुरकुर चालू होती. शेवटी डॉक्टरांनी सल्ला दिला, 'तलावाकाठचा तो बंगला सोडून गावात रहायला जा!'

डॅडींना काही दृष्टीनं गावापासून चारसाडेचार मैलांवर रहाणं जरी बरं वाटत असलं, तरी वकिली व्यवसायात पडल्यापासून पक्षकारांना आमचा मळ्यातला बंगला फारच गैरसोयीचा वाटत होता. शेवटी डॅडींनी गावात रहायला येण्याचा निर्णय घेतला. खरोखरच तो निर्णय हितावह ठरला; कारण आईची प्रकृती गावात रहायला आल्यापासून थोडी सुधारली. तिकडे शेतातल्या बंगल्यात तिचा दिवस जाता जात नसे; पण आता इकडे गावात रहायला आल्यापासून दिवस कसा सरतो हेदेखील तिला समजेनासं झालं.

माझं नाव समरसिंग! माझ्या पाठीवर आणखी एक भाऊ झाला. त्याचं नाव अमरसिंग! बस्स, आम्ही दोघेच! एक मुलगी व्हावी अशी आईला खूप इच्छा होती. पण ती पूर्ण झालीच नाही.

डॅडींनी आपलं फिरणं गावात आल्यानंतरदेखील सुरू ठेवलं होतं. भवानीनगरची लोकवस्ती तेव्हा वाढलेली नव्हतीच. दहाएक मिनिटं चालत गेलं दक्षिणेला की माळ लागायचा. या माळावरच डॅडींचं 'रनिंग व्हाइल वॉकिंग' सुरू झालं. आमच्या घरात तेव्हा लक्ष्मीचा संचार सुरू होता. लहानसहान खटल्यात डॅडी आपलं वकीलपत्र दाखल करीत नसत, फौजदारी असेल तर खून किंवा खुनाचा प्रयत्न, दरोडा, भारी स्वरूपाची मारामारी असल्या खटल्यात आणि दिवाणी असेल तर पंचवीस हजारांच्या पुढचे दावे! फालतू केसेसमध्ये ते वकीलपत्र घेत नसत. डॅडींनी वकीलपत्र घेतलं की फासावरून गुन्हेगाराची सुटका झालीच म्हणून समजावं असा बोलबाला झाला होता.

डॅडींचं अस्खलित इंग्रजी, त्यात त्यांचं इंग्लिश आणि अमेरिकन कायदेविषयक मासिकांचं वाचन, यामुळं त्यांचं कायद्याचं ज्ञान अगदी 'अपटुडेट' होतं. कितीही क्लिष्ट केस असली तरी डॅडी पाचच मिनिटात तिचं भाकीत करीत. एखादी खुनी केस वाईट असली तर ते पक्षकाराला स्पष्ट सांगत, 'केस अतिशय वाईट आहे. फाशी होण्याची शक्यता आहे. पण फाशीवरून जन्मठेप जरी झाली तरी सुटलास असं समज.' वास्तविक पहाता असं कोणी वकील सांगत नाहीत. पण डॅडींचं 'प्रोफोशनल मॉरल' इतकं उंच होतं की त्यांच्या स्पष्टवक्तेपणानं कधीही पक्षकार नाराज होत नसत.

मी वकील व्हावं ही डॅडींची फार इच्छा! माझ्याबद्दल तशी अपेक्षा बाळगण्यात त्यांची तरी काय चूक होती? वर्गात माझ्याइतकं इंग्रजी कोणाचंच चांगलं नव्हतं. इंग्रजीच्या सरांनासुद्धा माझ्याशी बोलताना थोडंसं कचरल्यासारखं वाटे! पण बाकीच्या विषयांचं काय? या हातांनी आजपर्यंत मी चारसहा लाखांवर उलाढाल केली असेल; पण दोन आकड्यांचा गुणाकार-भागाकार मला कधी जमला नाही. मला येत होती फक्त बेरीज! पण पैसे कमवताना तीदेखील मी करायच्या भानगडीत पडलो नाही. येतील ते पैसे माझे, जातील ते माझे नव्हते, असा अगदी साधासरळ हिशेब होता.

मॅट्रिकचा उंबरठा ओलांडून मी कॉलेजात प्रवेश केला. कॉलेजात पहिल्या दिवशी जाण्यापूर्वी मी माझ्या ओठावरच्या तुरळक मिशांचा कट मारला. ओठावर दोन्ही बाजूंना दोन खंजीर कोरले. कॉलेजला जाण्यापूर्वी डॅडींच्या आणि आईच्या पायांवर डोकं ठेवलं. डॅडींनी मला

उठवून सरळ माझ्या गालाचं चुंबनच घेतलं इंग्रजी संस्कार त्यांच्या वागण्यात भिनले होते ना! पण मला त्याचंही काही वाटलं नसतं! आश्चर्य वाटलं ते सकाळी डॅडींच्या तोंडाला व्हिस्कीचा वास आला म्हणून!

डॅडी सकाळी कधीच मद्य घेत नसत. पण जसजसा अफाट पैसा मिळत गेला तसा डॅडींच्या नियमबद्ध वागण्यात आम्हाला फरक जाणवू लागला. लक्ष्मी प्रसन्न होते, माणूस सुखावतो, पण ती नको इतक्या प्रमाणात प्रसन्न झाली की ऱ्हास जवळ आला असं बेशक समजावं! हे तत्त्वज्ञान मला मूर्खाला आता विकलांग अवस्था झाल्यानंतर सुचायला लागलंय्!

त्या दिवशी महालक्ष्मीवर मी 'किंग सालोमन' या घोड्यावर सातशे रुपये विनला लावले होते. घोडा अगदी फडतूस होता; पण त्यावर बसणारा जॉकी विलास यानं आदल्या रात्री सांगितलं होतं, -

"समर, तुला उद्या जितकं खेळायचं असेल तितकं खेळ, किंग सालोमनला मी विन करणार!"

"काय, सांगतोस काय विल्या! अरे, साला बेकार आहे घोडं ते या सीझनला डिबार होईल आणि जाईल कुठल्यातरी 'स्टड' ला!"

"नो जोक्स समर! बी सीरियस, यू आर माय फ्रेंड अँड ए फ्रेंड वुइथ ए ग्लास! माझ्या ग्लासाला ग्लास भिडवून विलास म्हणाला.

"सो व्हॉट?" मी एक सिप घेऊन विचारलं. तेव्हा विलास म्हणाला "ए फ्रेंड वुइथ ए ग्लास इज ए फ्रेंड फर्स्ट क्लास!"

त्यानं पुढं केलेल्या हातावर मी टाळी दिली, तेव्हा त्याच्या हातातला ग्लास हिंदकळला. त्याच्या पँटवर थोडी व्हिस्की सांडली तेव्हा मी 'सॉरी' म्हणून दिलगिरी व्यक्त केली, तेव्हा तो हसतहसत म्हणाला, "समर, डोंट बी सॉरी, इट इज ए गुड ओमेन! दारू पिताना ग्लास फुटणं, दारू सांडणं हे शुभचिन्ह समजलं जातं!'

मी त्याला हसतहसत म्हणालो, "दारुड्यांचं हे असं नेहमीच होतं. म्हणून त्यांनी असा अर्थ लावला असेल!"

"आपण काय दारुडे आहोत?" विलासनं विचारलं.

"छे: छे:! मुळीसुद्धा नाही! जोपर्यंत दारू आपणाला पीत नाही तोवर आपल्याला दारुडे मुळीच म्हणता येणार नाही! पण 'किंग सॉलोमन नक्की ना?"

"हंड्रेड पर्सेंट!" विलासनं आपली दोन बोटं चुबूंन मला तर्जनी आणि मधल्या बोटाचा न्न् करून दाखवला.

दुसऱ्या दिवशी मी विलास बसलेल्या घोड्यावर सातशे रुपये लावले. भाव पडला एकशे ऐंशी. माझ्या सातशे रुपयांचे पंचवीस हजार दोनशे झाले. पण ते पैसे घेऊन मी सरळ कोर्सच्या बाहेर पडलो असतो तर? पण असं कधीच घडत नसतं. थोडेदेखील कष्ट न घेता प्रसन्न झालेली लक्ष्मी सोबत सूडाचा आसूड घेऊन येत असते. त्या सुरुवातीच्या पंचवीस हजारांनी मला पक्का रेस पंटर बनवलं.

माझं रेसचं जीवन तसं फार समृद्ध आहे. ही फक्त एक झलक सांगितली. सांगण्याचा उद्देश एवढाच की लक्ष्मी आमच्या घरी सूडाचा आसूड घेऊन आली होती. डॅडी पक्के दारुडे बनले. त्यांना सकाळी उठल्याउठल्या दोन पेग दिल्याशिवाय त्यांचे हात थरथरणे थांबेना. वकिली बोंबलली. प्रतिष्ठा गडगडली. 'ठाकूर वकील घातला कामात की काम उलटं झालंच म्हणून समजा' असं लोक अगदी उघड उघड बोलू लागले.

मी एफ. वाय. पास होऊन इंटरच्या वर्गात गेलो, तोच हा काळ.

-o-o-o-

२

कॉलेजमधे शिक्षणाकडे जरी फारसं लक्ष नसलं तरी बाकीच्या 'ॲक्टिव्हिटीज' मधे मी प्रामुख्यानं भाग घेत होतो. फुटबॉल हा माझा आवडता गेम. तसा मी क्रिकेट, टेनिस, बॅडमिंटनही खेळायचो; पण माझी विशेष ख्याती होती ती फुटबॉलमधेच!

घरी दुभतं भरपूर होतं. शेतातल्या बंगल्यात आईनं पाच-पन्नास कोंबड्या पाळल्या होत्या. रोज डझन दोन डझन अंडी पडायची. सकाळी उठल्यावर एका दमात दोन मैल पळून यायचो मी! अंगात पांढरा टी शर्ट आणि पांढरी हाफ पँट. कॅनव्हासचा शू आणि पायमोजेही पांढरेच! पळून आल्यानंतर कच्ची दोन अंडी घातलेलं ग्लासभर दूध!

त्या वेळी अंगात रग होती. कितीही वेळ फुटबॉलच्या मैदानावर धावलो तरी दमायला होत नसे. फुटबॉलचा खेळ हा आपल्या बाजूच्या खेळाडूंच्या साहाय्याने खेळायचा गेम असला तरी माझा खाक्या निराळाच! एकदा फुटबॉल माझ्या पायात सापडला की तो प्रतिपक्षाला काढून घेणंच अशक्य व्हायचं! माझ्या तावडीत सापडलेला बॉल मी झुकांड्या आणि हुलकावण्या देत अगदी विरुद्ध बाजूला नेऊन गोल मारेपर्यंत कोणाला स्पर्श करायची संधीच देत नसे! भवानीनगरच्या फुटबॉल-शौकिनांनी अनेक वेळा हे माझं कौशल्य पाह्यलं होतं; म्हणून ते मॅच पहायला यायचे. मला टीममधे बघितलं की म्हणायचे, 'समर आहे होय! मग संपलं! तो एक अर्धा डझन गोल्स मारणार विरुद्द बाजूवर!'

भवानीनगरला वर्षातून एकदा फुटबॉलचे सामने व्हायचे. गावोगावच्या टीम्स यायच्या, स्पर्धा रंगायच्या. पण शेवटी भवानीनगरची टीम शील्ड घेऊन बसायची! टीमचा कप्तान होता धोंडू मास्तर! धोंडू मास्तरनं माझ्यासारखी दहाबारा 'बांड' पोरं शिकवून तयार केली होती. सतत सहा वर्षं आम्ही शील्ड दुसऱ्याच्या हाती लागू दिलं नाही!

धोंडू मास्तरनं मला फुटबॉल शिकवला. त्यानं आणखीन एक गोष्ट मला शिकवली आणि ती म्हणजे मद्यपान!

मद्यपानाची मला घृणा होती. गटारात लोळत पडलेली माणसं पाहीली की मला त्यांची कीव यायची. साले का पितात मरायला समजत नसे! डॅडींनी मद्यपान करायला सुरुवात केल्यानं आमच्या घरचं स्वास्थ्य बिघडलं होतं, त्यामुळंही मला त्या गोष्टीचा मनापासून तिरस्कार वाटत असे. पण या धोंडू मास्तराच्या मनात काय आलं, कुणास ठाऊक! त्यानं आम्हाला एकदा जत्रेच्या जेवणाला नेलं, आणि जबरदस्तीनं पाजली. घशात जळजळत जाणारं ते द्रव पिताना मला मनस्वी किळस आली. मी धोंडू मास्तरला शिव्या घातल्या आणि न जेवता तिथून परत निघालो. पायाखाली रस्ता नीट दिसत नव्हता. डोकं भिरभिरल्यासारखं झालं होतं, तोल जात होता. मी कसाबसा घरापर्यंत येऊन पोहोचलो. दारावर थाप मारली. आईनं दार उघडलं. माझा तो अवतार पाहून तिनं कपाळावर हात बडवून घेतला अन् म्हणाली "समर, हे रे काय? घराण्याची धूळदाण करायचं ठरवलंय का रे तुम्ही बापलेकांनी?"

"नाही नाही! आई, त्या धोंडू मास्तरनं जबरदस्तीनं पाजली मला आज. यापुढं आयुष्यात स्पर्श करणार नाही. तुझी शप्पथ!"

आईनं मला घरात आणलं अन् जेवायला घातलं. मी जेवत होतो. काय जेवत होतो ते माझं मलाच समजत नव्हतं. पोटात आग पडल्यासारखी झाली होती. त्या वेळी आई डोळ्यांना पदर लावून रडत होती. वर डॅडी खूप पिऊन मोठमोठ्याने बडबडत होते. ते प्याले की त्यांना आपण कोर्टात आहोत असे वाटायचं. समोर न्यायाधीश बसलेला आहे असं समजून ते 'माय लॉर्ड, द विटनेस इज टेलिंग अ लाय! ही मस्ट नॉट हॅव सीन द इन्सिडेंट ॲट ऑल! माय क्लायंट इज

ॲबसोल्युटली इनोसंट! ही डिझर्व्हस ए क्लिन ॲक्विटल!' असं काही तरी हातवारे करून एकटेच बडबडत. मद्याच्या नशेतसुद्धा ते बोलताना कसलीही चूक करीत नसत! रात्री बारा दोन वाजेपर्यंत कधी कधी त्यांचं हे काल्पनिक खटल्याचं काम चालत असे.

शेजारीपाजारी म्हणायचे, 'ठाकूर वकिलाला लवकरच वेड लागणार! पण खरं वेड लागायची पाळी आली होती आईला! डॅडींची प्रॅक्टिस हळूहळू इतकी मंदावली की, महिन्याकाठी शेदोनशे रुपयेदेखील घरी येत नव्हते. धान्य येत होतं. आजोबांनी लावलेल्या आंब्याच्या झाडांचा दरवर्षी लिलाव व्हायचा त्याचे हजार दोन हजार रुपये यायचे, यावर आई कसातरी प्रपंचाचा गाडा चालवीत होती. पण डॅडींचा एकट्याचाच महिन्याचा खर्च होता चारशे रुपये! रोज व्हिस्कीची अर्धी बाटली लागायची! जेवायला इंग्लिश डिनर हवंच! त्यात काही कमतरता पडली की संपलंच : आकांड तांडव सुरू व्हायचं!

आई खरोखरच वैतागली होती. ती वारंवार मला म्हणायची, "बेटा समर, तू लौकर लौकर शिकून मोठा हो. माझ्या आयुष्यात जगण्यासारखं काही शिल्लक राह्यलेलं नाही. केवळ तुझ्यासाठी आणि या अमरसाठीच जगते आहे."

माझे मामा नारायणलाल परदेशी, नगरवरून अचानक आले. त्यांनी घरातला तो प्रकार पाह्यला आणि ते आईला म्हणाले, -

"रूपा, थोडे दिवस मुलांना घेऊन नगरला चल!"

"मी या घरातून एकदाच जाणार! राजक्षत्रियांचं ब्रीद विसरलास दादा? आपल्या घराण्यात मुलगी सासरी जाताना उभी जाते, तिथून बाहेर पडताना मात्र ती आडवी असते!"

"पण रूपा, तुझी ही दशा काय झालीय, बघ ना! त्यांना काल सांगितलं की, हे वागणं तुमच्यासारख्या बुद्धिमान माणसाला शोभत नाही तर म्हणाले, "तुमच्या दारात जोपर्यंत मी येत नाही, तोपर्यंत मला अक्कल शिकवण्याचा प्रयत्न करू नका!"

"तुम्ही जा दादा!" आई डोळे पुसत म्हणाली.

परत मामा भवानीनगरला आले नाहीत. पण त्यांनी नगरला गेल्यानंतर दोनशे रुपयाची एक मनिऑर्डर आईच्या नावे पाठवली होती. आईनं तीही स्वीकारली नाही. माझी आई म्हणजे गडकऱ्यांच्या सिंधूचाच दुसरा अवतार!

घरातलं हे वातावरण पाहून मला एकसारखं वाटू लागलं की, आपण आता लौकर कमवायला हवं!

शेताचं धान्य, डाळी, चवळी, मूग, मटकी, वर्षाला पुरेल इतकं घरी येऊन पडत होतं. कुशाप्पा नावाचा शेतावर ठेवलेला शेतकरी प्रामाणिकपणे ठरल्याप्रमाणे धनधान्य घरी आणून पोहोचते करत होता.

इंटरची परीक्षा अगदी दोन महिन्यांवर आलेली होती. मी सारी पुस्तकं पसरून तिसऱ्या मजल्यावरच्या माझ्या खोलीत कपाळाला हात लावून बसलो होतो. लॉजिक, इकॉनॉमिक्स हे विषय थापेबाजी करून लिहायचे नव्हेत, याची मला जाणीव होती. पहिल्या टर्ममधे फुटबॉलच्या टूर्नामेंटस्मुळं अभ्यास झाला नाही, दुसऱ्या टर्ममधे सुरुवातीपासूनच अभ्यास करायचं असं ठरवलं तर डॅडींनी घरात तो धुमाकूळ घालायला सुरुवात केलेली!

पास होणं तर अत्यावश्यक होतं. शेवटी डोक्यात ती योजना घोळू लागली. कॉपी करायची! महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं बारीक टोकानं कागदावर उतरवायला सुरुवात केली. त्यासाठी गाईडची पुस्तकं आणली. हा माझा उपद्व्याप कोणालाही पत्ता न लागू देता करीत होतो.

आमच्या कॉलेजची इमारत अतिप्रचंड आणि भव्य! राजे भीमदेव यांनी कॉलेजसाठी आपल्या जुन्या वाड्याचाच एक भाग देऊन टाकला होता. त्यांना शिक्षणाबद्दल आस्था होती. सर्व जातीजमातीच्या मुलांनी शिकावं म्हणून त्यांनी खासगीतून स्कॉलरशिप्स् सुरू केल्या होत्या. पण राजे भीमदेव गेल्यानंतर युवराज सत्त्वशील गादीवर आले. त्यांना शिक्षणाबद्दल आस्था नव्हती. युवराजांच्या भोवती वावरणाऱ्यांपैकी कोणी एखादा हुजऱ्यादेखील त्यांच्या गळ्यातला ताईत बनत

असे. डॅडींनी लीगल ॲडव्हायझरची नोकरी सोडल्यानंतर आमचा राजेशाहीशी असलेला संबंध जवळजवळ तुटल्यासारखाच झाला होता. पण माझं नाव राजे सत्त्वशील यांच्या कानांवर जात होते, ते माझ्या क्रीडानैपुण्यामुळे! माझी परीक्षा अगदी चार दिवसांवर आली असता मला अचानक राजवाड्यावरून बोलावणं आलं.

आई मला म्हणाली, "यांनी राजघराण्याशी असलेले संबंध तोडले; पण आता तू मात्र जोडण्याची संधी वाया घालवू नकोस. राजघराण्याशी असलेले संबंध तोडल्यामुळंच आपल्या घराण्याची ही अशी अवस्था झालीय!"

राजा हा देवाचा अंश असतो आणि राजाशी असलेले संबंध डॅडींनी तोडल्यामुळंच देवाची अवकृपा आपल्यावर झाली, अशी आईची भोळीभाबडी समजूत होती.

मी वाड्यावर गेलो. महाराजांचे चरण स्पर्शून बाजूला उभा राहिलो.

"सध्या काय चाललंय, समर?"

"इंटरमध्ये आहे, महाराज. चार दिवसांवर परीक्षा आली आहे!"

"येऊ दे. मी तुला एवढ्यासाठी बोलावलं होतं की, हिंदुस्थानातल्या सर्व संस्थानिकांनी रत्नापूरला क्रीडामहोत्सव भरवण्याचं निश्चित केलं आहे. आपल्या पॅलेसची फुटबॉलची टीम तुझ्या नेतृत्वाखाली पाठवायचा निर्णय घेतलाय आम्ही!"

"जी महाराज!"

"तुझी परीक्षा झाल्यानंतर तू प्रॅक्टिसला सुरुवात कर. शहरातल्या इतर टीममधून कोण-कोण खेळाडू निवडायचे ते तूच ठरव! खाजगीतून तुला लागेल तशी रक्कम देण्याबद्दल आजच मी कारभाऱ्यांना सांगत आहे!"

"जी महाराज!"

"प्रॅक्टिस इथं पॅलेसच्या मागच्या ग्राऊंडवर करीत जा. म्हणजे मलाही ती पहाता येईल."

"जी महाराज."

मी या दोन शब्दांखेरीज दुसरं काहीच बोलू शकत नव्हतो. संस्थानी जमान्याचा 'ग्लॅमर' ज्या कोणी जवळून पाह्यला असेल त्यांना तिथल्या वातावरणाची कल्पना येईल! राजाशी फार बोलणं असभ्य समजलं जात होतं!'

परीक्षेचा दिवस उजाडला. सकाळपासून माझी छाती धडधडत होती. तशी मी फक्त दोन विषयांतच कॉपी करायचं ठरवलं होतं. लॉजिक आणि इकॉनॉमिक्स! काही केलं तरी हे दोन विषय माझ्या टाळक्यात शिरत नव्हते. दुसऱ्या दिवशी लॉजिकच्या पेपरला मी शर्टाखाली लपवलेल्या चिठ्ठ्या बाहेर काढल्या आणि इकडेतिकडे पहात त्या प्रश्नपत्रिकेखाली धरून उतरायला सुरुवात केली. त्या दिवशीची लबाडी पचली. शेवटचा पेपर होता-अर्थशास्त्राचा!

पेपरला सुरुवात झाली. चिठ्ठ्या काढून प्रश्नपत्रिकेखाली धरून मी उतरवायला सुरुवात केली, इतक्यात मागून पाऊल न वाजता जमदग्नी प्रोफेसर माझ्याजवळ आले आणि शांतपणे म्हणाले,

"काय चाललंय्?"

माझ्या डोळ्यांसमोर चांदण्या दिसल्या. मी माझ्या समोरचे कागद क्षणार्धात गोळा केले आणि सरळ पेंडॉलच्या बाहेर धूम ठोकली. जमदग्नी ओरडले, "पकडा! पकडा ऽऽऽ!" दारावर कॉलेजचा पट्टेवाला जमादार बसला होता. तो हात पसरून आडवा उभा राह्यला. त्याला ढकलून देऊन मी कॉलेजच्या इमारतीमधून धावत सुटलो. जमादार साला तगडा होता. तो केवळ बेसावध होता म्हणूनच मी दारातून बाहेर पडू शकलो. पण जमादारानं स्वत:ला सावरलं आणि त्यानंही माझा पाठलाग करायला सुरुवात केली. मी पट्टीचा फुटबॉल प्लेअर! त्याच्या बापाला ऐकतो! मी पुढे तो मागे अशी शर्यत सुरू झाली. भवानीनगरमधील गल्लीबोळ मला पाठ, तसेच ते जमादारालाही ठाऊक होते. धावताधावता मी मागे वळून पहात होतो. अर्धा पाऊण मैल धावलो तरीही जमादार माझ्या मागे 'धरा! पकडा ऽऽऽ' असं ओरडत धावत होता.

रस्त्यावरचे लोक आश्चर्यचकित होऊन पहात होते. तसा मी अनेकांना परिचित होतो.

लोकांची दिशाभूल करण्यासाठी मीही पुढे पळतापळता ओरडत होतो, 'धरा ऽ पकडा ऽ!' हेतू एवढाच की, लोकांना वाटावं मीही कोणाला तरी पकडण्यासाठी धावतो आहे आणि तो जमादारही! मी ओरडतो तो बनाव आहे असा एका ठिकाणी थांबून जमादार खुलासा करू शकत नव्हता. पडवळांच्या बोळात मी जमादाराला झुकांडी दिली. बोळाच्या मधे पाच फुटांची भिंत होती. त्या भिंतीवरून मी पलीकडे सरळ हायजंप घेतली आणि विरुद्ध दिशेनं धावत सुटलो. जमादार दमाचा माणूस होता; पण त्याला ती भिंत एक उडीत पार करणं अशक्य होतं. तो भिंतीवर चढून उतरायला जेवढा वेळ लागला तेवढ्यात मी त्याच्या नजरेआड झालो आणि माझ्या घरामागच्या गल्लीत असलेल्या तालमीत शिरलो. या तालमीच्या आसपास मी ज्या टीममधून फुटबॉल खेळत होतो, तो पोरं रहात होती. मी तालमीत शिरलो तेव्हा त्या पोरांनी ओळखलं की, काही तरी भानगड झालीय. समरच्या मागे कोणीतरी लागलेलं आहे. ते तालमीच्या दाराजवळ उभे राह्यले. मी आत पिराची कापडं ठेवण्याचं कपाट होतं, त्या कपाटाआड दडून बसलो.

बाहेर संवाद चालला होता. दमछाक झालेला, घामानं उभा भिजलेला जमादार विचारीत होता,-

"ठाकुरांचा समर इकडे आला होता?"

"नाही! काय भानगड आहे?"

"परीक्षेच्या हॉलमधून पळाला आहे!"

"का?"

"कॉपी करताना जमदग्नी सरांनी त्याला पकडला म्हणून!"

"इकडे काही दिसला नाही. आम्ही इथंच बसलोय मघापासून!"

"च्या आयला! काय चमत्कारिक कार्ट आहे!"

असं म्हणत हात चोळीत जमादार परतला. इकडे परीक्षेच्या पेंडॉलमध्ये काय बोंबाबोंब झाली, कुणास ठाऊक! बऱ्याच वेळानंतर तालमीबाहेरची पोरं आत आली आणि मला विचारू लागली, "समर, काय भानगड ही?"

"काय झालं समजत नाही!" हातातल्या कागदांचे तुकडे करीत मी म्हणालो, "आता काय करायचं ते करू देत! निदान पुरावा तरी नष्ट झाला!"

रात्री घरी जाणं भाग होतं.

दहाच्या सुमारास मागच्या कट्ट्यावर चढून घरात आलो. माडीवर डॅडींचं कोर्ट भरलं होतं. मी आरोपी समजून ते माझी केस चालवत होते. पुराव्याअभावी कोणालाही शिक्षा देता येणार नाही, असं समोर बसलेल्या न्यायाधीशाला ते पटवून देत होते- अस्खलित इंग्रजीत, "In absence of any documentary evidence my son Samar can not be held guilty" हे शब्द मी स्पष्ट ऐकले.

स्वयंपाकघराच्या उंबऱ्यावर बसून आई मात्र रडत होती. मी हळूच तिच्याजवळ जाऊन उभा राह्यलो. आई समोर दिसताच मला अपराध्यासारखं वाटू लागलं. इतका वेळ त्या जमादाराला कसं फसवलं याचा आनंद चेहऱ्यावर होता, तो क्षणार्धात मावळला.

तिनं माझ्याकडं पाह्यलं आणि म्हणाली, "निदान तू तरी चांगले दिवस दाखवशील असं वाटलं होतं!" मान खाली घालून मी आईसमोर उभा होतो. पटकन् खाली वाकलो अन् आईचे पाय धरून म्हणालो,-

"आई चुकलो. यापुढं असं कध्धी कधी करणार नाही!"

"अरे, तुझा अभ्यास झाला नव्हता तर परीक्षेला बसायचं नव्हतंस! केवढी मानहानी पत्करायची वेळ आणलीस? प्रिन्सिपॉल, प्रोफेसर्स, कॉलेजांतली पाचपन्नास मुलं आली होती. हे सारं बघण्यापेक्षा डोळे मिटलेले बरं!"

"आई, सांगितलं ना! यापुढं असं करणार नाही!"

"पुढचं काही सांगू नकोस! जे घडलंय त्याचं काय? जा, त्या जमदग्नी प्रोफेसरांचे पाय धर. प्रिन्सिपॉलांची माफी माग!"

"आई, तेवढं सोडून काही सांग!" माझ्यातलं राजक्षत्रियाचं रक्त उसळून आलं होतं!

तेव्हा इंटरची परीक्षा युनिव्हर्सिटीची असायची! मी पँडॉलमधून पळून गेल्याचा प्रकार युनिव्हर्सिटीला कळवण्यात आला. त्या प्रकरणाची चौकशी झाली आणि मला कॉलेजातून दोन वर्ष रस्टिकेट करण्यात आलं.

आठ दिवस घरातून बाहेर पडलो नाही. जेवायला आईनं हाक मारली की तेवढा खाली यायचो. या प्रकरणात मला धीर दिला तो डॅडींनी! ते मला म्हणायचे,

"समर! मोह प्रत्येकाला होतो! तू परीक्षेत पास होण्यासाठी ते धाडस केलंस, पण फसलास! आता पुन्हा असा अभ्यास कर, दोन वर्षानंतर जेव्हा परीक्षेला बसशील तेव्हा फर्स्ट क्लास फर्स्ट यायला हवंय! तुझ्या अपमानाची भरपाई फक्त त्यामुळंच होऊ शकेल!"

"पण डॅडी, मला पुढं शिकायची इच्छा नाही!"

"मग काय करणार आहेस?"

"काहीही करतो, शेतीसुद्धा करायची तयारी आहे आता माझी!"

"पण तू पुढं शिकावंस असं वाटतं मला!"

त्या दिवशी दुपारी पॅलेसवरून मोटार आली. मला महाराजांनी बोलावणं केलं होतं.

मी गेलो. महाराजांचं दर्शन घेऊन बाजूला उभा राह्यलो. महाराज माझ्याकडे पाहून हसतहसत म्हणाले, "समर, कॉलेजात काय प्रकार झाला तो परवा?"

मी खाली मान घालून उभा.

"अरे, हे चालायचंच! पण तू प्रॅक्टिसला केव्हा सुरुवात करतोस? टूर्नामेंटस् अगदी महिन्यावर आल्या!"

"महाराज, माझी मन:स्थिती बरोबर नाही. आपण ती जबाबदारी दुसऱ्या कोणावर तरी सोपवावी!"

"अरे, तुझ्या मन:स्थितीला झालंय काय? तू असं कर. यापुढं घरी राहूच नकोस! इथंच रहा! आज आमच्याबरोबर शिकारीला चल! तू खेळाडूंची नावं सुचव. त्यांना बोलावून घेऊ आपण शिकारीवरून आल्यानंतर. तू इथंच राहून प्रॅक्टिस सुरू कर!"

मलाही घरात बसून कंटाळा आला होता. बाहेर दिसलो की जो तो बोटं दाखवून त्या प्रकारची चर्चा करणार होता. त्यापेक्षा महाराजांनी सुचवल्याप्रमाणे आपण काही दिवस पॅलेसवरच रहावं असं मी ठरवलं.

सत्त्वशील महाराज स्वत: जास्त शिकलेले नव्हते, किंवा त्यांच्या भोवताली वावरणाऱ्यांमधे कोणाला शिक्षणाबद्दल फारशी आस्था नव्हती. त्यामुळे परीक्षेच्या वेळी मी जो गाढवगोंधळ घातला होता त्याबद्दल कोणाला फारसं औत्सुक्य वाटत नव्हतं!

घरी आईला तसा निरोप धाडला. महाराजांबरोबर रावजीपूरच्या जंगलात शिकारी वँâपसोबत गेलो.

तिथं पठारावर तंबू ठोकण्यात आले होते. महाराजांच्या तंबूशेजारी आमचा पाचसहा जणांचा तंबू होता. खायचीप्यायची चंगळ होती. दुसऱ्या दिवशी सकाळी रानकाढे धनगर आले. जंगलात मोक्याच्या जागी बंदुक्ये बसविले. मीही एका चांगल्या सरीवर सिंगल बॅरल घेऊन बसलो.

दुरून रानकाढे धनगर 'हा: हा ऽ ऽ ऽ हू ऽ ऽ हू ऽ ऽ ऽ ऽ' करीता आमच्या रोखानं येत होते. हाकेवाल्यांची चाहूल लागताच जंगलातले रानकोंबडे, कस्तर वाळलेल्या पानांवरून तुरूतुरू धावत समोरून इकडून तिकडे धावू लागले. पण ज्या वेळी आपण मोठ्या शिकारीसाठी जातो तेव्हा लहान प्राण्यांवर बार टाकायचा नसतो; म्हणून कोंबडे-कस्तर यांच्याकडे दुर्लक्ष करून मोठ्या जनावरांची वाट पहात राह्यलो. इतक्यात माझ्या रोखानं मोठ्या जनावरांची चाहूल येऊ लागली. मी बंदूक रोखून आवाजाच्या दिशेनं नजर टाकली. माझ्या समोरून एक एक्कूल येत होता. भलामोठा, सुळे बाहेर आलेला. नेम धरून मी बार टाकला, त्यासरशी ते थोराड जनावर मोठ्यानं ओरडलं आणि पाय घासून जाग्यावरच आडवं झालं. सारे हाकेवाले, बंदूक्ये जमले. महाराजही

तिथं आले. त्यांनी माझ्या पाठीवर थाप देऊन म्हटलं,-

"भले बहाद्दूर! छान शिकार केलीस! तुझ्या आजोबांचीही निशाणबाजी अशीच होती!"

राजघराण्याशी तुटलेले संबंध पुनश्च प्रस्थापित होत होते. शिकार वँâपवरून परत आल्यानंतर मी फुटबॉलची पॅलेस टीम तयार केली, आणि प्रॅक्टिसला सुरुवात केली. अधून मधून घरी जात होतो. आईला माझ्या स्थित्यंतरानं बरं वाटत होतं. कॉपी प्रकरणात झालेली बदनामी मी हळूहळू विसरत चाललो होतो.

रत्नापूर हे भवानीनगरसारखंच एक छोटं संस्थान. तिथले राजे बरीच वर्षं इंग्लंडला वास्तव्य करून होते. त्यामुळे त्यांनी आपली कन्या रत्नप्रभा आणि राजकुमार अमरेंद्र या दोघांना शिकवण्यासाठी इंग्लिश शिक्षक नेमले होते. या रत्नापूरच्या राजांना संगीत आणि नृत्य या दोहोंबद्दल आकर्षण होतं. संस्थानांत क्रीडानैपुण्य दाखवणाऱ्या तरुण मुलांना खास शिष्यवृत्त्या देण्याची सोय होती.

कानडी प्रदेशात असलेल्या या राजघराण्याविषयी मला विशेष उत्सुकता होती. पण या राजघराण्याशी संबंध जोडण्याची संधी मला यापूर्वी कधीच मिळाली नव्हती, ती क्रिडामहोत्सवाच्या निमित्ताने लाभली.

रत्नापूरला जाण्यापूर्वी भवानीनगरच्या महाराजांनी मला जवळ बोलावून सांगितलं होतं,

"समर, रत्नापूरची फुटबॉल टीम ऑल इंडियात उजवी समजली जाते; पण या वेळी आपल्या टीमनं तिला पराजित करायला हवं! फायनलच्या दिवशी मी येईन!"

मी महाराजांचे चरण स्पर्शून म्हणालो, "हुजूर, आमची टीम जिद्दीनं लढेल!"

रत्नापूरच्या राजमहालमध्ये एका हाऊसमध्ये आमच्या टीमची उतरण्याची सोय केलेली होती. हाऊसच्या मागेच एक प्रचंड तलाव होता. या तलावाचं वैशिष्ट्य म्हणजे यात लाल आणि निळ्या रंगाची असंख्य कमळं उमललेली होती. पश्चिमेकडून येणारा वारा त्याचा मंदमधुर गंध घेऊन यायचा!

सामन्यांना सुरुवात झाली. रत्नापूरच्या महाराजांनी एक खास स्टेडियम बांधलेला होता. पॅव्हेलियनही होता. पॅव्हेलियनच्या डाव्या बाजूला एक शामियाना उभा करण्यात आला होता. यात राजघराण्यातील स्त्री-पुरुषांची बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. लॉटस् पाडण्यात आले. निरनिराळ्या संस्थानांतून फुटबॉलच्या टीम्स रत्नापुरला क्रीडामहोत्सवात भाग घेण्यासाठी आलेल्या होत्या, त्यात भवानीनगरची आणि रत्नापूरच्या महाराजांची एवढ्या दोनच टीम्स उजव्या होत्या. रत्नापूरच्या टीमचे कप्तान होते राजकुमार अमरेंद्र! भवानीनगरचा कप्तान मी!

सेमी-फायनलपर्यंत पोहोचायला भवानीनगरच्या टीमला फारसं कठीण गेलं नाही. रत्नापूरची टीमही सेमी-फायनलपर्यंत पोहोचली. त्या टीममध्ये बॉल पास ऑन करणारे एकापेक्षा एक सवाई खेळाडू होते. त्यांचं टीमवर्क बघण्यासारखं होतं. पेनल्टी कॉर्नरमधून सरळ गोलमधे बॉल मारण्यात राजकुमार अमरेंद्र तरबेज होते, तसेच प्रतिपक्षाच्या कक्षेत एखादा 'फाऊल' मिळाला तर अगदी हमखास गोल मारणाला हनिफ नावाचा एक उत्तम खेळाडू त्यांच्यात होता. शेवटी मी अपेक्षा केल्याप्रमाणे आमची आणि रत्नापूरची टीम फायनलपर्यंत येऊन पोहोचली. क्रीडामहोत्सवात कोणती टीम अजिंक्य ठरते याकडेच सर्वांचं लक्ष लागून राह्यलेलं होतं.

फायनलचा दिवस उजाडला. भवानीनगरवरून सत्त्वशील महाराज येऊन दाखल झाले. त्यांचा मुक्काम रत्नापूरच्या राजवाड्यात होता. त्या दिवशी सकाळी दहाच्या सुमारास महाराजांनी मला बोलावणं केलं. या अगोदरच्या मॅचेसमधे मी, माझं अन् माझ्या टीमचं कौशल्य रत्नापूरच्या फुटबॉल शौकिनांना दाखवलंच होतं; पण माझा खरा 'ठेवणी' तला खेळ मी बाहेर काढला नव्हता. तो फायनलला मी सर्वांना दाखवून चकित करणार होतो.

हुजऱ्यानं मला महाराज सत्त्वशील यांच्या दालनात आणून सोडलं. आत महाराज सत्त्वशील, राजकुमार अमरेंद्र आणि राजकन्या रत्नप्रभा चहा घेत बसली होती. बॉबकट केलेल्या नितळ कांतीच्या राजकन्या मला पाहून स्मित करून राजे सत्त्वशील यांना म्हणाल्या, "अंकल, तुम्ही कप्तान मात्र योग्य निवडलात!"

"कशावरून म्हणता?"

"मी खेळ पाह्यलाय तुमच्या टीमचा! हे फारच छान खेळतात!"

त्यावर राजे सत्त्वशील म्हणाले, "आज फायनल पहा, म्हणजे तुम्हाला याची खरी करामत दिसेल! तुमच्या खेळाडूंच्या पायाला बॉलचा स्पर्श होईल की नाही याची शंका आहे! एस्क्युज मी अमरेंद्र! आय ॲम फ्लॅटरिंग माय ओन कॅप्टन!

त्यावर राजकुमार अमरेंद्र हसून म्हणाले, "यांच्यात उत्तम खेळाडूचे काही गुण आहेत हे मी केव्हाच ओळखलंय. पण तरीही फायनलमध्ये तुमच्या टीमला फार 'टफ्' फाईट द्यावी लागणार आहे! अरे! हे काय, तुम्ही उभेच बसा ना!" राजकुमार मला म्हणाले.

राजकुमारीने आपल्या खांद्यावरच पदर सावरून आपली खुर्ची थोडी बाजूला सरकावली. पण राजे लोकांच्या खुर्चीला खुर्ची लावून आपण सामान्य लोकांनी कधीही बसू नये असं आजोबा सुमेरसिंग नेहमी म्हणायचे! मी खुर्चीवर बसायला तयारच नव्हतो.

राजकुमार अमरेंद्र आणि राजकुमारी या दोघांनीही आग्रह धरला, तेव्हा राजे सत्त्वशीलही म्हणाले, "सिट डाउन, समर!"

राजकन्येच्या बाजूच्या खुर्चीवर मी अंग चोरून अदबीनं बसलो. हुजऱ्यानं माझ्या मागून येऊन चहाचा कप भरला.

"मग काय समर, आज काय होणार?" सत्त्वशील राजांनी विचारलं.

मी फक्त हसलो आणि म्हणालो, "राजकुमारांची टीम फार पॉवरफुल आहे! स्वत: हुजूर पेनल्टी कॉर्नर मारण्यात पटाईत आहेत. तरीही आम्ही प्रयत्नांची शिकस्त करू!"

राजकन्या माझ्याकडे कौतुकानं पहात म्हणाल्या, "आजपर्यंत रत्नापूरच्या टीमला कोणी हरवू शकलेलं नाही. अंकल, तुम्ही हरणार असं गृहीत धरून चला. नाही तर उगाच नंतर नर्व्हस व्हाल!"

"ओ ऽ नो बेबी! इट इज ए गेम! नो वन कॅन प्रेडिक्ट! व्हिक्टरी ऑर डिफिट वुइल हॅव टु बी ॲक्सेप्टेड वुइथ स्पोर्टसमन स्पिरीट!"

राजकन्या हसत हसत म्हणाल्या, "आज मात्र खरी लढत पहायला मिळणार आहे!"

राजकन्येचं बोलणं, हसणं इतकं लाघवी होतं की एकसारखं त्यांच्याकडे पहात रहावं असं मला वाटत होतं; पण ते तिथं अशक्य होतं. राजघराण्यातील माणसाभोवती एक प्रकारचं तेजोवलय असतं की काय कुणास ठाऊक! त्यांच्याशी नजरेला नजर भिडवून बोलणं सामान्य जनांना शक्य होत नसे. त्यात त्या पडल्या तरुण आणि सुस्वरूप!

त्यांनी लावलेल्या उंची सेंटनं सारा महाल दरवळून राह्यला होता. गोऱ्या हातांची निमुळती नखं नेलपेंटनं रंगवलेली होती. ओठांवर फिक्कट गुलाबी लिपस्टिक फिरवलेली होती. मूळच्याच धनुष्याकृती भुवयांवरून आय-ब्रो पेन्सिल इतक्या कौशल्यानं फिरवलेली होती की, ती सहजरित्या कोणालाही ओळखता येणं शक्य नव्हतं!

"व्हॉट अबाउट शिकार, अमरेंद्र?" राजे सत्त्वशीलनी राजकुमारांना विचारलं.

"अलीकडे बरेच दिवस झाले, कुठं गेलो नाही. गेल्या महिन्यात बेबींनी एक चिंक मारला तेवढाच!"

"होय बेबी?"

"होऽ! अंकल, माझी बेंगलोरहून एक फ्रेंड आली होती. तिला शूटिंग पहायचं होतं; म्हणून घेऊन गेले होते. दिवसभर फिरले, पण या लोकांनी हरणं आणि चिंक असे बुजवून टाकले की, विचारू नका!" अमरेन्द्रकडे बोट दाखवून त्या म्हणाल्या.

"आम्ही बुजवले होय?"

"नाही तर काय? गाडी पाह्यली रे पाह्यली की चौफेर उधळतात! मला शेवटी रायफलनं रनिंग शॉट मारावा लागला!"

"पण मारला कसा सांगा ना?"

"इट वॉज ए नेक शॉट!" राजकुमारांनी डोळे मोठे करून म्हटलं.

"वंडरफुल! आपला क्रीडामहोत्सव आटोपला की एक दिवस शिकारीचा प्रोग्रॅम ठरवू! चिंक खाऊन बरेच दिवस झाले. चिंक पिकल!"

मी आपला त्यांच्या गप्पा ऐकत बसलो होतो, तोच राजे सत्त्वशील म्हणाले, "समर, यू कॅन गो, वुइश यू ऑल द लक!"

मी आमच्या वँâपवर परत आलो, तरीही राजकन्येची ती विनयशील सुस्वरूप मूर्ती नजरेसमोरून जात नव्हती! त्यांनी अंगावर फवारलेल्या सेंटचा गंध वँâपमधेहीं मला जाणवू लागला. या वेळी मी गद्धेपंचविशीत होतो. समोर दिसणारी प्रत्येक तरुण पोरगी सुस्वरूपच आहे असं वाटायला लावणारं ते वय! पण मी आजपर्यंत कधी फारसा पोरींचा विचार केलेला नव्हता. नाही म्हणायला आमच्या गावातल्या घरासमोर सावळ्या परटाची बिंदी माझ्याकडे पाहून उगीचच हसायची! मी डॅडींचे कपडे भट्टीला टाकायला जायचो तो अगदी दुपार गाठून, कारण त्या वेळी सावळ्या पाठीवर कापडाचं बोचकं घेऊन नदीला कपडे धुवायला गेलेला असे. बिंदी गोरी, किंचित भुऱ्या केसांची सतराअठरा वर्षांची, फारच आकर्षक होती. पण आमचं हे खानदान, आजोबांच्यापासून आमच्या घराण्याचा भवानीनगरातला हा दबदबा! बिंदीबद्दल मी मनांत काहीही येऊ देत नसे!

आज राजकन्या रत्नप्रभा यांना इतक्या जवळून पाह्यल्यापासून माझं चित्त चाळवल्यासारखं झालं होतं! मनात नको ते विचार येऊ लागले!

खोलीत कॉटवर पडलो. भिंतीवर एक कॅलेंडर होतं. पाण्यानं भरलेली कळशी डोक्यावर घेऊन चाललेल्या तरुणीचं चित्र! डोक्यावरच्या कळशीतलं पाणी तिच्या वक्ष:स्थलावर सांडल्यामुळं पातळ झिरझिरित पांढऱ्या साडीमधून तिच्या उरोजाची गोलाई स्पष्ट दिसत होती. मला त्या चित्रात राजकन्या दिसू लागली. छट्! काय मूर्ख आहेस! तुझ्या मनाचा कमकुवतपणा आहे!...बिंदी गरिबाची, परटाची मुलगी, म्हणून तू तिचा अधिक विचार करू शकत नाहीस!....इथं ही राजकन्या! एक तुझ्यापेक्षा खूप खाली; आणि एक अति उंचावर... एकसारखं केवळ बघत राह्यलास तर मान मोडून पडेल! मग मी कोणत्या मुलीविषयी विचार करायचा! तुझ्या बरोबरीच्या! तुझ्या घराण्याशी, संस्कृतीशी मिळत्याजुळत्या! पण अशी मला कुठं कधी भेटणार? भेटेल! थोडं थांब! अजून तू तुझ्या पायावर उभा नाहीस! परीक्षेत कॉपी करताना पकडला म्हणून दोन वर्ष कॉलेजातून तुझी हाकलपट्टी झालीय. बी. ए. हो. काहीतरी नोकरीधंद्याला लाग; आपोआप स्थळं चालून येतील! लग्न करता येईल!....परवा आई म्हणत होती, बारामतीच्या ईश्वरसिंगची मुलगी फार देखणी आहे. पुण्यात कॉलेजात शिकते! पण ती राजकन्येइतकी देखणी असेल?.... छट्! त्यांच्याइतकी सुंदर स्त्री मी अद्याप पाह्यलेली नाही!....

"अरे समर, पडून काय राह्यलास. ऊठ, तीन वाजायला आले. चारला फायनल सुरू होणार!" आमच्या टीममधल्या सुब्या सरनोबतनं मला हाक मारली नसती तर मी असाच किती वेळ विचार करत पडलो असतो, कुणास ठाऊक! उठलो आणि कपडे करायला सुरुवात केली. पण माझं चित्त विचलित झालं होतं. सुगंधी वलयात वावरणारी राजकन्या रत्नप्रभा डोळ्यांपुढून हलत नव्हती.

-o-o-o-

३

एका एका शहराचं वैशिष्ट्यच! एखादा खेळ म्हटला तर सारं शहर जमा होतं. कुस्ती म्हटली की कोल्हापुरातली माणसं वेडी होणार. क्रिकेट म्हटलं की मुंबईत पोरांपासून थोरांपर्यंत सर्वांनाच 'इंटरेस्ट'! रत्नापूरला फुटबॉलचं असंच भलतं वेड!

स्टेडियम अगदी 'जॅम पॅक्ड' झालं होतं. त्यात फायनल मॅच होणार होती ती रत्नापूर आणि भवानीनगर या दोन टीम्समधे! भवानीनगरचे महाराजच केवळ हा सामना पहायला आले होते असं नाही, तर भवानीनगर-वरून दोनतीनशे लोक ट्रक्समधून आलेले होते.

बरोबर चार वाजता दोन्ही टीम्स मैदानात अवतीर्ण झाल्या. मी महाराज सत्त्वशील बसलेल्या ठिकाणी जाऊन मुजरा करून त्यांचे आशीर्वाद घेतले. त्यांच्या शेजारी राजकन्या बसल्या होत्या. त्यांनी माझ्याकडे पाहून पुन्हा एक गोड स्मित केलं. त्यांच्या ओठांची हालचाल झाली. मला त्यांचे शब्द काही ऐकायला आले नाहीत; कारण ते मुद्दामच हळुवारपणे उच्चारले गेले असले पाहिजेत. पलीकडेच रत्नापूरच्या महाराणी आणि महाराज मॅच पहायला बसले होते. राजकन्येचा ओठांच्या हालचालींवरून मी ओळखलं की, त्या नक्कीच 'बेस्ट, ऑफ लक' म्हणाल्या असणार. आपला भाऊही रत्नापूरच्या टीमचा कप्तान असल्यामुळं त्यांना ते शब्द मोठ्यानं उच्चारणं योग्य वाटलं नसेल!

बरोबर चार वाजता मॅचला सुरुवात होत असल्याची शिटी पंचाने फुंकली. राजकुमार अमरेंद्र मॅच सुरू होण्यापूर्वी मला म्हणाले, "समर, बेस्ट ऑफ लक."

"द सेम टू यू, युवर हायनेस!" मीही अदबीनं म्हणालो.

मधे ठेवलेला बॉल राजकुमारांनी उंच उडवला. बघताबघता तो आमच्या बाजूला टोलवत नेला. त्या लोकांचं टीमवर्क उत्तम होतं हे मी ओळखलं होतं; पण तरीही इतका आक्रमक पवित्रा ते सुरुवातीपासून घेतील याची मला कल्पना नव्हती. मीही बॉलच्या मागोमाग धावत सुटलो आणि आमच्या गोलपासून वीस फुटांवर असलेल्या बॉलवर मी जो ताबा मिळवला तो थेट प्रतिपक्षाच्या गोलजवळ आणीपर्यंत कोणालाही बॉलला स्पर्श करू दिला नाही. मी गोल मारणार, इतक्यात पंचाने शिट्टी फुंकली आणि 'फाऊल दिला. तो का दिला हेच मला समजलं नाही. मी कोणत्याच खेळाडूच्या पायात पाय घातला नव्हता, अगर कोणत्याच नियमाचा भंग केला नव्हता. मग मी गोल मारण्याच्या ऐन मोक्याच्या वेळी पंचाने 'फाऊल का द्यावा हेच मला कळलं नाही; पण वाटलं, कदाचित पंचाची चूक झाली असेल.

परत बॉल आमच्या बाजूकडे उडवला गेला. परत मी त्यावर ताबा मिळवला आणि विरुद्ध बाजूच्या गोलपर्यंत नेला आणि ऐन गोल मारण्याच्या वेळी पंचाने माझ्याविरुद्ध परत 'फाऊल' दिला. या वेळी मात्र मला आमच्याविरुद्ध काहीतरी 'फाऊल प्ले' होतोय याची शंका आली. तिसऱ्या वेळीही तसंच घडलं, तेव्हा मात्र मला माझा क्रोध आवरता येणं अशक्य झालं. मी गोल मारायच्या वेळी नेमका तो पंच माझ्या कबजातून बॉल हिरावून घेण्यासाठी 'फाऊल' देतो आहे अशी खात्री झाल्यामुळं मी त्या पंचाच्या रोखानं धावलो आणि त्याला एक असा जोरदार ठोसा लगावला, की त्या सरशी तो पार आडवाच झाला ग्राऊंडवर!

अख्खा स्टेडियम आरडाओरडा करीत उभा राह्यला. रत्नापूरचे काही लोक मला मारण्यासाठी मैदानात घुसू लागले; पण बंदोबस्तावरच्या पोलिसांनी त्यांना आवरलं. राजकुमार अमरेंद्र यांनी माझ्या दंडाला धरून महाराजांसमोर आणून उभं केलं आणि म्हणाले, "डॅडी, लेट हिम गो बॅक! लोक फार चिडले आहेत. याला मारल्याशिवाय रहाणार नाहीत!"

त्या वेळी तोंडात पाइप धरलेले रत्नापूरचे महाराज शांत चित्तानं म्हणाले, "अमरेंद्र सोड

त्याला. त्याची काहीएक चूक नाही! तो अंपायर मूर्ख होता! जॉनला बोलवा!''

जॉन हा दक्षिण रेल्वेच्या टीमचा रिटायड कप्तान. तो मॅच पहायला शामियान्यात मागच्या बाजूला बसलेला होता. तो मैदानात आला. पुन्हा मॅचला सुरुवात झाली. पहिल्या अर्धा तासांत मी लागोपाठ नऊ गोल्स मारले. त्यांपैकी त्यांच्याकडून फक्त एकच गोल फेडला गेला. खेळ संपल्याची शिट्टी झाली. अन् माझी टीम आमच्या महाराजांना मुजरा करण्यासाठी धावलो, त्या वेळी रत्नापूरचे महाराज पुढं होऊन मला म्हणाले,-

''वेल डन समर! काँग्रॅच्युलेशन्स महाराज!'' भवानीनगरच्या महाराजांकडे वळून रत्नापूरचे महाराज म्हणाले. राजकुमारी माझ्याकडे पाहून पुन्हा एकदा स्मित करून राह्यल्या.

गेल्या दहा वर्षांची परंपरा मी मोडली होती. पंचाला ठोसा लगावल्यामुळं रत्नापूरचे महाराज माझ्यावर चिडतील, माझ्यावर शिस्तभंगाचा काहीतरी इलाज करतील, हा माझा अंदाज साफ चुकला होता.

रात्री रत्नापूरच्या राजवाड्यावर बडा खाना होता. मी भवानीनगरच्या महाराजांजवळ उभा होता, तोच रत्नापूरचे महाराज आमच्याजवळ आले आणि म्हणाले, ''समर! तुला एक विनंती आहे!''

''विनंती कसली करता महाराज? आपण आज्ञा करावी!'' मी अदबीनं म्हणालो.

''तुझ्या तोडीचा फुटबॉल प्लेअर मी अद्याप पाह्यलेला नाही!'' आमची पोरं टीमवर्क, पासिंग ऑन छान करतात; पण त्यांना तुझं कौशल्य जमणार नाही. तू थोडे दिवस इथं राहून आमच्या पोरांना मार्गदर्शन करशील तर बरं होईल!'' असं म्हणून त्यांनी आमच्या महाराजांच्याकडे पाह्यलं.

आमचे महाराज म्हणाले, ''हा उत्तम खेळाडू आहे; पण याचं डोकं किती तापट आहे, पाह्यलंत ना?''

''ओह! फर्गेट इट! आमचा तो पंचच नालायक होता. त्या वेळी यानं त्याला ठोसा लगावला नसता तर मीच माइकवर जाऊन अनाउन्स करणार होतो, त्याचे डिसिजन्स फॉल्टी आहेत म्हणून! स्पोर्टसमन् स्पिरीट म्हणून काही आहे की नाही? चुकीचंच वागला तो पंच! तू चांगली अद्दल घडवलीस त्याला, समर!''

मला वाटलं होतं की, गावोगावचे संस्थानिक मॅच पहायला जमले आहेत तिथं काही तमाशा नको म्हणून रत्नापूरचे महाराज शांत राह्यले. संध्याकाळी ते त्या प्रकाराबद्दल उखडतील. पण तसा काहीच प्रकार घडला नाही. उलट आपल्या टीमचा कोच म्हणून रत्नापूरला थोडं दिवस राहण्याची त्यांनी विनंती केली, तेव्हा मलाही कळून चुकलं की, महाराज जातिवंत खेळाडू आहेत. त्या रात्री किती स्कॉचच्या बाटल्या रिकाम्या झाल्या याची गणतीच नाही.

दुसऱ्या दिवशी पहाटेपासूनच पाहुणे मंडळी परत जायला सुरवात झाली. रत्नापूरच्या महाराजांच्या खास आग्रहास्तव मला फुटबॉल-कोच म्हणून काही दिवस रत्नापुरात रहाणं भाग पडलं. सत्त्वशील महाराजांना रत्नापूरच्या महाराजांनी मला ठेवून घेतल्याबद्दल अभिमान वाटला. दोन-तीन महिनेच मी इथं रहाणार होतो, त्यामुळं फारसं काही बिघडणार नव्हतं. शिवाय खेळाच्या मैदानावर मी तो प्रकार करूनही रत्नापूरच्या महाराजांनी मला ठेवून घेतल्यामुळं मलाही माझा गौरव झाल्यासारखं वाटत होतं. वँâपमधून माझं सामानसुमान पॅलेसवर नेण्यात आले. अगदी रॉयल गेस्ट म्हणून माझी व्यवस्था करण्यात आली. शिवाय दिमतीला दोन हुजरे! कशाचीही कमतरता नव्हती. जेवायला खाशा स्वाऱ्यांच्या सोबत!

कॅंपमधून निघताना मी ते जलभरणास निघालेल्या तरुणीच्या चित्राचं कॅलेंडर सोबत घेतलं होतं. ते मी पॅलेसमधल्या माझ्या खोलीत लटकावलं. त्या कॅलेंडरकडे पाह्यलं की, मला राजकुमारीची आठवण यायची!

रोज सकाळी आणि संध्याकाळी मी रत्नापूरच्या पॅलेस टीमला फुटबॉल खेळण्याचं शिक्षण देऊ लागलो. तशी ती टीम उत्तमच होती; पण माझं जे खास वैशिष्ट्य- एकाच खेळाडूनं पायातील बॉल न-सोडता प्रतिपक्षावर गोल मारणे, यातलं तंत्र त्यांना अवगत नव्हतं. राजकुमार

अमरेंद्र न चुकता प्रॅक्टिसला यायचे. राजकुमारींचाही सहवास अधूनमधून घडत होता, पण त्या वेळी तिथं महाराज किंवा राजकुमार तरी असायचे! हे दोघे कुठेतरी जावेत आणि राजकुमारीशी मनसोक्त बोलायला मिळावे असे एकसारखे वाटत होते. जेवणाच्या वेळी गप्पाविनोद चालत; पण त्यात राजकुमारी फारसा भाग घेत नसत. त्या दिवसेंदिवस अबोल होत होत्या. महाराज त्या दिवशी संध्याकाळी त्यांना म्हणाले, "व्हॉटस् रॉंग वुइथ यू, रत्ना?"

"नथिंग डॅडी!"

"यू आर लार्इंग. अमरेंद्र, तुम्हाला नाही वाटत या आताशी अबोल रहातात?"

"मी त्यांना दोनचार वेळा विचारलंसुद्धा त्याबद्दल!" राजकुमार म्हणाले.

"आपण असं करू!"

"कसं?"

"लेट अस गो टु बॉम्बे फॉर ए चेंज!"

"हा ऽ! मग यांना त्यांच्या मैत्रिणींना भेटता येईल!"

"शिवाय माझीही बरीच कामं पडून आहेत मुंबईची!"

राजकुमारी खाली पाहून जेवत होत्या. पण जेवणांत त्यांचं लक्ष नसल्यासारखं दिसत होतं. मुंबईला जायच्या त्या प्रस्तावातदेखील त्यांना रस वाटत नसावा, असं मला भासत होतं. राजकुमारींच्या बाबतीत सलगी दाखवून काही बोलणं मला शक्य नव्हतं. मी आपला त्या बापलेकांचं बोलणं स्वस्थ राहून ऐकत असे.

पुडिंगचे बाउल्स बटलरने टेबलावर आणून ठेवल्यावर महाराज मला म्हणाले,-

"समर, काल मी आमच्या टीमचा खेळ बघितला, फार जोरदार तयारी करून घेतली आहेस तू! तुझ्या टीमला सवाई ठरणार अशी लक्षणं दिसतात!"

"हुजूर! आपल्या टीमकडून माझ्या टीमचा आता पराभव जरी झाला तरी मी तो माझा गौरवच समजेन! शिष्यानं गुरूचा पराजय केला तर गुरूला धन्यताच वाटते!"

"दॅटस इट! तुला याबद्दल मानधन किती द्यायचं?"

"मानधनाच्या अपेक्षेनं मी इथं राह्यलो नव्हतो, हुजूर!"

"पण तुझ्या श्रमांचा योग्य असा मोबदला तरी द्यायला हवा ना?"

"आपण, राजकुमार आणि राजकुमारीजी यांचा दयालोभ लाभला यातच मला सर्व काही मिळाल्यासारखं आहे, महाराज!"

आमचं बोलणं चालू असताना पुडिंग अर्धच टाकून राजकुमारी उठल्या आणि म्हणाल्या,-

"डॅडी, एक्सक्यूज मी, आय ॲम हॅविंग सीव्हियर हेडेक!"

"ओ ऽ! एकाएकी डोकं कशानं चढलं?"

"काही समजत नाही! जाते मी!"

राजकुमारी आपल्या दालनाकडे निघून गेल्या.

महाराज राजकुमारकडे पहात म्हणाले, "समथिंग इज रॉंग वुइथ हर!"

"असं वाटतंय खरं आताशी! उद्या सकाळीच निघू डॅडी!"

"ओ ऽ के! समरला जाता जाता भवानीनगरला सोडून पुढं जाऊ!" महाराज म्हणाले.

त्या दोघांचा निरोप घेऊन मी माझ्या खोलीवर आलो. मलाही अस्वस्थता जाणवू लागली. राजकुमारींना काय झालं असावं? एकाएकी त्यांचं डोकं का दुखू लागलं! का मी इथून जाणार म्हणून त्यांना तसं वाटलं?.... पण कशावरून तू हे अनुमान काढतोस? तुझं-त्यांचं एकदातरी संभाषण झालंय का?....उगाच नसत्या कल्पना उराशी कवटाळण्यात काय अर्थ आहे?....

मी कॅलेंडरवर नजर रोखली त्या युवतीच्या ठिकाणी मला राजकुमारींची प्रतिमा दिसू लागली. रत्नापुराबद्दल नाही म्हटलं तरी मला आपुलकी वाटू लागली होती. महाराज आणि राजकुमार दोघेही माझ्याशी मनमोकळेपणानं वागत होते. रत्नापूरचा निरोप घेताना अक्षरश: दु:ख वाटत होतं. बऱ्याच उशिरा डोळा लागला. सकाळी सहा वाजता महाराज, राजकुमार, राजकुमारी यांच्यासमवेत जायचं असल्यानं पहाटे लवकर उठणं भाग होतं. पण मध्यरात्रीपर्यंत डोळ्याला

डोळा लागला नाही!

मी अर्धवट झोपेत असताना कोणीतरी माझ्या अंगावरचं ब्लँकेट ओढल्याचा भास झाला. मी डोळे उघडले. खिडकीतून पडलेल्या चंद्रप्रकाशात मला राजकुमारी दिसल्या. क्षणभर हातापायातून वीज गेल्यासारखे झाले. त्यांनी माझ्या अंगावरचं ब्लँकेट ओढून बाजूला फेकलं आणि त्या हलक्या आवाजात म्हणाल्या,-

"समर, ऊठ, कपडे कर आणि माझ्याबरोबर चल!"

"कुठं!"

"तुला पहाटेच्या आत इथून बाहेर पडायला हवं!"

"पण का?"

"का ते सांगायलादेखील सवड नाही. ऊठ. हरी अप!"

मी पँट, शर्ट चढवला. त्या तशाच खिडकीतून चंद्रबिंबाकडे पहात उभ्या होत्या.

"पण उद्या सकाळी तुमच्यासोबत गाडीतून निघायचं होतं ना?"

"वेडा आहेस! ते सगळं नाटक होतं. तू आमच्या टीमचा पराभव केलास, त्याबद्दल तुझ्यावर सूड घ्यायचा होता डॅडींना!"

"काय सांगता काय?"

"तुला विश्वासात घेऊन मगच त्यांना विश्वासघात करायचा होता!"

"पण-" माझ्या तोंडून भीतीनं शब्दच उमटेनासा झाला.

"तू इथं आनंदात आहेस अशी पत्रं पाठवलीस ना भवानीनगरला?"

"हो, दोन महिन्यात सहा-सात पत्रं पाठवलीत आईला, मित्रांना!"

"तेच हवं होतं डॅडींना. तू इथं मजेत आहेस असंच त्यांना भासवायचं होतं! कम ऑन, फॉलो मी!"

अंधारातून मी राजकुमारींच्या मागोमाग निघालो. हातापायात त्राण नसल्यासारखं झालं होतं. घशाला कोरड पडली होती. महाराज इतके कारस्थानी असतील, याची मला यत्किंचितही कल्पना आलेली नव्हती. तसं वाटण्यासारखं त्यांचं वर्तनही घडलेलं नव्हतं. पण इंग्लडमध्ये इतकी वर्षं वास्तव्य केलेल्या रत्नापूरच्या महाराजांनी इंग्रजी नीती इतकी आत्मसात केली असेल याची माझ्यासारख्या खेळाडूला कल्पना करता येणंच अशक्य होतं.

राजप्रासादाच्या तिसऱ्या मजल्यावर बरोबर विरुद्ध बाजूला राजकन्येचं दालन होतं. त्या दालनात दोन दासी उभ्या होत्या. एकीजवळ मोठा दोरखंड होता. मला वाटलं, तो खाली उतरण्यासाठी राजकन्येनं आणवला आहे. पण तसं नव्हतं. तो महाराजांची दिशाभूल करण्यासाठी त्यांनी आणला होता. एका दासीला राजकन्येनं सांगितलं, "जा आणि यांच्या खिडकीच्या गजाला एक टोक बांध आणि दुसरं हळूच खाली सोडून दे! अगोदर खालची चाहूल घे!"

ती दासी दोरखंड घेऊन गेल्यावर राजकन्या माझ्याकडे पाहून म्हणाल्या,-

"तुला साडी नेसता येते?"

"साडी?" मी नकारार्थी मान हलवून म्हणालो, "नाही!"

त्यासरशी राजकन्येनं दुसऱ्या दासीला मला साडी नेसवण्याची खूण केली. राजकन्येच्या डोळ्यांत विलक्षण तेज दिसत होतं.

माझ्या कमरेभोवती दासी साडी गुंडाळत असताना त्या म्हणाल्या, "पहाटे चार वाजता या दोघींची ड्यूटी संपते. त्या वाड्याच्या मुख्य प्रवेशद्वारातून जातात! तू हिच्यासोबत जायचं! पण डोक्यावरचा पदर ढळणार नाही याची दक्षता घे; नाहीतर तुझ्यासोबत माझीही शंभर वर्षं भरलीच म्हणून समज! शिवाय इथून बाहेर पडल्यानंतर मी तुझ्या सुटकेसाठी हे दिव्य केलं हे कुणालाही समजता कामा नये! खुद्द तुझ्या आईवडलांनासुद्धा!"

"नाही नाही राजकुमारीजी, यातलं अवाक्षरदेखील कुणाला सांगणार नाही!"

"वाड्याच्या बाहेर या माझ्या दासीचा भाऊ आहे, तो तुला स्टेशनचा रस्ता दाखवील. स्टेशन इथून साडेतीन मैल दूर आहे. बरोबर पाच वाजता ट्रेन स्टेशनवर येते. एकदा तू स्टेशनच्या

आवारात पोहोचलास की तुला पकडायची कुणाला हिम्मत होणार नाही. स्टेशन, ब्रिटिश इंडियाची हद्द मानली जाते! जा, बेस्ट ऑफ लक!''

मी राजकन्येचे पाय धरण्यासाठी वाकलो, तेव्हा त्या किंचित् रागावून म्हणाल्या, ''तुला सांगितलेलं विसरलास? मला माझे पाय स्पर्शिलेलं आवडत नाही!''

राजकन्येनं माझ्या हातात एक पाकीट ठेवलं.

''हे काय, बेबीराजे!''

''पैसे! तुला भवानीनगरला पोहोचायला पुरेसे होतील इतकेच आहेत!''

भावनाविवशतेनं माझे डोळे भरले होते. राजकन्या एखाद्या देवदूतासारख्या माझ्या सुटकेसाठी धावून आल्या होत्या. देवडीवरच्या पहारेकऱ्यानं आम्हाला पाहून दार उघडलं. आम्ही दारातून बाहेर पडताच त्यानं दार बंद करून घेतलं. मी सुटकेचा निश्वास सोडला.

बाहेर अजून अंधार होता. माझ्यासोबत आलेली दासी पहिल्यांदा माझ्याशी बोलली,-

''एक महिना झाला, आक्कासाहेब बेचैन होत्या!''

''का?''

''महाराज तुमचा असा घात करणार आहेत याची त्यांना कुणकुण लागली होती!

''तरीच त्या जेवताना फारशा कुणाशी बोलत नव्हत्या!''

इतक्यात समोरून एक तरुण आला. दासी त्याला म्हणाली, ''वाकड्या, वडावरून यांना स्टेशनच्या वाटेला लाव! तू जाऊ नकोस; कोणीतरी बघेल!'' मी त्या दासीचे आभार मानून म्हटलं, ''तुमच्या आक्कासाहेबांना मुजरा सांगा!''

''सांगते सांगते! पण जा तुम्ही आता.''

अंधारात मला त्या तरुणाचा धड चेहराही दिसत नव्हता. साडेतीन-पावणेचार वाजले होते. आकाश तारांनी भरलेलं होतं. हवेत किंचित् गारवा होता. रत्नापूरच्या बाहेर पडेपर्यंत मला त्या तरुणानं कोणत्या आडवाडेनं नेलं याचा पत्ताच लागत नव्हता. रस्त्यावर आल्यावर माझ्या पँटभोवताली गुंडाळलेली साडी काढून मी त्या तरुणाच्या हाती देत म्हणालो, ''फार उपकार झाले तुम्हा लोकांचे!''

तो काहीएक बोलला नाही. आयुष्यात पुन्हा भेटले की नाही, कुणास ठाऊक, असं वाटलं!

त्यानं दाखवलेल्या स्टेशनच्या वाटेवरून मी धावत सुटलो. धावण्याच्या सरावानं मला स्टेशन गाठणं फारसं कठीण गेलं नाही.

पावणेपाचच्या सुमारास मी स्टेशनवर येऊन पोहोचलो. तिथं फारशी गर्दी नव्हती. तरीही मी उजेडापासून दूर राहाण्याची खबरदारी घेतली. तिकिटाच्या खिडकीजवळ जाऊन मी तिकिट मागितलं, ''एक मिरज.''

तिकिट घेतलं. फलाटावर जिथं दाट अंधार होता तिथं येऊन मागे रत्नापूरच्या दिशेनं पाह्यलं. विजेचे दिवे लुकलुकत होते. राजप्रासादावरचा लाल दिवा मंगळासारखा दिसत होता. राजेलोक आपल्या राजवाड्यावर मुक्कामाला असले की असा लाल दिवा लावण्याची प्रथा आहे; पण मला मात्र त्या वेळी वाटलं, ''तो लाल दिवा या क्रूर आणि कारस्थानी वृत्तीच्या लोकांपासून सामान्यजनांना सावध रहाण्याचा इशारा आहे!'

बरोबर पाचच्या सुमारास दिव्याचा प्रखर झोत रुळावर टाकीत गाडी आली. मी इकडेतिकडे पहात एका डब्यात घुसलो. दोनतीन मिनिटांनी इंजिननं शिट्टी दिली. गाडी चालू लागली. मी सुटकेचा नि:श्वास सोडला.

डोळे मिटून मी एका कोपऱ्यात बसलो होतो. काही घटकांपूर्वी मी कुठं होता? तिथून बाहेर पडलो नसतो तर माझ्यावर कोणतं संकट ओढवणार होतं, याची कल्पनाच करवत नव्हती. राजकन्येच्या उपकाराचं ओझं घेऊन मी चाललो होतो. राजवाड्यात रहायला आल्यापासून त्या अबोल का दिसत होत्या, याचं गूढ आता मला उकललं होतं; पण आता तिथून मी पळून गेलो म्हटल्यावर काय होणार आहे याची मला कल्पनाच करता येईना. राजकन्येनं मला निसटून

जाण्यासाठी साह्य केलं म्हणून मी मनातल्या मनात प्रार्थना करीत होतो, 'त्यांना त्रास होऊ नये....'

भवानीनगरला पोहोचल्यानंतर राजवाड्यावर जावंसं वाटलं नाही. सारे राजेमहाराजे धोकेबाज आहेत असा माझा समज झाला होता. मनात अद्याप एक अस्पष्ट अशी शंका डोकावत होती. खरोखरच रत्नापूरच्या महाराजांनी माझ्या जीविताला अपाय करण्याचा कट रचला असेल का?

या प्रश्नाचं उत्तर मला भवानीनगरला पोहोचल्याच्या दिवशीच मिळालं.

रत्नापूरच्या महाराजांनी सत्त्वशील राजांना मी तिथून बाहेर पडण्याच्या अगोदर चार दिवस पत्र पाठवून कळवलं होतं, "समर, येथून एक-दोन दिवसांत परत येत आहे, त्यानं आमच्या टीमला अत्यंत शास्त्रोक्त असा फुटबॉल कसा खेळावा याचं शिक्षण दिलेलं आहे. त्याला इथं रहायला परवानगी दिल्याबद्दल आपले शतश: आभार." त्या पत्राचा अर्थ इतकाच होता की, दोन दिवसांनंतर माझं काहीतरी भलंबुरं करायचं आणि चौकशीला कोणी रत्नापूरला गेलेच तर त्याला सांगायचं, 'समर येथून परत गेला. तो जाणार असल्याचं आम्ही अगोदरच कळवलं होतं.'

आईच्या पायांवर डोकं ठेवताच मला ब्रह्मांड आठवलं. नकळत माझ्या डोळ्यांतून अश्रू ओघळले. माडीवर जाऊन मी डॅडींना भेटलो. आश्चर्य असं की, डॅडींनी काही दिवस प्यायची बंद केली होती. असेच अधूनमधून ते बंद करीत.

हातातलं 'इक्विडन्स ॲक्ट' चं पुस्तक बाजूला ठेवीत ते म्हणाले, "वेल डन समर! तू आपल्या भवानीनगरच्या टीमला अजिंक्यपद मिळवून दिलंस. तुलाच त्या लोकांनी 'कोच' म्हणून ठेवून घेतलं, यात तुझा नि आपल्याही महाराजांचा गौरव झालेला आहे!"

माझ्या अगदी ओठांवर आलं होतं, डॅडी, मला ठेवून घेण्यामागं रत्नापूरच्या राजाचा दुष्ट हेतू होता, केवळ राजकन्येच्या कृपेनं बचावलो. पण मी काहीच बोललो नाही. राजकन्येनं मला बजावून सांगितलं होतं, सुटकेसाठी मी प्रयत्न केला हे तुझ्या आईवडलांनादेखील कळता कामा नये!

मनातून राजेरजवाड्यांच्याबद्दल तिरस्कार वाटत असला तरी राजे सत्त्वशील यांना भेटून येणं भाग होतं. समर परत आला आहे आणि तो आपल्याला भेटायला का येत नाही, असं राजांना वाटायला नको म्हणून गेलो. त्या वेळी महाराज राजवाड्यासमोर 'पेगू' जातीच्या कोंबड्यांची झुंज पहात उभे होते. दोन्ही कोंबड्यांची शिरगुरी रक्तबंबाळ झाली होती. तरीही आपले इंगळासारख्या लाल-पिवळ्या डोळ्यांची उघडझाप करीत ते दोन पक्षी एकमेकावंर तुटून पडत होते. किंचित हवेत उडून पायाच्या टोकदार नखांनी परस्परांचे डोळे फोडायचा प्रयत्न करीत होते. मानेजवळची पंख रक्तानं लालकिरमिजी झाली होती. दोन निष्पाप प्राण्यांना चेतवून त्या पक्ष्यांची झुंज लावण्याचा हा षौक अगदी अमानुष असा होता. पण तो विचार तिथल्या कोणाच्याही खोबडीत शिरण्यासारखा नव्हता. शेवटी त्यातला एक कोंबडा वर्मी मार लागल्यामुळं जमिनीवर कोसळला. दुसरा विजेता त्याच्या छाताडावर उभा राहून चोचीनं त्याचे डोळे फोडू लागला. महाराजांच्या एका हुजऱ्यानं त्या विजयी कोंबड्याला उचलून समोर आणलं. महाराजांनी त्याच्या पाठीवर हात फिरवला आणि म्हणाले,-

"भले बहाद्दर! याच्या मालकाला पाचशे रुपयांचं इनाम!"

तांबडा पटका बांधलेला, कधी काळी पैलवानकी केलेला शिरपा वस्ताद शेमला उडवीत पुढं आला आणि त्यानं राजांना मुजरा केला.

"शिरपा, पुढच्या खेपेला आमच्या पॅलेसमधल्या कोंबड्याशी तुझ्या या कोंबड्याची झुंज होईल! चांगली तयारी कर! आम्ही हरलो तर एक हजाराचं इनाम मिळवशील!"

शिरपानं शेमला गळ्याभोवती टाकला आणि तो अदबीनं म्हणाला, "महाराज, मी आणि माझा कोंबडा आपल्या अन्नावर जगलो, आपल्या कोंबड्याशी मी नाही झुंजायला देणार!" मला शिरपाचे ते बोल फार मार्मिक वाटले. राजे लोकांशी स्पर्धा केल्यानं सामान्य माणासावर कोणती आफत ओढवते, याचा मी नुकताच अनुभव घेतला होता.

महाराज वाड्यात निघाले, तेव्हा मी पुढं होऊन त्यांना मुजरा केला. क्षणभर त्यांनी माझ्याकडे पाह्यलं आणि म्हणाले, "केव्हा आलास?"

"काल!"

"आम्हाला वाटलं, तू रत्नापुरातच कायम वास्तव्य करतोस की काय! पण परवा तू येणार म्हणून पत्र होतंच महाराजांचं! तुझ्या घरीही निरोप पाठवला होता तसा!"

"समजलं मला!"

"आता आपल्याला हॉकीची टीम बनवायची आहे! जानेवारीत दिल्लीला सामने व्हायचे आहेत!"

"महाराज, मला आता खेळता येणं अशक्य आहे!"

"का?"

"मला नोकरी करायला हवी!"

"मी नोकरी देण्यास असमर्थ आहे असं वाटल की काय तुला?"

"तसं नाही, महाराज!"

"मग कसं?"

"मला नोकरीसाठी बाहेरगावी जायची इच्छा आहे. इथं त्या कॉपी प्रकरणापासून..."

"झक मारते ते कॉपी-प्रकरण! लोक विसरूनदेखील गेले!"

"पण मी विसरू शकत नाही, महाराज!"

"तू असं कर, इथंच रहा वाड्यांत! गावात फिरकूच नकोस!"

माझ्या अंगावर सर्रकन काटा फुलला. राजवाड्यात एक दिवसदेखील रहायचं नाही असं मी ठरवून टाकलं होतं. "पहातो विचार करून." असं म्हणून मी त्या दिवसापुरती तरी माझी सुटका करून घतली. पण महाराजांचं पुन्हा बोलावणं येणार, त्या वेळी त्यांना नकार कसा द्यायचा याचा विचार करण्यात मी चार दिवस घालवले. पाचव्या दिवशी मला ती बातमी वाचायला मिळाली: "सैन्यभरतीचे केंद्र भवानीनगर येथे सुरू! लायक सुशिक्षित तरुणांना सैन्यांत कमिशन देणार!"

मी डॅडींना तो पेपर दाखवून म्हटलं, "भवानीनगर सन्मानानं सोडण्याचा मला हा एकमेव मार्ग दिसतो आहे."

"गॉड ब्लेस यू! समर, माझा तुला पाठिंबा आहे! नाही तरी आपण मूळचे योद्धेच! युद्ध हेच आपलं कार्यक्षेत्र! आता संधी आली आहे ती तू दवडू नकोस र्!'

मी कमिशनसाठी अर्ज भरला. वर्तणुकीबद्दल पोलीस चौकशीला आला, तेव्हा पोलिसांनी माझ्या त्या कॉपी प्रकरणाचा उल्लेख केला. मला कॉलेजमधून 'रस्टिकेट' करण्यात आल्याचं नमूद केलं. मला इंटरव्ह्यूलादेखील बोलवणं येणं शक्य नव्हतं. मी डॅडींना ती अडचण सांगितली, तेव्हा ते फक्त हसले.

मी त्यांच्याकडे पहातच राह्यलो. ते शांत चित्तानं खुर्चीवरून उठले, काळा कोट चढवला आणि मला म्हणाले, "तयारी कर, जायचंय!"

"कुठं?"

"बेळगावला!"

"काय करायचं तिथं जाऊन?"

"तू चल तर खरा!"

मीही कपडे बदलले आणि डॅडींच्या समवेत बेळगावला गेलो. तिथं डॅडींनी सैन्यातल्या एका गोऱ्या अधिकाऱ्याच्या घरी मला नेलं.

डॅडींनी त्या गृहस्थाला प्रथम आपली ओळख करून दिली, "आय ॲम् ॲन एक्स-लीगल ॲडव्हायझर टु द् महाराजा ऑफ भवानीनगर! आय हॅव कम टु ट्रबल यू अ बीट फॉर माय सन समर!"

डॅडींनी माझ्याकडे बोट दाखवून त्यांना म्हटलं. डॅडींचं व्यक्तिमत्त्व फारसं भारदस्त नव्हतं.

पण त्यांच्या इंग्रजी बोलण्याची ढब अशी होती की, त्या जातिवंत इंग्रजाला "प्लीज कम इन सर, इट इज ए ग्रेट प्लेजर टु रिसीव्ह ए डिग्निटरी लाइक यू!" असं म्हणण्याशिवाय गत्यंतरच उरलं नाही.

डॅडींनी आजोबांपासूनचा आमचा इतिहास त्या साहेबाला अस्खलित इंग्रजीत कथन केला. राजक्षत्रियांची लढवय्यी वृत्ती सांगताना ते म्हणाले, "वुई आर बॉर्न सोल्जर्स बट द् सोशल स्ट्रक्चर इज बेसिकली चेंज्ड अँड वुई हॅव टु स्टिक टु अदर प्रोफेशन्स लाइक द वन् वुइच आय हॅव ॲक्सेप्टेड!"

साहेबाला डॅडींनी चांगलाच कह्यात घेतला आणि मग हळूच माझं ते कॉपी प्रकरण त्यांच्या कानांवर घातलं तेसुद्धा कसं तर त्याला कलाटणी देऊन! डॅडी म्हणाले, "त्या वर्षी मी आजारी, घरी कोणी पहाणारं नाही. शेतीपासूनचे सारे व्यवहार यालाच पहावे लागत होते. हा परीक्षेलाच बसत नाही म्हणत होता; पण याचे प्रिन्सिपॉल घरी आले आणि म्हणाले, "तू आमच्या कॉलेजचा स्पोर्टसमन! तू परीक्षेला बस, पास करायची जबाबदारी आमच्यावर!"

"त्यांच्या भीडेखातर हा बापडा बसला. पण आपल्याला काही लिहिता येणं शक्य नाही, म्हणून तो सरळ पँडॉलमधून उठून आला. त्या प्राध्यापकांनी उठवलं, कॉपी करताना पकडलं म्हणून! पण साहेब, एक ओळीचा-देखील लेखी पुरावा नाही हो त्यांच्याकडे! आता ती बाब युनिव्हर्सिटीच्या कक्षेतली होती, म्हणून मी चॅलेंज केली नाही. खरं सांगतो, मला ते प्रकरण कोर्टात नेण्याची फार इच्छा होती. पण म्हटलं, उगाच कशाला स्वत:ला मनस्ताप करून घ्यायचा? बाब तर अगदी क्षुल्लक होती! शिवाय आम्हाला शिकून कुठं प्रोफेसरकी मिळवायची होती! आम्ही जाणार सैन्यांत, नाही तर पोलिस खात्यांत!"

"यू आर परफेक्टली राइट! नाउ आय कॉट द पॉइंट!"

साहेबच तो! त्याला डॅडींचा तिथं जाण्याचा उद्देश समजला. डॅडींनी जाता जाता आणखी एक शक्कल लढवली, "हे पहा साहेब, सत्तावनच्या बंडांत आमचे आजोबा ब्रिटिशांच्या पाठीशी उभे होते. आज दुसऱ्या युद्धात माझा मुलगा मायबाप सरकारच्या मदतीला धावून जाण्याची इच्छा बाळगून आहे. पण त्यात असल्या कॉपी प्रकरणासारख्या काही क्षुल्लक गोष्टींची अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे, म्हणून म्हणतो!"

"नो ऽ नो ऽ! नथिंग ऑफ द् सॉर्ट वुइल हॅपन. आय अश्युअर यू!"

साहेबानं जायच्या वेळी आम्हाला चहा आणि बिस्किटं दिली. डॅडी बंगल्यातून बाहेर पडल्यावर मला म्हणाले, "तुला कमिशन मिळालं असं समजून चाल, समर! तू तयारीलाच लाग!"

"पण डॅडी, तो पोलिसांचा रिपोर्ट?"

"तो गेला खड्ड्यात! हा साहेब कोण आहे, आहे का ठाऊक?"

"कोण?"

"हा आहे सगळ्या ऑफिसरांचा बाप! याच्या विरुद्ध जायची कोणाची हिम्मत नाही होणार!"

आम्ही परत जायला निघालो, तेव्हा डॅडींनी मला विचारलं, "रत्नापूरला बरेच दिवस रमलास?"

"रमलो कुठला? त्यांनीच ठेवून घेतलं!"

"बरं झालं, तिथून बाहेर पडलास! हे राजेरजवाडे मोठे चमत्कारिक असतात. यांच्या स्वभावाचा अंदाजच करता येत नाही. आज ज्याला डोक्यावर घेऊन नाचतील त्याला उद्या फटक्यांची सजा करतील. मी काही मूर्ख नव्हतो लीगल ॲडव्हायझरची नोकरी सोडायला!"

"पण डॅडी भवानीनगरचे महाराज माझ्या सैन्यभरतीला प्रोत्साहन देतील असं वाटलं होतं मला!"

"वेडा आहेस! अरे समर, त्यांना तुझं ते कॉपीप्रकरण दडपता येणं अशक्य होतं का? पण नाही, पोलिसांच्या अहवालात ते त्यांनी अगदी आग्रहानं नमूद करायला सांगितलं असेल!"

"असं का करावं त्यांनी?"

"या राजेरजवाड्यांना आपण ब्रिटिश सरकारशी फार एकनिष्ठ आहोत असं भासवण्यात फार प्रौढी वाटते. शिवाय तुझ्यासारखा अष्टपैलू खेळाडू गमावण्याची इच्छा त्यांना होईल का सांग? तू अजून बच्चा आहेस. तुला ते शास्त्र कळायचं नाही! पूर्वीचे राजेमहाराजे मोठ्या मनाचे होते. त्यांची दानत काय होती!"

"हे मात्र खरं!" माझ्या अगदी ओठांवर आलं होतं, डॅडींना सांगावं रत्नापुरांत घडलेला प्रकार; पण राजकन्येला वचन दिल्यामुळं गप्प बसलो.

परत आल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी माझ्या मित्रांना भेटून सांगितलं, 'लवकरच मी मिलिट्रीत जाणार. किंग्ज कमिशन मिळेल!' त्यांना मी भवानीनगर सोडून जाण्याची कल्पना काही पटेना. महाराष्ट्रीय माणसाच्या रक्तांतला हा फार मोठा दुर्गुण! आपलं गाव सोडून जायला नको!

मी अपेक्षा केल्याप्रमाणे मला किंग्ज कमिशन मिळाल्याची तार आली.

समर धीरजसिंग ठाकूर सेकंड लेफ्टनंट म्हणून सैन्यांत भरती झालो. ट्रेनिंगसाठी पुण्याला पोस्टिंग करण्यात आलं.

स्थानिक वृत्तपत्रातून माझ्या फोटोसह ती बातमी प्रसिद्ध झाली अन् आश्चर्य असं की, माझे अभिनंदन करायला प्रथम आले ते महाराज!

डॅडी म्हणत होते ते मात्र पटलं. या राजेलोकांचा कोणालाच कधी अंदाज करता येत नव्हता. मला कमिशन मिळू नये यासाठी प्रयत्नशील असलेल्या महाराजांनीच प्रथम येऊन माझं अभिनंदन करावं हे मला विचित्र वाटलं. पण दारात गाडी आल्यानंतर पुढं जाऊन वाकून त्यांना मुजरा केल्याशिवाय दुसरा मार्गच नव्हता.

-o-o-o-

४

रेंज हिल येथे मिलिट्री ट्रेनिंग सेंटर होते. ऑफिसर्स क्वार्टर्सशेजारी ऑफिसर्स मेस होते. पलीकडे जवानांसाठी 'बराकी' होत्या.

रोज पहाटे पाचला ब्युगल व्हायचा. ब्युगल झाल्यापासून एक तासात आम्हाला पी. टी. साठी ग्राऊंडवर फॉलोइन करावं लागत होतं. अंगात पांढरे बनियन आणि पांढरी पँट घालून माझ्याप्रमाणं भारतातल्या अनेक भागातून आलेले ऑफिसर्स आणि जवान यांची सांघिक कवायत सुरू व्हायची.

या ट्रेनिंग सेंटरमधे प्रत्यक्ष आघाडीवर असताना कोणकोणत्या संघटनांना तोंड द्यावं लागतं, त्यावर कशी मात करायची, याचंही अगदी शास्त्रोक्त शिक्षण दिलं जात होतं. उंच भिंतीवर दोराच्या साहाय्यनं चढणं, उंचावरून उडी मारणं, खड्डे खणणं, निशाणबाजी, इत्यादि अनेक प्रकारचे युद्धविषयक धडे देत असताना, रोज संध्याकाळी ग्राउंडवर स्पोर्टसाठीही हजर रहावं लागत होतं. स्पोर्ट म्हटलं की माझी चर्या एकदम खुलत असे. त्यातल्या त्यात फुटबॉल म्हटलं की काही विचारू नका! अल्पावधीतच मी माझ्या फुटबॉलमधील कौशल्यानं सर्वांना चकित करून सोडले. भवानीनगरला लहानपणापासून जोपासलेल्या माझ्या फुटबॉल खेळण्याच्या या छंदानं युनिटमधे मला लोकप्रिय केले. लेफ्टनंट समर ठाकूर ज्या टीममधून खेळतो ती टीम नक्कीच विजयी होणार असे सर्वांना वाटू लागले. सकस आहार, मिलिट्रीची शिस्त आणि डोक्याला कसलीच विवंचना नाही, यामुळं मजबूत असलेली माझी शरीरयष्टी अधिकच भक्कम झाली.

ट्रेनिंग चालू असताना रोज रात्री मेसमधे जेवणासाठी जावं लागे. तिथं मद्याचा सुकाळ! न पिणं हा मागासलेपणा मानला जायचा! पण मी आईसमोर शप्पथ घेतली होती, मद्याला आयुष्यात स्पर्श करणार नाही म्हणून. मला धोंडू मास्तरानं प्रथम पाजली. त्या दिवशी मी जो गाढवगोंधळ घातला होता तो विसरलो नव्हतो. शिवाय मद्याच्या अतिरेकामुळे डॅडींच्यासारख्या बुद्धिमान कायदेपंडिताचा मध्यंतरी ऱ्हास झाल्याची घटना डोळ्यांपुढून जायला तयार नव्हती. तेव्हा ज्या वेळी मला मेसमधे ड्रिंक्सचा आग्रह व्हायचा तेव्हा मी माझ्या सहकाऱ्यांना हात जोडून विनवीत होतो, "मेहेरबानी करा आणि माझ्यावर ही एवढी सक्ती करू नका."

कोणी मला 'कॉवर्ड' ठरवले, तर कोणी अर्वाच्य शब्दांत माझी टिंगल करायलाही मागेपुढे पाह्यले नाही. पण असा निर्धार किती दिवस मी भक्कम ठेवणार? रोज संध्याकाळी क्लबमधे मी एका कोपऱ्यात बसायचो, ते सारे ऑफिसर्स व्हिस्कीचे ग्लास घेऊन माझ्या भोवताली येऊन बसायचे अन् म्हणायचे, 'असला कसला रे तू राज-क्षत्रिय? अरे, ड्रिंक्स घेतल्याशिवाय अंगात रग येत नाही. घे, निदान एक सिप तरी घे!' असं म्हणत ते चक्क आपला ग्लास माझ्या ओठांना नेऊन भिडवीत.

त्या दिवशी मला ती टिंगल अगदी असह्य झाली. माझ्या भोवताली बसलेल्या चार अधिकाऱ्यांच्या हातातले ग्लास मी हिसकावून घेऊन एका पाठोपाठ पिऊन टाकले आणि म्हणालो, "बोला! आता कसला राज-क्षत्रिय वाटतो मी?"

त्या दिवसापासून मी अगदी नियमानं मद्यपान करायला सुरुवात केली. आईला शप्पथ दिली होती; पण तिचं पालन करणं मला अशक्य होतं! त्या वेळी माझं पिणं एकदम मर्यादित होतं - अडीच ते तीन पेग!

ट्रेनिंग चालू असताना रात्री आमच्यातले काही ऑफिसर्स फ्लश खेळत बसायचे. मला पत्ते खेळायची बिल्कुल आवड नव्हती. पत्तेच नव्हे, तर दुसऱ्या कुठल्याही बैठ्या खेळाबद्दल मला घृणा होती. खेळ या शब्दाशी माझ्या मनात भलंमोठं मोकळं पटांगण, वर निळंभोर आकाश,

खाली हिरवळ, चकचकित सूर्यप्रकाश, आणि सारं शरीर घामानं थबथबेपर्यंत धावणं, अशा गोष्टी निगडित होत्या. खोलीत, विजेच्या दिव्याखाली तासन् तास बसणं, सिगारेटची पाकिटामागून पाकिट संपवणं, या साऱ्याचा मला मनस्वी तिटकारा होता. पण नियतीनं मला ज्या ज्या गोष्टी आवडत नव्हत्या त्या त्या माझ्या गळी उतरवण्याचा जणू काही चंगच बांधला होता.

सहज गम्मत म्हणून मी अंगावर चादर लपेटून फ्लश बघत बसू लागलो. हळूहळू एखादा डाव खेळून बघावं असा मोह होऊ लागला. भावी आयुष्यात अट्टल जुगारी म्हणून माझ्यावर जे शिक्कामोर्तब झाले, त्याचा श्रीगणेश मी आर्मीमधेच शिकलो.

रात्री दोन काय तीन झाले तरी पत्ता लागत नसे. मद्यापेक्षा जुगाराचा वैâफ फार वाईट! मद्यात जास्त झाली तरी माणूस अल्कोहोलिक कोमा होऊन भुईसपाट तरी होतो, पण या जुगारांतली इर्षा माणसाला अगदी रसातळाला नेईपर्यंत त्याला कसलाही विवेक सुचू देत नाही. परिस्थितीचं भानच रहात नाही!

त्या रात्री आमचा फ्लश असा रंगला की पाचचा ब्युगल वाजला तसे आम्ही टेबलावरून उठलो आणि पी. टी. साठी तयारीला लागलो. रात्रभर खेळत होतो. कधी पैसे यायचे, कधी जायचे! याच सुमारास आम्हाला एका पार्टीचं आमंत्रण आलं. कमांडिंग ऑफिसरची परवानगी घेऊन आम्ही वँâपात पार्टीसाठी गेलो तो इराणी गृहस्थ मोठा रंगेल होता. बऱ्याच आर्मी ऑफिसरांची अन् त्याची मैत्री होती. साडेदहा-अकरापर्यंत प्राशन झालं. मग थोडं खाणं. इराणी अट्टल जुगारी होता. प्रथम प्रथम तो हरला. पण शेवटी त्यानं एकामागोमाग एक अशा रंगीत पानांच्या 'ट्रायोज्', 'चेन्स' असे काढायला सुरुवात केली. आम्ही सगळे मायनस झालो. मला थोडी शंका आली, यात काहीतरी हातचलाखी असावी. मी अगदी बारकाईनं त्याचं निरीक्षण करीत होतो. चष्म्यातून दिसणारे त्याचे निळसर घारे डोळे आम्हा सर्वांच्यावरून फिरायचे तेव्हा ते किलकिले झालेले असत. तो विचारात गढल्यासारखा दिसायचा. मधेच हसायचा! आमचा अंदाज घ्यायचा. आम्हाला जोखायचा, आणि पुढची चाल खेळायचा. मला वाटलं, 'आम्ही पितो. त्यामुळे आम्हाला धूर्तपणानं खेळता येत नाही, तेव्हा एकदा न पिता त्याच्याशी खेळायला हवं!'

रविवार होता. पी. टी. परेडला सुट्टी होती. वँâपातली दुकानंही बंद असायची त्या दिवशी; म्हणून इराण्याकडे गेलो. त्याची बेकरीही बंद होती त्या दिवशी. मला पाहाताच तो काहीसा चपापला; पण खोटंखोटं हसत म्हणाला, "हॅल्लो समरसिंग! व्हॉट ए प्लेजंट सरप्राईज? इकडे कसे काय आलात सकाळीच?"

"सहज. सुट्टी होती, म्हटलं, तुम्हालाही सवड असली तर एक-दोन डाव टाकावेत!"

"असं होय? काही हरकत नाही! पण खरं सांगू? फ्लश खेळायला खरी मजा येते ती रात्रीच! तशी माझी काही हरकत नाही आत्ता खेळायला! बरं, जस्ट ए मिनिट हं!" असं म्हणून इराणी आत गेला. मी आज त्याचं खेळात आम्हाला हरवण्याचं गुपित शोधण्यासाठी आलो होतो, तेव्हा त्याचं अगदी बारकाईनं निरीक्षण करताना एक गोष्ट माझ्या लक्षात आली. फ्लश खेळताना तो जो चष्मा वापरत होता तो आत्ता त्याच्या ड़ोळ्यांवर नव्हता. आत जाऊन तो परतला तेव्हा त्याच्या डोळ्यांवर फ्लश खेळताना तो नेहमी वापरायचा तोच चष्मा होता. पण दोन्ही फ्रेम्स जवळजवळ एकसारख्याच दिसायच्या! मी त्याला त्या चष्म्याबद्दल काहीच बोललो नाही.

"मिस्टर ठाकूर, यु वुइल हॅव लंच वुइथ मी!"

"डोंट बॉदर! आय हॅव टेकन हेवी ब्रेकफास्ट टुडे!"

"नो नो! ऐसा कभी नहीं हो सकता!" मला माडीवर चढण्याची सूचना करून तो पडदा टांगलेल्या दाराजवळ जाऊन म्हणाला,

"पमि ऽ ला, ब्रिंग इट ॲट एलेवन थर्टी शार्प!"

"ओऽके!" आतून आवाज आला.

बेहराम इराणी तीस-बत्तीस वयाचा गोरा, लाल, लांब नाकाचा आणि भुरकट मिशांचा आणि चांगला उंचापुरा होता. त्याचं बोलणं, हसणं अत्यंत लाघवी आणि 'इंप्रेसिव्ह' असं होतं. शिसवीच्या गोल टेबलाभोवती खुर्च्या होत्या. आम्ही समोरासमोर बसलो.

बेहरामनं पत्त्याचा कॅट काढला आणि तो जोरजोरानं पिसू लागला. पिसताना त्याच्या कपाळावर सुळसुळीत भुऱ्या केसांची एक बट डोलू लागली. नाकावरचा चष्मा किंचित पुढं आला होता तो त्यानं मान वर करून सरळ बसता केला. मला वाटलं, तो आता पानं वाटणार; पण पानं वाटण्याअगोदर तो थांबून म्हणाला, "समरसिंग, लेट अस हॅव सम जीन कॉर्डियल!"

"ओ, नो, थँक्स! जनरली आय डोंट टेक डे टाईम!"

"बट जीन इज ए लेडीज ड्रिंक! रात्र नाही ती नाही, निदान ड्रिंक्स तरी घेऊ एक-दोन पेग!"

खरं म्हणजे मी आलो होतो ते ड्रिंक्स न घेता त्याच्याशी खेळण्यासाठी! पण त्याची प्रत्येक विनंती फेटाळून लावणं मला काही योग्य वाटेना. शिवाय जीनच्या एक-दोन पेगनं माझ्यावर तसा फारसा परिणाम होणार नव्हता. हल्ली सहा-सहा पेग व्हिस्की रिचवायची सवय झाली होती. तेव्हा म्हटलं,-

"आण! उगाच नाराज करण्यात काही अर्थ नाही!"

तो हसला आणि म्हणाला, "थोडं ड्रिंक घेतल्याशिवाय लंचलाही मजा येणार नाही! आमच्या पमिलाची बहीण काल लिस्बनहून आलीय्. येताना तिनं सॉसेजेस आणले आहेत. बघा तर त्यांची टेस्ट. आपल्या इथंही सॉसेजेस बनवतात; पण फॉरेनची चव नाही त्यात!"

"पण बेहरामजी, तुम्ही लोक ते खात नाही ना?"

"हमको तो सब चलता है! यू नो, पमिला इज खिश्चन! अवर्स इज ॲन इंटरकास्ट मॅरेज!"

"ओह! आय सी!"

बेहरामनं जीन ग्लासात ओतली. त्यात थोडं कॉर्डियल घातलं. आइस क्यूब्ज् टाकले आणि म्हणाला, "तुम्हाला पाणी हवं त्यात?"

"नो, थँक्स! इटस ऑल राइट!"

बेहरामनं माझ्या ग्लासाला आपला ग्लास भिडवला आणि चिअर्स करून म्हणाला, "बेस्ट ऑफ लक टु यू."

"थँक्स! द सेम टु यू!" मी एक सिप घेऊन म्हणालो.

त्यावर तो मोठ्यानं हसला आणि म्हणाला, "वंडरफुल! पण 'लक' आपणा दोघांना एकाच वेळी नाही लाभणार!"

खेळाला सुरुवात झाली. एक रुपयाची चाल ठरली. प्रथम दहा चाली 'ब्लाइंड' झाल्या. माझ्याजवळ तीनशे रुपये होते. बेहराम गब्बर होता. त्याच्याशी उगाच इर्षेनं खेळण्यात अर्थ नव्हता; म्हणून मी पत्ते उचलले. दोन राजे आणि एक अठ्ठ्या मला आला होता. मी आणखी एक चाल केली. बेहरामनं आपले पत्ते उचलून घेतले आणि 'ओपन' मागितलं. त्याची पानं अगदीच फडतूस होती!

दोन-अडीचशे रुपये मी जिंकले, इतक्यात दारावर टकटक झालं.

"येस्, कम इन् प्लीज!"

पमिला आत आली. तांबडा चौकड्यांचा स्कर्ट घातलेली, पाठीवर केस मोकळे सोडलेले. किंचित् सावळी, पण चेहरा अत्यंत रेखीव 'चिझल्ड' असा! हसताना तिच्या गालावर खळी पडायची! ओठांना आणि गालांवर तिनं लाली लावली होती; पण ती फक्त जाणकारालाच दिसू शकली असती!

"पमिला, मीट माय फ्रेंड लेफ्टनंट समरिंसग!" पमिला आत येताना दिसली, तेव्हाच मी उठून उभा राह्यलो होतो. 'फेअरसेक्स' च्या बाबतीत कोणकोणत्या मॅनर्स पाळायच्या असतात ते सारं मिलिट्रीत गेल्यानंतर कटाक्षानं शिकलो होतो. पण त्याआधीदेखील राजेरजवाड्यांच्या सहवासात स्त्रियांचा मानसन्मान नेहमीच राखावा, हे मला ठाऊक होतं.

मला वाटलं, पमिला मला हात जोडून नमस्कार करील; पण तिनं चक्क माझ्यापुढं शेकहँडसाठी हात केला. मला तिच्या हाती हात देणं भाग होतं.

पमिला माझ्या बाजूच्या खुर्चीवर बसली, तेव्हा तिच्या मांड्या जवळ जवळ उघड्याच

पडल्या. पमिलानं लावलेल्या पावडरचा वास उत्तेजक होता. पमिलाच्या त्या पुष्ट मांड्या, तिचे ते मोठाले डोळे, रेखीव भुवया आणि किंचित् जाडसे ओठ पाहून मला मित्राच्या पत्नीबद्दल सज्जन माणसाला जे वाटू नये ते वाटू लागलं. माझी मलाच लाज वाटली.

"बेम्, द लंच इज रेडी!" आमचा दोघांचा खेळ खंडित करून ती म्हणाली.

"प्लीज ब्रिंग इट हिअर, वुई वुइल इट व्हाइल वुई प्ले! कसं समर खेळता खेळता खायला मजा येईल की नाही?"

"सर्टनली!"

पमिला उठून लंच आणण्यासाठी खाली निघाली तेव्हा बेहराम म्हणाला, "वन मोअर फॉर द् लंच!"

एकदोन पेग जीन घ्यायची म्हणताम्हणता पाचसहा पेग झाले होते आणि वर बेहराम 'वन् फॉर द लंच' म्हणत होता!

मी आज जिंकलो होतो. जेत्याची नशा मस्तकांत भिनली होती. तीपुढं आणखी एक जीनच्या पेगचा काय दिमाख?

खेळायला बसल्यापासून पाचशेपंचावन्नचं एक पाकीट संपलं होतं, बेहरामनं दुसरं कपाटातून काढून टेबलावर ठेवलं. त्यानं माझ्या सिगारेटला लायटर लावून म्हटलं,—

"समरिंसग, आज तू कमाल केली भाई!" मी हसलो.

पमिलानं प्लेटस आणून टेबलावर ठेवल्या. तेव्हा मी म्हणालो, "भाई बेहराम, आपल्याला काही हे खाता खाता खेळणं जमणार नाही!"

"जमणार नाही? द्या सोडून! खेळता खेळता खाऊ! ते तरी जमेल की नाही!"

त्याच्या त्या 'जोक' वर पमिला न हसता म्हणाली, "तुम्ही म्हणता तेच बरोबर आहे, समरिंसग! माणसानं एका वेळी एकच काम करावं! खेळावं तरी किंवा खावं तरी!"

"चलो, मेजॉरिटी कॅरीज द् पॉइंट!" असं म्हणून बेहरामनं हातातले पत्ते खाली टाकले आणि त्यानं काटा आणि चमचा घेऊन फ्राय केलेली. सॉसेजेस कापायला सुरुवात केली.

मी पमिलाला म्हटलं, "फारच टेस्टी आहे हं सॉसेजेस!"

"याला फार आवडतात म्हणून रिटा मुद्दाम आणते!"

"काय करतात त्या?"

"ती बोटीवर असते! 'अलितालिया' नावाच्या इटालियन कंपनीच्या जहाजावर ती मेडिकल असिस्टंट आहे!"

"वा:! रोज खूप नवीन नवीन अनुभव मिळत असतील त्यांना!"

"शी लव्हज हर प्रोफेशन; पण मला बाई कंटाळवाणं वाटतं ते जीवन. महिनेचे महिने पाण्यावर तरंगत रहायचं म्हणजे काय? त्यात बोटीसारखं अत्यंत हळू चालणारं दुसरं वाहन नाही. डॅडींची इच्छा होती तिला मेडिकल प्रोफेशनमधे घालायची!"

"डॅडी कुठं असतात?"

पमिला काहीशी गंभीर होऊन म्हणाली, "ही डाइड! दोन वर्षे झाली, गेले तेव्हा ते मिलिट्रीतच होते. आघाडीवर असतानाच मारले गेले!"

"ओह! आय ॲम् सॉरी!" उगाचच मी तो विषय पमिलासमोर काढला असं मला वाटू लागलं.

बेहराम म्हणाला, "समर, येत्या रविवारपासून इथं रेसेस सुरू होतात. रेस खेळला आहेस का कधी?"

"नाही बुवा! मला पैसे घोड्यावर लावतात म्हणजे पैसे घोड्याच्या पाठीवर ठेवतात असं वाटत होतं आतापर्यंत! पण खेळायचं राह्यलं तरी रेस बघायला मात्र हवी कधीतरी! आमच्या भवानीनगरचा एक जॉकी आहे, विलास!"

"मी ओळखतो त्याला! मग रविवारी चल माझ्यासोबत! बरेच ट्रेनर्स, ओनर्सही माझ्या परिचयाचे आहेत. रेस म्हणजे एक अगदी थ्रिलिंग गेम आहे!"

त्यावर पमिला म्हणाली, "डोंट से गेम, से गॅब्लिंग! अ गॅबिंलग अलाउड बाय द् गर्व्हन्मेंट!"

आमचं जेवण संपलं. पमिला मोकळ्या प्लेटस घेऊन खाली गेली. बेहरामनं आणि मी सिगारेटस् शिलगावल्या आणि परत खेळायला प्रारंभ झाला. तेव्हा मात्र मी एकसारखा हरू लागलो. मी बेहरामचे जिंकलेले सर्व पैसे त्यानं परत जिंकून घेतलेच; पण मी नेलेलेसुद्धा त्यानं जिंकले, तेव्हा मात्र मला त्याच्या खेळात काहीतरी लबाडी असावी अशी खात्री वाटू लागली. चार वाजता मी अगदी 'बँकरप्ट' झालो. पमिला पुन्हा चहा घेऊन वर आली. तिनं मला हसतहसत विचारलं, "काय झालं? कोण संपलं?"

"मीच की! हा कधीच हरत नाही!" मी म्हणालो. पमिला किटलीतला चहा कपात ओतत म्हणाली,-

"आता पुरे करा! एके ठिकाणी इतका वेळ बसायचा कंटाळा कसा येत नाही, कोण जाणे!"

"डाव संपलेलाच आहे!" मी खुर्चीवरून उठून आळस दिला. बाथरूमकडे जाऊन तोंडावर थंड पाण्याचा शिडकावा केला. एकसारखं वाटत होतं, बेहराम काहीतरी बनवाबनवी करतो आहे. मी बाथरूममधे असताना पमिला आणि बेहराम काहीतरी बोलत होती. मी परत तिथं जाताच ती बोलायचीच थांबली. चहाचा कप हातात घेत मी म्हणालो,-

"आज मला अगदी कफल्लक केलं यानं!"

बेहराम चहाचा घोट घेतघेत मिष्किल हसला. आणि म्हणाला, "भाई समर, तुला एक विनंती करायचीय मला!"

"कोणती?"

"तू माझ्याशी यापुढं कधीही फ्लश खेळायला येऊ नकोस!"

"का?"

"आस्क पमिला!"

मी पमिलाच्या चेहऱ्याकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाह्यलं. पण पमिला काहीशी गंभीर दिसत होती.

"व्हाटस् द् मॅटर?" मी पमिलाला विचारलं. पण उत्तर दिलं बेहरामनं. तो म्हणाला,-

"हिचे वडील सैन्यात होते. आघाडीवर असतानाच त्यांना मरण आलं. हिला सैन्यातल्या लोकांविषयी आपुलकी वाटते. तू इथं येऊन खेळतोस, कधी कधी हरतोस, ते पाहून हिला वाईट वाटतं! तेव्हा मी आजपासून तुझ्याशी फ्लश खेळायचं नाही असं ठरवलंय!"

"यू रिटर्न हिज मनी!" पमिला बेहरामला म्हणाली, अन् खरोखरच बेहरामनं माझे जिंकलेले सर्व पैसे खिशातून काढले अन् टेबलावर ठेवले. तो प्रकार मला अगदीच अनपेक्षित होता. मी बेहरामला म्हणालो, "मी ते पैसे घेणार नाही. माझा अधिकार नाही त्यावर! मी कोणाची मदत आजपर्यंत स्वीकारलेली नाही. यापुढंही मी मदतीसाठी कोणापुढं हात पसरणार नाही. बेहराम, तुला माझ्याशी खेळायचं नसलं तर खेळू नकोस; पण मी आज हे पैसे मुळीच घेणार नाही."

त्यावर बेहराम हसतहसत पमिलाला म्हणाला,-

"काय सांगत होतो तुला मी? अगं, अस्सल राज-क्षत्रियाचं रक्त आहे ते!"

"पण असं तुम्हा लोकांना आजच का वाटलं?" मी त्या दोघांकडे पहात विचारलं.

"आज नाही वाटलेलं समर! तू पहिल्या दिवशी आल्यापासून ही मला एकसारखी सांगते आहे, मिलिट्रीतल्या लोकांना गंडवत जाऊ नकोस!"

"तसं काही नाही. आमची करमणूक होते म्हणूनच आम्ही इथं येतो. तू काय आमच्यावर खेळायची जबरदस्ती करतोस थोडीच! मी ते पैसे परत नाही घेणार!"

मी जायला उठलो, तेव्हा बेहराम इराणी उठून माझ्याशी हस्तांदोलन करीत म्हणाला, "यापुढं खेळायचं नाही याचा अर्थ तू इकडे यायचं नाही असा नव्हे. लक्षात ठेव, समर!"

''खेळायचं नसलं तर येण्यात तरी काय अर्थ आहे?'' मी म्हटलं.

''हे बघ!'' माझ्या खांद्यावर हात ठेवून बेहराम म्हणाला, ''आजपर्यंत मी या पमिलेचा शब्द कधी मोडलेला नाही. यापुढंही मोडणार नाही. तेव्हा प्लीज डोंट मिसअंडरस्टँड!''

मी तिथून बाहेर पडलो तो काहीसा चमत्कारिक अशा अवस्थेत! पमिलाला असं का वाटावं? का तिनं जिंकलेले सर्व पैसे बेहरामला परत करायला सांगितलं? बेहराम पैसे लबाडीनं मिळवतो याची तिलाही खात्री असावी? नेमकं काय घडलं?.... आज थोडी जीन प्यालो ही गोष्ट खरी; पण लंचनंतर जीनचा थोडासुद्धा अम्मल शिल्लक राह्यला नव्हता... मग असं का व्हावं? प्रत्येक डाव बेहराम जिंकत राह्यला. एकदा एक्क्याचा 'ट्रायो', दुसऱ्यांदा एक्का-राजा-राणी, तेही एका रंगाचे, तिसऱ्यांदा सात-आठ-नऊची चेन! काय भानगड असावी?... बेहराम फ्लॅश खेळताना जो चष्मा वापरतो त्यात नक्कीच काहीतरी मख्खी असली पाहिजे! पण यापुढे तो माझ्याशी खेळायलाच तयार नाही, तेव्हा ते रहस्य समजायचे कसे?

विचार करीत मी केव्हा क्वार्टरवर पोहोचलो ते समजलंदेखील नाही. रात्री अंथरुणावर पडल्यानंतरदेखील मला बेहराम आणि पमिला या दोघांच्या विचित्र वागण्यामागचं रहस्य उलगडलं नाही.

-o-o-o-

५

त्या रविवारी बेहराम रेसला जाणार हे मला ठाऊक असूनही मी त्याच्या घरी गेलो. दारावरची बेल दाबली. जाळीच्या खिडकीतून पमिलानं कोण आलंय ते पाह्यलं अन् हसत हसत येऊन दार उघडलं. पमिलानं स्लीव्हलेस फ्रॉक घातला होता. तिच्या दंडावर माझी नजर गेली.

"बेहराम कुठंय?"

"रेसला गेलाय!"

"असं होय?"

"तू जाणार होतास ना?"

"जाणार होतो, पण कॅंपमधून बाहेर पडायलाच वेळ झाला!"

पमिलाच्या मागोमाग मी हॉलमध्ये गेलो. ती माझ्यासमोरच्या खुर्चीवर आकडून पाय जुळवून बसली. इतका शॉर्ट फ्रॉक घातल्यावर तिला माझ्यासमोर बसायला संकोच वाटायला हवा होता. पण ती ज्या संस्कृतीत लहानाची मोठी झाली होती तीत अर्धावृत शरीर ठेवणं यात संकोच वाटण्यासारखं काही नव्हतं! पण मी संस्थानी जमाना जवळून पाह्यलेला. भवानीनगरच्या जहागीरदार आणि इनामदारांच्या पोरीचं नखदेखील दिसत नसे! बाहेर पडताना त्यांच्या बग्गीलादेखील चिकाचे पडदे असायचे!

एखाद्या सुंदर स्त्रीकडे टक लावून बघणं असभ्यपणाचे आहे याची मला जाणीव होती. म्हणून मी हॉलमधल्या वारंवार बघितलेल्या वॉल-पेटिंगकडे पाहत राह्यलो. "बेहराम परत केव्हा येईल?"

"तो आता संध्याकाळी सहालाच येईल!"

मी हातातल्या घड्याळाकडे पाह्यलं, साडेतीन वाजले होते. "मग मी निघतो तर!"

"काही घेतल्याशिवाय? ॲटलीस्ट ए कप ऑफ टी?"

"ओ ऽ के! ॲज यू विश!" खरं म्हणजे मी ती दुपार गाठून मुद्दामच बेहरामच्या घरी आलो होतो. मला बेहरामच्या त्या चष्म्याचं कोडं सुटत नव्हतं. एरव्ही निराळा चष्मा वापरणारा बेहराम पत्ते खेळायच्या वेळी तोच ठराविक चष्मा का वापरतो, याची माहिती काढायची होती. मिलिट्रीतल्या माणसाविषयी सहानुभूती असणारी पमिला त्यासंबंधी काहीतरी 'क्ल्यू' देईल ही आशा होती. माझे जिंकलेले पैसे बेहरामला परत करायला तिनंच सांगितलं होतं. माझ्याबद्दल तिला आपुलकी नक्कीच वाटत असली पाह्यजे, असा अंदाज होता.

"समर, घरी कोणीच नाही. किचनमधे चल! मलाच चहा करावा लागेल!" पमिला म्हणाली.

"का? तुझी ती मेरी कुठं गेली?"

"गेली गोव्याला. तिची आन्टी आजारी आहे!"

"तू कशाला त्रास घेतेस?"

खरं म्हणजे मला बेहरामच्या खोलीत जाऊन तो चष्मा डोळ्यांना लावून पाहायचा होता. पण मी माझी शंका पमिलाजवळ व्यक्त न करता म्हणालो,-

"परवा माझं पेन इथं कोणाला सापडलं का?" चक्क थाप ठोकली.

"नाही! मला तरी सापडलं नाही. फार भारी होतं?"

"पार्कर फिफ्टीवन्, मला डॅडींनी बर्थडे प्रेझेंट म्हणून दिलं होतं!"

"बघू या, तू चल माडीवर. मी चहा घेऊन येते!"

मला नेमकं तेच हवं होतं. बेहराम तो चष्मा आपल्या ड्रेसिंग टेबलाच्या कोणत्या ड्रॉवरमधे

ठेवतो ते मी मागच्या खेपेला पाहून ठेवलं होतं. पमिला किचनमधे गेली आणि मी सरळ बेहरामच्या खोलीत माडीवर आलो. ड्रेसिंग टेबलाचा तो ड्रॉवर उघडून चष्मा उचलला आणि तसाच पँटच्या खिशात ठेवून दिला.

ती चोरी होती; पण मी चोरी करतो आहे अशी त्या वेळची माझी मनोधारणा नव्हती. आठ-दहा वेळी मी बेहरामशी फ्लश खेळलो. प्रत्येक वेळी त्यानं मला नागवलं होतं. एकदा तर माझ्याजवळ परत टॅक्सीनं जायला पैसे उरले नव्हते. बेहरामन मला एकट्यालाच फ्लशमधे गंडवलं होतं. असं नाही, तर प्रत्येकाची तो अशीच वाट लावीत होता, अन् प्रत्येक वेळी त्याच्या डोळ्यांवर तो चष्मा असायचा! हा चष्मा आज माझ्या हाती आला होता. त्याचं मला आकर्षण होतं म्हणून नव्हे, तर त्याच्याबद्दल गूढ वाटत होतं म्हणून मी तो हस्तगत केला होता. तो डोळ्यांना लावून इथं पाहणं शक्य नव्हतं. चष्मा खिशात घालून मी चक्क गच्चीत येऊन उभा राह्यलो.

पमिला ट्रेमधून चहाबिस्किटं घेऊन वर आली अन् म्हणाली,

"मिळालं?"

मी चमकून विचारलं, "काय?"

"अरे, तुझं पेन!"

"हो-नाही, बहुतेक कॅंपवरच कुठंतरी गहाळ झालं असेल असं वाटतं!"

"मी आणखी शोधून बघते!"

केटलीतला चहा कपात ओतत पमिला मला म्हणाली, "समर, परवा तू पैसे का घेतले नाहीस ते?"

"हे बघ, जुगारांत हरलेल्या पैशावर माझा अधिकार काय? ते पैसे स्वीकारणं मला कमीपणाचं वाटलं! माझ्याबद्दल कोणी काहीही म्हटलं तरी मला त्यात काही वावगं वाटणार नाही. पण कोणी माझी कीव केली तर मला भलती चीड येते! तू काल माझ्याबद्दल सहानुभूती दाखवलीस; पण मला ते आवडलं नाही!"

पमिला हसली आणि म्हणाली, "बेहराम इतक्या माणसांना इथं बोलावून त्यांचे खिसे साफ करून सोडतो. पण मला कोणाविषयी कधीही सहानुभूती वाटली नाही; पण तुझ्याबद्दल मात्र वाटली!"

"ती का वाटावी?"

"माझे डॅडी आर्मीत होते. आर्मीचे ऑफिसर घरी यायचे! मला त्यांच्या स्वभावाची पूर्ण कल्पना आहे. सैन्यांतली माणसं सरळमार्गी असतात. त्यांना जगातले छक्केपंजे समजत नाहीत. त्यांच्या भोळ्याभाबड्या स्वभावाचा कोणी गैरफायदा घेतल्याचं मला आवडत नाही. खुद्द माझ्या नवऱ्यानं - बेहरामनंसुद्धा!"

"म्हणजे बेहराम माझ्या सरळ स्वभावाचा गैरफायदा घेतोय तर?"

पमिला हसली आणि म्हणाली, "तो गैरफायदा घेतो असं नाही, तर त्यानं तुझ्यासारख्या सरळमार्गी सैनिकाला लुबाडलेलं मला आवडलं नाही!"

"त्यानं लुबाडायचा प्रश्न येतो कुठे? मीच जुगारांत हरतो!"

"पण बेहरामशी खेळणारा कोणी शेवटी जिंकू शकत नाही?"

"पमिला, हा जुगार आहे, जुगारांत हारजित ही असतेच. मात्र बेहराम नेहमीच जिंकतो त्याचं रहस्य काय?"

पमिला हसली आणि म्हणाली, "तू मला फार खोलात घेऊन चाललास. समर, तूर्तास एवढं लक्षात ठेव, तू बेहरामशी स्पर्धा करायचा प्रयत्न करू नकोस! तू कधीही जिंकू शकणार नाहीस!"

"ठीक आहे!"

मी पमिलाचा निरोप घेऊन बाहेर पडलो. खिशात बेहरामचा चोरलेला तो चष्मा होता. उगीचच एक-दोन वेळा खिसा चाचपून पाह्यला. कॅंपात आलो आणि खोलीत गेल्याबरोबर तो चष्मा डोळ्यांवर चढवला; पण मला त्यात विशेष असं काहीच जाणवलं नाही. चष्म्याची काच

पॉइंट टु फायची होती. माझा भ्रमनिरास झाला. उगाच हा चष्मा चोरून आणला असं वाटू लागलं. बरं, आता तो बेहरामला परत करावा म्हटलं तरी चोरी केल्याचं सिद्ध होणार होतं. रॅकवरच्या ॲम्युनिशन शूमधे तो ठेवला. पुन्हा पुन्हा पश्चात्ताप वाटत होता, परत बेहरामच्या घरी जायचंच नाही असं ठरवलं. पण मी त्याच्या घरी गेलो होतो हे पमिला त्याला सांगणार आणि त्याला मीच तो चोरून नेला अशी शंका येणार... विचारायला आला तर? काय करायचं?...

असा एक आठवडा उलटला. कटाक्षानं मी बेहरामकडे जायचं टाळलं होतं. पण माझं मन मला एकसारखं खात होतं. हळूच केव्हातरी जाऊन तो चष्मा त्याच्या घरी नेऊन टाकावा असंही वाटू लागलं. पण माझं 'गिल्टी कॉन्शन्स' मला तिकडे जाऊ देत नव्हतं!

पुन्हा रविवार उजाडला. सुट्टीचा दिवस. माझे इतर सहकारी सिव्हिलियन कपडे चढवून भटकायला निघाले. त्यातला एकजण माझ्याकडे येऊन म्हणाला,-

"समर, व्हॉटस रॉंग वुइथ यू? अलीकडे तू असा चिंताग्रस्त का दिसतोस? बरं वाटत नाही का?"

"तसं काही नाही!" मी उडवाउडवी करीत उत्तरलो.

"मग तू असा सर्वांपासून दूर राहण्याचा प्रयत्न का करतोस? हसत नाहीस, बाहेर पडत नाहीस!"

"कंटाळा आला आहे!"

"म्हणूनच बाहेर पडायचं. आज रेस आहे. आम्ही रेस बघायला जाणार, चल येत असलास तर!" जावं असं वाटलं; पण लगेच लक्षात आलं की बेहरामही रेसकोर्सवर असणार! शेवटी मी त्यांच्यासोबत जायला नकार दिला. मेसवर जाऊन एक बिअर घेतली. लंच घेतलं आणि कॉटवर जेम्स हॅडले चेसची एक डिटेक्टिव्ह कादंबरी वाचत पडलो. डोळ्यांवर किंचित गुंगी आली म्हणून पुस्तक मिटून बाजूच्या स्टुलावर ठेवलं, तोच मेसचा जमादार येऊन टिक टिक करून म्हणाला,-

"सर, बाहर एक औरत आयी है!"

मी उठलो. अंगावर गाऊन चढवला. बाहेर आलो. जमादार म्हणाला, "हॉल में बैठी है. आपको मिलना चाहती है!"

तसाच पायात सपाता सरकावून मी मेसच्या मेन हॉलमधे आलो. पमिला कोचावर बसून इलस्ट्रेटेड वीकलीचा अंक चाळत होती. मला पाहताच तिनं तो अंक टी-पॉयवर ठेवला आणि म्हणाली, "समर, जरा बाहेर चल. मला तुझ्याशी थोडं बोलायचं आहे!"

तिच्या त्या संदिग्ध बोलण्यानं मी सर्दच झालो. ती त्या चष्म्यासाठीच इथं आलीय असं वाटू लागलं. पण चेहऱ्यावर काहीही न दाखवता मी म्हणालो, "येतो, पण काय भानगड आहे?"

"तू चल तर खरा, इथं मला स्पष्टपणे बोलता येणार नाही." दारात उभ्या असलेल्या जमादाराकडे पाहत ती म्हणाली.

"डोंट वरी, तू काही चिंता करू नकोस. आपण इथंच बाजूच्या खोलीत बसू. तिथं कोणी येणार नाही! जमादार, आम्ही या बाजूच्या खोलीत थोडं बोलत बसतो, इकडे कोणाला सोडू नको." मी म्हणालो.

"येस सर!"

आर्मीच्या ऑफिसरना भेटायला त्यांची कुटंबीय मंडळी अधूनमधून यायची. पण त्यांना आमच्या निवासस्थानी नेण्याची परवानगी नसे. इथं मेसच्या हॉलमधेच त्यांच्याशी बोलत बसावं लागे.

"बोल काय प्रकार आहे?"

"बेहरामनं मला घरातून बाहेर काढलंय!" पमिला म्हणाली.

"काय, सांगतेस काय?"

"हो! गेला एक महिना आमच्यात थोडी कुरबुर होत होती; पण मीच समजूतदारपणानं घेत होते. क्षुल्लक कारणावरून तो मला एकसारखा छेडत असे. आता परवा त्याचा पत्ते खेळताना वापरायचा चष्मा कुठं हरवला. तो म्हणतो मीच तो कुठे गहाळ केला!"

माझ्या छातीतली धडधड वाढली.

"आता तू मला सांग त्याचा तो चष्मा घेऊन मला कोणाशी 'फ्लश' खेळायला जायचं आहे का?"

"एवढं विशेष काय होतं त्या चष्म्यात?" तो विचारलं.

त्यावर पमिलानं एक प्रदीर्घ नि:श्वास सोडला आणि ती म्हणाली, "विशेष होतं म्हणून तर तो हट्टाला पेटला! तुला कल्पना नाही समर, त्या चष्म्याच्या खालच्या रिंगजवळ दोन सूक्ष्म अशा लेन्सेस आहेत. ठराविक अँगल्सनी त्यातून पाह्यलं की पत्त्यांची पानं क्राउन साईज पुस्तकाएवढी मोठाली दिसतात. बेहराम पत्त्यांच्या बाहेरच्या बाजूला डिझाईनमधे टाचणीनं किंवा नखानं अतिसूक्ष्म अशा खुणा करतो, त्याला खेळताना दुसऱ्यांच्या, हातात कोणाचे पत्ते आहेत ते त्यामुळं अगदी अचूक समजतं. प्रतिस्पर्ध्याकडे 'ट्रायो' किंवा 'चेन' असं दिसलं की हा लगेच 'ओपन' मागतो, किंवा चाल थांबवून खेळ थांबवतो. तू मला या आधीही विचारलं होतंस, बेहराम नेहमी जिंकतो याचं रहस्य काय? त्या वेळी मी हे ठाऊक असून तुला सांगितलं नव्हतं! तर हे त्याचं रहस्य आहे! पंधरा दिवसांपूर्वी त्याचा तो चष्मा त्यानं कुठं हरवला! त्यानं माझ्यावरच आळ घेतला की, तो दुसऱ्यांना फसवतो म्हणून मीच तो मोडूनतोडून टाकला! हे चष्म्याचं एक सोडून दे! इतर बाबतीतही तो असाच माथेफिरूपणा करायचा! व्हेरी डेंजरस मॅन! शेवटी मीही वैतागले. घरच्यांच्या विरोधाला न जुमानता त्याच्याशी इंटरकास्ट मॅरेज केलं. पण मला काही सुख लाभलं नाही रे!"

बोलता बोलता पमिलानं रुमालानं डोळे टिपले. स्त्रियांच्या अश्रूंत इतकी प्रचंड शक्ती असते की, व्रजासारखं कठीण हृदय असणारा पुरुषदेखील हेलावला जातो! मग माझा काय पाड! मी म्हणालो, "समज पमिला. बेहरामला तो चष्मा परत मिळाला तर तुझे नि त्याचे सर्व मतभेद मिटतील?"

"शक्य नाही! चष्म्याचं हे एक कारण झालं, अशी अनेक कारणं आहेत मतभेदाची. त्या माणसाला पैशाशिवाय जगात काहीच प्यारं नाही! कॅंपातली ती बेकरी उत्तम चालते आहे. महिन्याकाठी अडीच-तीन हजार रुपये मिळतात! पण याला समाधान नाही. गावातली व्यापाऱ्यांची पोरं बोलवतो, त्यांना फ्लशमधे गंडवतो, तुझ्यासारखे आर्मी ऑफिसर बोलावून त्यांना लुबाडतो, खरं सांगते, यानं साऱ्या जगाला लुबाडलं असतं तरीही क्षणभर मी क्षम्य मानलं असतं; पण जे आपल्या देशाचं संरक्षण करण्यासाठी घरदार, प्रपंच सोडून सैन्यात दाखल होतात, त्यांना फसवलेलं, लुबाडलेलं मला बिल्कुल आवडत नसे. त्यात माझा चुलतभाऊ आणि वडील दोघेही सैन्यात होते. युद्धभूमीवर ते मारले गेले आहेत, त्यामुळं आर्मी ऑफिसर पाह्यले की मला माझ्या चुलतभावाची आणि डॅडींची आठवण येते रे! त्यांना कोणी त्रास दिला, फसवलं, तर मला ते सहन होत नाही! आर्मी ऑफिसर हा माझा वीक पॉ◌ंइंट आहे, समर!"

पमिला बोलताबोलता डोळ्यांना रुमाल लावत होती. मी बेहरामचा तो चष्मा उपटल्यानं कोणतंही गैरकृत्य केले नाही असं वाटलं! शिवाय पमिलानं मला आता त्या चष्म्याचं 'इंगित' ही सांगून टाकलं होतं.

डोळे टिपून झाल्यानंतर पमिला म्हणाली, "मी तुझ्याकडे एवढ्यासाठी आले होते, मला थोडे पैसे हवे आहेत. मी लखनौला जाणार आहे!"

"तिथं कोण असतं?"

"तिथंच माझं घर आहे. घरी मम्मी आहे, लहान दोन भाऊ आहेत. पण मी या बेहरामच्या नादानं त्यांना सोडून इकडे आले होते. तरी माझी बहीण रिटा मला म्हणायची, 'तुला हा माणूस सुख लाभू देणार नाही.' रिटा बोटीवर असते, तिनं खूप जग पाह्यलंय. मला नेहमी म्हणते, गाव न सोडल्यामुळं तुझं अनुभवविश्व फार मर्यादित झालंय!"

"किती वर्षं झाली तुला इथं येऊन?"

"साडेतीन!"

"हा भेटला कुठं तुला?"

"लखनौला आला होता. ऑल इंडिया बेकर्स असोसिएशनची मिटिंग होती लखनौला.

माझे अंकल जोसेफ यांची लखनौमधे मोठी बेकरी आहे. बेहराम त्यांच्याकडे उतरला होता. त्याच्या 'पर्सनॅलिटी'वर मी भाळले. पण आता मात्र पस्तावते आहे! खूप खूप मनस्ताप दिला या माणसानं मला. मी म्हणूनच सहन केला. आतून इतकी दु:खी होते; पण वर कधीही कोणाला जाणवू दिलं नाही. म्हटलं, एखादं मूल झालं की तो बदलेल, पण तेही नशिबी नव्हतं.''

''पमिला, आय ॲम् व्हेरी सॉरी फॉर ऑल धिस! बरं, तुला किती पैसे लागतील?'' मी विचारलं.

''शंभर पुरेत! तू कधी आलास तर ये लखनौला! जोसेफ बेकर अख्ख्या लखनौला परिचित आहेत! त्यांच्या बेकरीशेजारीच माझं घर आहे!''

''पमिला, बेहरामनं तुला घराबाहेर काढलं, वाईट झालं! इतक्या थराला गेला तो?''

''त्याला वाटायचं, मी त्याच्या लांड्यालबाड्या चव्हाट्यावर आणीन; त्यानं धनलालसेपायी केलेली कारस्थानं जगजाहीर करीन; म्हणूनच मला बाहेर घालवण्याची ही स्टेप घेतली त्यानं.''

''अगदी अनपेक्षित होतं हे मला.''

''अरे, काय सांगू समर, या माणसाची एकएक कृत्यं! पैशासाठी कोणत्याही खालच्या थराला जायची वृत्ती आहे याची! रिटानं मला भेट म्हणून काही परदेशी वस्तू दिल्या होत्या. या नालायक माणसानं भरमसाट पैसे घेऊन त्या विकून टाकल्या. न जाणो पैशासाठी त्यानं मलाही कदाचित् -'' बोलता बोलता पमिलाचा कंठ दाटून येत होता.

मी उठलो आणि जमादाराला बोलावून कॉफी आणायची ऑर्डर दिली. पमिलाला म्हणालो, ''बाजूला बाथरुम आहे, वॉश घे. मी रूमवरून पैसे घेऊन येतो!'' रडून रडून तिचे डोळे लाल झाले होते.

कॉफी घेतल्यानंतर मी पमिलाला शंभर रुपये दिले तेव्हा ती म्हणाली, ''मी गेल्या गेल्या तुला मनीऑर्डरने परत करीन!''

''राहू देत! डोंट बॉदर अबाउट मनी, पमिला.''

बोलता बोलता मी गेटपाशी आलो. तेव्हा पमिला माझे आभार मानून म्हणाली, ''समर, आयुष्यांत जोडीदार निवडताना कधीही घाईनं निर्णय घेऊ नकोस! जन्मभर पस्तावण्याची पाळी येते!''

पमिला माझा निरोप घेऊन निघून गेली. मला त्या क्षणी वाईट वाटलं. पण बेहरामचं रहस्य आणि त्यातल्या त्यांत त्याच्या त्या चष्म्याचं रहस्य समजल्यानं समाधानही वाटू लागलं!

पमिलेला निरोप देऊन मी खोलीवर आलो आणि तो चष्मा लावून समोर पत्त्याचं पान ठेवून अँगल्सनी पाहायला सुरुवात केली. थोडीशी मान उचलून काठातून पाहाताना मला ते पत्त्याचं पान केवढंतरी मोठं दिसू लागलं - पुस्तकाएवढं मोठं!

बेहराम प्रत्येक वेळी फ्लशमधे मला गंडवत होता, याचं रहस्य समजून आलं. तोही खेळताना विचार केल्याचा बहाणा करून मान वर करून का पहायचा याचा उलगडा झाला.

मी तो मौल्यवान चष्मा पुन्हा माझ्या ॲम्युनिशन बुटात दडवून ठेवला. याच चष्म्यानं मी पुढं कित्येकांना अगदी साफ धुतलं. भवानीनगरच्या जहागीरदारांपासून तो अगदी त्या दौलतखान नबाबापर्यंत सर्वांनाच!

-o-o-o-

६

पुण्यात रोज संध्याकाळी स्पोर्टसाठी ग्राऊंडवर जात होतो, त्या वेळी आर्मीत हॉकी हा फार महत्त्वाचा खेळ मानला जात होता. त्या वेळी साऱ्या भारताचा हॉकीचा संघ अजिंक्य होता. आमच्या युनिटचे एक वरिष्ठ अधिकारी बलबीरसिंग हे एके काळी भारतीय हॉकी संघात खेळलेले. तेव्हा त्यांना स्पोर्टस् म्हटलं की डोळ्यासमोर फक्त हॉकी दिसायची! हॉकी उत्तम खेळणारा तो उत्तम अधिकारी असं त्यांचं समीकरण होतं. ज्याला हॉकी खेळता येत नाही तो त्यांच्या दृष्टीनं बाद!

मी फुटबॉलचा शौकीन. तसा हॉकी अन् फुटबॉल यात फारसा फरक नव्हताच. दोघातही दमदार छाती आणि पळण्याची सवय आवश्यक असे. फुटबॉल आकारानं मोठा असला तरी प्रतिपक्षाला हुलकावण्या देत विरुद्ध बाजूवर आक्रमक खेळ करून गोल मारणे हे दोन्ही खेळांतलं साम्य ठळक असं होतं. लौकरच मी हॉकीत चॅंपियन समजला जाऊ लागलो.

संध्याकाळी अधूनमधून क्लबवर 'फ्लश' चाले. पण ते चोरून! फ्लश खेळायला जमणारे चारसहा जण होते. त्यांत नेहमी हॉकीत माझ्याशी स्पर्धा करणारा गुमानसिंग हा तरुण शीख कॅप्टन होता. गुमानसिंग सहा फूट दोन इंच, गरुडासारखं टोकदार नाक, जाळीत बसवलेली किंचित् भुऱ्या रंगाची दाढी, आणि बोलताना नेहमी पंजाबी शिव्यांचा सर्रास वापर करायचा!

बेहरामचा तो चष्मा मी हस्तगत केल्यानंतर फ्लशमधे मी हरण्याचा प्रश्नच उद्भवत नव्हता. प्रथम मुद्दाम सोंग करून हरायचं आणि नंतर एकेकाला 'बॅंकरप्ट' करून सोडायचं! त्या दिवशी साला गुमानसिंग इर्षेलाच पेटला. त्याचे साडेसहाशे रुपये मी जिंकले. तेव्हा तो म्हणाला, "उधार खेळ. पहिल्या तारखेला पगाराला तुझे देणे लागले तर भागवतो!"

मी पत्त्याची पानं उचलून परत खोक्यांत ठेवीत म्हणालो, "जुगारांत उधारपाधार काही नसतं, गुमानसिंग!"

"क्यूँ ऽ? साला हम भाग जायेंगे?"

"भाग जानेका सवाल नहीं है भाई!" शांतपणे मी म्हणालो.

"अच्छा!" असं म्हणून गुमानसिंग दातओठ खात उठून गेला.

त्यानंतर दुसऱ्या दिवशी संध्याकाळी स्पोर्टस्साठी आम्ही पांढऱ्या हाफ पॅंटस् आणि टी-शर्टस् घालून हॉकी खेळायला मैदानांत उतरलो. सकाळपासून गुमानसिंग माझ्याशी बोलला नव्हता. मेसमध्ये लंचच्या वेळी, त्या अगोदर पी. टी. च्या वेळी सकाळी त्याची अन् माझी नजरानजर झाली होती. पण गुमानसिंगने मला पाहून तिसरीकडेच पहायला सुरुवात केली होती. मीही त्याला भीक घालायची नाही असं ठरवलं होतं. नाही बोलला तर नाही. गेला जहन्नममधे!

त्या दिवशी हॉकी खेळायला मैदानात उतरलो तेव्हा बलबीरसिंग उपस्थित होते. त्यांनी आम्हांला सांगितलं, "आज के मॅचमें जितनेवाली टीम को जालंदर भेजा जाएगा!"

जालंदरला हॉकीच्या स्पर्धा होणार होत्या. मी आज माझं कौशल्य पणाला लावणार होतो. प्रत्यक्ष खेळाला सुरुवात झाली. मी बॉलवर ताबा मिळवून सेंटर फॉरवर्डमधून जो गुमानसिंगच्या टीममधे घुसलो तो बॉल टोलवीत टोलवीत गुमानसिंगच्या गोलीला अक्षरश: फसवून गोल मारला. एकापाठोपाठ एक असे तीन गोल्स मी मारले. तासाच्या मॅचमधे पहिल्या अर्ध्या तासात जो खेळ होईल तेवढाच खरा! नंतर खेळाडूत धावण्याचे त्राण रहात नाही. उरलेल्या अर्ध्या तासांत फार तर बचावात्मक खेळ करता येणे शक्य असते! आमची टीम आता जालंदरला जाणार हे निश्चित! गुमानसिंग माझ्यावर भयंकर चिडून होता. अगोदरच काल रात्री क्लबमधे तो प्रकार घडलेला, त्यांत ही मानहानी! इंटरव्हलनंतर पुन्हा खेळ सुरू झाला. बलबीरसिंग गुमानसिंगच्या

टीमला प्रोत्साहन देऊ लागले, "ब्रेव्होऽगुमान! गो अहेड!"

मी गुमानसिंगाच्या स्टिकमधून तीन वेळा चेंडू काढून घेतला आणि आमच्या खेळाडूकडे पासऑन केला. चौथ्या वेळेस गुमानसिंगाने अक्षरश: शत्रूवर हल्ला करावा अशा आविर्भावात हॉकीची स्टिक फिरवून माझ्या गुडघ्यावर मारली. मी धावताधावता कोसळलो. गुडघा हातात धरून बसलो. भयंकर वेदना येत होत्या. बलबीरसिंग मैदानात आले. त्यांना मी ओरडून म्हणालो,-

"जान बूझकर गुमानने मारा है!"

"अरे, छोड दो भाई! जान बूझकर ऐसा कोई नहीं करता!" बलबीर म्हणाले. मला उचलून ग्राऊंडच्या पॅव्हेलियनमधे आणले. मिलिट्री हॉस्पिटलला फोन करून ॲम्ब्युलन्स मागवली. तत्काळ माझ्या पायाचे फोटो काढण्यात आले. डाव्या गुडघ्याची वाटी फुटली होती-तीन तुकडे झाले होते!

महिनाभर टांग वर बांधून पडून होतो. आई आणि डॅडी समजल्यावर येऊन पाहून गेले. मी गुमानसिंगावर सूड उगवण्याची स्वप्नं रंगवीत असतानाच त्याची अमृतसरला बदली झाल्याची ऑर्डर आली. त्याला 'सेंडॉफ' पार्टी झाली. बडा खाना झाला. पण त्या वेळी मी हॉस्पिटलमधेच होतो. त्यानंतर मला गुमानसिंग भेटलाच नाही. पण त्यानं मला आयुष्यभर आठवण रहावी असं करून ठेवलं होतं. महिन्यानं प्लॅस्टर काढलं; पण वाटीचा एक तुकडा काही बरोबर जुळला नाही. पुन्हा ऑपरेशन करावं लागलं!

डॉक्टरांनी मला यापुढं सैन्यांत अधिकारी म्हणून रहाण्यास 'अनफिट केलं! मला पुढं चालता येऊ लागलं; पण धावता येणं अशक्य होतं. हॉकी-फुटबॉल यापुढं आयुष्यात खेळता येणंच शक्य नव्हतं!

गुमानसिंग! मला वाटलं की, गुमानसिंगवर काहीतरी 'डिसिप्लिनरी ॲक्शन' होईल; पण मैदानावर हजर असलेल्या बलबीरसिंगांनी सर्वांना सांगून टाकलं की, समरला गुमानची हॉकी स्टिक लागली ती चुकून; त्यानं मुद्दाम मारलेलीच नव्हती! झालं, एवढ्या मोठ्या अधिकाऱ्यानं निर्वाळा दिल्यावर काय होणार?

माझं सैनिकी जीवन अशा अनपेक्षित रीतीनं संपुष्टात आलं! अंगावर सैनिकी गणवेश आणि छातीवर बिल्ले लटकावून मिरवण्याची माझी स्वप्नं धुळीला मिळाली. उलट डाव्या पायाची फुटकी वाटी घेऊन मला सैन्यातून निवृत्त व्हावं लागलं!

परत भवानीनगर! आताशी मुलं एका विशिष्ट प्रकारचा चेंडू खेळतात, त्या चेंडूला लांब अशी रबराची पट्टी बांधलेली असते. चेंडू कितीही वेगांत फेकला तरी परत तो फेकणाऱ्याच्या हाती परत येतो. माझी अवस्था त्या चेंडूहून भिन्न नव्हती! भवानीनगरवरून रत्नापूरला गेलो. तेथून असाच फट्कन् परतलो. सैन्यांत दाखल झालो. तिथं नाव कमवायची स्वप्नं रंगवली; पण माझे सैनिकी जीवनही असेच अचानक संपुष्टात आले. पुन्हा तोच यक्ष प्रश्न-पुढं काय?

जेवायला बसलो होतो. आई स्वयंपाकघरातच होती. अमर बाहेरच्या खोलीत अभ्यास करत होता. अमर काहीसा अबोल, पण मनाचा सज्जन होता. त्याला माझं 'रॅश' वागणं पसंत नसे. पण तो मला कधी अक्कल शिकवण्याच्या भरीस पडत नसे. डॅडी माडीवर होते. आताशी त्यांनी पिण्याचं प्रमाण बरंचसं कमी केलं होतं. डॉक्टरांनीच त्यांना बजावलं होतं, जास्त प्याल तर 'सिरॉसिस' होईल आणि कसल्याही उपचारांचा उपयोग व्हायचा नाही.

आई मला म्हणाली, "समर, मला आता पूर्वीसारखं घरचं काम होत नाही. अधूनमधून दमाही उद्भवतो. घरी सून यावी आता!"

मी हातातला घास तसाच धरून आईकडे पहात म्हणालो, "सूऽन? अजून मी कुठं स्थिर झालेलो नाही. त्यांत ही जबाबदारी अंगावर कशाला टाकतेस?"

"तू आता आपल्या शेतातल्या बंगल्यावर जाऊन रहा! कुशाप्पा म्हणत होता, समरबाबू इथं येऊन राहतील तर बरं होईल; माझी पोरं भविष्यात तुमच्याशी प्रामाणिक रहातीलच कशावरून? तेव्हा आता कुठं बाहेर जायचं डोक्यात घेऊ नकोस! शेतावरचा बंगला रंगवून घे, अधूनमधून रहायला जात जा! शेतीत लक्ष घातलंस तर काही कमी पडणार नाही! मला तिथली तलावाकाठची हवा सहन होत नाही म्हणून! नाहीतर मीच आले असते तिकडे रहायला!"

लग्न! लग्नाचं माझं वय झालं होतं यात शंका नव्हती. तरुण पोरी दिसल्या की काळजात एकदम लख्ख व्हायचं! पुण्यात त्या दिवशी पमिलाच्या उघड्या मांड्या पाह्यल्यानंतर मनात किती विचित्र विचार आले होते? समोरची ती धोब्याची मुलगी पाहिली की असंच काहीतरी व्हायचं! रात्री अंथरुणावर पडलं की, आजपर्यंत पाह्यलेल्या सर्व देखण्या पोरी अंगावर तोकडी वस्त्र घालून एका ओळीनं समोर उभ्या राह्यल्या आहेत असा भास व्हायचा! मनाचा मोगल सम्राट जनानखान्यांत प्रवेश करायचा! छट्! हा मनाचा दुबळेपणा आहे. त्यापेक्षा आई म्हणते त्या प्रस्तावाला सरळ होकार देऊन टाकावा!

भातावर चमच्यानं तूप वाढतावाढता आई म्हणाली, "नासिकच्या शंकरलाल परदेशींचं पत्र आलंय. त्यांची मुलगी यंदा मॅट्रिक पास झालीय, दिसायला बरी आहे. शिवाय एक मुलगा अन् एकच मुलगी आहे त्यांना! खर्च करून देतीलच, शिवाय तुला आयुष्यभर त्या लोकांचं पाठबळ लाभेल!"

"मुलीचा फोटो तरी घे मागवून!"

"फोटो कशाला? तू एकदा जाऊन ये!"

"अगं, पण — "

"त्यांना अगोदर पत्र पाठवू!"

"छे: छे:! तसला काही प्रकार नाही करायचा मला. मी अगोदर बाहेरून मुलीच्या स्वभावाची चौकशी करणार. ती दिसते कशी, तिच्या मैत्रिणी कोण आहेत, स्वभाव कसा आहे, याची सर्व बारकाईनं चौकशी करणार आणि मगच मुलगी पहायला जाऊ आपण सर्वजण!"

"तसं कर. पण मुलगी मात्र नाकारू नकोस हं! चांगले लोक आहेत! द्राक्षाची थोडी बागही आहे म्हणे!"

"आई, मला लग्न करायचंय ते मुलीशी, द्राक्षाच्या बागेशी नव्हे!"

"तसं नव्हे रे समर, पण तुझा स्वभाव हा असा हूड, कुणाशी तुझं फार काळ पटत नाही, तेव्हा मला आपलं वाटतं की, तुला चांगल्या लोकांचं पाठबळ असावं!"

"हा भ्रम आहे तुझा आई! एकदा लग्न झालं की कोणी जुमानीत नसतो जावयाला! सारी प्रलोभनं लग्नाअगोदरची असतात. माझ्यापेक्षा तुला अनुभव जास्त! पण मी जे जग डोळ्यांनी पहात आलो आहे, त्यावरून म्हणतो. लग्न झालं ना की आईबापांचं मुलीवर तितकं प्रेम रहात नाही! ती दुसऱ्याची झाली ही जाणीव ते विसरू शकत नाहीत. तेव्हा मला जी बायको हवी ती अशी की माहेरची प्रौढी न मिरवणारी, घराण्याच्या प्रतिष्ठेबद्दल वृथा अभिमान बाळगणारी मुळीच नसावी! गरिबाची मुलगी हवी मला, अट एकच, की ती दिसायला सुंदर असावी!"

आईनं माझ्या ताटातला भात संपल्याचं पाहून पुन्हा हातात भाताचं भांडं घेतलं तेव्हा मी म्हणालो, "पुरे पुरे! पोट भरलंय माझं!"

"आणखी थोडा घे रे! त्या मिलिट्रीत गेल्यापसून तुझं जेवणच कमी झालंय! कुठून दुर्बद्धी झाली अन् दाखल झालास, बाबा! अधू होऊन बसलास पायानं!"

मोरीत जाऊन हात धुताधुता मी म्हणालो, "जे व्हायचं होतं ते झालं! मिलिट्रीत हे झालं नसतं तर आणखी कुठंतरी पाय मोडलाच असता!"

दैववादी विचारसरणी मला मुळात पसंत नव्हती; पण आयुष्यात अशा काही अकल्पित घटना घडत होत्या की, नकळत मी दैववादावर विश्वास ठेवायला प्रवृत्त होत होतो. रत्नापुरहून माझी झालेली सुटका! मला कल्पना तरी होती की रत्नापूरचे महाराज माझ्या जीविताचं काहीतरी भलंबुरं करण्याच्या इराद्यात आहेत म्हणून? पण राजकन्येनं मला त्याची कल्पना दिली आणि माझी तिथून सुटका घडवली! हा दैवाचा प्रतापच नव्हे का?

जेवून मी तिसऱ्या मजल्यावर माझ्या खोलीकडे निघालो तेव्हा आई परत म्हणाली, "अरे, त्या परदेशींची पत्रं आलेली आहेत. निदान त्यांच्या समजुतीसाठी मुलगी तरी पाहून ये!"

"बरं बर, मुलगी पाहून येतो. मला पसंत पडली तर आपण सर्वजण मिळून जाऊ!"

"तसं केलंस तरी माझी ना नाही!"

मी माडीवर चाललो असताना अमर टेबलावर पुस्तक वाचत होता. तो मला जवळ बोलावून म्हणाला, "दादा, इकडे ये!"

"काय अमर?" आम्ही दोघे भाऊ भाऊ फारच क्वचित् बोलत असू! पण माझं अमरवर आणि अमरचं माझ्यावर खूप प्रेम होतं! मी त्याच्याजवळ गेलो तेव्हा त्यानं माझ्या हातात एक पाकिट दिलं — उघडलेलं!

"दादा, एक्सक्युज मी! या पत्रावर खरं म्हणजे तुझं नाव होतं; पण मला वाटलं ते माझंच नाव आहे; म्हणून मी उघडलं अन् वाचायला सुरुवात केली; पण लगेच माझं नाही अशी खात्री पटताच ते मी घडी करून यांत ठेवून दिलंय!"

"आय बिलीव्ह इन यू, माय डिअर लॅड!" असं म्हणत मी अमरचे सुळसुळीत केस कुस्करले आणि ते पत्र घेऊन माडीवर निघालो.

दुसऱ्या मजल्यावर डॅडी चष्मा लावून काहीतरी वाचत होते; बाजूला अर्धा झालेला व्हिस्कीचा ग्लास! मला वाटलं, डॅडींचं आपल्याकडे लक्ष नाही. हळूच आपण वर जावं. पण पुस्तकातली आपली नजर बाजूला न काढताच डॅडी म्हणाले, "समर, प्लीज कम हिअर!"

मी ते पत्र विजारीच्या खिशात कोंबून त्यांच्यासमोर जाऊन उभा राह्यलो.

"तू नाशिकला जेव्हा जाशील तेव्हा एक काम कर!"

"जी?"

"तिथं राज-क्षत्रिय ज्ञातीच्या संघटनेचं ऑफिस आहे, त्या ऑफिसात जा आणि माझी गेल्या चार वर्षांची वर्गणी भरायची राह्यली आहे, तेवढी भरून टाक! जाताना पैसे घेऊन जा!"

"जी!"

"ती परदेशीची मुलगी तुला पसंत पडली तर तिथूनच तार कर; आम्ही दोघं येऊ. आता तुला फार दिवस विनालग्न रहाता येणार नाही. हिला मधूनमधून अस्थम्याचा त्रास होतो!

मी खाली मान घालून तसा उभा. खरं म्हणजे मला अमरनं दिलेलं ते पत्र कोणाचं आहे ते वाचायची जिज्ञासा लागून राह्यली होती.

मी माडीवर आलो. खिशातलं ते पाकिटं उघडलं. त्या अगोदर पत्रावरचा पत्ता पुन्हा एकदा न्याहाळून पाह्यला. खरंच अमर म्हणाला तसंच घडलं असलं पाह्यजे. 'एस' हे अक्षर प्रथमदर्शनी 'ए' सारखंच काढलं गेलं होतं. त्यामुळंच अमरचा घोटाळा झाला असावा. आमच्या घरात सहसा कोणी दुसऱ्याची पत्र फोडून वाचत नसत. डॅडींची तशी अगदी लहानपणापासून आम्हाला शिकवण होती. मी पत्र वाचायला सुरुवात केली,—

"माय डिअर समर,

तुला हे पत्र पाहून थोडं आश्चर्य वाटेल! कारण तू इथून गेल्यापासून तुझ्याकडचं मला काहीएक समजलेलं नाही!

पत्र वाचताना ते निश्चित कोणाचं आहे याचा बोध होईना, म्हणून मी पत्राच्या शेवटची सही पाह्यली, ती राजकन्या रत्नप्रभा राजेंची होती. मग पुन्हा वाचायला प्रारंभ केला :

"त्या रात्री मी तुझी सुटका केली अन् दुसऱ्या दिवशी सकाळी राजवाड्यात जो गहजब उडाला म्हणून सांगू! डॅडी भयंकर संतापले. वाड्यातले सारे पहारेकरी एका ओळीनं उभे करण्यात आले. डॅडींनी स्वत: हंटरनं त्यांना फटके मारले. बिचाऱ्यांना फुक्कट मार खावा लागला. तुझ्या खोलीजवळ आपण दिशाभूल करण्यासाठी जो दोर बांधून ठेवला होता त्याचाही पंचनामा झाला. दासदासींचे जाबजबाब झाले. चोहो दिशांना सांडणीस्वार सुटले. पण काहीही उपयोग होण्यासारखा नव्हता. तेव्हा तू ट्रेनमधे सुखरूप होतास. दुपारी डॅडींनी मलाही बोलवणं केलं. मी गेले.

संतप्त झालेले डॅडी आपल्या दालनात हात मागे बांधून एकसारख्या फेऱ्या मारीत होते. त्यांनी मला पहाताच गर्जना केली,

'व्हॉट इज ऑल धिस नॉनसेन्स?'

मी वेड पांघरून विचारलं, 'काय झालं डॅडी?'

'सकाळपासून इतका गाढवगोंधळ सुरू आहे, तुला काहीच ठाऊक नाही?'

'तसं समजलंय, पण तो समर आज परत जायचा होता ना?'

''तो जायचा होता, पण भवानीनगरला नव्हे! मी त्याला जन्माची अद्दल घडवणार होतो. हरामखोरानं सगळ्या राजेरजवाड्यांदेखत रत्नापूरची बेअदबी केली होती.''

'पण तुम्हीच नंतर त्याचं कौतुक केलंत, कोच म्हणून त्याला वाड्यात काही दिवस ठेवून घेतलंत!'

'इट वॉज ए ड्रामा! ते नाटक होतं! त्याला पूर्ण विश्वासात घेऊन मगच त्याच्यावर सूड उगवायचा होता. तो जोपर्यंत भवानीनगरच्या टीममधे रहाणार होता तोपर्यंत ती टीम अजिंक्य ठरणार होती. त्याच्याकडून त्याच्या खेळाचं तंत्र आपल्या खेळाडूंना शिकवून नंतर एक दिवस त्याचा'—

डॅडी बोलता बोलता अचानक थांबले. मी मात्र ओळखायचं ते ओळखलं. डॅडींच्या या कारस्थानाची चाहूल मला फार अगोदर लागली होती; म्हणूनच मी तुझ्या सुटकेसाठी तो प्रयत्न केला होता. डॅडी त्या दिवशी जेवले नाहीत. दिवसभर अस्वस्थ होते. त्यांना माझाच संशय येत होता. परत रात्री मला बोलावणं झालं.

'रत्ना, यू हॅव डन इट? इजंट इट?'

डॅडींनी सरळ सरळ माझ्यावर आरोप केला. तेव्हा मी म्हणाले, 'शेवटी माझा संशय घेतलात आपण?'

'तुझ्या मदतीशिवाय तो इथून बाहेर पडणंच शक्य नाही!'

'आपला काहीतरी गैरसमज होतो आहे!'

'त्या दिवशी पहाटे रात्रपाळीच्या तुझ्या दासी परत केव्हा गेल्या?'

'नेहमीप्रमाणे पहाटे गेल्या असतील! माझ्या काही लक्षात नाही!'

'खोटं बोलतेस! रात्रपाळीची एक दासी दिवसभर त्या दिवशी वाड्यात होती. तूच समरला साडी नेसायला देऊन मुख्य दरवाज्यातून बाहेर जायची सूचना केलीस. वर दिशाभूल करण्यासाठी खिडकीला तो दोर बांधून ठेवला होतास! प्रत्यक्ष जन्मदात्या बापाला फसवलंस?'

'तुमची खात्री आहे?'

'बाय ऑल मीन्स!'

'मग मला काय शिक्षा करायची ती बेलाशक करा!'

मीही उलटा पवित्रा घेतला. पण गंमत अशी की, मला ते काहीच शिक्षा करू शकत नव्हते. हळूहळू त्यांचा क्रोध थंड झाला. त्यांना वाटत होतं की, तू भवानीनगरवरून पत्र पाठवशील किंवा भवानीनगरच्या महाराजांच्या कानांवर हे सर्व घालशील. पण तू तसं काहीच करायचं नाही याची मी तुला ताकीद देऊन ठेवली होती म्हणून बरं झालं!

आज तुला खास पत्र लिहायचं कारण म्हणजे माझं लग्न ठरतं आहे! केव्हा ना केव्हा हे ठरायचंच होतं. यात अनपेक्षित असं काहीच घडत नाही. पण मला एक चिंता सारखी भेडसावते आहे. लग्नानंतर मला शिकार, नृत्यकला, चित्रकला यांची जोपासना करता येणार नाही. ज्या रावेरच्या राजपुत्राशी माझा वाङ्निश्चय होतो आहे ते घराणं फार 'आर्थोडॉक्स' असं आहे! मी तर कॉन्व्हेंटमधे शिकलेली, मुलामुलींत एकत्र खेळलेली, वाढलेली. रावेरच्या राजवाड्यात मला माझ्या आवडीचा एकही छंद जोपासता येणार नाही, याची एकसारखी खंत लागून राह्यली आहे! पण काय करू? सुटकेचा एकही मार्ग नजरेसमोर दिसत नाही! सर्वसामान्य नागरिकाच्या पोटी जन्मले असते तर कुठंही पळून गेले असते! कदाचित् तुझ्याकडेदेखील आले असते! माझं लग्न आणखी एक महिन्यानं होणार आहे! तुला लग्नाला ये म्हणणं म्हणजे पुन्हा पिंजऱ्यात बोलवण्यासारखं होईल! तेव्हा तसलं काही धाडस करण्याच्या भानगडीत पडू नकोस! पुन्हा या आयुष्यांत केव्हा गाठीभेटी पडतील की नाही कुणास ठाऊक, पण माझी मनोदेवता मला सांगते आहे, पुन्हा आपली कुठं ना कुठं भेट होईल. निदान आज मनात तशी आशा तरी आहे!

रत्नप्रभा राजे.'

राजकन्येचं ते पत्र वाचून माझ्या जुन्या स्मृती जागृत झाल्या. रत्नापुरांत घालवलेले दिवस आठवले. महाराजांची कारस्थानी वृत्ती आठवली. 'खरंच, त्या दिवशी ते माझं काय करणार हाते? कुणास ठाऊक? राजकन्येला माझ्याविषयी अनुकंपा वाटली अन् तिनं मला सुखरूप राजवाड्याबाहेर घालवून दिलं. तिचे उपकार या जन्मी तरी माझ्या हातून फिटतील का?....'

बराच वेळ मी अंथरुणावर पडून विचार करत होतो. मध्यरात्र उलटली तरी झोप येईना. दुसऱ्या दिवशी मला नाशिकला जायचं होतं. आईच्या हातून पूर्वीसारखं काम होत नव्हतं. तिच्या हाताखाली लौकरांत लौकर सून यायला हवी होती. न जाणो, आजपर्यंत भरकटत चाललेलं माझ्या आयुष्याचं तारू कदाचित् लग्नामुळे तरी स्थिर होईल!

माझा पाय संपूर्ण बरा झाला होता, पण चालताना मी किंचित् लंगडत होतो. माझे जुने दोस्त मला म्हणायचे की, लंगडतोस असं वाटतच नाही. 'स्टाइलिश' चालतोस असं वाटतं. काय असेल ते असो; कधी कधी गुडघ्यावरची नस दुखायची. लोकांना फ्लशमध्ये फसवल्याबद्दल गुमानसिंगानं मला घडवलेलं प्रायश्चित्त होतं. तो चष्मा मी भवानीनगरला आल्यापासून पेटीत ठेवून दिला होता. एकदोनदा क्लबवर खेळायला गेलो; पण तो चष्मा मात्र मी सोबत नेला नव्हता. 'चारसोबीसगिरी' आपल्या गावी करू नये एवढाच हेतू होता. निदान त्या वेळी तसं वाटलं होतं!

नाशिक! यापूर्वी नाशिकला चारदोन वेळा गेलो होतो. आम्ही रक्तानं राज-क्षत्रिय असलो तरी दोन पिढ्या महाराष्ट्रांत घालवल्यामुळं महाराष्ट्रीय संस्कृतीशी एकरूप झालो होतो. आईसोबत गोदास्नानही मी केलं होतं. त्र्यंबकेश्वर चांगलंच आठवत होतं. पण का कुणास ठाऊक, क्षेत्राच्या ठिकाणी नदीत अंघोळ करायला मनापासून कधीही आवडलेलं नाही. गलिच्छपणाचा कळस! कोणी घाणेरडे कपडे धुतो आहे, तर कोणी हातात दगडाची कपरी घेऊन स्तोत्र बडबडत कडेला बसून अंग घासतो आहे. 'हरगंगे' म्हणून त्या पाण्यात आपण डुंबायचं आणि मोठ्या भाविकतेने ते जल प्राशन करायचं! छी: छी:!....

नाशिकच्या त्या जुन्या आठवणी आठवता आठवता मी नाशिकला पोहोचलो. परदेशींचं घर लहानपणी पाह्यलं होतं; ते आता इतक्या वर्षांनी मला सहजासहजी सापडणार नव्हतं. हातात सूटकेस घेऊन मी परदेशी गल्लीच्या कोपऱ्यावर गेलो, आणि तिथल्या पानपट्टीवाल्याला विचारलं, —

"शंकरलाल परदेशींचा वाडा कोणता?"

"शंकरलाल परदेशी? या गल्लीत दोन शंकरलाल आहेत. तुम्हाला कोणते हवेत?" माझ्या ओठांवर आलं होतं, त्याला सांगायचं 'ज्यांची एक उपवर मुलगी आहे ते शंकरलाल!" पण तसं सांगणं बरं दिसणार नाही. म्हणून मी म्हणालो,—

"त्यांची द्राक्षाची बाग आहे."

"द्राक्षाच्या बागा तर दोघाही शंकरलालांच्या आहेत. तुम्हाला नेमके कोणते हवेत?"

आता आली का पंचाईत! अलिबाबा चाळीस चोरांची आठवण झाली. क्षणभर विचार करून म्हणालो, "आमच्या राज-क्षत्रिय जमातींचे ते पुढारी आहेत. त्र्यंबकेश्वराच्या रस्त्यावरच त्यांची द्राक्षाची बाग आहे!"

इतक्यात समोरून एक मोटार आली आणि पानपट्टीवाल्याच्या दुकानासमोर थांबली. ड्रायव्हर शेजारी बसलेले गृहस्थ हातात दहा रुपयांची एक नोट धरून पानपट्टीवाल्याला म्हणाले, "गोल्ड फ्लेक चार पाकिटं घे!"

पानपट्टीवाला काचेच्या कपाटातून सिगारेटची पाकिटं काढताकाढता मला म्हणाला, "हे एक शंकरलाल आहेत. विचारा त्यांना. कदाचित् तुम्हाला हवे ते हेच असतील!"

मी गाडीजवळ जाऊन त्या गृहस्थांना नमस्कार केला आणि म्हणालो, "मी समर ठाकूर, भवानीनगरवरून आलो आहे!"

गृहस्थांनी मला चष्म्यातून आपादमस्तक न्याहाळलं अन् चेहऱ्यावर स्मित आणून म्हणाले, —

"धीरजलाल ठाकुरांचे कोण तुम्ही?"

"मी त्यांचाच मुलगा!"

"इथं काय करता आहांत?"

"पत्ता शोधतोय, हा पानपट्टीवाला म्हणाला, इथं दोन शंकरलाल परदेशी आहेत; म्हणून थोडा गोंधळून गेलो होतो!"

त्या गृहस्थांची चर्या क्षणभर गंभीर झाली. पण लगेच ते दुसऱ्याक्षणी मोठ्यानं हसत म्हणाले, "चला, बसा गाडीत. माझ्याकडेच यायचं होतं तुम्हाला!"

"आपणच पत्र पाठवलं होतं का?" गाडीचं दार उघडून बसताबसता मी विचारलं.

"माझ्याशिवाय कोण पाठवणार पत्र या नाशकातून!"

ते इतके आत्मविश्वासानं बोलत होते की, शंकरलाल ते तुम्हीच का, की ज्यांनी आपली मुलगी पहाण्यासाठी मला बोलावले आहे, हे विचारण्याचं मला धाडसच झालं नाही! गाडी एका अलिशान बंगल्यापुढे आली. वॉचमननं अदबीनं पुढं होऊन बंगल्याचं लोखंडी फाटक उघडलं. गाडी मधल्या वाळूच्या पट्टयावरून पोर्चमध्ये येऊन स्थिरावली. बंगल्याभोवती निरनिराळ्या प्रकारची देशी अन् विदेशी फुले बहरली होती. कोपऱ्यातलं चायनीज चाफ्याचं बुटकं झाड असं फुललं होतं की, बंगल्याचा सारा परिसर त्यानं सुगंधमय करून ठेवला होता. पोर्चमधे गाडी स्थिरावताच शंकरलाल उतरले. रेशमी बंद गळ्याचा गुडघ्यांइतका कोट, तलम पांढरं शुभ्र झालेले केस मागे वळवलेले. शंकरलाल मला हाताला धरून मेन हॉलमधे नेतानेता म्हणाले,—

"ठाकूरसाहेब अद्याप प्रॅक्टिस करतात ना?"

"जातात अधूनमधून कोर्टात!"

"शेती काय म्हणते! घरी ठेवली आहे की कुळं करतात?"

"कुळंच करतात!"

"एक दिवस तीच मालक होऊन बसतील म्हणावं! तुमचं सध्या काय चाललंय?" शंकरलालनी गोल्ड फ्लेक शिलगावून मला विचारलं.

"मी मधे काही दिवस आर्मीत होतो; पण स्पोर्टसच्या वेळी पायाला हॉकीची स्टिक लागली, म्हणून 'डिसेबल' झालो."

"अरेरे! कुठं लागली?"

मी पँटवरून गुडघा धरून जागा दाखवली.

"पण चालता येतं ना?"

"उत्तम! तसं कोणाला सहजासहजी ओळखताही येणार नाही!"

"आणि समजा, ओळखलं तर त्यात बिघडलं कुठं? अरे भिकूऽऽ?"

एक नोकर धावत आला.

"अलका काय करतेय?"

"कॉलेजला जायची तयारी चाललीय!"

"तिला जरा खाली ये म्हणावं! आणि चहा आण!"

"जी ऽ!"

आम्ही ज्या हॉलमध्ये बसलो होतो त्या हॉलचं मी निरीक्षण करू लागलो. उंची सोफासेट, बाजूला दोन मखमली आवरणाचे दिवाण, कोपऱ्यांत चायनीज पद्धतीची लँपशेड, भिंतीवर मोजकीच अशी मोठी दोन तैलचित्रं. खाली लालगडद असा काश्मीरी गालिचा. ऐश्वर्याचं साक्षात् दर्शन घडवणारा तो हॉल मी पहात असतानाच मधल्या गोल जिन्यावरून अलका धीमीधीमी पावलं टाकत खाली आली.

वीसबावीस वर्षांची परदेशींची कन्या स्वरूपसंपन्न होती. तिनं केलेलं माफक असं प्रसाधन तिच्या सौंदर्याला खुलून दिसत होतं. डोळ्यांच्या कडांना कळत न कळत काजळाची रेख ओढली होती. कमानदार भुवयांवर आय ब्रो पेन्सिल फिरवली होती. खांद्यावरून ओघळणारा पदर सावरत तिनं माझ्याकडे एक कटाक्ष टाकला. आजपर्यंत खूप देखण्या पोरी मी अगदी जवळून पाह्यल्या होत्या. तसं म्हटलं तर आमचं भवानीनगरमधलं घर कॉलेजच्या रस्त्यावरच होतं. याच रस्त्यावरून

पोरींचे तांडे कॉलेजला जायचे. तिसऱ्या मजल्यावरच्या खिडकीतून अकराच्या सुमारास मी रस्त्यावर फोकस लावून बसलेला असे. कितीतरी सुंदर पोरी दिसायच्या. परवा पुण्यात माझ्या सहवासात आलेली पमिला काय कमी देखणी होती? शिवाय रत्नापूरची राजकन्या रत्नप्रभा? खानदानी सौंदर्याचं मूर्तिमंत स्वरूप! पण या सर्वांपेक्षा मला अलकाच्या सौंदर्यांत अधिक भुरळ घालणारं असं काहीतरी जाणवलं खास! तिच्या एका कटाक्षानंच मी घायाळ झालो.

"अलका, हे समर ठाकूर. धीरज ठाकूर वकील आहेत ना भवानीनगरला, त्यांचे चिरंजीव! सैन्यात होते काही दिवस!"

मी उठून अलकाला नमस्कार केला.

अलकानं एका हातातली पुस्तकं सावरत मला नमस्कार केला आणि ती शंकरलालना म्हणाली,—

"पप्पा, मला आज फक्त एकच तास आहे. लौकर येईन परत मी!"

"पण गेलंच पाह्यजे का?" शांतपणे नाकातोंडातून धूर सोडत शंकरलालनी विचारलं.

"हो! लॉजिकचा तास आहे!"

"लॉजिक शिकायला कॉलेजला कशाला जावं लागतं समजत नाही मला!" शंकरलाल विनोद केल्याचा बहाणा करीत म्हणाले, "तर्कज्ञान हे माणसाला शिकवून येत नसतं अलका, ते मुळातच असावं लागतं! काय हो?"

मी हसत हसत मान डोलावली.

अलकानं पुन्हा माझ्याकडे एक कटाक्ष टाकला. मी कोपऱ्यातल्या लँपशेडकडे पहात बसलो. इतक्यात भिकू चहा घेऊन आला तशी अलका परदेशींना म्हणाली, "लगेच येते मी, पप्पा!"

"बरं बरं!"

ट्रेमधला चहाचा कप स्वत: शंकरलालनी उचलून माझ्या हाती दिला आणि मुख्य प्रवेशद्वारातून बाहेर चाललेल्या अलकाला उद्देशून ते म्हणाले, "लौकर ये हं! आपल्याला मधुबनला जायचं आहे. माझी गाडी नादुरुस्त आहे आज!"

अलका स्वत:च ड्रायव्हिंग करीत कॉलेजला निघून गेल्यानंतर शंकरलाल मला म्हणाले, "अभ्यासात फार हुषार आहे! दोन वर्षांपूर्वी एस. एस. सी. ला सेंटरला पहिली आली. हिच्या शिक्षणासाठी मला एकही पैसा खर्च करावा लागलेला नाही! सारं शिक्षण स्कॉलरशिपवर झालंय!"

मी कोटाच्या खिशांत हात घालून चेहऱ्यावर स्मित आणून ऐकत होतो. शंकरलाल बोलत होते, "एक मुलगा आणि एक मुलगी!"

"ते कुठं असतात?"

"तो असतो मुंबईला!"

"शिकतात वाटतं?"

शिकतो कुठला? नोकरी करतोय औषधाच्या कंपनीत. काय सांगायचं समरबाबू, माणसाला दैव देतं खूप, पण खायची बुद्धी नको का? चमत्कारिक स्वभाव आहे त्याचा! मी म्हणालो, अरे बाबा, एवढी इस्टेट आहे. आरामशीर मधुबनांत बायको-मुलांना घेऊन रहा; पण ऐकलं नाही! गोरेगावला ब्लॉक आहे. बायको-मुलं मुंबई सोडायला नको म्हणतात म्हणे! आहे काय त्या मुंबईत हेच कळत नाही मला! या अलकाचं एवढं लग्न झालं की माझी जबाबदारी संपली! या आयुष्यांत कितीजणांची म्हणून चिंता करायची, समरबाबू?"

मी मान डोलावत राह्यलो.

शंकरलाल मला आपल्या कर्तृत्त्वाचा इतिहास कथन करताना म्हणाले, "तीस वर्षांपूर्वी मी नाशकांत आलो तेव्हा अंगावर धड कपडेसुद्धा नव्हते. विड्या वळायच्या कारखान्यात नोकरी धरली आठ आणे रोजावर. मालकांचा विश्वास बसला. विड्याच्या कारखान्यात मुकादम म्हणून बढती मिळाली! हळूहळू कारखानाच माझ्या हातात आला; पण मालकांच्या मनात काय आलं कुणास

ठाऊक! त्यांनी कारखाना विकून टाकला आणि द्राक्षाची बाग करायचं ठरवलं! त्या वेळी द्राक्षाच्या बागा फार थोड्या होत्या!''

''बरं, मग?''

''मग काय, जमीन घेतली, द्राक्षाची लागवडही केली; पण चार महिन्यांत अचानक मालक गेले! एखादा धंदा लाभत नसतो हो!''

''त्यांचे कोणी वारस?''

''बायको होती; दोन मुली होत्या. पण त्या शेती करतात थोडीच? जबाबदारी माझ्यावरच पडली. मुलींची लग्न करून दिली. मालकीणबाई परवापरवापर्यंत होत्या.''

''म्हणजे ही मूळ प्रॉपर्टी आपली नव्हे तर?''

शंकरलाल त्यावर हसले आणि म्हणाले, ''प्रॉपर्टी कोणाचीच नसते. माणूस तरी काय ती जाताना घेऊन जातो थोडाच? ही जबाबदारी माझ्यावर पडली एवढं खरं! आता अलकाचं एवढं लग्न झालं की....''

शंकरलाल पुन्हा मूळ पदावर आले. त्यांच्या वक्तव्यावरून ते अलकाचं लौकरात लौकर लग्न करून टाकण्यासाठी आतुर आहेत असं मला दिसून आलं.

''बरं, आता तुम्ही माडीवर जा, स्नान वगैरे आटोपून घ्या. अलका येईलच इतक्यात. मग मधुबनला जाऊ. तुम्हाला आमची द्राक्षाची बाग दाखवतो. पहा आदर्श बागाईतदार कसा असतो ते! अरे भिकू ऽ! पाव्हण्यांना गेस्टरूमकडे घेऊन जा!''

भिकूसोबत मी त्या हॉलच्या गोल जिन्यानं माडीवर गेलो. समोर अलकाची खोली होती. खोलीचं दार उघडंच होतं.

''हितं आक्कासाब असत्यात!'' भिकूनं न विचारताच मला सांगितलं.

त्या खोलीच्या दाराशीच मला उंची सेंटचा गंध जाणवला. मघा बाहेर जाण्यापूर्वी अलकानं सर्वांगावर फवारलेले काही कण अद्यापही हवेत तरळत होते. समोर ड्रेसिंग टेबलावर प्रसाधनांनी एकच दाटी केलेली होती. बाजूला कपाट होतं, ते बंद होतं, पण त्यात किती प्रकारच्या साड्या असाव्यात याचा मी अंदाज करू शकत होतो. भिकूनं मला गेस्टरूमचं दार उघडून दिलं. मी बॅग टेबलावर ठेवली अन् बूट काढले. भिकूला म्हणालो, ''थोड्या वेळानं अंघोळ करतो. एक बादलीभर गरम पाणी आणून ठेव बाथरूममधे!''

भिकू हसून म्हणाला, ''गरम पानी बाथरूमातच हाय, मालक! बटन दाबला का गरम पानी!''

''असं ऽ? मग हरकत नाही!''

''आनि काय आणायचं?''

''काही नको!''

भिकू निघून गेल्यानंतर मी खोलीचं दार आतून बंद केलं आणि कॉटवर पाय पसरून पडलो. त्याच क्षणी माझ्या मनात विचार आला, या अलकाशी लग्न झालं तर माझं उद्दिष्ट साध्य होईल का?.... खरं म्हणजे आईच्या हाताखाली काम करणारी सालस, गरीब स्वभावाची अशी सून हवी होती! ही तर लाखोपती बापाची लाडकी लेक! स्वत: गाडी घेऊन कॉलेजला जाणारी! फॅशनेबल! सुस्वरूप आहे एवढ्या एकाच गुणावर तिची पसंती करणं उचित ठरेल का?

इतक्यात खालून परदेशीची हाक आली, ''समरबाबू! तुमचं आवरलं का! अलका आली बघा!''

मी कॉटवरून उठलो. म्हटलं, एवढ्यात ही जाते काय अन् लगेच येते काय? इतक्यात कसलं लॉजिक शिकून आली ही?

अंघोळ करून कपडे बदलून मी खाली आलो. ती दोघे माझीच वाट पहात होती. गाडी चालवायला अलकाच बसली. मी तिच्या शेजारी. मागे सिगारेटचा आस्वाद घेत शंकरलाल ऐसपैस एखाद्या शेटजीनं पेढीवर बसावे तसे पाय पसरून बसले होते.

चौदा एकर द्राक्षांची बाग, त्यात मध्यभागी 'मधुबन' अशी अक्षरं असलेला बंगला.

बंगल्यात केनचं फर्निचर होतं, पण त्यावरच्या गाद्या होत्या रबर फोमच्या! फोन होता. इलेक्ट्रिसिटी होती. नोकर-चाकर होते. कशाची कमतरता नव्हती! अलकाच्या मादक सौंदर्यापुढं मला आईच्या हाताखाली एक गरीब स्वभावाची सून हवी याची जाणीवच उरली नाही. अलकाचं बघणं, हसणं, बोलणं, यात एक प्रकारचं आकर्षण होतं, मादकता होती.

मधुबनांत आल्याआल्या शंकरलालनी कपाटातली बाटली काढून टेबलावर ठेवली, अन् ते मला म्हणाले,-

"तुम्हाला अलका सगळी बाग दाखवेल. मी थोडा वेळ 'रिलॅक्स' होतो!"

चौदा एकर बाग, पण स्वच्छता वाखाणण्यासारखी होती. लोखंडी अँगल्स सिमेंटमधे रोवले होते. वर तारांची जाळी होती आणि या जाळीवर नक्षीदार पानांचे द्राक्षाचे वेल सोडलेले होते. मी गेलो तो मोसम ऐन द्राक्षाच्या बहराचा! अलका मला माहिती सांगत होती,-

...."हे वेल अनाबेशाहीचे आहेत. पलीकडची ओळ काळी साहेबीची, त्यानंतर ही ओळीनं दिसतात ही आहेत थॉमसन सिडलेस आणि पलीकडे जी रांग दिसते ती सिलेक्शन सेव्हन!"

"यातली तुम्हाला कुठली आवडतात?" मी विचारलं.

"मला द्राक्षंच आवडत नाहीत!" अलका डोळ्यांची आकर्षक उघडझाप करीत म्हणाली.

"आश्चर्य आहे!"

"अहो, ती बघूनच नाकात वास बसतो!"

"एवढं मात्र खरं! आमच्या भवानीनगरला उसाची गुऱ्हाळं असतात; पण तिथं जाऊन उसाचा रस प्यावासाच वाटत नाही!"

"मला उसाचा रस फार आवडतो!" अलका म्हणाली.

"आमच्याकडे चिक्कार आहे. डॅडींचे काही जुने पक्षकार आहेत ते घागरीच्या घागरी भरून घरी आणतात; पण डॅडी त्यांना काय म्हणतात, आहे ठाऊक?"

"काय म्हणतात?"

"एवढ्या रसाचं अल्कोहल तरी करून आणायचं!"

"अय्या ऽ! म्हणजे आमचे पप्पा आणि तुमचे डॅडी यांचं वागणं अगदी सारखंच दिसतं! पप्पा प्रत्येक सीझनला ही जास्त पिकलेली द्राक्षं आंबवून भट्टी लावून दारू तयार करून ठेवतात! त्यांना विकतचं मद्यच आवडत नाही!"

"पण काय हो, तुम्हाला हे सर्व सोडून भवानीनगरला राहायला आवडेल?" मी अचानक अलकाला प्रश्न केला. ती माझ्याकडे विचित्र नजरेनं पहात म्हणाली, "म्हणजे? मला नाही समजलं, तुम्हांला काय म्हणायचंय ते?"

"तुमचे पप्पा काही बोलले नाहीत तुम्हाला?"

"नाही! का?"

"मला वाटलं, बोलले असतील!"

"काय बोलले असतील असं वाटलं?"

"मला इथं ज्या कारणासाठी बोलावलं आहे त्याची तुम्हाला कल्पना असावी असं वाटलं!"

"ॲबसोल्युटली आय हॅव नो आयडिया!" अलका प्रामाणिकपणे उद्गारली.

मला वाटलं, की उगाच आपण तो विषय काढला. शंकरलालनी अलकाला माझा तिथं येण्याचा उद्देश सांगितला नसावा, अशी माझी खात्री झाली. बोलतबोलत आम्ही परत मधुबनांत आलो. शंकरलालनी हसतहसत म्हटलं, "कशी काय वाटली बाग, समरबाबू?"

"फारच छान!"

"पप्पा!" अलका मधेच म्हणाली, "यांना तुम्ही मुद्दाम बोलावलंत आपल्याकडे?"

"हो." किंचित् गोंधळून शंकरलाल म्हणाले.

"कशासाठी?"

"घ्या ऽ!" शंकरलाल मोठ्यानं हसत मला म्हणाले, "या पोरींना कॉलेजांत कसलं

ढेकळाचं लॉजिक शिकवतात समजत नाही! आपल्या खानदानीतला एक उमदा देखणा तरुण आपल्या घरी का येतो, हेदेखील आजकालच्या मुलींना समजू नये? आणि म्हणे लॉजिक शिकते!'' समोरचा ग्लास रिकामा करून शंकरलाल माझ्याकडे आणि अलकाकडे पाहू लागले अन् मग मात्र अलका लाजली! लाजल्यानंतर ती फारच छान दिसली. तिच्या कमरेभोवती हाताचा विळखा घालून परत एकदा तिला बागेत घेऊन जावंसं वाटलं! पण ते शक्य नव्हतं! नोकरानं पलीकडच्या खोलीत जेवणाची ताटं मांडायला सुरुवात केली होती. चिक्कन करीचा वास सुटला होता. सिगारेटचा धूर नाकातोंडांतून सोडतासोडता शंकरलाल मला म्हणाले, ''धीरजलाल आणि मी खूप वेळा एकत्र प्यालो आहे! वुई आर फ्रेंडस्, आता यापुढं आमची मैत्री रक्ताच्या नात्यानं जखडली जाईल! अलका पसंत आहे ना तुम्हाला?''

मी लाजून मान खाली घातली. मग अलका केवळ पसंतच नव्हती तर खूप खूप आवडली होती. तिचं वागणं, बोलणं, हसणं सर्वच काही विलोभनीय होतं.

-o-o-o-

७

अख्ख्या नाशिक शहरांत त्या वेळी अलकाइतकी दुसरी सुंदर मुलगी नव्हती. कॉलेज क्वीन तर ती होतीच होती. पण त्याचबरोबर अभ्यासांत हुषार असल्यामुळे तिच्या व्यक्तिमत्त्वाला एक विशेष असं महत्त्व होतं. सौंदर्य आणि बुद्धी यांचा संगम क्वचितच पहायला मिळतो. पण इथं त्रिवेणी संगम झाला होता- सौंदर्य, बुद्धी आणि ऐश्वर्य यांचा!

मी सहा दिवस शंकरलाल परदेशींच्या बंगल्यावर राह्यलो. या सहा दिवसांत मी अन् अलका खूपच जवळ आलो. अलका माझ्याशी अगदी मन-मोकळेपणानं वागत होती. तिनं डॅडींच्याबद्दल, आईबद्दल मला सर्व माहिती विचारून घेतली. माझा पूर्वेतिहास मी तिला सांगितला तेव्हा ती म्हणाली,-

"बरेच अनुभव तुमच्या गाठीशी आहेत तर!"

"हो, पण आता यापुढं कुठंतरी स्थायिक व्हावं असं वाटू लागलंय! झाली इतकी भटकंती आणि धावपळ पुरे असं वाटतंय!"

"पण मला हे नाही समजलं, की तुम्हाला त्या शिखानं पायावर हॉकीस्टिक मारून जायबंदी का करावं?"

"तो नेहमी फ्लशमधे हरायचा, त्याचा सूड उगवला त्यानं माझ्यावर!"

"नेहमीच कसा हरायचा? जुगारात हारजित ही कोणाची ना कोणाची होणारच. त्याबद्दल त्यानं अशी सूडभावना बाळगावी याचं आश्चर्य वाटतं!"

खरं म्हणजे मी अलकाला बेहराम इराण्याच्या चोरलेल्या त्या चष्म्याबद्दल सांगायला हवं होतं. पण ते सांगणं म्हणजे माझी मीच बदनामी करून घेण्यासारखं होतं. मी तिला चष्म्याचं ते प्रकरण सांगण्याचं हेतु:पुरस्सर टाळलं.

आमच्या आवडीनिवडी समान होत्या. चांगले कपडे वापरावेत, चांगलं खावं, आयुष्य मजेत आणि सुखासमाधानात घालवावं, हेच मी आजपर्यंत करीत आलो होतो. अलकानंही हेच केलं होतं. पण ती माझ्यापेक्षा वरचढ होती ती एका बाबतीत, शिक्षणात! मी कॉपी करताना सापडल्याचं जेव्हा तिला सांगितलं तेव्हा हसून हसून ती बेजार झाली, अन् मला म्हणाली, 'तुमची ती दोन वर्षे संपली की तुम्हाला ग्रॅज्युएट करायची जबाबदारी माझी!"

मी कोपरापासून हात जोडून "तेवढी मेहेरबानी कर! यापुढं चुकूनदेखील कॉलेजचं तोंड पहाणार नाही!"

"पण मला ग्रॅज्युएट व्हायचं असेल तर?'

"तू बेशक हो. माझी ना नाही, डब्बल ग्रॅज्युएट झालीस तरी हरकत नाही!"

मी अलकाला आणि अलका मला पसंत होती. मी आईला अन् डॅडींना तार करण्यासाठी पोस्टाकडे निघालो, तेव्हा एक मध्यम वयाचा गृहस्थ माझ्यापाठोपाठ येतो आहे असं मला दिसलं. मी मुद्दामच थांबलो. तो गृहस्थ जवळ आला आणि त्यानं मला विचारलं, "आपण समरसिंग ठाकूर?"

"हो, आपण कोण?"

"मी शंकरलाल परदेशी!"

"काय म्हणालात?" मी आश्चर्यचकित होऊन विचारलं.

"मीच शंकरलाल परदेशी! मीच ठाकूरसाहेबांना पत्र पाठवलं होतं. माझी मुलगी बघण्यासाठी तुम्हाला पाठवलेलं आहे त्यांनी; पण चुकून तुम्ही त्या शंकरलाल परदेशींच्या घरी गेलात. उभं नाशिक या शंकरलालना ओळखतं. मी काही जरी सांगितलं त्यांच्याबद्दल तरी

स्वार्थामुळं सांगतो असं म्हणाल! तुम्ही त्यांच्याविषयी, त्यांच्या मुलीविषयी कोणाकडेही चौकशी करा! भलत्याच ठिकाणी गेलात हो तुम्ही!''

मी त्या गृहस्थांच्या उद्गाराने चक्रावून गेलो. गेले सहा दिवस मी ज्या शंकरलाल परदेशींकडे राह्यलो ते निराळेच होते, या जाणिवेनं पुरता गोंधळून गेलो.

''पण तेही शंकरलाल डॅडींना ओळखतात! आमच्या डॅडींना त्यांनीही मुलगी पहाण्यासाठी या असा निरोप दिला होता!''

''असं करा, आपण थोडा वेळ माझ्या घरी चला, मी तुम्हाला सर्व काही समजावून देईन!''

''मी आता कुठे येऊ शकत नाही!'' मी म्हणालो.

''का?''

''मी अलकाला माझी पसंती कळवली आहे. माझं अलकाशी लग्न अगदी अटळ आहे!''

''समरबाबू, हात जोडतो. असा आततायीपणानं निर्णय घेऊ नका, आयुष्यभर पस्तवाल!' गृहस्थ काकुळतीला येऊन म्हणाले.

''पण तुम्ही इतके दिवस थांबलाच कशासाठी? मी इथं येऊन सहा दिवस झाले. या आधी का नाही तुम्ही मला निरोप पाठवला?''

''कसा निरोप पाठवणार? काल रात्री मला ठाकुरसाहेबांची तार आली. समर अजून कसा परत आला नाही म्हणून! मग चौकशी सुरू केली, तेव्हा समजलं की, एकसारख्या नावाचा फायदा घेऊन या विडीवाल्या परदेशीनं तुम्हाला चांगलंच बनवलेलं आहे.''

''हे पहा, आपण आता मला काहीही सांगून उपयोगाचं नाही. माझं अन् अलकाचं लग्न जवळ जवळ ठरल्यासारखंच आहे?''

''आता असं म्हटल्यावर माझा नाईलाज आहे. पण तुमच्या डॅडींनी ज्या शंकरलाल परदेशीच्या घरी तुम्हाला पाठवलं तो शंकरलाल तो नव्हे एवढं तरी मान्य कराल की नाही?''

''मान्य करण्याचा अगर न करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही आता!'' मी निर्धारानं म्हणालो.

''मग संपलंच! पण एवढी एक शेवटची मागणी तरी माझी मान्य करा.'' काकुळतीला येऊन ते म्हणाले.

''कसली?''

''माझ्या मुलीला एकदा पाहून तरी जा!''

''अशक्य आहे! तुम्हाला सांगितलं ना मी अलकाशी वचनबद्ध आहे!''

''दिशाभूल करून शंकरलालनं तुम्हाला फसवलेलं आहे, मिस्टर ठाकूर! माझ्या मुलीला कुठंही दुसरं स्थळ मिळेल! तुमच्यासाठी मला इतका अट्टाहास करायचं कारण नाही. पण सत्य काय आहे हे सांगण्यासाठीच तुमची भेट घेतली! येतो मी! तो समोर कोपऱ्यावर दिसतो तो माझा वाडा! शंकरलाल परदेशी, कॉंट्रॅक्टर म्हणतात मला! माझीही थोडीशी द्राक्षाची बाग आहे. पण ती स्वकष्टार्जित आहे! कोणाला लुबाडून, फसवून मिळवलेली नाही! येतो मी!''

मी पोस्टाकडे चाललो होतो. पोस्ट पाचच मिनिटांच्या अंतरावर होतं; पण त्या गृहस्थाच्या बोलण्यानं मला जागचं पाऊलच उचलता येईना! नामसादृश्यामुळं काहीतरी घोटाळा झाला होता, एवढं निश्चित! पोस्टांत जाण्याऐवजी मी त्या शंकरलाल कॉंट्रॅक्टरांच्या घराच्या दिशेनं चाललो. वाटेत ते पानपट्टीचे दुकान लागले. मी त्या दुकानाजवळ जाताच पानपट्टीवाला मला हात जोडून म्हणाला, ''नमस्कार साहेब!''

''नमस्कार! पण काय हो, मी तुम्हांला शंकरलाल परदेशीचा वाडा विचारला तेव्हा तुम्ही-''

''मी काहीच केलं नाही! शेठ गाडीतून आले होते, शंकरलाल परदेशी त्यांचं नाव आहे असं फक्त मी तुम्हाला सांगितलं. पण मलाही नंतर समजलं, तुम्हाला जायचं होतं ते कॉंट्रॅक्टर परदेशींच्याकडे!''

''त्यांना मुलगी आहे ती ओळखता तुम्ही?''

''हो. या गल्लीतले सगळे परदेशी लोक माझ्या नात्याचेच आहेत!'' पानपट्टीवाला

म्हणाला.

"अलकाला ओळखता?"

पानपट्टीवाला हसला आणि म्हणाला, "तिला उभं नाशिक ओळखतं!"

"या कॉंट्रॅक्टरांची मुलगी अलकापेक्षा सुन्दर आहे?"

पानपट्टीवाला मिस्किल हसला आणि म्हणाला, "बाबूजी, मी कॉंट्रॅक्टर परदेशीची रेखाही ओळखतो आणि बड्या शेठची अलकाही ओळखतो; पण कोण उजवी अन् कोण डावी हे मी सांगू शकत नाही!"

"का?"

"दोघीही माझ्या नात्यातल्याच आहेत!"

"काहीतरी घोटाळा झाला हो!" मी म्हणालो.

पानपट्टीवाला मोठा तऱ्हेवाईक होता. तो मला आपल्या बोलण्याने अधिक बुचकळ्यात पाडत होता. डॅडींना पत्र पाठवणारे शंकरलाल हे अलकाचे वडील नव्हते ही माझी खात्री झाली होती.

मी कॉंट्रॅक्टर परदेशीच्या घरी गेलो. ते आरामखुर्चीवर पडले होते. बसल्या बसल्याच ते म्हणाले, "या ऽ!"

मी त्यांच्या समोरच्या खुर्चीवर येऊन बसलो. काहीशा गोंधळलेल्या अवस्थेत मी बोलायला सुरुवात केली, "सहा दिवसांपूर्वी मी तुमचीच चौकशी करीत त्या पानपट्टीवाल्याच्या दुकानाजवळ उभा होतो. तेव्हा...."

मी त्यांना सर्व हकीकत निवेदन केल्यावर शांतचित्ताने ते म्हणाले,

"आयती संधी चालून आल्यावर ते तुम्हाला सोडतात थोडेच? आपल्या खानदानीतला असा तरुण त्यांना कुठं मिळणार होता?"

"का नाही मिळणार? अलका हुषार आहे, दिसायलाही सुंदर आहे!"

"हे पहा समरबाबू, मी काही आचरणातली तत्त्वं पाळत असतो. कोणाची कुचेष्टा करून स्वत:ची प्रतिष्ठा वाढवून घ्यायची ही माझी पद्धत नाही. पण एवढं मात्र मी निक्षून सांगू इच्छितो की, अलकाशी लग्न केल्यानं तुम्हाला सुख लाभणार नाही!"

"पण तुमची मुलगी -"

"आता ती मी तुम्हाला दाखवणार नाही! तुम्ही वचनबद्ध आहात ना?"

"हो, पण-"

"जातीचा राज-क्षत्रिय एकदा दिलेला शब्द मागे घेत नसतो. तुम्ही शब्द दिलाय ना त्यांना?"

"हो.'

बराच वेळ मी स्तब्ध बसून होतो; पण तो सद्गृहस्थ कोणतीच गोष्ट स्पष्ट रीतीनं बोलायला तयार नव्हता. अलकाशी होणारा माझा विवाह सुखावह होणार नाही, एवढंच बोलून त्यांनी माझी जिज्ञासा पराकोटीला नेऊन सोडली होती. अधिक खुलासाही करायला ते तयार नव्हते!

मोठ्या विचित्र अवस्थेत मी परत बंगल्यावर आलो, तार न करताच! संध्याकाळी बॅग भरायला सुरुवात केली. तिथं अलका आली आणि म्हणाली,

"हे काय? तुम्ही डॅडींना अन् आर्इंना बोलावणार होता ना?"

"बोलावणार होतो; पण समक्षच जावं असा विचार केला आहे!"

"का?"

"सहज!"

"ते काही चालणार नाही." असं म्हणून अलकानं माझा हात पकडला आणि दुसऱ्या हातानं मी बॅगेत भरलेले कपडे भराभरा बाहेर उपसून काढले. अलकाच्या सौंदर्यात धुंदी होतीच; पण तिच्या स्पर्शात देखील एक अनोखी अशी किमया होती. तिच्या शरीराचा स्पर्श हवाहवासा वाटे. माझा धरलेला हात तिच्या हातातून सोडवून घ्यावा असं मला मुळीच वाटेना!

माझ्या तारेची वाट पाहून डॅडी आणि आई दोघंही नाशिकला येऊन ठेपली. ती उतरली बाहेरच. तिथं त्यांना सर्व काही समजलं. त्यांनी मला बोलावणं धाडलं.

डॅडी म्हणाले, "तुला ती अलका पसंत आहे का?"

"हो."

"मग माझी काही हरकत नाही!'

इतक्यांत आई पुढे येत म्हणाली, "त्या मुलीशी याचं लग्न होता कामा नये!"

"का?" डॅडींनी विचारलं.

"तिचं आणि याचं जमणार नाही!"

"कशावरून ठरवतेस तू हे?"

"बायकांना सर्व काही समजतं!" आई मोघमात बोलली.

"काही समजत नाही!" डॅडी म्हणाले, "आजकालचा जमाना मुलामुलींनी एकमेकांच्या आवडीनिवडी, स्वभाव ओळखून निर्णय घेण्याचा आहे! मी समरच्या निर्णयाशी सहमत आहे!"

"अरे, पण निदान त्या कॉन्ट्रॅक्टरची मुलगी तरी पहायची होतीस! सुलक्षणी मुलगी आहे. सारं घर सांभाळते. शिवाय शेतीही बघते. अशीच सून मला हवी होती. सांबर तलावाभोवतालची शेती मला बघता आली नाही, निदान सुनेनं तरी सांभाळावी ही इच्छा होती!

डॅडी हातवारे करीत आईच्या म्हणण्याबाबत नापसंती व्यक्त करीत म्हणाले, "धिस इज शिअर नॉनसेन्स! समर, यू डोंट पे एनी हीड टु व्हॉट शी सेज!"

शेवटी हो-ना करीत त्या दोघांना मी शंकरलालशेठ परदेशी यांच्या बंगल्यावर घेऊन आलो. डॅडी माझ्या 'सिलेक्शन' वर खूष होते. कारण त्यांना संध्याकाळी प्यायला मिळणार होती, पण आई मात्र का कुणास ठाऊक नाराज होती!

डोक्यावर पदर घेऊन अलका आईच्या पाया पडली. आईने आशीर्वाद देण्यासाठी केवळ हात उंचावला, पण तोंडाने बोलली मात्र नाही काहीच!

अलकाबद्दल तिला असं का वाटत होतं हे मला समजत नव्हतं, पण ती नाराज होती एवढं खरं!

डॅडी आणि मी एका बाजूला झाल्यानंतर आईच्या विरोधाला कितीशी किंमत रहाणार होती?

आमच्या विवाहाची तिथी निश्चित करण्यात आली. शंकरशेठ परदेशींनी वाङ्निश्चयाच्या जेवणालाच चार-पाच हजार रुपये खर्च केले. पुढे चारच दिवसांनी मोठ्या धुमधडाक्यानं आमचं लग्न झालं. अलकाला नाशिक सोडताना खूप दु:ख झालं. शंकरशेठ परदेशींचा मुलगा कुलदीपसिंग एकच दिवस लग्नासाठी येऊन गेला.

भवानीनगरला आल्यानंतर आजूबाजूचे खूप नातेवाईक भेटून गेले. डॅडी खुशीत होते. येताना शंकरशठनी व्याह्यांना व्हिस्किचं अख्खं 'क्रेट' दिलं होतं. आई मात्र एकसारखी मला म्हणत होती, 'समर, उतावळेपणा केलास रे! राज-क्षत्रियाच्या घरी येणारी मुलगी उभी येते, पण जाताना मात्र आडवी जाते!"

"कसली म्हण काढलीस ही?" मी आईला विचारलं.

"राज-क्षत्रियाची लग्न होऊन गेलेली मुलगी मेली तरच त्या घरातून बाहेर पडते. जिवंतपणी ती ते घर सोडूच शकत नाही!"

"पण तुला अलकाबद्दल असं का वाटतं?"

"मी काहीएक सांगू इच्छित नाही; तुझं तुलाच अनुभवानं कळेल ते!"

लग्न झाल्यानंतर निदान सहा महिने लोटले तरी मला तसं काही जाणवलं नाही. मी आणि अलका, या दोन भिन्न व्यक्ती उरलेल्याच नव्हत्या. अलका आईला स्वयंपाकातदेखील मदत करीत होती. पण तरीही आईचं तिच्याबद्दलचं मत निवळायला तयार नव्हतं. नंतर नंतर मला आईचाच राग येऊ लागला! निष्कारण ती अलकाबद्दल मनात आकस बाळगून आहे असं वाटल्यानं मी आईशी बोलणंच बंद करून टाकलं.

अलकानं मला लग्नाच्या अगोदरच सांगून टाकलं होतं, 'लग्नानंतर मला माझं ग्रॅज्युएशन पूर्ण करायचं आहे!' मी तिला माझी संमतीही दर्शवली होती. भवानीनगरला आल्यानंतर तिनं कॉलेजात नाव दाखल केलं. आईला मात्र आमचा तो निर्णय आवडला नाही. तिनं नापसंती व्यक्त करताना मला म्हटलं,-

"हे आणखी काय तिच्या डोक्यांत भरवलं?"

"मी नाही भरवलेलं. तिचीच इच्छा होती बी. ए. व्हायची. मी कशाला आड येऊ तिच्या?"

"नोकरीच करायची आहे?"

"नोकरी कशाला करायला हवी? बी. ए. झाली तर त्यांत बिघडलं कुठं?'

याही बाबतीत डॅडी आमच्याच बाजूला होते. ते आमच्याही पुढं! अलकाला ते म्हणाले,

"अलका तू केवळ बी. ए. वरच थांबू नकोस, पुढं 'लॉ' ला नाव दाखल कर! या भवानीनगरमधे अद्याप एकही लेडी ॲडव्होकेट नाही. तू मिळव तो मान! माझी इच्छा होती समरनं वकील व्हावं. पण तो कसला होतोय वकील! अमर होईल म्हटलं तरी त्याचाही भरवसा नाही. माझं हे क्लायंटेल दुसऱ्या कोणाला देण्यापेक्षा निदान घरातल्या घरातच राहील!"

अलका अत्यंत विनयानं म्हणाली, "आपला आशीर्वाद आणि प्रोत्साहन मला असल्यावर तेदेखील शक्य होईल, डॅडी!"

अलका कॉलेजला जाऊ लागली.

आईनं अलकाशी होणाऱ्या विवाहाला सुरुवातीला जरी विरोध दर्शवला असला तरी, नंतर मात्र तिनं फारशी कुरबुर केली नाही. केली असती तरी त्याचा फारसा उपयोग नव्हता. लग्नानंतर तिनं दुसरीच एक अपेक्षा मनात बाळगली. घरी लवकर पाळणा हलावा. अमर झाल्यानंतर घरी गेल्या वीस वर्षात पाळणा हललेला नव्हता. तेव्हा मला लवकरात लवकर मूल व्हावं ही आईची अपेक्षा नैसर्गिक होती.

त्या दिवशी मी माझा हातरुमाल शोधत होतो. शोधता शोधता अलकाची ट्रंक उघडली, आणि मला त्यात औषधांच्या बाटल्या दिसल्या. गर्भप्रतिबंधक गोळ्यांची ती बाटली उचलून मी त्यावरचं लेबल वाचलं आणि अलकाला विचारलं,

"हे काय? हे कशासाठी?"

अलका कसल्यातरी नोटस् काढत होती. ती किंचित् स्मित करून म्हणाली, "तुम्ही तिथं कशाला गेलात धडपडायला? ठेवून द्या ती बाटली!"

मी ती बाटली हातात घेऊन अलका बसलेल्या टेबलाजवळ येऊन म्हणालो, "आईला जर हे समजलं तर काय वाटेल?"

"मला पर्वा नाही!" बेफिकीरीनं अलका उद्गारली.

"पर्वा नाही म्हणजे?"

"डिग्री मिळेपर्यंत मला मूल नको आहे! हे स्पष्टच सांगायला हवं का?"

तिच्या त्या उत्तरानं मला काय बोलावं हेच समजेना. तथापि क्षणभर विचार करून मी म्हणालो, "तुझ्या शिक्षणामुळं ही गुंतागुंत होणार आहे याची मला कल्पना नव्हती!"

"मूर्ख आहेस म्हणून कल्पना आली नाही!" वहीवर नोटस् काढायचं पुढं चालू ठेवीत अलका म्हणाली.

"पण एक मूल झाल्यानंतर तुला पुढं नाही का शिकता येणार?" मी विचारलं.

"इंपॉसिबल! मूल केव्हाही होईल पण एकदा शिक्षणात खंड पडला तर ते मात्र पूर्ण होत नसतं कधी! तू प्लीज आता बडबड थांबवशील तर बरं होईल, समर! मला आजच्या आज एवढ्या नोटस् पुऱ्या करायच्या आहेत!"

मी काहीएक न बोलता माडीवरून खाली आलो. आई स्वयंपाकघराच्या तोंडाशी तांदूळ निवडीत बसली होती. आताशी तिला नीट दिसतही नव्हतं. डोळ्यांना चाळीशी लागू लागली होती. माझ्याकडे पहात ती म्हणाली, 'समर, चेहरा कशानं उतरलाय रे तुझा?"

"कुठं काय?" मी चेहऱ्यावर खोटं हास्य आणून म्हणालो.

"हे बघ, मी तुझी आई आहे. तुझ्यात एवढा जरी बदल झाला तरी मला समजत!"

"बरं बरं!" हसत हसत विषय बदलण्याच्या हेतूनं मी म्हणालो, "तुझं काहीतरीच असतं आई. डोळ्याला चष्मा लागल्यामुळे तुला माझ्यात काहीतरी बदल झाल्याचा भास होतोय!"

आईनं ते काही कबूल केलं नाही. संध्याकाळी मी घराबाहेर पडलो. मस्तक विचारानं बधिर झालं होतं. अलकाशिवाय डोक्यात दुसरा विचार येत नव्हता. आज ती ज्या बेपर्वाईनं माझ्याशी वागली, ती तऱ्हा मला मुळीच पसंत पडली नव्हती. पण आता हे मी कोणाला सांगू? आईनं शेवटच्या घटकेपर्यंत लग्नाला विरोध केला होता. पण मी तो जुमानला नव्हता.

शंकरलालशेठ परदेशी यांनी मला त्या दिवशी नाशिकमधे अचूक हेरलं! काँट्रॅक्टर शंकरलाल यांनी खरं म्हणजे मला बोलावलं होतं; पण मीच तो शंकरलाल असं अलकाच्या वडिलांनी मला भासवलं होतं. त्यांच्या ऐश्वर्यानं माझे डोळे दिपले. अलकाच्या सौंदर्यानं मला भुरळ पाडली. माझी सदसद्विवेकबुद्धी अन् विचारशक्तीच लुप्त झाली. मला अलकाच हवी हवीशी वाटू लागली. पण आज अलकानं आपलं खरं स्वरूप दाखवलं! तिला माझ्याविषयी, माझ्या आईविषयी तिळमात्र आदर नव्हता. तिच्या शिक्षणाआड येणारी प्रत्येक व्यक्ती तिला तुच्छ वाटत होती!

बरेच दिवस मी धोंडूमास्तरकडे गेलो नव्हतो. फुटबॉलचा अन् माझा संबंधच जवळ जवळ संपला होता. पूर्वीसारखं मला चपळाईनं धावता येणं अशक्य होतं. तरीही भवानीनगरला अधूनमधून होणाऱ्या फुटबॉलच्या मॅचेस पहायला मी जायचो.

धोंडू मास्तर तालमीच्या कट्ट्यावर तंबांखूचा बार भरून बसला होता. मी जवळ येताच त्यानं दोन बोटं ओठांवर ठेवून बाजूला जोरदार पिंक टाकली आणि तो मला म्हणाला,

"काय समर, बायको घरी आल्यापासून बाहेर पडायचं बंदच केलंस वाटंत?"

"तसं काही नाही मास्तर!"

"अरे, तुझी बायको शाळा शिकते?" माझ्या मांडीवर हात ठेवून मास्तरनं विचारलं.

"शाळा नव्हे, कॉलेज!"

"हाऽ, म्हणजे मला काय म्हणायचंय ते तुला समजलं! बरं, तुला एक सूचना करायची आहे!"

"कसली?"

"तू परत आमच्या टीममधे ये!"

"कशाला? शोभेला! मला एक दहा फूट तरी धावता येतं का?"

"अरे, गोली तरी होशील की नाही? गोलीला कुठं फार धावावं लागतं! गड्या, तू टीममधून गेल्यापासून सारी मजाच निघून गेली!"

मास्तरनं तोंड साफ केलं आणि तो मला म्हणाला, "तुझ्या सासुरवाडीची टीम आलीय!"

"सासुरवाडीची?"

"हो, नाशिकची टीम आलीय. परवा आमची आणि त्यांची मॅच आहे. तू गोली म्हणून खेळ!"

"नको मास्तर! मी आपला मॅच बघायला येईन!"

भवानीनगरला नेहमी फुटबॉलच्या मॅचेस व्हायच्या. त्या शहागंज बागेत! खरं म्हणजे तिथं बाग नव्हतीच. होती ती खेळाची दोन मैदानं. एकावेळी दहापाच हजार माणसं बसू शकतील एवढी मोठी. याच मैदानावर फुटबॉल मॅचेस् व्हायच्या.

दुसऱ्या दिवशी चार वाजता भवानीनगर स्पोर्टस् क्लब विरुद्ध पंचवटी फुटबॉल क्लब यांच्यात फुटबॉलची मॅच होती. पाय दुखावल्यापासून खरं म्हणजे माझा फुटबॉलमधला इंटरेस्ट कमीच झाला होता. पण एखादा पैलवान म्हातारा जरी झाला तरी कुस्त्यांची दंगल चुकवत नाही, तशी माझी अवस्था झाली होती. खेळता येणं शक्य नव्हतं, पण दुसरे खेळतात ते पहाण्यात सुख वाटत होतं. शिवाय एके काळी भवानीनगरची ही शहागंज मैदानं मी गाजवली होती.

त्या दिवशी मी नेहमीच्या जागी न थांबता नाशिकवरून आलेल्या प्रेक्षक मंडळींच्या मागे

जाऊन थांबलो. त्या लोकांच्या आमच्या भवानीनगरच्या टीमबद्दल काय 'कॉमेंटस्' होतात हे ऐकण्याच्या हेतूनं मी नाशिककरांच्या घोळक्यामागे जाऊन थांबलो. त्यांपैकी एकजणही मला ओळखत नव्हता.

बरोबर चार वाजता दोन्ही टीम्स शहागंजच्या हिरवळीवर अवतरल्या. भवानीनरच्या टीममधे बरेचसे माझे स्नेही होते. स्वत: धोंडू मास्तरही त्या टीममधून खेळणार होता. पंचांनी शिट्टी फुंकली आणि मॅचला सुरुवात झाली. बॉल या विभागातून त्या विभागाकडे फेकला जात होता. नाशिकच्या टीमसोबत जे वीसपंचवीसजण मॅच पहाण्यासाठी आले होते, त्यांच्या 'कॉमेंटस्' सुरू झाल्या.

एकजण, "अरे, आपल्या शंकरलाल शेठचा जावईही फुटबॉल फार चांगला खेळायचा म्हणे!"

दुसरा : "पण मिलीट्रीत त्याचा पाय दुखावला गेला म्हणून त्यानं खेळणं सोडलं म्हणे!"

तिसरा : "आयला! पण अलकीने कितीजणांना नादी लावलं होतं रे! बिपीन सारडा, जयचंद राठोड, चंद्या, राम धुळेकर-एक का दोन, चांगले दहा-बाराजण 'मॅड' केले होते तिनं!"

पहिला : "अरे, म्हणून तर शंकरलाल शेठला तिच्या लग्नाची घाई झाली होती. आपल्याकडच्या भागातला कोणीही तिला करून घेणं शक्य नव्हतं; म्हणून शंकरलाल शेठनं हा 'बकरा' पकडला इकडचा!"

"त्याच्याशी तरी प्रामाणिक राहील का?" दुसऱ्यानं शंका काढली.

"कुणास ठाऊक' पण शंकरलाल तसा मोठा वस्ताद, नाही रे?"

"असा तसा नव्हे! विडीवाल्या मालकाला आपल्या नावावर जमीन खरेदी करायला लावली आणि ती जमीन खरेदी केल्यावर लगेच चारच महिन्यात त्याचा मालक कसा काय मेला रे?"

"मेला का यानं मारला?"

"राम जाणे! पण मालकांच्या त्या दोन पोरींची लग्न करून देऊन मोकळा झाला. त्या मुलींच्याकडूनही यानं लिहून घेतलंय म्हणे की, त्या जमिनीशी आपला काही संबंध नाही!"

"फारच पक्का माणूस आहे तो! ती मालकीण मेली तर यानं स्वत:ची आई मेली असं समजून घेतलं, म्हणजे लोकांना वाटावं, पहा काय निष्ठा होती म्हातारीवर!"

"पण एवढं करून काय उपयोग? तो मुलगा कुलदीपसिंग बापाचं तोंड पहात नाही! त्या अलकेला देखील तो मारायचा! तिचा वाह्यातपणा न खपल्यामुळंच त्यानं नाशिक सोडलं?"

"बाकी अलकीला स्थळ मात्र चांगलं मिळालं हं! इकडे त्या ठाकुरांचीही शेती आहे म्हणे!"

"असेल, पण आपला अंदाज आहे. अलकी या गावातही सरळपणानं रहाणार नाही. अरे, चार ठिकाणचं पाणी प्यायची सवय जडल्यावर तिला एक ठिकाणचं पाणी गोड लागणार आहे थोडंच?"

माझं डोकं गरगरू लागलं. अलका आणि शंकरशेठ यांच्याबाबत आजपर्यंत मला जे ठाऊक नव्हतं ते ठाऊक झालं होतं! शंकरशेठनं प्रॉपर्टी वाममार्गानं मिळवली की कशी मिळवली यात मला स्वारस्य नव्हतं; पण अलकानं माझ्याशी लग्न होण्यापूर्वी दहापाच जणांना आपल्या नादी लावलं होतं हे ऐकल्यानं माझं मस्तक भडकलं. मी त्या गर्दीतून हळूच बाहेर पडलो. ग्राऊंडवर खेळ रंगला होता. पण मला आता ग्राऊंडकडे वळूनदेखील पहायची इच्छा उरली नव्हती. मी चालतच होतो. अलकानं कॉलेजात नादी लावलेल्या मुलांची नावं तापलेल्या तेलाप्रमाणं माझ्या कानात शिरली होती.

'बिपीन सारडा, जयचंद राठोड, चंद्या, राम धुळेकर....'

अगोदरच घरात तो मनस्ताप करणारा प्रकार दोन दिवसांपूर्वी घडला होता. त्यात आज ही नामावली आणि त्यात शंकरलालशेठ परदेशींचा इतिहास ऐकून माझं मस्तक बधिर झालं होतं!

शंकरलाल शेठनी पानपट्टीच्या दुकानासमोर माझं नावगाव समजताच मला गाडीत घालून

सरळ आपल्या बंगल्यावर का आणलं याचा आज खुलासा झाला. काँट्रॅक्टर परदेशी अलकाबद्दल अधिक काही बोलले नाहीत ते का हेदेखील आज समजलं! अलकाचं नाव निघताच तो पानपट्टीवाला मिष्किलपणे का हसला याचाही आता उलगडा झाला. ते काँट्रॅक्टर मला शोधत आले तेव्हा मी त्यांना बेपर्वाईनं उत्तरं दिली हे आठवून पश्चात्ताप वाटला. पण याहीपेक्षा आश्चर्य वाटलं ते माझ्या आईच्या अंत:प्रेरणेचं! तिनं अलकाला बघितल्या क्षणापासून माझ्यामागे एकसारखा लकडा लावला होता, या मुलीशी लग्न करू नको म्हणून! आईला अशी कोणती 'इंट्यूशन' झाली की तिनं या लग्नाला विरोध करावा?

ग्राऊंडवर हे सारं ऐकल्यापासून एक विलक्षण असं नैराश्य मनावर आलं! घरदार सारं सोडून कुठंतरी परागंदा व्हावं असं वाटलं! पाय नेतील तिकडे मी चालत होतो. धावता येत नव्हतं, नाहीतर वेड्यासारखा धावतदेखील सुटलो असतो.

तलावाच्या किनाऱ्यावर येऊन उभा राह्यलो. पश्चिम आरक्त झाली होती. लालसोनेरी सूर्यबिंब निळ्या डोंगराला येऊन भिडलं होतं. वातावरण अत्यंत प्रसन्न होतं, पण मला मात्र उभी पश्चिम पेटल्यासारखी वाटत होती. बराच वेळ मी तलावाच्या काठी खडकावर बसून होतो. सूर्यास्त होऊन हळूहळू अंधार पसरू लागला, तरीही मला बसल्या जागेवरून उठावंसं वाटेना.

आकाशात एकएक तारा उगवू लागला. बघताबघता आकाश चांदण्यानं भरून गेलं तरीही मी त्या खडकावर तसाच!

आईची आठवण आली अन् टचकन् डोळे भरून आले, मी घरी परतल्याशिवाय आई जेवत नसे. मला दुसऱ्या कोणासाठी नाही, पण माझ्या आईसाठी तरी घरी जाणं भाग होतं.

किनाऱ्यावरच्या विचित्र ओरडणाऱ्या बेडक्या आणि चित्कारणारे रातकिडे यांनी माझ्या विषण्णावस्थेत भर घातली होती. घरी सांगितल्याशिवाय इतका वेळ मी कधीच बाहेर थांबत नसे. पण आज पाय घराकडे जायला राजी नव्हते, तरीही आईसाठी मला घरी जाणंच भाग होतं.

अलका माडीवर अभ्यास करीत होती. आई मात्र वेड्यासारखी या दारातून त्या दारात करीत माझी प्रतीक्षा करीत होती. मला पाहताच ती म्हणाली, "इतका वेळ कुठं होतास, समर?"

"थांबलो होतो मित्राकडे!"

"इतका वेळ? दहा वाजायला आले!"

"जेवून घ्यायचं होतंस."

"अलका जेवली, मला मात्र उगाच तुझी चिंता वाटून राह्यली आज!"

"ती जेवली?"

"होय जेवून वर जाऊन वाचत बसलीय."

"ठीक आहे, वाढ मला!"

हातपाय धुऊन मी पाटावर बसत म्हणालो, "आई, आज मला अजिबात भूक नाही. फक्त भात वाढ थोडा!"

"का रे?"

मला आईला उत्तर देता येणं शक्य नव्हतं. निमूटपणानं दोन घास पोटांत ढकलले आणि आचवून उठलो. तिसऱ्या मजल्यावर जाताना दुसऱ्या मजल्यावर डॅडींच्या खोलीत डोकावून वर जायची सवय होती मला. त्या सवयीनुसार मी आत डोकावलो. डॅडी कसलंसं जाड पुस्तक डोळ्यांसमोर धरून वाचत होते. जिन्यावरून येताना पाऊल न वाजवता यायचो. पण तरीही डॅडींना कशी काय माझी चाहूल लागायची हेच समजत नसे. पुस्तकावरची नजर बाजूला न करतांच ते मला म्हणाले, 'यू आर लेट टुडे समर!"

"हो. थोडा उशीर झाला, डॅडी!"

"नाउ यू आर नॉट अलोन! यू मस्ट नॉट फर्गेट!"

मला डॅडींच्या त्या उद्गारांची कीव आली. मी एकटा नाही याची डॅडी मला जाणीव देत होते; पण मघा शहागंज बागेत मी जे ऐकलं होतं. त्या क्षणापासून मी या जगात एकटाच आहे असं वाटत होतं. डॅडींना गुडनाइट करून मी वर गेलो.

अलका बेडलँप लावून वाचत बसली होती. मला तिच्या एकाग्रतेचं प्रथम प्रथम फार कौतुक वाटायचं. पण आज मी तिच्याशी एक चकार शब्दही न बोलता कॉटवर आडवा झालो.

"इतका वेळ कुठं होतास?" अलकानं विचारलं.

"कुठेही असेन!"

"अं? काहीतरी बिघडलेलं दिसतंय!"

"तुझा तू अभ्यास कर, मला झोप आलीय्!"

"ठीक आहे! मला तरी कुठं वेळ आहे फालतू बडबड करायला!"

कॉटवर पडलो खरा. पण झोप लागणं अशक्य होतं. डोक्यांत असंख्य विचारांनी काहूर माजलेलं होतं. ती नाशिकची पोरं जे बोलली ते सारं सत्य असेल का? या अलकानं आठदहा पोरांना आपल्या नादी लावलं असेल का? नक्कीच ते सत्य असलं पाह्यजे! मी हिच्यापेक्षा कमी शिकलेला असूनही हिनं मला पसंत का करावं? कारण हिचं त्या भागांत कुणाशीही लग्न होणं शक्य नव्हतं! निदान जातीतल्या तरुणाशी तरी नाहीच! पण काही झालं तरी आता यातून मार्ग काढायलाच हवा! मीच हट्टाला पेटलो होतो, करीन तर हिच्याशीच लग्न करीन! दुसऱ्यांना दोष देण्यात तरी काय अर्थ आहे? पण ती मुलं म्हणाली ते सारं खरं कशावरून? सुंदर मुलीबद्दल नेहमीच गावात अशा अफवा पसरत असतात! त्यातलं खरं किती अन् खोटं किती, कुणास ठाऊक? त्याची शहानिशा कोणाकडून करून घ्यायची? आणि समजा, ते खरं आहे असं समजलं तर काय करायचं? घटस्फोट? अशक्य! आमच्या खानदानीत घटस्फोट मान्य नाही! एकदा लग्न होऊन सासरी गेलेली मुलगी मृत्यूनंतरच ते घर सोडते!....

बराच वेळ मी विचार करत पडलो होतो. रात्री अलका केव्हा माझ्या शेजारी येऊन झोपली, कुणास ठाऊक. पण पहाटे तहान लागली म्हणून उठलो. मंद निळ्या दिव्याच्या प्रकाशात अलका गाढ झोपलेली दिसली. पाणी पिऊन परत मी अंथरुणावर आडवा झालो. माझ्या चाहुलीनं अलका किंचित् जागी झाली. तिनं वर सरकलेली साडी खाली ओढली. पायांजवळची चादर उलगडून अंगावर घेतली आणि माझ्या अंगावर हात टाकून परत झोपी गेली.

तो हात काढून टाकावा असं क्षणभर वाटलं, पण परत विचार केला मुलींनी शाळाकॉलेजात काही अल्लडपणा केला तर त्याचा बाऊ करण्यात काय अर्थ आहे? फुटबॉलची मॅच पहायला आलेली ती पोरं काही सज्जन नव्हती! टवाळखोरांना सगळंच वाईट दिसतं.... मी माझ्या मनाची समजूत घालत घालत अलकाच्या अंगावर हात टाकून पुन्हा झोपी गेलो.

-o-o-o-

८

अलकानं लग्नापूर्वी काय केलं याचा फारसा विचार करायचा नाही असं मी ठरवून टाकलं. मागचं उकरून काढल्यानं स्वत:ला त्रास होणार होता, पण त्याचबरोबर माझ्या घराचंही स्वास्थ्य बिघडणारं होतं. तिला ग्रॅज्युएट व्हायचं आहे तर खुशाल होऊ दे, या विचारानं मी थोडंसं तटस्थतेचं धोरण स्वीकारलं. पण याचाही विपरीत परिणाम होऊ लागला. अलका घरी अभ्यास होत नाही म्हणून कॉलेजच्या स्टडीरूमवर जाऊ लागली. हरकत नाही! तिला परीक्षा होईपर्यंत काही बोलायचं नाही असं मी ठरवून टाकलं; पण हळूहळू कानावर निराळ्याच बातम्या येऊ लागल्या.

लॉजिक आणि फिलॉसॉफी शिकवणारे प्रोफेसर ठोंबरे यांचं अलकाच्या संदर्भात नाव घेतलं जात होतं. स्टडीरूममधे या दोघांचं बसणंउठणं एकत्र असतं, या वार्तेनं माझं मस्तक बिघडलं. पण ऐकीव बातम्यांवर विश्वास ठेवण्याअगोदर त्या अफवेत काही तथ्य आहे की नाही हे मी स्वत: खात्री करून घ्यायचं ठरवलं. मला फार काळ थांबावं लागलं नाही. चौथ्या दिवशी कॉलेजच्या बगिच्यात दोघं एकत्र गप्पा मारत उभी असलेली दिसली. एवढ्या एका प्रसंगावर त्यांच्यात तसं काही असेल असा तर्क करणंही अनुचित होतं. त्यानंतर पुढं आठ दिवसांनी कॉलेजच्या कॅंटिनमध्ये दोघं एकत्र बसल्याचं अमरनं मला सांगितलं. आता मात्र हळूहळू माझी विवेकशक्ती ढिली पडू लागली. मी अलकाच्या वॉचवर राहू लागलो.

मैत्रिणीच्या घरी कसलासा समारंभ आहे असं सांगून अलका मला म्हणाली, "कदाचित मला यायला उशीर होईल! तिकडे जेवणाचाही प्रोग्राम आहे!"

"ठीक आहे!" मी कसलीच शंका व्यक्त न करता म्हणालो.

त्या रात्री त्या दोघांना मी तलावाजवळच्या बागेत अगदी हसतखिदळत असल्याचं बघितलं आणि पुढं गेलो. त्या दोघांच्यामधे कमरेवर हात ठेवून उभा राह्यलो. अलकाला दरडावून विचारलं, "मैत्रिणीच्या घरचा हाच का प्रोग्रॅम?"

"अरे! ते कॅन्सल झालं. तिचे आजोबा आजारी आहेत म्हणून तार आली. मी घरी यायला निघाले तर वाटेत सर भेटले. म्हणाले, काही काम नसलं तर थोडा वेळ बागेत गप्पा मारत बसू! तुला एवढं विचित्र काय वाटलं यात?"

मी अलकाच्या प्रश्नाला उत्तर देण्याच्या भरीस न पडता ठोंबऱ्यांच्या बुशशर्टची कॉलर पकडली आणि त्यांना एक सणसणीत ठोसा हाणला. ठोंबरे कोलमडले आणि परत स्वत:ला सावरून म्हणाले, "शोभलं नाही हे समर तुला, अलका माझी विद्यार्थिनी आहे. तिनं फिलॉसफीत डिस्टिंक्शन मिळवावी यासाठी मी प्रयत्नशील आहे, पण तू भलताच अर्थ काढलास यातून!"

"ठोंबरे! तुम्हा दोघांना एकत्र पहाण्याची ही माझी पहिली वेळ नाही. स्टडीरूममधे, कॉलेजच्या वॅंâटीनमधे आणि बागेत कितीतरी वेळा मी तुम्हा दोघांना एकत्र पाह्यलंय, तुम्ही हिला कसली फिलॉसफी शिकवता हे न कळण्याइतका मी मूर्ख नाही! चल!" मी अलकाचा हात पकडून तिलाही एक चपराक लगावली. आपला हात माझ्या हातून सोडवून घेण्याचा निष्फळ प्रयत्न करीत ती म्हणाली, "यू ब्रूऽटऽ! मॅनरलेस! सोड माझा हात!"

तिच्या हाताला एक जोरदार हिसडा देऊन मी म्हणालो, "नाशकांत बिपीन सारडा, जयचंद राठोड, चंद्रया, राम धुळेकर झाले इतके पुरे झाले नाहीत वाटतं! यू बीच! चल, घरी चल! इथं रस्त्यावर अधिक तमाशा करायची इच्छा नाही माझी! ठोंबरे, तुला बजावून ठेवतो, पुन्हा हिच्या वाटेला आलास तर हाडं पोत्यात भरून तलावात फेकून देईन! समरसिंग ठाकूर म्हणतात मला!"

ठोंबरे काहीएक न बोलता बागेच्या मागच्या कंपांऊडमधून निघून गेला. अलका

माझ्यासोबत यायला तयार नव्हती, ती बागेत हिरवळीवर फतकल मारून बसली. मी नाशकांतल्या त्या पोरांची नावं घेतल्यामुळं तिला काय बोलावं हेच सुचलं नसावं! दोन्ही हात डोळ्यांसमोर धरून ती रडू लागली.

"इथं रस्त्यावर तमाशा करू नको, अलका! सरळ ऊठ आणि माझ्यासोबत चल, नाहीतर लाथ घालीन. लाथ घालण्याइतपत बळ आहे अजून माझ्या पायात! आय गेव्ह यू ए व्हेरी व्हेरी लाँग रोप! बट यू आर रॉटन सीन्स युवर चाइल्डहूड! तू लग्नाअगोदर काय केलंस हे सर्व मी विसरायचं ठरवलं होतं. पण लग्नानंतरदेखील तुझे हे चाळे मी चालू देणं शक्य नाही! ऊठ!"

अलकानं ओळखलं की, आता माझ्याशी अधिक वाद घालण्यात अर्थ नाही. पूर्वीपासूनची तिची हकीकत मला ठाऊक आहे. शिवाय आज अगदी 'रेड हँडेड' मी तिला पकडलं होतं.

घरी आल्यानंतर ती सरळ तिसऱ्या मजल्यावर आपल्या खोलीत गेली आणि कॉटवर पडून हुंदके देऊन रडू लागली. खालून आई आणि डॅडी वर आले. डडींनी माझ्या पाठीवर हात ठेवून मला विचारलं,—

"व्हॉटस द् मॅटर, समर?"

"काय आहे आणि काय घडलं ते हिलाच विचारा. मला काही एक सांगायची इच्छा नाही!"

"काय झालं बेटी, अलका?" डॅडींनी प्रेमळपणानं पुढं येऊन विचारलं.

"तोंड आहे का तिला बोलायला?"

"समर, यू प्लीज गो डाउन!" डॅडी मला म्हणाले, "मी विश्वासात घेऊन तिला विचारतो. अरे, नवराबायकोत अशी किरकोळ भांडणं होतातच सुरुवातीला. म्हणून काही माथेफिरूपणा करायचा नसतो कोणी."

"डॅडी, तिला या घरात रहाता येणार नाही." मी ओरडून म्हणालो अन् खाली आलो. माझ्या मागोमाग आईही खाली आली.

"नॉनसेन्स! असं काहीतरी बरळू नकोस. तुझी लग्नाची बायको आहे ती." मी खाली आल्यावर डॅडी माडीवरून ओरडून म्हणाले.

"बायको? हं ऽ! जिला चारित्र्य नाही ती या घरात राहूच शकत नाही! उद्याच्या उद्या तिनं हे घर सोडावं!" मी क्रोधानं थरथरत होतो. आईला काय प्रकार घडला हे मी सांगितलं तशी ती बिचारी डोक्याला हात धरून अश्रू ढाळत बसली.

नंतर मी वरची तिची सारी पुस्तकं जिन्यावरून खाली घेऊन आलो. जमिनीवर टाकून म्हणालो, "या शिक्षणाच्या बुरख्याआडून स्वैराचार करायची चटक लागलेली आहे तिला. खरं तर मी आज तिचा खूनच करणार होतो! निर्लज्जपणे त्या ठोंबऱ्याला घेऊन बागेत खिदळत बसली होती!"

"अरे, पण त्यात बिघडलं काय? ठोंबरे तिला प्रोफेसरच आहेत!"

डॅडी जिन्यावरून खाली येत म्हणाले.

"पण प्रोफेसर बागेत बाजूला एकांतांत एखाद्या तरुण विद्यार्थिनीला घेऊन बसतो तेव्हा तो तिला कसली फिलॉसफी शिकवतो? डॅडी, हिचं हे वर्तन आजचं नाही. तिकडे हिचं लग्न होणं शक्य नव्हतं; म्हणून फसवून हिच्या बापानं माझ्या गळ्यात बांधली! कमअस्सल!"

"समर! जे झालं ते झालं. आता उगाच आपल्या खानदानीची इज्जत चव्हाट्यावर आणू नकोस. हिचं कॉलेज बंद करू उद्यापासून हवं तर!" डॅडी

"मला ही घरातच नको आहे!"

तेव्हा रडणारी माझी आई थांबली आणि माझ्यावर ओरडून म्हणाली, "ती या घरातून जाणार नाही! उगाच काहीतरी बरळू नकोस! यासाठी लग्नाला मी विरोध केला होता. शंकरलाल काँट्रॅक्टरच्या बायकोनं मला हिच्याबद्दल सगळं काही सांगितलं होतं. म्हणून शेवटपर्यंत तुला हात जोडत होते. समर, एवढी ही मुलगी पसंत करू नको म्हणून! पण ऐकलं नाहीस. हट्टाला पेटला होतास! आता बघण्याशिवाय तू काहीच करू शकत नाहीस! राज-क्षत्रियाच्या घरी येणारी मुलगी

जाताना उभी जात नसते.''

''आडवी करून घालवतो!'' मी म्हणालो.

''डोंट टॉक नॉनसेन्स!'' डॅडी माझ्यावर ओरडून म्हणाले, ''यापुढं ती घराबाहेर पडणार नाही! पण तिला सोडून देण्याची कल्पना डोक्यातून काढून टाक, ते अशक्य आहे! ठाकूर घराण्यांत घटस्फोट देण्याची प्रथा नाही. आजपर्यंत असला प्रकार घडलेला नाही!''

''मग ही असली बदफैली घरात सून म्हणून ठेवून घेणार?''

डॅडींनी माझ्या गालावर एक जोराची चापट मारली आणि मला म्हणाले, ''यू ऽ गेट आउट! जा ऽ!''

''बाहेर कुठं जाईल तो? त्याला कशाला मारता?'' आई रडतारडता म्हणाली. मी स्वत:च्या जिवाचं काहीतरी भलंबुरं करून घेईन या भितीमुळं मला आई बाहेर सोडायला तयार नव्हती.

ती रात्र मी अक्षरश: जागून काढली. सारखा या कुशीवरून त्या कुशीवर होत होतो. उद्या डॅडी काय निर्णय घेणार आहेत, हे मला समजलं नव्हतं! माझ्या आयुष्याचे तीन-तेरा वाजले होते! शिक्षणाकडून ती बोंब झाली होती. मिलिट्रीत गेलो आणि एका पायानं दुबळा होऊन बाहेर पडलो. आवडीचा छंद फुटबॉल, त्याला कायमचा मुकलो. आई म्हणाली, लग्नामुळं माणसाच्या आयुष्यात बदल घडतो, म्हणून लग्नाला तयार झालो तर लग्नाचा हा असा 'फियास्को' होऊन बसला. शंकरशेट परदेशीनं मला अक्षरश: बनवलं! अलकाच्या सौंदर्यानं मला भुरळ घातली. पण त्या देखण्या नाजुक व्यक्तिमत्त्वामागे एक अतिकामांध अशी स्त्री लपलेली आहे याची मला मूर्खाला यत्किंचितही जाणीव झाली नव्हती! परदेशींच्या ऐश्वर्याला भुललो. अलकाच्या बुद्धिमत्तेवर भाळलो. आईचा विरोध जुमानला नाही. आता डोळे उघडले, पण उपयोग काय? व्हायचं ते होऊन गेलं होतं! आमच्या घराण्यांत घटस्फोटाची पद्धत नाही! आजपर्यंत कोणा राज-क्षत्रियाच्या घरी घटस्फोट दिला-घेतल्याचं उदाहरण नाही. निदान माझ्या आढळात तरी मुळीच नाही. मग आता पुढं काय होणार?.... या अलकानं जर इथंच रहायचं तर....! छे! ती इथं रहाणार असेल तर मला हे घर सोडावं लागेल! पण मी जाणार कुठं? माझी शैक्षणिक पात्रता काय? त्यात एका पायानं मी दुबळा....

आजपर्यंत मला स्त्रीजातीबद्दल आदर होता. मी जेव्हा वयात आलो तेव्हा मलाही मुलींच्याकडे पहावंसं वाटे. समोरची धोब्याची बिंदी-तीसुद्धा मला अप्सरेसारखी सुंदर वाटायची! तिसऱ्या मजल्यावरच्या खिडकीतून मी पोरींच्या घोळक्याकडे आशाळभूत नजरेनं पहायचो. पण जसजशी मला जाण येऊ लागली, तशी माझी दृष्टीही निवळू लागली. स्त्री ही क्षणाची पत्नी अन् अनंत कालची माता, या सुभाषितावर माझी श्रद्धा बसली. हळूहळू मला आयुष्याचा अर्थ समजत होता. कॉलेजात असताना फुटबॉल टीमचा मी कॅप्टन होतो! पण पुढं परीक्षा झाल्यानंतरदेखील मला कॅप्टन म्हणूनच सारे संबोधू लागले! काहीजण 'कॅप्टन' म्हणून माझी मस्करी करायचे, पण सैन्यांत दाखल झाल्यावर खरोखरचा कॅप्टनचा हुद्दा माझ्या अगदी हाताच्या टप्प्यात आला होता. पण तिथंही दुर्दैव आड आलं! बेहरामच्या त्या चष्म्याचा मोह होऊन मी तो उचलला आणि माझ्या ऑफिसर मित्रांना फ्लशमधे फसवायला सुरुवात केली. त्याचं पुरेपूर बक्षीस मला गुमानसिंगनं दिलं! डावा गुडघा कायमचा अधू करून टाकला.

पण काही झालं तरी मी अलकाशी लग्न करायला नको होतं! रत्नापूरला महाराजांनी त्या दिवशी माझ्या जीविताचं काहीही भुलंबुरं केलं असतं तरी बरं झालं असतं. पुढं लग्नानं होणारी 'ट्रॅजेडी' तरी झाली नसती. पण आता पुढं काय करायचं कुठं जाणार मी? काय करणार? त्या शंकरशेठ परदेशीचा गळा धरून जाब विचारावा, का म्हणून असली बदफैली मुलगी माझ्या गळ्यात बांधलीस?....

अख्खी रात्र डोळ्याला डोळा लागला नाही. दुसऱ्या दिवशी आमच्या घरी सुतकी वातावरण! आठ वाजून गेले तरी अलका खाली आली नव्हती. शेवटी आई वर गेली आणि तिला घेऊन आली. मी अमरच्या खोलीत सकाळी आलेला 'नेता' वाचत बसलो होतो. डॅडींकडे कोणी

पक्षकार आले होते.

खाली कोणीच कोणाशी बोलत नव्हतं. सर्व व्यवहार मुकाट्यानं चाललेले, पण ही शांतता सर्वांनाच असह्य होत होती. आई अलकाशी आत काहीतरी बोलू लागली. थोड्या वेळानं आईनं मला हाक मारली. हातात पेपर धरून मी स्वयंपाकघराच्या दाराशी जाऊन उभा राहिलो.

"समर, हिला चार दिवस नाशकाला जायचंय!"

"नाशकाला जाऊ दे नाही तर आणखी कुठंही जाऊ दे. माझ्या परवानगीची गरज काय आहे?"

"अरे, असा एकेरीवर येऊ नकोस. यातून काहीतरी मार्ग काढायला हवा!"

"हिला आपल्या बापाच्या पैशाची फार घमेंड आहे. जाऊ दे बापाकडे! ते किती दिवस ठेवून घेतात हे पहायचंय!"

"पण मी लग्नापूर्वी तुला कल्पना दिली होती, समर." अलका काहीशी गंभीर होऊन म्हणाली.

"कसली?"

"माझा स्वभाव थोडा फ्री आहे. मला लोकांशी मनमोकळेपणानं बोलणंवागणं आवडतं!"

"ते मी समजू शकतो, अलका. पण तू कॉलेजमधे असताना कशी वागत होतीस याची कधी वाच्यतादेखील केली नाही. या ठोंबरे प्रोफेसरबरोबर आताशी इतकी सलगी दाखवत होतीस की त्यातून दुसरा तिसरा अर्थच निघू शकत नव्हता. काल मैत्रिणीकडे जायचं खोटं कारण सांगून बागेत त्याला भेटायला गेलीस. तुला काय वाटलं, मला काहीच समजणार नाही?"

"मला ठोंबरे मार्गदर्शन करीत होते. त्यांचा स्वभाव आवडत होता मला!"

"म्हणून अशी चोरून त्याच्या भेटीगाठी घेत होतीस? अलका, तू जा नाशिकला आणि परत इकडे येऊ नकोस!"

आई त्यावर लगेच म्हणाली, "तसं असलं तर मी हिला पाठवणारच नाही!"

इतक्यात पक्षकारांना घालवून डॅडी खाली आले आणि म्हणाले, —

"समर, मीच हिला घेऊन जातो नाशिकला! हे बघ, आत्ताच रजिस्टर पत्र आलंय शंकरशेठ परदेशीचं! त्या मालकिणींच्या दोघी मुलींनी त्यांच्यावर म्हणे दिवाणी दावा दाखल केला आहे! द्राक्षाची बाग आपल्या मालकीची आहे, शंकरशेठनी फसवून आपल्या सह्या घेतल्यात, असं त्या दोघी मुलींचं म्हणणं आहे! मी ती केस चालवावी अशी शंकरशेठची इच्छा आहे!"

"तुम्ही कशाला जाता?" मी म्हणालो.

"असं नाही समर. काही झालं तरी एकदा निर्माण झालेलं हे नातं सहजासहजी तोडता येत नाही."

"ठीक आहे. पण ही जर परत या घरी येणार असली तर मी या घरात रहाणार नाही." मी स्पष्टपणे सांगून टाकलं.

डॅडींनी माझी धमकी फारशी 'सीरियसली' घेतली नाही.

डॅडी अलकाला घेऊन नाशिकला गेले. महिना-दीड महिना तिकडेच राह्यले. पण शंकरशेठची केस उलटी झाली. त्या दोन मुलींची सही असलेला स्टँप पेपर कोर्टाने बेकायदेशीर ठरवला. सर्व प्रॉपर्टी व गेल्या तीन वर्षांचं उत्पन्न परदेशींनी मालकाच्या मुलींना द्यावं अशी कोर्टाची 'डिक्री' झाली. शंकरशेठनी हा निकाल ऐकला आणि अंथरूण धरलं. 'मधुबन' गेलं, द्राक्षाची बाग गेली, नाशकातल्या बंगल्यावरही मालकाच्या मुलींनी 'क्लेम' लावला होता. त्यालाही कोर्टाचं कुलूप लागलं. डॅडींनी वरच्या कोर्टाकडे अपील केलं; पण अपिलाचा निकाल होण्याअगोदरच शंकरशेठ परदेशी परलोकवासी झाले.

अलका परत जेव्हा भवानीनगरला आली तेव्हा तिचा सारा नक्षा उतरलेला असेल असं मला वाटलं, पण ती पूर्वीइतक्याच तोऱ्यांत माझ्याशी वागू लागली. तिचं कॉलेज बंद झालं होतं. आईशी तिनं थोडं मिळतंजुळतं घेतलं, पण माझ्याशी वागताना ती पूर्वीप्रमाणंच ताठ होती!

शेवटी मी काही दिवस घर सोडण्याचा निर्णय घेतला. घराण्याची प्रतिष्ठा आणि

रीतिरिवाज यांच्यापुढं डॅडी आणि आई दोघेही मान तुकवून उभी होती. अलकाला घटस्फोट देण्याची कारवाई करणं डॅडींना पसंत नव्हतं आणि अलका त्या घरी असेपर्यंत मलाही त्या घरी वास्तव्य करणं अशक्य होतं.

मी तिसऱ्या मजल्यावर गेलो की अलका खाली येई, मी खाली आलो की ती वर जाई! माझा वारादेखील अंगावर पडू द्यायचा नाही असा तिचाही निर्धार होता. कालांतरानं आमच्यात समझोता घडून येईल ही डॅडींची आणि आईची आशा फोल ठरली. मला घर सोडण्याशिवाय दुसरा मार्ग उरलेला नाही.

मी बॅग भरू लागलो, आणि त्या वेळी मला आठवला तो नाशिकमधला प्रसंग! अशीच मी बॅग भरत होतो, तेव्हा अलकानं येऊन माझा हात धरला होता. बॅगेत भरलेले सगळे कपडे खेचून बाहेर काढले होते. पण आज तीच अलका मी बॅगेत कपडे भरतो आहे हे पाहून माझ्यासमोरून बेपर्वाईनं निघून गेली खाली. दोन पायजमे, चार पँटस् चार शर्टस्, दोन कोट; टायची एक जोडी. बेहरामचा तो 'फ्लश फेम' चष्मा आणि खिशात साडेसोळा रुपये! बस्स! इतकेच माझ्या सोबत होते.

बॅग घेऊन मी खाली आलो. आईच्या डोळ्यांना धार लागली होती. ती म्हणाली, "कुठं रहाशील? काय करशील? पैशाची गरज लागली तर कळव!"

"हे बघ आई, अजून हे दोन हात मजबूत आहेत. या जगात असंख्य आंधळी, लुळीपांगळी माणसं जगू शकतात, तिथं माझ्यासारख्याला जगणं का कठीण आहे? मी हे गाव सोडावं हीच नियतीची इच्छा दिसते, त्याला कोण काय करणार?"

जाताना मास्तरला भेटायला गेलो. मास्तर डोळ्यात पाणी आणून म्हणाला, "आयला! आमच्या घराण्यात आसली पोरगी आली आस्तीतर तिला लाथ मारून हाकलली असती, पण तुमच्या खानदानीचा रिवाजच काय न्यारा! जा बाबा! कुठंही सुखी ऱ्हा!"

डॅडी मला पोहोचवायला स्टेशनवर आले होते. ते चष्म्याची काच पुसण्याचं निमित्त करून डोळे टिपत होते. शेवटी गाडी सुटायच्या वेळी माझा हात हातात घेऊन म्हणाले, "वाईट वेळ ही नेहमीच वाईट रहात नसते. बदल हा निसर्गाचा नियम आहे. तूर्त थोडे दिवस बाहेर राह्यलास तरी काही बिघडणार नाही. उलट बाहेरचं जग पहाणाऱ्याचं अनुभवविश्व व्यापक होतं! पण गरज लागली तर कळव! जाताना मला, तुला एकच सल्ला द्यावासा वाटतो. क्रिएट मोअर लायॅबिलिटीज ॲण्ड यू फाइण्ड द वे आउट' जगात आजपर्यंत जी खरी कर्तृत्त्वसंपन्न माणसं निर्माण झाली त्यांनी बापजाद्यांच्या नावाचा अगर त्यांच्या धनाचा कधीही आधार घेतलेला नव्हता!"

खिशात फक्त साडेसोळा रुपये घेऊन वयाच्या सत्ताविसाव्या वर्षी मी घराबाहेर पडलो होतो. गाडीत बसण्यापूर्वी मी पुण्याचं तिकीट घेतलं होतं, पण पुण्यात कुठं रहायचं, कोणता कामधंदा करायचा, काही काही मला ठाऊक नव्हतं!

रात्री मिरजेवर आईनं बांधून दिलेली चपाती आणि शेंगदाण्याची चटणी खाल्ली. नळावर जाऊन पाणी प्यालो. गाडीत येऊन परत बाकावर पाय पसरून ताणून दिली. आयुष्याचं तारू पुन्हा एकदा सुकाणू तुटल्याप्रमाणं भरकटत चाललं होतं. ते कुठं किनाऱ्याला लागणार होतं की वादळात सापडून नामशेष होणार होतं, कशाचाच पत्ता नव्हता.

माझ्यातला पापभिरू सज्जन, सालस समर त्याच रात्री नष्ट झाला. स्त्रीजातीवर सूड उगवणारा, उभ्या जगाशी डावपेच करणारा एक अट्टल बदमाश जन्माला येत होता. समरसिंग ठाकूर याच्या कायेत तो हळूहळू प्रवेश करीत होता. डॅडींचा शेवटचा तो आदेश 'Creat more liabilities and you find the way out !' कानात घुमत होता. गाडीच्या चालत्या लयीबरोबर डोळ्यांवर झोप येऊ लागली. माझ्यासमोर बसलेला एक गृहस्थ डोळ्यांवर चष्मा ठेवून पेंगत होता. त्याचा चष्मा पाहून मला माझ्या 'त्या' चष्म्याची आठवण आली. ज्या बेहराम इराण्याचा तो चष्मा आपण उचलला तो बेहराम अद्यापही पुण्यात असेल! त्याची माझी गाठ पडली तर तो मला तसा सरळ सोडील का? आपण त्या कॅंपभागाकडे फिरकलंच नाही म्हणजे

झालं!

सकाळी सहाला गाडी पुण्याच्या फलाटावर येऊन स्थिरावली. मी बॅग हातात घेऊन उतरलो. टॅक्सीवाले उतरलेल्या प्रवाशांना गावातल्या मोठमोठ्या हॉटेलांची नावं घेत आपल्या टॅक्सीतून यायला प्रवृत्त करीत होते. माझ्यासमोरही एक टॅक्सीवाला अदबीनं पुढं आला. ''सर, हॉटेल हेवर्डस् चलिए! थ्री स्टार हॉटेल है! रेसकोर्स बिल्कुल नजदीक है!''

मनातल्या मनात म्हणालो, ''म्हणजे पुण्यात पुन्हा रेस सीझन चालू आहे तर! अच्छा, चलो हॉटेल हेवर्डस्!''

टॅक्सीचं बिल चुकतं करून सूटकेस घेऊन मी हॉटेल हेवर्डसच्या पायऱ्या चढत असतानाच हॉटेलचा नोकर धावत आला आणि त्यानं माझी बॅग मोठ्या अदबीनं आपल्या हाती घेतली.

काऊंटरवर गोरा पारशी बसला होता. त्यानं 'साहेबजी' केलं. मीही त्याला साहेबजी इच्छिलं! अशा मोठ्या हॉटेलमधे येणारे लोक कधी खोलीभाड्याची चौकशी करीत नसतात. मीही केली नाही; पण जिना चढताना बोर्ड वाचला. फक्त रहायचा चोवीस तासांचा चार्ज होता पस्तीस रुपये! टॅक्सीभाडं, गाडीचं तिकिट जाऊन माझ्या खिशात होते फक्त अडीच रुपये!

सोळा नंबरच्या खोलीत माझं सामान ठेवण्यात आलं. गालिच्यामध्ये बूट आत इंचभर रुतत होता. जाड डब्बल गादी, वर फॅन, भिंतीत लॅपशेडस्, वॉश बेसिन, अॅटॅच्ड लॅव्हेटरी-पस्तीस रुपयांचा पुरेपूर मोबदला देत होता बेटा मालक!

नोकर बॅग आत ठेवून सलाम करून जाता जाता म्हणाला, ''साडा आठ बजे ब्रेकफास्ट ले आऊ?''

''हा! ठीक साडा आठ!''

बूट काढून बाजूला फेकले आणि कॉटवर पडलो. शिवरीच्या कापसाची गादी. जवळजवळ आंतच बुडालो! उठून उगाचच फॅन सुरू केला. वॉश बेसिनचं पाणी सोडून पाह्यलं, आणि ड्रेसिंग टेबलच्या आरशात माझी उभी प्रतिमा न्याहाळली! हा माझा नेहमीचाच एकांतांतला छंद! आरशासमोर उभं रहायचं आणि स्वत:शीच मोठ्यानं बोलायचं! शहाणी माणसं असं कधी करतात की नाही, कुणास ठाऊक! पण मी मात्र वारंवार असा आरशासमोर स्वत:ला भेटतो. स्वत:शीच बोलतो, कुशल विचारतो. आजही आरशांतल्या समरनं मला विचारलं, 'इथपर्यंत आलास. आता पुढं?'

'पुढचं पुढं. अगोदर स्नान तरी करून घे! मग ब्रेकफास्ट येईल. यथेच्छ खाऊन घे, आणि मग नंतर काय करायचं ते ठरवू! क्रिएट मोअर लायॅबिलिटीज अॅण्ड....'

अंघोळ आटोपली, केस विंचरले, कपडे बदलले आणि बटन दाबलं बरोबर साडेआठला बेअरर ट्रेमधून ब्रेकफास्ट घेऊन आला. पोर्चड एग्ज टोस्ट, बटर, चहा बनवण्याचं सारं साहित्य. मधल्या टेबलावर त्यानं ते साहित्य ठेवलं आणि मला अदबीनं विचारलं-

''साब, लंच आप इधरही लेंगे ना?''

''हां!'' हातातल्या घड्याळाकडे पहात मी म्हणालो, ''रेस कितना बजे स्टार्ट होती है?''

''दो बजे सर!''

''तो एक बजे लंच ले आना.''

यथेच्छ ब्रेकफास्ट केला आणि गच्चीत आलो. माझ्या पलिकडच्या खोलीच्या गच्चीत एक गोरापान मुस्लिम तरुण उभा होता. त्या बेट्यानं मला कधी जन्मात बघितलं नसेल, पण माझ्याकडे नजर जाताच स्मित करून म्हणाला, ''गुड मॉर्निंग!''

''सेम टु यू!''

''केम फॉर द रेसेस?''

''ऑफ कोर्स!'' मीही ठोकून दिलं.

''आप हमेशा आते है?''

''हां ऽ हमेशा नहीं, कभी वख्त मिल जाता है तो आ जाता हूँ!''

''अच्छा अच्छा! बडी खुशीकी बात है ।''

मोकळा ट्रे घेऊन जायला बेअरर आला. त्याला माझ्याजवळ शिल्लक होते त्यातला एक रुपया देऊन रेसचं एक पुस्तक आणायला पिटाळलं! शेजारी रहाणारा मुस्लिम तरुण माझ्याशी रेसबाबत चर्चा करणार याचा मी अंदाज करूनच ठेवला होता! इंट्यूशन!

रेसचं पुस्तक आल्यावर मी पेननं त्यावर भराभर खुणा करुन टाकल्या अर्ध्याएक तासातच मला पलीकडचं बोलावणं आलं.

-o-o-o-

९

नबाब दौलतखान हा हैद्राबादच्या निजामाच्या दूरच्या नात्यातला होता. नुकताच त्याचा बाप पैगंबरवासी झाला. जहागिरीचं सारं उत्पन्न हाती आलं होतं. अचानक अफाट संपत्तीचा वारसा विनासायस चालून आल्यानंतर माणूस जे करतो तेच दौलतखाननं केलं होतं. त्याच्या सोबत आलेली 'नबाबी' आपली पत्नी नाही याची मला खात्री होती. खऱ्या बायकोची काही लक्षणं आहेत. ती नवऱ्यावर एकसारखी जरब बसवण्याचा प्रयत्न करते. 'मी आहे म्हणून तू आहेस' असं भासवते. त्याच्या प्रत्येक गोष्टीत विरोध करीत असते; पण गम्मत म्हणून आणलेली सोबतीण असं काहीच करीत नसते. तो जे करतो ते अगदी योग्य आहे असंच ती आपल्या कृतीनं आणि उक्तीनं भासवत असते. विरोध तर तिला मुळीच करता येत नाही.

मला दौलतखानानं आपल्या खोलीत बोलावलं. 'तुम्ही कोण' 'आम्ही कोण' झालं. "मी दिली ठोकून, मी भवानीनगरच्या दिवाणांचा मुलगा आहे. रेस हा माझा आवडीचा छंद आहे. पुण्याला आणि मुंबईला रेस सीझन चालू असला की मी बहुतेक येत असतो!"

तो रेसमधे नवखा होता. जॉकीचं नाव हे त्याला घोड्याचं नाव वाटायचं आणि घोड्याला जॉकी समजायचा! मागे मिलिट्रीत असताना मी माझ्या मित्रांसमवेत चारदोन वेळा रेसकोर्सवर गेलो होतो. पण तो बेभरंवशाचा 'डिग्निफाइड' जुगार आहे अशी माझीही खात्री झाली होती. रेसबद्दल त्या वेळी मला कधीच आकर्षण वाटलं नव्हतं, आणि त्यातली माहितीही करून घेण्याचा मी कधी प्रयत्न केला नव्हता. पण आता माझ्यासमोर हैद्राबादचा चांगला 'मांदवलेला बकरा' चालून आला होता. त्याला लांबडा करायला रेसचा कत्तलखाना उपयोगी पडेल याची मला खात्री होती.

"आप हमेशा खेलते हो, तो आपको सब कुछ मालूम होगा?" दौलतखानानं पाचशेपंचावन्न सिगारेट ऑफर करीत मला विचारलं.

"थोडा थोडा समझता हूं!" हसत हसत मी त्याची सिगारेट घेऊन शिलगावली आणि खिशांतलं रेसचं पुस्तक काढून टेबलावर ठेवलं. तसं पाह्यलं तर त्या दिवशी रेसकोर्समधे प्रवेश मिळविण्यासाठी तिकीट काढण्याइतकेदेखील पैसे माझ्याजवळ नव्हते. पण मी आव मात्र आणला होता, चांगले दहावीस हजार घेऊन आलो आहे असा!

हातातल्या घड्याळाकडे पाह्यलं, पावणेदहा वाजले होते. रेस सुरू व्हायची होती दोनला. तेव्हा त्याला विचारलं, "नबाबसाब, आर यू इंटरेस्टेड इन कार्डस?"

तो हसला आणि म्हणाला, "जरूर! हैद्राबाद के रॉयल क्लबमें मैं हमेशा जाता हूँ!"

"दॅटस व्हेरी फाइन, वुई वुइल हॅव अ फ्यू गेम्स!" असं म्हणत 'एक्सक्यूज मी' म्हणून मी उठलो आणि माझ्या खोलीतून पत्त्याचा जोड आणि तो इतिहासप्रसिद्ध चष्मा घेऊन आलो. पत्ते चांगले चार वेळा मी पिसले. त्याला थोडीसुद्धा माझ्या लबाडीची कल्पना येऊ नये या हेतूनं! त्यानं आपल्या शर्टाच्या खिशातून चष्मा काढून डोळ्यावर चढवला. मला शंका आली. 'याही बेट्याजवळ माझ्यासारखा चष्मा आहे की काय?' शंकेचं निरसन करून घेण्यासाठी मी म्हणालो, "आपका नंबर कौनसा है?"

"पता नही! थोडा ब्लरिंग होता था इसके वजहसे बंद हो गया!"

त्यानं चष्मा काढून माझ्या समोर धरला. मी अगदी बारकाईनं माझ्या चष्म्यासारखा त्यात काही चमत्कार नाही याची खात्री करून घेतली आणि त्यालाही माझा चष्मा लावून पहायला सांगितला. ठराविक अँगलनं त्यातून पाह्यल्याशिवाय 'व्हिजनमॅग्निफाय' होत नव्हतं! माझी खात्री होती की नबाबाला माझ्या चष्म्यातील गोम मुळीसुद्धा समजणार नाही.

पानं वाटता वाटता मी थांबलो आणि त्याला म्हणालो, "एक्सक्यूज मी, पैसे आणायचंच विसरलो!"

"कोई वांदा नहीं!" असं म्हणून त्यानं मला आपल्याजवळचे शंभर रुपये उसने दिले. त्याच क्षणी मी ताडलं की, तो जातिवंत जुगारी नव्हे. जुगारात उधारउसनवारी करणारी माणसं मूर्ख असतात. आमचा डाव चालला. प्रथम मी नेहमीप्रमाणे वीसपंचवीस रुपये हरलो. नवाब खुशीत आला. त्यानं 'नबाबी' ला पान बनवायला सांगितलं. मच्छरदाणीतून गोरा हात बाहेर आला. टेबलावरचा चांदीचा डबा उघडून ती पान बनवू लागली. मी माझ्या चष्म्याच्या त्या अँगलमधून त्याच्या पत्त्यांचा अंदाज घ्यायला सुरुवात केली. ज्या ज्या वेळी त्याच्याकडे एखादा 'ट्रायो' किंवा चेन असेल तेव्हा मी चटकन् 'ओपन' मागू लागलो आणि माझ्याकडे चांगली पानं असतील तेव्हा चाल करीत राह्यलो.

नबाबी मच्छरदाणीतून बाहेर आली. दोन पानं घेऊन! या वेळी मी तिला स्पष्ट न्याहाळून पाह्यलं. अप्रतिम रूप होतं ते! कधीकाळी इतिहासात बाजीरावाच्या मस्तानीचं वर्णन वाचलं होतं, तसलं रूप! गोरी, नितळ कांती, कमरेच्या खालीपर्यंत आलेला केशसंभार, एखाद्या कुशल शिल्पकारानं संगमरवरावर कोरावी तशी ती यवन सौंदर्यसम्राज्ञी वाटली. लगेच नजर माझ्या हातातल्या पत्त्यावर स्थिरावली. नबाबानं तिच्याकडून घेतलेल्या पानांपैकी एक मला देत म्हटलं, "असली हैद्राबादी पान है, ठाकुरजी! लो!"

"थँक्यू!" मी पानाचा स्वीकार करून म्हणालो, "आपकी पेहचान मैं मेरे जिन्दगीमें खुशीका मौका समझता हूं."

दौलतखान दिलखुलास हसला आणि त्यानं माझ्या हातावर टाळी देत म्हटलं, "मैं भी वैसाही समझता हूं!"

आम्हाला पानं देऊन नबाबी बाथरूमकडे गेली. माझ्या मनात त्या वेळी जो विचार आला त्याची मला लाज वाटली. अगदी असंच बेहराम इराण्याकडे पमिलेला आखूड स्कर्टमधे पहाताना मला वाटलं होतं. स्त्री-दाक्षिण्य, स्त्री ही क्षणाची पत्नी अन् अनंत कालची माता वगैरे वगैरे स्मरणातली पुस्तकी सुभाषितं अशा वेळी हवेत विरून जायची! स्त्रीजातीबद्दलचा आदर अलकानं नष्ट केला होता. यापुढं आयुष्यात कोणत्याही स्त्रीबद्दल मनांत आदर बाळगू नकोस असं कोणीतरी मला एकसारखं ओरडून सांगत असल्याचा भास होई!

एक तासाच्या खेळांत मी दौलतखान नबाबाला अडीच हजारांना साफ केलं. त्याला माझा राग येण्याऐवजी माझं कौतुक वाटत होतं. 'नबाबी' बाजूला खुर्ची घेऊन आमचा खेळ पहात बसली.

तासाभरांत आमच्यात चांगलीच सलगी वाढली. या तासाच्या अवधीत दोन वेळा "हैद्राबादी' पान खाल्लं आणि तीन वेळा नबाबाची पाचशे पंचावन्न सिगारेट मी ओढली.

साडेबारा वाजता नबाबानं लंच मागवलं. मलांही त्यानं आपल्या समवेत जेवायचा आग्रह धरला. 'कशाला कशाला' करीत मीही तिथंच टेकलो. खरं म्हणजे मनातून मी नबाबाचे शतश: आभार मानत होतो; कारण मी हॉटेलांत आलो तेव्हा माझ्याजवळ फक्त अडीच रुपये शिल्लक होते.

नबाब मला जेवताना हैद्राबाद संस्थानातल्या गमतीजमती सांगत होता. मीही त्याला भवानीनगरची माहिती सांगत होतो. बोलता बोलता विषय निघाला शिकारीचा! आमच्या भवानीनगरला चित्त्याकडून काळविटाची शिकार करण्याच्या 'एक्सायटिंग' गेमबद्दल मी त्याला सांगू लागलो, "उत्तम पैदाशीचे चित्ते आणून ते माणसाळवले जातात; त्यांना कळपातला फक्त काळवीट मारण्याचे शिक्षण दिले जाते. हरणांचा कळप दिसला की घोडागाडीच्या हौद्यावर डोळ्याला झापड लावलेल्या चित्त्याची झापड काढायची आणि 'ईहॅहॅहॅ' असा ठराविक आवाज तोंडानं करायचा. चित्त्याचं कळपाकडे लक्ष जाताच तो गाडीच्या हौद्यावरून झेप घेतो आणि सरळ कळपाच्या रोखानं धावत सुटतो. त्याला पाहून हरणांचा कळप जीव घेऊन टणटण उड्या मारत धावू लागतो; पण बघता बघता त्यांच्यामागे धावणारा चित्ता कळपातला नर- काळविट हेरून

त्याचा पाठलाग करतो. काळवीट आडवातिडवा धावून चित्त्याला झुकांडी देण्याचा प्रयत्न करतो; पण शेवटी त्याची शक्ती संपते आणि चित्त्याच्या पंज्याच्या फटक्यानं तो खाली कोसळतो. क्षणार्धात चित्ता त्याच्या नरडीचा घोट घेतो; पण हरणाच्या मांसाला मात्र स्पर्श करीत नाही! हा खेळ बघायला फारच प्रेक्षणीय!''

मी चित्त्याकडून हरणाची शिकार कशी खेळली जाते हे सांगितल्यावर दौलतखानानं मला हैद्राबाद संस्थानात बहिरीससाण्याकडून तितर लाव्हरी हे पक्षी कसे मारले जातात याचं रसभरीत वर्णन अस्सल हैद्राबादी उर्दूत केलं. नबाबी एक शब्द बोलत नव्हती. तिनं फारच थोडं खाल्लं! नॅपकीनला हात पुसतापुसता मात्र ती म्हणाली, -

''किसी की जान लेना मुझे पसंद नहीं!'' त्यावर दौलतखान क्षणाचाही विलंब न लावता म्हणाला, ''तो मुर्गी क्यूं खाती हो?''

''वो खानेकी चीज है!''

''तितर और हिरनभी खानेकी चीज है!''

नबाबी त्यावर हसली आणि तिनं पानाचे विडे तयार करायला सुरुवात केली.

बरोबर दोन वाजता आम्ही रेसकोर्सवर पोहोचलो. प्रवेशाची तिकिटं नबाबानंच काढली. नबाबीला तो म्हणाला, ''सलिमा, तू उधर स्टॉलपर बैठ, हमारे साथ इधर उधर वैâसी करेंगी?''

खरं म्हणजे दौलतखान फारच सुरेख उर्दूमिश्रित हिंदी बोलत होता; पण आता इतक्या दिवसांनंतर मला त्याचे जसेच्या तसे शब्द आठवणं अशक्य आहे. जेवढं आठवतं आहे तेवढं मी माझ्या मोडक्यातोडक्या भाषेत लिहिण्याचा प्रयत्न करतो आहे!

रेसकोर्स म्हणजे एक जत्राच! या जत्रेत भाविक म्हणजे पंटर्स आणि देव म्हणजे घोडी आणि त्यावर स्वार होणारे जॉकी! हे देव दहातल्या एखाद्या भक्ताला पावतात आणि नऊ जणांची निराशा करतात! पण तरीही निराश झालेले भक्त खिशात पैसे असेपर्यंत त्या देवाची आराधना करीत राहातात!

मी आणि दौलतखान फिरत फिरत बूथजवळ आलो. त्याला मी तज्ज्ञ आहे असं भासवलं होतं खरं; पण आता मी काही घोडी सुचवली आणि ती हरली की माझं पितळ उघडं पडणार होतं. अशा चिंतातुर अवस्थेत असताना मला अचानक शर्मा नावाचा एक लेफ्टनंट भेटला. मागे मी पुण्यात ट्रेनिंगला असताना तो आमच्या ट्रेनिंग सेंटरलाच होता. तो साला पक्का पंटर होता. मला भेटताच त्यानं अगोदर माझ्या पायाबद्दल चौकशी केली. तेव्हा मी म्हणालो, ''पाय ठीक आहे; पण आजच्या चारसहा सर्टन्ट्या सांग, नाहीतर धड आहे तो उजवा पायही मोडेल कदाचित्!'' त्यानं भराभर आपल्या पुस्तकात टिकमार्क केलेली घोडी सांगितली. दौलतखान आम्ही काहीतरी खाजगी बोलतो आहो म्हणून बाजूला उभा होता. शर्मांचे आभार मानून मी दौलतखानाकडे वळणार इतक्यात शर्मा मला म्हणाला, ''समर, तुला समजलं की नाही?''

''कशाबद्दल?''

''बेहराम इराण्याचा परवा खून झाला!''

''काय सांगतोस? मला कसं कळलं नाही? पेपरला बातमी कशी नाही?''

''अरे, इथं नव्हे, दुबईत! गेल्या महिन्यात तो तिकडे गेला होता!''

''कशासाठी मारला?''

''लाख लफडी! स्मगलिंगचं काहीतरी लफडं होतं. काल रात्री मला क्लबवर समजलं!''

खरं म्हणजे पुण्यात आल्या क्षणापासून मला बेहरामची भीती वाटत होती. तो भेटला तर त्या चष्म्यासाठी तो माझा पिच्छा पुरवणार असं वाटलं होतं; पण तो मेल्याची ही अनपेक्षित वार्ता शर्मानं दिल्यामुळं मी खरोखरच सुटकेचा नि:श्वास सोडला. लालबुंद गोरा, डब्बल हाडाचा इराणी बेहराम जर चष्म्यासाठी हात धुऊन माझ्यामागे लागला असता तर माझी खैर नव्हती. त्यात एका पायानं अगोदरच मी अधू झालो होतो! खोटं खोटं दु:ख व्यक्त करीत म्हणालो, ''व्हेरी सॅड न्यूज! वुइ लॉस्ट ए व्हेरी गुड फ्रेंड!''

''पण समर, त्याचं काय झालं आहे ठाऊक? पमिला त्याला सोडून गेल्यापासून त्याला

उतरती कळाच लागली. बेकरी बंद पडली. तिकडे दुबई मधून चोरटं सोनं इकडे यायचं, त्याची विल्हेवाट लावायच्या कामी बेहराम मदत करायचा; पण त्यांच्यात काहीतरी बेबनाव निर्माण झाला. याला सगळं लफडं मिटवण्यासाठी म्हणून त्या अरबांनी दुबईला नेलं आणि तिथंच त्याला खतम् केलं! तरी आम्ही सांगत होतो रे त्याला, या स्मगलिंगच्या झंझटात सापडलास की पश्चात्ताप करायची पाळी येईल! पैशाचा विलक्षण मोह होता बेट्याला!''

''बॅड लक्!'' असं म्हणून मी शर्माचा निरोप घेऊन दौलतखानाकडे वळलो. हा बेटा बूथच्या रांगेत तिकिटासाठी तोकडे कपडे घालून उभ्या असलेल्या अँग्लोइंडियन पोरीवर 'लाइन' मारत उभा!

मनाशी म्हटलं, सलीमासारखी अप्सरा सोबत असताना या बेट्याला दुसऱ्या पोरीच्याकडे पहावंसं तरी कसं वाटतं?

मी त्याच्या पाठीवर थाप मारताच दचकून तो म्हणाला, ''चलो, कौनसे घोडेपर लगानेका?''

''यार, तुम तो घोडीके तरफ देख रहे थे!''

तो हसला आणि म्हणाला, ''कितनी लाजवाब है वो लडकी!''

''अरे भाई, तुम रेस खेलनेको आये हो या लडकियाँ देखनेको?''

तो हसला. मी त्याला शर्मानं सांगितलेल्या टिप्स् दाखवत म्हणालो, 'चलो, अभी रेस छुटेगी....''

दिवसभर आम्ही दोघे रेसकोर्सवर धावाधाव करीत होतो. मी दिलेल्या सहा टिप्सपैकी तीन बरोबर आल्या. दौलतखाननं दीड हजार कमावले; म्हणून माझी अब्रू बचावली. तो जर सगळाच हरता तर मात्र माझी पंचाईत होती. रेसमधलं मला काहीच समजत नाही असं त्याला वाटण्याची दाट शक्यता होती.

चार रेसेस झाल्यानंतर मी व तो सलिमाकडे गेलो. बिचारीला रेसमधलं काहीच समजत नव्हतं, ही घोडी धावतात का, ती जवळ आल्यावर लोक ओरडतात का, घोड्यावर पैसे लावायचे म्हणजे काय करायचं? काही तिला ठाऊक नव्हतं. मी तिला विचारलं,

''आपको खेलना है?''

''कुछ समझता नहीं मुझे!'' अदबीनं ती म्हणाली.

''कुछ चायवाय पिएँगे!''

''हां जी ऽ!''

खरं म्हणजे अधूनमधून तिला येऊन भेटायला हवं होतं आम्ही. तीन तास एका ठिकाणी बाईमाणसाला बसवून आम्ही त्या जत्रेत भटकणं चुकीचं होतं.

सलिमा स्टॉलवरून आमच्या सोबत खाली उतरली; पण मला ती काहीशी अस्वस्थ दिसली. तिला काहीतरी सांगायचं होतं दौलतखानाला, माझ्यासमक्ष ती सांगू शकली नाही असं वाटलं. तिची अस्वस्थता कशासाठी आहे मी तत्काळ ओळखलं. स्टॉलच्या खाली असलेलं लेडीज 'टॉयलेट' मी दौलतखानाला दाखवून म्हटलं, ''उनको अगर वहाँ जाना है तो...''

नवाबीनं मात्र माझा चाणाक्षपणा अचूक ओळखला आणि ती गालांतल्या गालात हसली आणि टॉयलेटकडे निघून गेली. काही नबाब बुद्दू असतात असे किस्से मी आर्मी ऑफिसरांच्या बैठकीत ऐकले होते. दौलतखानाला आपल्यासोबत आणलेल्या सलिमाला काय सांगायचं हेदेखील कळू नये याचं मला आश्चर्य वाटलं. एक तर ती त्याची नसावी अशी शंका माझ्या मनात तरळत होती. त्यात अशा त्याच्या तिच्याकडे दुर्लक्षण्यानं माझ्या समजात अधिकच भर पडली! माणूस आपल्या पत्नीला जसा वागवतो, तसा तो तिला मुळीच वागवत नव्हता.

रेसकोर्सवरचं चहाचं स्टॉल म्हणजे केवळ पंटर्सना कापण्यासाठी काढलेली असतात की काय, न जाणे! सगळ्या पदार्थांचे भाव दुप्पट! यांच्या बापानं कधी दीड रुपया कप चहा दिला होता? मी पाह्यलं, त्या रेसच्या कंपाऊंडमधे येणाऱ्या प्रत्येकाला कापायचं असतं हे एकच तत्त्वज्ञान दुसऱ्याला ठाऊक असतं. पण मला हे म्हणण्याचा काय अधिकार आहे? दौलतखानाला

मी कशासाठी इथं आणलं होतं?

आम्ही चहा घेऊन सलिमाला स्टॉलवर सोडायला गेलो, तर जागा फुल्ल! मी म्हणालो, "आप थोडी देर ठहरिए यह रेस खतम होने के बाद बहोत लोग नीचे जाते है. फिर आप बैठ लेना!"

सलिमा गोड हसली. माझ्या अदबशीर बोलण्यावागण्यावर ती खूष होती. बायकांची 'सायकॉलॉजी' ज्याला ओळखता आली, त्याला जगात कुणाही पुरुषाचा अंदाज घ्यायला वेळ लागत नाही, असं माझं मत आहे. उलट बायकांना ज्याला ओळखता आलं नाही तो जन्मभर फसत राहणार हेही मी आज अनुभवानं सांगू शकतो. अलकाला मी प्रथम भेटीत ओळखलं असतं तर असा घरदार सोडून बोंब मारत कशाला भटकत बाहेर पडलो असतो? त्याबद्दल अलकाला दोष देण्याऐवजी स्त्रीस्वभावाचा अंदाज न लागणाऱ्या माझ्या कोत्या बुद्धीसच दोष द्यायला हवा. भवानीनगर सोडल्यानंतर हे सगळं सुचत होतं. पण 'It is never too late to learn' असं डॅडी वारंवार मला बजावायचे! तेव्हा यापुढं मी बायकांच्या मानसशास्त्राचा सखोल अभ्यास करायचा ठरवला होता. सलिमाकडे त्याच दृष्टीनं मी पहात होतो. माझ्या अभ्यासाचा एक विषय! ती कोण असेल? याच्यासोबत सहज गंमत करायला म्हणून आलेली की खरोखरच नात्यागोत्यातली कोणीतरी?

सहाला शेवटची रेस संपली. दौलतखान, सलिमा आणि मी बाहेर पडणार, तोच मला विलास भेटला. ठेंगू, पाच फूट दोन इंच उंचीचा विलास, सूट, बो, घालून अगदी टेचात आपल्या गाडीकडे चालला होता. किती वर्षांनी मी त्याला पहात होतो? हा विल्या भवानीनगरच्या महाराजांच्या एका कर्मचाऱ्याचा मुलगा! बेताचा शिकलेला; पण फार बोलका, तयारीचा! यानं माझ्या काही फुटबॉल मॅचेस पाह्यल्या होत्या. पण त्यानंतर तो भवानीनगर सोडून परागंदा झाला. तो रेसच्या या क्षेत्रात कुणाच्यातरी स्टेबलला जॉकी म्हणून काम करतो आहे एवढं माझ्या कानांवर आलेलं होतं. मी मोठ्यानं हाक मारली, "विला ऽ स!"

तो गाडीच्या दाराचं कुलूप काढायच्या बेतात होता. माझ्याकडे लक्ष जाताच तो थबकला आणि माझ्याकडे काही पावलं येत म्हणाला, "समर? अरे, तू इकडे कुठं?"

"रेसला आलो होतो!"

"असतोस कुठं सध्या? करतोस काय? मधे मिलिट्रीत होतास असं ऐकलं होतं!"

"ते सगळं सवडीनं सांगतो, अगोदर सांग, तू जॉकी नाहीस आता?"

विलास मोठ्यानं हसला आणि म्हणाला, "अरे बाबा! मी आता फूलफ्लेज्ड जॉकी आहे! आज मला माउंटस नव्हत्या म्हणून या वेषात बघतोय्स! पुढच्या रेसपर्यंत राहाणार असलास तर रहा, मला लागोपाठ चार रेसेसमधे माउंटस आहेत; पण आपण त्याअगोदार भेटू. बंडगार्डनपासून उजव्या बाजूला जो रस्ता फुटतो तिथं तिसऱ्या बंगल्यात मी मागे आऊटहाऊसमध्ये रहातो. जॉकी विलास एवढं विचार, कुणीही दाखवेल. पण जरूर ये हं. भवानीनगरचं कोणीही भेटलं की मनाला फार बरं वाटतं. हे पाव्हणे कोण?"

"हे दौलतखान! हैद्राबादचे आहेत. या सलिमा बेगम." विलासनं त्या दोघांनाही नमस्कार केला अन् माझ्याकडे रोखून पहात विचारलं. "मग तू सध्या हैद्राबादला असतोस की काय?"

"छे: रे! इथं पुण्यात हॉटेल हेवर्डसमधे ओळख झाली!"

"तिथं उतरलाहेस?"

"हो. का?"

"मग फार मोठा झालास!" विलास हसत हसत म्हणाला, "मोठी माणसं त्या हॉटेलवर उतरतात!"

"तसं काही नाही, तसं काही नाही!"

"बरं, पण घरी ये हं! बंडगार्डन थर्ड राइट रोड, बंगलो नंबर श्री लक्षात राहील ना?"

"पाय थोडासा दुखावला आहे, पण स्मरणशक्ती अगदी ठणठणीत आहे!" डोक्यावर टिचकी मारून मी म्हणालो.

विलासनं विचारलं, "तुम्ही लोक आलात कसे?"

"कसे म्हणजे? टॅक्सीनं!"

"मग चला, मी सोडतो तुम्हाला जाता जाता!" दौलतखान, सलिमा मागं बसली. मी विलासजवळ पुढे. विलासनं मला विचारलं, "या लफड्यात केव्हापासून पडलास?"

"लफडं कसलं?"

"ही बाई कोण?"

"खरं सांगू? ती कोण आहे हे अजून मलाही माहीत नाही. त्याच्या नात्यातली कोणीतरी असावी अशी शंका आहे, पण ही त्याची बायको खासच नाही!"

"खानदानी सौंदर्य म्हणतात ते हे हं, समर! अरे, पण तुझं लग्न झालं होतं ना?" अचानक आठवल्यासारखं करून विलासनं मला विचारलं.

"विलास, आपण त्या विषयावर नंतर बोलू! असं गाडीतल्या गाडीत काही मिनिटात सांगण्यासारखं प्रकरण नाही ते! मी घर सोडलंय, अजून कुठं थाऱ्याला लागलो नाही! आज सकाळपर्यंत खिशात दमडा नव्हता. हा मागे बसलेला दोस्त भेटला आणि पैसे खिशात आले! फ्लश!"

विलास हसत हसत म्हणाला, "फुटबॉल सोडलास आणि फ्लश धरलास काय?"

मी फक्त हसलो. पण भवानीनगरचा, माझ्या काहीसा पूर्वपरिचयाचा हा विलास इथं पुण्यात आहे आणि शिवाय तो लायसेन्स्ड् जॉकी झाला आहे हे समजल्या क्षणापासूनच मला आधार वाटायला लागला होता.

हॉटेल हेवर्डसवर आम्हाला सोडून विलास पुढे गेला. तो इतका बुटका होता की ड्रायव्हिंग करताना सीटखाली त्याला दोन उशा ठेवाव्या लागल्या होत्या. गाडी पुण्यातल्या त्या अरुंद रस्त्यातून विशेषत: सायकलवाल्यांच्या गर्दीतून अगदी सराईतासारखा चालवत होता. आम्हाला हॉटेलवर सोडताना दौलतखान उतरून त्याचे आभार मानताना म्हणाला, "इफ् यू डोंट माइण्ड कॅन यू कम हिअर फॉर डिनर?"

"ओ ऽ नो! थँक्स नबाबजी!"

विलास जाता जाता सलिमाकडे ओझरता दृष्टिक्षेप टाकण्याचा मोह टाळू शकला नाही!

रेसमधे पैसे मिळोत वा हरोत, जाताना जो उत्साह असतो तो रेसवरून परत येताना कधीच नसतो. पण आज दोन गोष्टी चांगल्या झाल्या. शर्माच्या टिप्समुळं दौलतखान हजार दीड हजार रुपये मिळवून होता, आणि मला विलास भेटला होता!

साडेसात वाजायला आले होते. अगदी वर्षांनुवर्षांची दोस्ती असल्यासारखा दौलतखान मला सोडायलाच तयार नव्हता. मी माझ्या खोलीचं कुलूप काढत असताना तो म्हणाला, "वॉश लेके आव, डिनरतक फ्लश खेलेंगे!"

मी मनाशी हसलो. म्हटलं, अजून माझा फ्लशमधला हिसका तुला समजलेला नाही!

घर सोडल्यानंतरचा हा दुसराच दिवस होता. पण किती धामधुमीचा गेला, या दिवसभरात मी घर सोडलेलं आहे आणि ते ज्या कारणामुळं सोडलं हे दोन्हीही विसरलो होतो.

शॉवरबाथखाली उभा राहिलो. अंघोळ केली. रेशमी शर्ट आणि पायजमा चढवला. आरशात पाहून केस विंचरू लागलो. तोंडानं गाणं गुणगुणत होतो 'दुनिया ऽ ए दुनिया ऽ रंगरंगेली बाबा दुनिया रंगरंगेली,' इतक्यात दारात टकटक झाली, मी जाऊन दार उघडलं. दारात दौलतखान उभा होता. लखनवी जरीबुट्टीचा झब्बा आणि मोगली विजार घालून. तो म्हणाला, "आपका ब्रँड कौनसा?"

"याने?" मी विचारलं.

"ड्रिंकका आपका ब्रँड कौनसा?"

"हा!" हसत हसत मी म्हणालो, "कुछ भी चलेगा!"

"मेरे पास व्हिस्की है!"

"फिकर मत करो, नबाबजी! मैं तो हमेशा लेनेवाला नही हूँ! कभी कभी जस्ट फॉर द

सेक ऑफ कंपनी!''

''हमाराभी वैसाही होता है'' हसत हसत तो म्हणाला. आम्ही त्याच्या खोलीकडे जायला निघालो. त्याने माझ्या खांद्यावर हात ठेवला! त्या वेळी मला एका उक्तीची आठवण आली,-

Ignorance about future is a bliss. A lamb which is to be slaughtered, licks the hands of the butcher, only because it is ignorant about its future !

मी दौलतखान नबाबाला साफ धुणार होतो, पण त्या बिचाऱ्याला मात्र त्याची य:त्किंचितही कल्पना नव्हती. अगदी जुन्या-पुराण्या जिगरी दोस्तासारखा त्यानं माझ्या खांद्यावर हात ठेवला होता - चालता चालता!

-o-o-o-

१०

सलिमा प्रत्यक्षात दौलतखानाची कोण आहे हे समजून घ्यायला मी अत्यंत उत्सुक होतो. पण ती समोर असताना दौलतखानाला तिच्याबद्दल विचारायचं कसं हा प्रश्न होता. मी दौलतखानसोबत त्याच्या खोलीवर आलो आणि या प्रश्नाचं उत्तर मिळालं. सलिमाला काही शॉपिंग करायला बाहेर जायचं होतं. हॉटेलातला बेअरर तिच्यासाठी टॅक्सी घेऊन आला होता. तोही तिच्यासोबत जाणारा होता. सलिमा बाहेर पडायच्या तयारीत होती. जाताजाता ती मला म्हणाली,-

"आप उनको जादा नहीं पिने देना!"

मी हसून म्हणालो, "आप फिक्र मत करो!"

अर्ध्यापाऊण तासात सलिमा 'शॉपिंग' करून परत येणार होती. पण ती दाराशी तशीच घुटमळत होती. दौलतखान आठवल्यासारखं करून म्हणाला, "लो! मैं भूलही गया! तुझे पैसे चाहिए ना?"

त्यानं कॉटखालची ट्रंक बाहेर ओढली. त्यातली नवी कोरी नोटांची बंडलं मला दिसली. सलिमाला काय खरेदी करायची होती, कुणास ठाऊक! पण दौलतखानानं ओठाला बोट लावून शंभराच्या पाच नोटा मोजून तिच्या हाती दिल्या. तिच्या सोबत जाणाऱ्या हॉटेलातल्या पोऱ्याला उद्देशून तो म्हणाला, "संभालके ले जाना!"

त्यानं मान डोलावली. अशा अर्थानं की, 'मी नेहमीच अशी जोखमीची कामं करीत असतो.'

सलिमा बाहेर पडली. पण माझ्या मनात उगाच शंका डोकावली, "ही परत येईल ना?"

दौलतखानानं ड्रेसिंग टेबलावर ठेवलेले उपडे ग्लास उचलून मी बसलो होतो त्या टेबलावर आणून ठेवले. गादीखाली असलेली व्हिस्कीची बाटली उघडली.

"आपको सोडा चाहिए या पानी चलेगा?"

"पानी चलेगा!"

त्यावर तो हसून म्हणाला, "तो आप पिनेमें दर्दी है!"

ग्लास भरले गेले. ग्लासाला ग्लास भिडले. एकमेकांनी एकमेकांना 'चीअर' केले आणि मी पहिला घोट घेताक्षणीच दौलतखानाला प्रश्न केला "माफ किजीए नबाबजी, ये बीबीजी कौन है?"

दौलतखानला माझा तो प्रश्न अनपेक्षित होता. त्यानं एक मोठा घोट घेतला. सिगारेट शिलगावली अन् सांगायला सुरुवात केली. सलिमाचा तो इतिहास ऐकत असताना मी तल्लीन होऊन गेलो. दौलतखान मला सांगू लागला,-

"हैद्राबादच्या नबाबांची ख्याती साऱ्या जगभर आहे ती त्यांच्याजवळ असलेल्या अफाट संपत्तीसाठी! पण बाहेरच्या जगाला त्यांच्या जनानखान्याबद्दल फारशी माहिती नाही. परंपरागत मोठा जनानखाना पदरी बाळगणं हे ऐश्वर्याचं प्रतीक मानलं जायचं! राजवाड्याचा एक भाग या जनानखान्यासाठी राखून ठेवलेला असे. यात जवळजवळ तीन साडेतीनशे स्त्रिया असत. पण व्हायचं काय, वर्षातून एखादा दिवसदेखील नबाबाची आणि त्यांची तशी भेट व्हायची नाही. या जनानखान्यातल्या स्त्रियांना बाह्य जगाचं वारंसुद्धा लागत नसे. यांच्यावर देखरेख करायलाही पोक्त अशा नबाबांच्या खास विश्वासातल्या स्त्रिया असायच्या. कडेकोट बंदोबस्त! खायलाप्यायला मुबलक! पण समरबाबू, तरुण स्त्रियांना केवळ खायलाप्यायला मिळालं म्हणजे झालं?"

''मुळीच नाही! शरीरधर्म कुठं सोडता येईल?''

''मग तेच सांगतो ना! त्या देखरेख करणाऱ्या पोक्त बायकांना लालूच दाखवून त्यातल्या काहीजणी वाड्यातल्या पुरुषांशी संधान बांधायच्या! या प्रकरणातून काही स्त्रिया गरोदर रहायच्या! नबाबांना वाटे, त्या आपल्यापासूनच गरोदर राह्यल्या! अशा गरोदर स्त्रियांना बाजूला ठेवलं जायचं, त्या बाळंत होईपर्यंत त्यांची देखभाल केली जायची. मुलगा झाला की त्या स्त्रीला शंभर रुपये पोटगी सुरू व्हायची. मुलगी झाली की दीडशे!''

''असा फरक का?''

''मुलीची जबाबदारी अधिक असते ना?''

''अच्छा!''

''बाळंतपणानंतर त्या स्त्रीला जनानखान्यातून मुक्त केलं जायचं!''

''ते का?''

''मूल झालेल्या स्त्रीशी नबाबसाहेब पुन्हा 'तसा' संबंध ठेवत नसत!''

''अरेच्चा!''

''पुढं ही झालेली संतती आमच्या संस्थानांत काहीशी 'प्रिव्हिलेज्ड' अशी मानली जायची! लग्न, नोकऱ्या या बाबतीत त्यांना सवलती मिळत! स्वत: नबाब नसलेले, पण नबाबाशी आपलं रक्ताचं नातं आहे असं सांगणारे माझ्यासारखे बरेच नबाब हैद्राबादच्या आसपास पसरले आहेत. नबाबांच्या जनानखान्यात जन्मलेली एखादी रूपवान स्त्री पदरी बाळगणं हे त्यांना भूषण वाटतं. या सलिमाची आई झेबुन्निसा फार सुस्वरूप बाई आहे.''

''अजून आहेत त्या?''

''हो ऽ! पन्नाशीला आलीय, पण अजून पस्तिशीत असल्यासारखी वाटते! मीरागंज विभागात तिचा बंगला आहे. सलिमानं लग्न केलं नाही. ती अशीच माझ्यासारख्या 'सो कॉल्ड' नबाबांसोबत फिरते! पण आहे कशी?''

मी व्हिस्कीचा एक मोठा घोट घेऊन म्हणालो, ''मला तरी ती तुमची पत्नीच वाटली!''

''ते तर तिचं कौशल्य आहे! आजपर्यंत कितीतरी बड्या धेंडांसोबत ती राह्यलीय, पण प्रत्येकाला वाटतं, आपणच तिचा पहिल्यादा उपभोग घेत आहोत!''

''कमाल कर दिया नबाबसाब!'' हसत हसत मी म्हणालो. आतून मीही गरम होत चाललो होतो. पोटात गेलेल्या व्हिस्कीमुळं की सलिमाची हकीकत ऐकून, हे माझं मलाच समजत नव्हतं.

''पण एवढी खूबसुरत सलिमा सोबत असताना तुम्ही रेसकोर्सवर त्या अँग्लोइंडियन पोरीकडे टक लावून पहात होता, हे कोडं काही मला सुटलं नाही!''

दौलतखान मोठ्यानं हसला आणि म्हणाला, ''खुदानं इतकी असंख्य फुलं निर्माण केली आहेत, प्रत्येकाला निराळा 'खुशबू' असतो!''

''कमाल कर दिया!''

''समरबाबू, तुम्ही एकदा हैद्राबादला या. तुम्हाला अशी एक एक चीज दाखवतो, बस्स! तुम्ही परत यायला मागणार नाही! सलिमा कुठं लागावी? हैद्राबादचं नॉनव्हेज जेवण कधी खाल्लंय का तुम्ही?''

''मी अद्याप हैद्राबादच बघितलेलं नाही, तर हे सर्व अनुभवणार कसा?''

''अरे यार! एक दफे आ जाना! मेरे मेहमान बनकर आव!''

दारावर टकटक झाली. मी उठून दार उघडलं. सलिमा शॉपिंग करून परत आली होती. ती जाताना माझी तिच्याकडे पहाण्याची जी नजर होती ती, ती परतल्यानंतर राह्यली नव्हती. व्हिस्कीचे दोन पेग पोटात गेलेले होते आणि सलिमाचा इतिहास समजला होता. अर्थात तिच्याकडे पहाण्याच्या माझ्या दृष्टीतही बदल झाला होता.

''बंबईसे ये पूना बहोत महेंगा है!'' ती रुमालानं कपाळावरचा घाम टिपत म्हणाली.

''आप कौनसे मार्केटमें गये थे!''

''इधरही कॅंप में!''

''ये कॅंपवाले लोग बहोत महेंगे है! गाव मे जाना था! लक्ष्मी रोड!'

''वह साथ आयेला लडका बोला यही जाएंगे!''

मी मनाशी म्हटलं, ''त्या भडव्याला काहीतरी कमिशन मिळायचं असेल!''

आमच्या स्वस्त-महागाच्या बोलण्यात दौलतखानाला काही स्वारस्य नव्हतं. त्याच्या दृष्टीनं ही चर्चा फालतू होती. पैसा ही चीज खर्च करण्यासाठी आहे आणि ती खर्च करताना स्वस्तमहाग अशी चर्चा करणं त्याच्या दृष्टीनं मूर्खपणा होता. तो मला म्हणाला, ''चलो यार, समर!''

आठ वाजले होते. जेवायला अद्याप थोडा वेळ होता. डोक्यात सलिमा शिरली होती. व्हिस्कीची धुंदी त्यापुढं अगदीच फिक्की पडली होती. बाहेरून आल्यानंतर सलिमा पार्टिशनच्या पलिकडे जाऊन कपडे बदलू लागली. मी चष्मा चढवून पत्ते पिसत होतो. दौलतखानाच्या बॅगेतली नोटांची पुडकी माझ्या नजरेसमोर होती. पण एकदम त्याला खंक करून सोडणं मूर्खपणाचं ठरलं असतं. कळत नकळत मला त्याला कातरायचा होता. पण ते करत असताना ती सलिमा आड येणार नाही, याचीही दक्षता घेणं जरुरीचं होतं. मी त्याला फ्लशमधे एकसारखा गंडवतो आहे, हे जर तिच्या लक्षात आलं तर? माझा जसा दौलतखानाच्या नोटांवर डोळा होता तसा तिचाही कदाचित् असणार! तेव्हा तिला माझ्या हेतूची जाणीव होता कामा नये, यासाठी काहीतरी उपाययोजना करणं अत्यावश्यक होतं....

ती कपडे बदलून आम्ही खेळत होतो तिथं बाजूला येऊन बसली. मी दौलतखानाला खेळताखेळता म्हणालो, ''बीबीजी, खाली खेल देखती है!''

''तो क्या करना चाहिए?'' दौलतखानानं मला विचारलं.

मी ग्लासाकडे बोट दाखवलं तेव्हा दौलतखान म्हणाला, ''वैसा वो कभी कभी लेती है, लेकिन आपके सामने शरमाएंगी!''

''इसमें शरमानेकी बात क्या है?'' असं म्हणत मी उठलो आणि तिसरा ग्लास आणून टेबलावर ठेवला. दौलतखानने त्यात एक पेग ओतला. मला वाटलं, सलिमा आढेवेढे घेईल, लाजेल, मुरकेल, पण यांपैकी काहीही घडलं नाही. सरळ तिनं ग्लास उचलला; आम्हाला चीअर्स केलं आणि ओठाला ग्लास भिडवला. मघा दौलतखानाला जादा प्यायला देऊ नका असं सांगणाऱ्या सलिमानं अगदी विनासंकोच मद्याचा ग्लास उचलून ओठांना लावावा, याचं मला आश्चर्य वाटलं!

आमचं खेळणं पुढं चालू झालं. नेहमीप्रमाणे सुरुवातीचे काही डाव मी हरलो. नंतर त्या चष्म्यातून दौलतखानाच्या हातातील पत्त्यांचा अंदाज घेत त्याला चांगलाच गंडवायला सुरुवात केली. पण तो डाव हरला की प्रत्येक वेळी ग्लासात शिल्लक असलेली व्हिस्की संपवून पुन्हा त्यात ओतत होता. प्रत्येक डावागणिक त्याच्या खिशाला कात्री बसत होती अन् माझा खिसा फुगत होता. सलिमा एकएक सिप घेऊन आमचा खेळ पहात होती. मी प्रतिस्पर्ध्यावर अचूक कशी चाल करू शकतो, याचं राहून राहून तिला कौतुक वाटत होतं. पण मूर्ख दौलतखान इर्षेला पेटून खेळत होता. हरलेले पैसे लगेच जिंकता यावेत, म्हणून चाल वाढवत होता. प्रथम रुपया चाल होती, तिची त्यानं दहा रुपये केली. माझं काही त्यांत नुकसान नव्हतं. माझ्या चष्म्यातल्या पॉइंटमधून त्याच्या हातात नेमके कोणते पत्ते आहेत हे जोपर्यंत मला निश्चित समजत होतं, तोपर्यंत मला कशाचीही चिंता करायचं कारण नव्हतं. त्यात मी पीत होतो अगदी सावधानतेनं!

जेवणाला डायनिंगरूममधे जाणं अवश्य होतं, पण मी वेटरला सांगून आमचं जेवण वरच पाठवायला सांगितलं. जेवण आलं. पण दौलतखानाचं जेवणात लक्ष नव्हतं. त्याला हरलेले सगळे पैसे माझ्याकडून परत जिंकायचे होते. आम्ही थोडंफार काहीतरी खाल्लं. वेटर प्लेटस् खाली घेऊन गेला. लगेच दौलतखान मला म्हणाला,-

''चलो समरबाबू, आज रातभर खेलनेका!''

''बस्स हो गया अब, कल खेलेंगे!'' मी म्हणालो.

''नहीं नहीं! ऐसा नहीं. एक तो मुझे खतम कर दो या तुम खतम हो जाव!''

''अच्छा ऽ ऽ अच्छा -''

मला त्याच्या बोलण्याचा आशय समजला. त्याच्या किंवा माझ्याकडचे सगळे पैसे संपेपर्यंत खेळत रहायचं, अशी त्याची इच्छा होती. मुळात तो प्यायलेला. त्यात माझ्या या चष्म्याची करामत! त्याच्या बापालासुद्धा माझ्या ट्रिक्स कळणार नव्हत्या.

सलिमाही त्याला म्हणाली, "अब बस्स करो. कल सुबह खेलो!" पण दौलतखान ऐकण्याच्या मन:स्थितीत मुळीच नव्हता. तो इर्षेला पेटला होता. जससे जवळचे पैसे संपतील तसतसे तो बॅगेतून काढत होता. रात्रीचे दोन वाजायला आले तरी आमचं खेळणं चालूच. जांभया देऊन सलिमा खुर्चीतच झोपली. खांद्यावरून पदर ओघळला होता. निद्रेतसुद्धा तिचं सौंदर्य मला मोहवत होतं.

बघताबघता दौलतखानाची बॅग रिकामी झाली. शेवटी त्याच्या हाताला व्हिस्कीची अर्धी बाटली लागली. ती घेऊन तो धडपडत खुर्चीवर बसला आणि म्हणाला,

"तुमने सब जीत लिया. अब मेरे पास कुछ भी नहीं. अगर ये आखरी डाव भी तुमने जिता तो-"

"तो क्या?" मी आश्चर्यानं विचारलं.

"तो आप सलिमाके साथ सो जाइए!"

आमच्या मोठ्या बोलण्यानं सलिमा जागी झाली होती. दौलतखानाचे शब्द तिच्या कानावर पडले आणि तिनं लाजून माझ्याकडे पाह्यलं अन् मान खाली घातली. द्यूतांत हरलेल्या पांडवांनी शेवटी द्रौपदी लावली हे वाचलं तेव्हा खरं वाटलं नव्हतं. पण आज अगदी तस्सा प्रकार घडत होता. फ्लशमध्ये सर्व पैसे गमावलेला दौलतखान सलिमाच्या मोबदल्यात मला शेवटचा डाव खेळण्याची विनंती करीत होता. मी म्हणालो, "मैं खेलूंगा, लेकीन सलिमाका इनसल्ट मत करो."

सलिमा दौलतखानाकडे पाहून तुच्छतेनं हसली. दौलतखानानं जेवल्यानंतरदेखील अर्धा ग्लास व्हिस्की भरून घेतली. शेवटचा डावही तो हरला. पण त्याला आता कशाचीच शुद्ध राह्यली नव्हती. तो बेशुद्धावस्थेत असल्यासारखा काहीतरी असंबद्ध बडबडत होता. खुर्चीवरदेखील त्याला नीट बसता येईना, तेव्हा सलिमा मला म्हणाली, "उसको कॉटपर सुलाना होगा!"

मी व सलिमानं त्याला दोन्ही बाजूंना धरून कॉटवर नेऊन झोपवला आणि अर्धवट शुद्धीत असलेला दौलतखान बरळला, "अब तुम दोनो जाव, सो जाव, मझा करो ऽ!"

मी पत्त्यांचा जोड गोळा करून खिशात घातला. चष्मा केसमधे बंद करून केस विजारीच्या खिशात ठेवण्याचा प्रयत्न केला. पण माझे विजारीचे दोन्ही खिसे नोटांनी गच्च भरले होते. तो चष्मा मला खिशातल्या सर्व नोटांपेक्षा अधिक मोलाचा होता. तसाच तो खिशात कोंबला. सलिमा उठून गच्चीत जाऊन उभी होती. रात्रीचे अडीच वाजले होते. थंड हवा सुटली होती. पत्त्यांची आवराआवरा झाल्यावर मी सलिमाला म्हणालो,-

"मैं जा रहा हूँ. दरवाजा बंद कर लो!"

पण सलिमा काहीच बोलली नाही. ती तशीच गच्चीत उभी.

मी गच्चीत अगदी तिच्याजवळ जाऊन म्हणालो, "मैं जा रहा हूँ!"

तरीही ती निश्चल!

शेवटी मी तिच्या हाताला स्पर्श करून म्हणालो, "मैं जाता हूँ!"

सलिमानं पाठ फिरवली आणि तिनं चक्क माझ्या गळ्यात हात टाकले. मघापर्यंत मस्तकात तरळणारी व्हिस्कीची धुंदी खाडकन् उतरली. दुसरीच नशा चढली. सलिमाच्या त्या भुऱ्या केसांचा वास नाकातून मस्तकात शिरला. तिला तशा मिठी घातलेल्या अवस्थेतच मी आत घेऊन आलो. कॉटवर बसलो. पलीकडे दौलतखान घोरत होता-आणि मी?

सलिमा 'त्यानंतर' मला सोडायला तयार होईना.

"इधर सो जाइए थोडी देर!"

मी दौलतखानाच्या कॉटकडे प्रश्नार्थक मुद्रेनं पाह्यलं. त्यावर ती तुच्छतापूर्वक म्हणाली, "वो कल दस-ग्यारा बजेतक नहीं उठेगा."

तिच्या आग्रहास्तव मी नंतर काही वेळ तिच्या अंगावर हात टाकून झोपलो. माझ्या

स्वप्नांतदेखील कधी आलं नव्हतं की, या सलिमाशी मला मजा करायला मिळेल.

सलिमा एकदम खुलली होती. तिचा तर तो धंदाच होता; पण या प्रांतातला दर्दी कोण, अर्धवट कोण, हे तिला चांगलंच समजत असावं. त्याशिवाय तिनं मला असा प्रतिसाद दिलाच नसता. बाहेर कुठंतरी तीनचे टोल पडले, तसा मी उठलो आणि सलिमाच्या पाठीवरून हात फिरवीत म्हणालो, "अब सो जाव! तीन बज गये!"

तिच्याही डोळ्यांवर झापड आली होती, आतून दार बंद करायला ती माझ्या मागोमाग आली. मी दार उघडण्यापूर्वी ती म्हणाली, "आप इधर न ठहरो!"

"क्यूँ?"

"सुबह वो होशमें आयेगा और कहेगा रातको मुझे शराबींमें फसाया!"

"ऐसा कभी हुवा है?"

"बार बार होता है, झगडेभी करता है!"

"अच्छा हुवा आपने कह दिया! बडी मेहेरबानी हुई! मैं अभी इधरसे निकल जाऊंगा!" सलिमा हसली. कशाच्या मोबदल्यात तिला माझ्याबद्दल हा जिव्हाळा वाटला हे मी समजू शकत होतो. दाराचा बोल्ट काढण्यापूर्वी मी सलिमाला घट्ट कवटाळून धरलं अन् एक चुंबन घेतलं. कॉटवर पडलेला दौलतखान एका लयीत घोरत होता. खऱ्या अर्थानं आज मी त्याची दौलत लुटली होती.

-o-o-o-

११

मी खोलीत आलो. खिशात कोंबलेल्या नोटा सूटकेसमधे न मोजताच भरल्या. त्या मोजत बसायला मला सवड होती कुठं? सलिमानं सुचवल्याप्रमाणं मला उजाडायच्या आत ते हॉटेल सोडणं भाग होतं.

खाली आलो तो हॉटेलच्या दाराला आतून कुलूप! काऊंटरजवळ हॉटेलचा पहारेकरी झोपला होता. त्याच्या उशाखाली कुलुपाच्या किल्लीची साखळी दिसली. ती हळूच ओढून घेतली. हॉटेलचं बिल न भागवता मी तेथून सटकलो. पुणं शांत होतं. एखादा ट्रक 'राँवराँव' करीत प्रकाशझोत टाकीत निघून जात होता. हवेत कमालीचा गारवा होता. पण मला स्टेशन गाठायचं होतं. कॅंपची हद्द ओलांडून थोडा पुढं झालो, तो मला एका कोपऱ्यात उभी असलेली टॅक्सी दिसली. ती टॅक्सी आहे हे कळावं म्हणूनच टॅक्सीवाल्यानं ती म्युनिसिपालिटीच्या दिव्याखाली उभी केली असावी. पण ड्रायव्हर खिडक्यांच्या काचा बंद करून मागच्या सीटवर पायाची मुटकुळी करून गुडुप झोपला होता. मी काचेवर टकटक केलं. टॅक्सीवाला चटकन् उठून बसला. झोपेतदेखील गिऱ्हाईकाची प्रतीक्षा करीत होता की काय, न जाणे! त्यानं दार उघडलं.

"चलो स्टेशन!" मी म्हणालो.

त्यानं एक भली मोठी जांभई दिली. मनगटातल्या घड्याळाकडे पहात विचारलं, "कौनसी गाडी जाना है?"

"बम्बई!"

"चलो, अभी पाँच बजे एक्सप्रेस है!"

मी माझ्या घड्याळांत पाह्यलं. साडेचार वाजले होते. सुटकेचा नि:श्वास सोडून मी ड्रायव्हरशेजारी बसलो.

"कहाँसे आये?" आगंतुकपणे त्यानं विचारलं.

"नगरसे!" त्या बेट्याला मी कुठून आलो हे विचारायचं काय कारण होतं? पण एकेकाचा स्वभाव झालं!

स्टेशनवर पोहोचलो आणि मुंबईला जाणारी एक्सप्रेस फलाटावर लागली. टॅक्सीचं बिल भागवून मी फर्स्ट क्लासचं तिकिट घेतलं.

हळूहळू फलाटावर गर्दी जमू लागली. माझ्या फर्स्ट क्लासच्या डब्यातही चारदोन सूटबूटवाले आले. खिडकी पकडून मी बसलो होतो. पायाशी सूटकेस होती. तीमधे किती पैसे आहेत हे मोजायचा वारंवार मोह होत होता; पण आता ते मला अशक्य होतं.

स्टेशनवरच्या मोठ्या घड्याळातला मोठा काटा बरोबर पाचावर आला आणि गाडीच्या इंजिननं भोंगा दिला. हळूहळू गाडी सुरू झाली.

माझ्या भटकंतीचा पहिलाच दिवस असा धामधुमीचा गेला. तो दौलतखान कोण? ती सलीमा कोण, पण एका दिवसांतच सगळा 'हॅवॉक उडाला. आमच्या भवानीनगरला भाजी विकायला येणाऱ्या बायका भाजीची पहिली पेंडी विकली की मिळालेली चवलीपावली कपाळाला लावून कमरेला खोचत आणि "भवानी झाली" म्हणायच्या. माझ्या धंद्याची 'भवानी' ही अशी जोरदार झाली होती. केवळ हजारो रुपयेच कमावले नव्हते, तर एक अत्यंत स्वरूपसंपन्न स्त्रीही उपभोगायला मिळाली होती. नीतीअनीती, धर्म-अधर्म या विचारांचा चुकूनही माझ्या मनाला स्पर्श झाला नव्हता. यापुढं आयुष्यात मी तो होऊनही देणार नव्हतो. ज्या अलकाचा मी पत्नी म्हणून स्वीकार केला होता, तिनं बदफैलीपणा केला होता. नव्हे, मुळातच म्हणजे मी अलकाचा नायनाट करायला हवा होता. पण आईनं आपली शप्पथ घालून माझी अडचण केली होती. उलट सारं

गढूळ वातावरण निवळेपर्यंत मला गाव सोडायचा सल्ला दिला. माझ्या दृष्टीनं हा भ्याडपणाच होता, पण आई हा माझ्या आयुष्यातला वीक पॉइंट. केवळ आईसाठी मी स्वस्थ राह्यलो. अलकाला खतम करून तिला कुठल्या कुठं बेपत्ता करून टाकली असती. आई! आई, तू जर मधे पडली नसतीस तर....!

गाडीनं तळेगाव सोडलं अन् वेग धरला. बघता बघता लोणावळा आलं. काचेच्या खिडकीतूनदेखील थंडी जाणवत होती. माझ्यासमोर बसलेल्या साहेबानं चिरूट पेटवला. मला स्वत:ला चिरूट ओढायला मुळीच आवडत नाही, पण दुसरा ओढत असताना त्याचा येणारा वास मात्र आवडतो.

प्रवासाला निघण्यापूर्वी स्नान करून निघण्याची आमच्यात प्रथा होती. त्यात रात्री सलिमाशी केलेला तो प्रकार! स्नान केल्याशिवाय बाहेर पडणं उचित नव्हतं. पण सवड कुणा बेट्याला होती?

खंडाळा सोडल्यानंतर बोगद्याचा साईसुट्यो सुरू झाला. गाडी काही क्षण गुडुप अंधारांत जायची, तर कधी उजेडांत! नुकताच पावसाळा संपलेला. डोंगरमाथा हिरवागार झालेला होता. त्यातच पूर्वेकडून सूर्य डोकावला. दऱ्यांवर तरळणारं धुकं निवळू लागलं. झाडांचे शेंडे प्रकाशमय झाले. एका बाजूला उंच कडा अन् दुसऱ्या बाजूला खोल दरी, यातून रेल्वे लयबद्ध आवाज करीत संथ गतीनं चालली होती. पावसाळ्यात झालेल्या पडझडीनं रूळदुरुस्तीचं काम सुरू होतं. रेल्वेच्या कामगारांना उतरवण्यासाठी एक्सप्रेस जागोजागी स्लो होत होती.

घाट संपला आणि गाडी सपाट प्रदेशावरून धावू लागली. कर्जतच्या परिसरात भाताचे मैलच्या मैल पसरलेले हिरवेपिवळे भातवाफे नयनरम्य दिसत होते.

कर्जतला एक सधन मुस्लिम कुटुंब आमच्या डब्यांत आलं. पण या बाईनं नखशिखांत काळा रेशमी बुरखा पांघरला होता. डोळ्यांवर थोडीशी जाळी होती. मी तिच्या पायांकडे पाह्यलं. गोरे गोरे पान! नखं मेंदीनं रंगवलेली. मला त्याच क्षणी आठवण झाली ती सलिमाची!

सलिमानं दौलतखानाला असा दगा का द्यावा? तो सकाळी उठल्यावर दारूच्या नशेत माझ्याशी भांडण उकरून काढेल असं का सांगावं? खरं म्हणजे ती त्याच्यासोबत चैन करायला म्हणून आलेली. माझ्यासारख्या काही क्षणांच्या सोबत्याला तिनं इतकं विश्वासात घ्यायचं कारण तरी काय? कारण एकच! मी तिला तृप्त केलं होतं. त्या मोबदल्यात तिनं मला हा सल्ला दिला. तो तरी साला तिच्याशी कुठं इमान राखून होता? रेसकोर्सवर फॅशन केलेल्या पोरी बघितल्या की विरघळायचा! पण सकाळी उठल्यावर मी 'गुल' झाल्याचं पाहून नक्कीच बोंब मारणार! नाहीतरी मी त्याचे है पैसे चोरूनच आणले की! हा चष्मा लावून दुसऱ्याशी खेळणं म्हणजे शुद्ध फसवणूक नव्हे? प्रतिस्पर्ध्याकडे कोणते पत्ते आहेत हे समजून खेळणं म्हणजे चोरी नव्हे तर दुसरं काय?....

गाडी कर्जत सोडल्यानंतर आणखी वेगात धावू लागली. नेरळ स्टेशनवरची ती छोटी आगगाडी, तिचे निळेनिळे डबे दिसतात न दिसतात तोच मागे गेले. माझ्या मनात चटकन् विचार आला, 'मुंबईला जाण्यापेक्षा माथेरानला गेलो तर? आरामात चारआठ दिवस एखाद्या हॉटेलात रहावं!.... अद्याप सीझन चालू नाही, म्हणजे तिथं फार गर्दीही असणार नाही! पण ही बया आता थांबणार कल्याणला! कल्याणला उतरून परत नेरळला यायचं!.... काही नाही, माथेरानलाच जायचं! मी पायाखालची सूटकेस घेऊन दाराशी जाऊन उभा राह्यलो. कल्याण यायला खूप अवधी होता. सारा उलटा प्रवास करावा लागणार होता; पण इलाज नव्हता. आता मुंबईला जाऊन तरी मला कुठली अपॉइंटमेंट साधायची होती?

आणि खरोखरच आश्चर्य घडलं. नेरळ सोडल्यानंतर दुसऱ्याच स्टेशनांत सिग्नल पडल्यानं एक्सप्रेसची चाकं चुईचुई करीत थांबली. क्षणाचाही विलंब न लावता मी उतरलो. त्या स्टेशनवर एक्सप्रेस थांबतच नसे, तेव्हा मी उतरल्याचं पाहून स्टेशनमास्तर पुढं आला आणि मला म्हणाला,-

"इधर क्यूँ उतरे?"

"गाडी खडी हो गई, उतर गया!"

"आपके पास टिकट है?"

हसत हसत मी माझे मुंबईचे फर्स्ट क्लासचे तिकिट काढून त्याच्यासमोर धरले. तो काहीसा ओशाळून म्हणाला, "आय ॲम् सॉरी!"

सिग्नल पडताच एक्सप्रेस पुढं निघून गेली. मी परत चाललेल्या स्टेशनमास्तरला विचारलं,-

"नेरळ जाने के लिए लोकल कब है?"

"अभी दस-पंधरा मिनिटमें आ जाएगी, लेकिन आपको वो प्लॅटफॉर्मपर जाना पडेगा!"

खरं म्हणजे मी कर्जतला उतरलो असतो तर बरं झालं असतं. पण हा विचारच डोक्यात अचानक आला, त्याला काय करू?

लोकलची वाट पहात फलाटावरच्या सिमेंटच्या बाकावर बसून राह्यलो. त्या वेळी एक विचार मला ग्रासू लागला. मी दौलतखानाला लुबाडला हे एक क्षम्य, पण त्या हॉटेलचं बिल बुडवून मी काय साधलं? दौलतखान परत हैद्राबादला जाईल! माझी-त्याची पुन्हा आयुष्यात गाठभेट होईल की नाही, सांगता येत नाही... पण हॉटेल हेवर्डसवर परत जायची वेळ आली तर? दारात पाऊल ठेवू देईल का तो मालक!....

स्टेशनच्या मागेच पोस्ट ऑफिस होतं. तिथं गेलो आणि मनीऑर्डरचा फॉर्म भरला. शंभर रुपये हॉटेल मालकाला पाठवले आणि खालच्या स्लिपवर लिहिलं "As I had to leave your Hotel in early hours, I could not pay your bill. Please accept Rs. 100- tourist of room No. 23.' का कुणास ठाऊक, मला त्या हॉटेलवाल्याला फसवू नयेसंच वाटलं. एक तर पुन्हा मी पुण्यात येण्याची शक्यता नाकारता येत नव्हती, शिवाय सगळ्या जगाशी बेईमान होणं बरं नव्हतं!

मनीऑर्डर करून नेरळपर्यंतचं लोकलचं तिकिट घेऊन प्लॅटफॉर्मवर यायला आणि उल्हासनगरवरून आलेली कर्जतकडे जाणारी लोकल यायला, एकच गाठ पडली.

नेरळला आलो तेव्हा खूप भूक लागली होती. दिवाडकरांच्या केटरिंग स्टॉलवर जाऊन पोटभर खाल्लं. ती 'झुकझुक' गाडी दहा वाजता सुटणार होती. मी अद्याप माथेरान बघितलं नव्हतं; पण सीझनला तिथं मुंबईकरांची खूप गर्दी होते हे ऐकून होतो.

दोन तास त्या छोट्या गाडीचा प्रवास सुरू होता. नागमोडी वळणं घेत इंजिन गाडी घेऊन चढत होतं. पण एखाद्या गोमेच्या शेपटीवर पाय दिला की ती शेपटीकडे तोंड नेत कशी वळवळते तसं इंजिन आणि शेवटचा डबा वारंवार एकमेकांना भिडल्यासारखे वाटायचे. मोठी गंमत वाटली. पारशांच्या काही पोरी, पोरं किलबिल करीत चिक्की चघळत मागच्या ट्रिपच्या आठवणी काढत होती. जसजशी गाडी उंचावर जाऊ लागली तशी थंडी लागली. पण वरून दिसणारं निसर्गसौंदर्य बघताना थंडीचं काहीच वाटेनासं झालं!

दोन तासानंतर ती इवलीशी गाडी माथेरानच्या स्टेशनवर येऊन स्थिरावली. तशी ती वाटेत एकदा वॉटरस्टेजला थांबली होती. हॉटेलच्या एजंटांनी स्टेशनबाहेर गर्दी केली होती. मला आठवले ते पंढरपूरचे बडवे! गाडीतून उतरायचा अवकाश, भाविकांना घेरतात. तसलाच प्रकार!

पॉश हॉटेलात उतरायचं ठरवलं होतं. माथेरान मला एका गोष्टीमुळं फार फार आवडलं. इथं यांत्रिक वाहनांना बंदी होती. त्यामुळं आपण पृथ्वीतलावरून कोणत्यातरी ग्रहावर आल्याचा भास झाला काही क्षण!

हॉटेल 'रुबी'! नाव छान वाटलं, म्हणून नाही तिकडे गेलो, तर खरोखरच ते आकर्षक वाटलं. इमारतीच्या पत्र्यापासून ते आतल्या फर्निचरपर्यंत सारं काही गडद लाल असं रंगवलेलं होतं. त्याला मॅचिंग असा त्या हॉटेलच्या पारसी मालकाच्या नाकाचा शेंडा होता. पांढरा शुभ्र वेष असलेल्या पोऱ्यानं माझ्या हातून अदबीनं बॅग घेतली, आणि तो माझ्या खोलीकडे घेऊन निघाला. जाता जाता थबकून मला त्यानं विचारलं,-

"शेठ, तुम्ही पुण्याचे का?"

"का?"

"सहज विचारलं!"

''पण असं विचारावं असं का वाटलं तुला?''

''आपला 'म्हराठी' मानूस या हॉटेलात चुकून येतो!'

''का?''

''पैसाबी जादा लागतो आणि बाजूचे होटेलवाले पोपागंडा करतात!''

''पोपागंडा नव्हे, प्रोपागंडा असेल?''

''हा तेच! आमचा शेठ बार बार म्हणतो!''

खोलीचं दार उघडून आत आल्यानंतर एकदम प्रसन्न वाटलं. इथंही सारं लालेलाल! गादीवरच्या बेडशीटस्, खुर्च्यांची कुशन्स, छताचा पंखादेखील लाल! जणू काही त्यातून येणारी हवादेखील लालच येणार होती!

पोऱ्या ड्रेसिंग टेबलाची काच पुसू लागला, तेव्हा मी त्याला विचारलं, ''काय प्रोपगंडा करतात?''

''आमी पासिंजरला लय लुबाडतो!''

''अरे, धंद्यात हे चालतंच! तू कुठल्या गावचा?''

''ठाकुर्लीचा!''

''किती वर्ष आहेस इथं?''

''सातवा साल चालू आहे!''

''अरे व्वा! तुझं नाव काय म्हणालास?''

''माझं नाव आहे लक्ष्मण. पण मला मालक 'लछमन्' म्हणतो; म्हणून मला सगळेच लछमन् म्हणतात!''

''मीही लछमनच म्हणणार! हे बघ, राहण्याचा चार्ज काय घेतो तुझा मालक?''

''पन्नास डेली!''

''आणि ब्रेकफास्ट-जेवण हवं असेल तर?''

''ब्रेकफास्ट दहा रुपये, लंच पंधरा, डिनर पंचवीस!''

''मग काही जादा नाही! हे बघ लछमन, मला संध्याकाळी एक स्वेटर घ्यायचा आहे. थोडे कपडेही घ्यायचे आहेत!''

''हितं कशाला घेता शेठ?''

''का?''

''साले एक रुपयाच्या मालाला धा रुपये सांगतात!'' मी हसलो आणि म्हणालो, ''सांगणारच! किती उंचावर आणावा लागतो माल. मग किंमतीचीही उंची वाढवणारच!''

''सायेब, तुमी सगळे पाइंट बघनार तर घोडा पायजे!''

''का? चालत पहाता येणार नाही?''

''नाही! एक हिकडे तर दुसरा तिकडे. आमच्या मामाची घोडी हाय लय बेस्ट! पांढरीफेक! पारश्याच्या पोरी शिजनला आल्या की त्या घोडीसाठी मरत्यात!''

''असं? मग मला पहायलाच पाहिजे ती घोडी! पण काय रे लछमन्, इथं क्लब वगैरे काहीत आहेत की नाही!''

''क्लबबिप कुछ नहीं. पन् हितला फौजदार, रामानी डॉक्टर आणि चिक्कीवाला शेठ खेळत बसतात!''

''कुठं?''

''चिक्कीवाला शेठच्या माडीवर! पण साहेब, खरं सांगू तुमी तिकडे जाऊ नका!''

''का?''

''तो चिक्कीवाला शेठ सगळ्यांना हरवतो!''

मी मनाशी म्हटलं. याही शेठजवळ माझ्यासारखा चष्मा आहे की काय?

''बरंय लछमन, आता मी अगोदर अंघोळ करून घेतो. मग तू लंच घेऊन ये!'

लछमन गेल्यावर मी दार आतून बंद करून घेतलं आणि सूटकेस उघडून अगोदर पैसे

मोजले. पंधरा हजार सहाशे ऐंशी! मेला दौलतखान! आता आयुष्यात तो कोणाशी पुन्हा 'फ्लश' खेळणार नाही!

सलिमा आठवली! काय तिचं रूप? मध्यरात्रीचा तो प्रसंग! त्यानंतर माझ्या आयुष्यात डझनावरी बायका येऊन गेल्या. पण सलिमाची बरोबरी कोणीच करू शकलं नाही. तिच्या हुंकारातदेखील मला मादक अशी संवेदना जाणवली होतं, आणि परत पुण्याला हॉटेल हेवर्डस्मधे उजळ माथ्यानं जाता यावं म्हणूनच मी येतायेता ते शंभर रुपये पाठवले होते.

अंघोळ केल्यावर जरा बरं वाटलं! लछमन लंच घेऊन आला. इंग्रजी पद्धतीचे ते लंच पाहून मी त्याला विचारलं,-

"हे कोण बनवतं रे तुमच्याकडे?"

"सेठानी."

"काय सांगतोस? कूक नाही?"

"कूक सीझनला! आता आडवारी कूकला दीडदोनशे रुपये फुक्कट कोण देणार? तुमच्यासारखा एखादा गिऱ्हाईक महिन्यातनं येणार!"

"शेठचं आणखी कोण असतं!"

"शेठ, शेठानी, आणि त्याचा एक पुतण्या आहे, तो साला भटकत असतो! पिंडकराम आहे हो!"

"मग हा सेठ एवढी कमाई कोणासाठी करतो?"

"कुणास ठाऊक?"

"लछमन्, मला गेली रात्र बिलकुल झोप मिळाली नाही! आता मी पडणार आहे. बरोबर चारला चहा घेऊन ये आणि तुझ्या मामाला घोडीही आणायला सांग! रायडिंग करून बरीच वर्षं झाली!"

लंच घेऊन मी गच्चीत आलो. दूरपर्यंत पसरलेली सह्याद्रीची निळसर शिखरं, माथेरानच्या माथ्यावरची दाट झाडी, आणि या सर्वांना साथ देणारी तिथली शांतता-मनाला प्रसन्नता देत होती.

घर सोडलं त्या वेळी माझ्याजवळ फक्त साडेसोळा रुपये होते, कुठं जायचं, काय करायचं, काही काही ठाऊक नव्हतं. आज माथेरानमधल्या या आलिशान रुबी हॉटेलात रोज शंभर रुपये खर्च होणार याची मुळीसुद्धा फिकीर वाटत नव्हती. कष्ट करून कमावणाऱ्यानं खर्चाची फिकीर करावी. मला कोणते कष्ट पडले होते? पैसा तो पैसा मिळाला आणि वर सलिमासारखी उच्च मुस्लिम खानदानीशी लागेबांधे असलेली यौवना उपभोगायला मिळाली.

लाल बेडशीट असलेल्या कॉटवर मी आडवा झालो आणि अचानक घरची आठवण आली. आई काय करीत असेल? अलका कुठे असेल? मी घर सोडलं, याचा तिच्या मनावर काही परिणाम झाला असेल का?....अलकाला घरात ठेवून घेऊन मलाच काही काळ बाहेर जायचा सल्ला देणाऱ्या आईच्या आणि डॅडींच्या स्वभावाचं मला आश्चर्य वाटत होतं. माझ्या गैरहजेरीत ते अलकाला 'ब्रेनवॉशिंग' देणार होते म्हणे! पण अशा बदफैली पत्नीशी पुन्हा समझोता करायची माझी इच्छा नव्हती. अलकाच्या वर्तनामुळे मी नीतीअनीतीची सर्व बंधनं झुगारून हे अनिर्वेध असं जीवन स्वीकारलेलं आहे, त्यामुळंच दौलतखानाला फ्लशमधे फसवताना मला मी काही गैर करतो आहे असं मुळीच वाटलं नव्हतं. सलिमाला बाहुपाशांत घेतानादेखील मला चुकतो आहे असं वाटलं नव्हतं! पण आता मला हेच जीवन आवडू लागलं होतं. यात थ्रिल होतं. उद्या काय होणार आहे याची मला चिंता नव्हती. या जगांत माझं कोणी नाही, अन् मी कोणाचा नाही! खूप पैसा कमवायचा आणि कमवलेला पैसा गमवायचा, हेच माझ्या जीवनाचे सूत्र झाले होते.... विचार करता करता मला झोप लागली, इतकी चांगली झोप कित्येक वर्षांत लागली नव्हती. दारावर टकटक् झाल्यानं मला उठावं लागलं. दारात लछमन चहाचा ट्रे घेऊन उभा होता. तो आत येता येता मला म्हणाला,-

"घोडी आलीय खाली!"

तोंड धुऊन मी चहा घेतला आणि माथेरानचे पॉइंटस बघायला बाहेर पडलो. पण मला मी

घोड्यावर बसून एका माणासानं घोड्याचा लगाम धरून पुढं चालणं काही आवडलं नाही. मी त्या लछमनच्या मामाला म्हणालो, "हे बघ, तू इथंच थांब, मला घोड्यावर बसायचा चांगला सराव आहे!

"पन साहेब, तुम्हाला रस्ते कसे समजणार?"

"बरोबर समजतात, थांब तू!" त्याच्या अंगावर दहा-दहाच्या दोन नोटा टाकताच तो तिथंच थांबला. त्या पांढऱ्या शुभ्र घोडीवरून मी माथेरानचे पॉइंटस् पहायला बाहेर पडलो होतो. प्रथम मला एक स्वेटर घ्यायचा होता. म्हणून वाटेत चौकशी करून मी मार्केटकडे घोडा वळवला.

-o-o-o-

१२

मी लहानपणी इंग्रजी सिनेमे खूप पहायचो. त्या वेळी एक आणा तिकीट होतं, थर्ड क्लासचं! त्यातल्या त्यांत हाणामारीचे सिनेमे मला फार आवडायचे! टेक्सास् स्टाइल तंग पँटी, डोक्यावर जाड घेराच्या हॅटस् आणि कमरेला पिस्तुल लावलेले लोक काय बोलायचे हे त्या वेळी अजिबात समजत नसे. पण पडद्यावर हाणामारी सुरू झाली की माझंही रक्त सळसळायचं. सिनेमातल्या त्या व्हिलनला 'ठींश्यू ऽ ठींश्यू ऽ' अशा दोन कल्पनेच्या गोळ्याही मी झाडीत असे.

पुढे भवानीनगरला महाराजांच्या टीममधे असताना कधी कधी रायडिंग करायची संधी मिळत असे; पण भवानीनगरचे महाराज मला घोड्यावर बसायला बऱ्याच वेळा परवानगी नाकारत. ते म्हणत, 'तू आमच्या फुटबॉल टीमचा मुख्य आधारस्तंभ. घोड्यावरून पडलास आणि पाय मोडून घेतलास तर काय करायचं?'

आज नेमकं तेच घडलंय! माझा एक पाय अगदीच जरी नसला तरी तसा धावण्यापळण्यासाठी निकामीच झाला आहे. लछमननं मला घोड्यावरून माथेरानचे पॉइंटस पहायला सल्ला दिला ते एका दृष्टीनं योग्यच वाटलं मला.

माथेरानला भर गावातून घोड्यावर बसून जाणं याचं कुणालाच काही विशेष वाटत नव्हतं. कारण तिथं येणारे प्रवासी लहान मोठे सर्वचजण घोड्यावरून फिरत. पण त्यांच्या फिरण्यात आणि माझ्या फिरण्यात एक फरक होता! त्यांच्या घोड्याचा मालक घोड्याचा लगाम हाती धरून पुढं चालत असे. मी या माझ्या पांढऱ्या घोडीच्या मालकाला हॉटेलातच थांबायला भाग पाडलं होतं.

माथेरानच्या लोकांना घोड्यावरून फिरणारे लोक पहायची सवयच होती. मी बाजारपेठेतून जाताना मात्र अनेकांच्या नजरा माझ्यावर स्थिरावल्या होत्या. त्याला कारण होतं, माझ्या घोडीचा लगाम धरणारा मालक सोबत नव्हता आणि मी 'गॅलोपिंग' करीत चाललो होतो. तशी माझी उंची, चेहरा, रंग, हा नजरेत भरण्यासारखा होता. विशेषत: माझ्या भुवया! माणसानं स्वत:चं फार कौतुक करून घेऊ नये, पण जे आहे ते सांगायला नको? गोऱ्यापान कपाळावर माझ्या कमानदार भुवया कोरल्यासारख्या वाटत. माझं नाकही सरळ होतं. ओठावरच्या मिशांना तलवारीसारखा आकार देण्यात माझा हात कोणीच धरू शकत नसे. अन् शेवटी माझे डोळे. डोळे भेदक होते, वेधक होते. काही म्हणा! पण मी एखाद्या माणसाला काहीतरी सांगू लागलो की, डोळ्यांत असे भाव निर्माण व्हायचे की, समोरच्या माणसाला मी काय म्हणतो ते सारं खरंच वाटायचं!

एवढं सारं प्रभावी व्यक्तिमत्त्व असूनही अलकानं मला फसवावं! जाऊ दे, या माथेरानसारख्या निसर्गरम्य ठिकाणी तिचं नावदेखील नको घ्यायला. बीच, रास्कल, स्काँड्रल!....

माथेरानच्या लोकांच्या नजरा माझ्यावर केंद्रित झाल्या होत्या. एक तर माझ्या घोड्यापुढे चालत जाणारा माणूस नव्हता आणि दुसरं म्हणजे पुण्या-मुंबईच्या इथं येणाऱ्या मंडळींचा घोड्याशी संबंध येत असे तो टांग्यात किंवा व्हिक्टोरियात बसल्यावरच! तेव्हा इथं हौसेखातर घोड्यावर बसणाऱ्या बालकांपासून ते प्रौढांपर्यंत सर्वांच्या चेहऱ्यावर एक अनाहूत असं भय दिसत असे. कुठं हा उधळतो आणि आपण आपटतो की काय?

माझ्या चेहऱ्यावर तसल्या भीतीचा लवलेशदेखील नव्हता. असेल कसा? भवानीनगरला जेव्हा वाड्यावर काही वर्षं रहात होतो, तेव्हा सकाळचं रायडिंग हा एक माझा नित्यक्रमच होता. महाराजांना भीती वाटायची माझी, पण मला रायडिंग अतिशय आवडायचं!

रेडीमेड कपड्यांच्या दुकानासमोर ती घोडी एका उंच सुरूच्या झाडाला बांधून मी आत गेलो. "स्वेटर्स बतावो! आसली वुल के!'

''फुल या हाफ?'' फुटबॉलसारखं गोल गरगरीत लाल तोंड असलेल्या दुकानदारानं विचारलं.

''फुल!''

''देखो साब, मेरेपास एक इंपोर्टेड चीज है, लेकीन थोडी महेंगी है!'

''अरे भाई, बतावो तो!''

तो दुकानाचं पार्टिशन उघडून आत गेला आणि एक हार्डबोर्डचा डबा घेऊन आला. माझ्यासमोर तो त्यानं उघडला. बंद गळ्याचं, लांब हातांचं गडद निळ्या रंगाचं, काठाला लाल वेलीचं डिझाइन असलेलं ते 'मेड इन स्वित्झर्लंड' स्वेटर बघताक्षणीच माझ्या मनात भरलं.

''क्या किंमत है?' पँटच्या खिशात हात घालताघालता विचारलं.

''चार सौ.''

त्याला वाटलं, मी घासाघीस करीन; पण मी चार शंभराच्या नोटा त्याच्यापुढं भिरकावल्या आणि ते स्वेटर दुकानातच अंगात चढवलं. संध्याकाळचे पाच वाजायला आले होते अन् थंडीची तीव्रता हळूहळू वाढत चालली होती.

दुकानातल्या उभ्या आरशात मी पाह्यलं, स्वेटर जणू काही त्या कंपनीनं माझ्यासाठीच बनवल्यासारखं फिट्ट बसलं होतं.

लछमननं मला माथेरानचा नकाशा असलेलं छोटंसं गाईड दिलं होतं. ते उघडून पाह्यलं.

संध्याकाळचा समय हा बॉम्बे पॉइंट पहायला उत्कृष्ट, अशी टीप होती. उंच अशा हिलस्टेशनवरून अस्ताला जाणारा सूर्य पहाण्यात एक आगळाच आनंद असतो, असं मी खूप ऐकलं होतं. आज अनायासे तो योग आलेलाच होता. मी बाजारपेठेतून सरळ 'सन्सेट पॉइंट' गाठला. मला वाटलं होतं, तिथं कोणी असणार नाही. पण तिथं लहान मुलं आणि मोठी माणसं मिळून शेदीडशे लोकांचा जमाव मोक्याच्या जागा धरून बसलेला होता!

सूर्य क्षितिजाला येऊन भिडताना त्याच्या भोवताली जे वलय निर्माण झालं होतं, त्यातून लाल, गुलाबी, निळ्या अशा इंद्रधनुष्याच्या सातही रंगांचं प्रक्षेपण होतंय असा भास होऊ लागला. बघता बघता ते प्रक्षेपण थांबलं. एक लालभडक, प्रचंड फुटबॉल सकाळी पूर्वेला कोणीतरी जोराची 'किक्' दिली म्हणून आकाशाच्या पोकळीतून असा या पश्चिम क्षितिजाला येऊन भिडलाय असं वाटलं!

सूर्यास्त झाल्यानंतर अचानक थंडीची तीव्रता वाढल्यासारखं वाटू लागलं. मी घोडीला हॉटेल रूबीकडे दौडत घेऊन निघालो. नेहमीच मालकाच्या मागोमाग चालावं लागणारी ही उमदी घोडी आज मोकळेपणानं दौडायला मिळतंय म्हणून मोठ्या खुशीत आली होती. येताना वाटेत चिक्कीचं मोठं दुकान लागलं.

पाच रुपयांची शेंगदाण्याची चिक्की घेऊन मी उभ्याउभ्याच त्या घोडीला चारत होतो. दुकानदार आणि त्याच्यासमोर पँट-बुशशर्ट घालून बसलेला एक तरुण एकमेकांकडे आश्चर्यानं पाहू लागले. घोडीला पाच रुपयांची चिक्की? ही कोणीतरी बडी आसामी दिसते. कदाचित् सिनेमा नट.... त्यांच्या नजरेतले भाव मी न्याहाळले.

मेकअप न करतादेखील मी सिनेमानटासारखा दिसायचो. तो मालक माझ्याकडे कौतुकानं पहात असताना मी काऊंटरजवळ जाऊन म्हणालो-

''थोडं पाणी मिळेल का हात धुवायला?''

''हो-हो! का नाही? आत या ना!''

मी थोडा पुढे गेलो. पोऱ्यानं हातावर पाणी घातलं. घोडीच्या लाळेनं चिकीचा रस तळहातावर पसरला होता. खिशातल्या रुमालानं हात पुसतपुसत मी आत आलो. मालकासमोर बसलेला तो तरुण येताच उठून हसतहसत म्हणाला,-

''आय ॲम् पी. एस. आय. नेरळ अँड माथेरान!''

''ओ ऽ! ग्लॅड टु मीट यू! म्हणजे इथं सेपरेट पोलिस स्टेशन नाही?''

''नाही! सहा महिने इकडे वर कोणी येतच नाही. लोकल माणसं, मजूर, शेतकरी तेवढे

वर रहातात. सहा महिने इथं पाऊस तोंड बाहेर काढू देत नाही. मग 'क्राइम' होणार तरी कसा? सहा महिने नेरळला असतो मी खाली.''

''म्हणजे माथेरानला सहा महिने आणि नेरळला सहा महिने! बरं आहे!''

''सीझनला इथं टूरिस्ट येतात, तेव्हाच थोडासा क्राइम होण्याची शक्यता असते!''

''कोणत्या प्रकारचा?''

''पेटी थेफ्टस, कधी कधी प्रियकर-प्रेयसीचा बेबनाव होऊन एखादा कॉग्निझेबल ऑफेन्सही घडतो! पण अगदी रेअर!''

''मग तुम्हांला वारंवार वर येण्याचं कारणच पडत नसेल!''

''खरं म्हणजे पडू नये; पण व्ही. आय. पी. ज्. आले की बंदोबस्तासाठी यावं लागतं! तसं म्हणाल तर इथं दुसरं कामच नाही!''

फौजदार असून इतका बोलत होता तो! मी सारं ऐकून घेत होतो! चिक्कीवाल्यानं चहाची ऑर्डर दिली. आम्ही तिघांनी मिळून चहा प्यायला सुरुवात केली. तेव्हा चिक्कीवाल्यानं विचारलं, -''

''आपण उतरलात कुठं?''

''हॉटेल रूबी!''

''अच्छा? म्हणजे आपल्या नसरवानजीकडे!'' फौजदाराकडे पहात चिक्कीवाला म्हणाला.

''एकटेच आहात की-''

''एकटाच आहे!'' हसतहसत म्हणालो.

तो बिचारा अगदी मनमोकळेपणानं विचारत होता. वास्तविक पहाता पाच रुपयांची चिक्की मी घोडीला चारली म्हणून माझ्याविषयी कदाचित् औत्सुक्य वाटलं असेल. मला प्रथम पाहणाऱ्या प्रत्येक माणसाला माझ्याशी चार शब्द बोलावेत असं वाटायचं! Just out of curiosity.

''बरं, मुक्काम किती?''

''अजून काही निश्चित ठरलेलं नाही; पण मला एक आठवडाभर रहावंसं वाटतंय. 'ब्युटीफुल ॲटमॉसफिअर' आहे! मघाशी सनसेट पॉइंट पाहून आलो.''

''आपल्याला संध्याकाळी आमच्याकडे खेळायला यायला आवडेल?''

एकदम माझ्या डोक्यात प्रकाश पडला. लछमन म्हणत होता तो फौजदारांचा दोस्त चिक्कीवाला हाच! मी त्यांच्याविषयी अगोदर काहीच समजलेलं नाही, असं भासवून म्हणालो, ''मला संध्याकाळी इथं वेळ कसा घालवायचा हाच प्रश्न होता!''

संध्याकाळी फौजदारांनी मला आपल्याकडे जेवायला यायचं निमंत्रण दिलं. मी हॉटेलवर गेलो, तेव्हा घोडीचा मालक माझीच प्रतीक्षा करीत बसला होता. घोडीवरून उतरताच मी लगाम त्याच्या हाती देत म्हणालो; ''फर्स्ट क्लास घोडी आहे! उद्या दुपारी जरा लौकर घेऊन ये! जितके दिवस मी इथं राहीन तितके दिवस रोज ही माझ्यासाठी 'रिझर्व्ह' ठेवायची!''

''जी साहेब!''

''अरे, पण हिचं नाव नाही सांगितलंस मला!''

''रूपाली!''

''रूपाली? अगदी मुलीचं नाव ठेवलंस की! पण काही म्हण, जनावर फार उमदं आहे.''

मी रूपालीच्या पाठीवर थाप देत म्हणालो, ''रूपाली, उद्या परत यायचं हं!'' माझ्या हातून पाच रुपयांची चिक्की खाणारी रूपाली फुर्रर्रकन् आवाज काढून माझ्याकडे स्नेहार्द्र नजरेने पहात मला निरोप देत होती.

हॉटेलवर जाऊन मी वॉश घेतला. कपडे बदलले, तो 'चष्मा' घेतला आणि चिक्कीवाल्याच्या माडीवर गेलो. जाताना लछमनला 'डिनर' नको म्हणून सांगायला विसरलो नाही.

तिथं पोहोचेपर्यंत डॉक्टरही तिथं हजर झाले होते. मला खेळावं लागणार होतं ते त्यांच्या पत्त्यावर. तेव्हा माझ्या चष्म्याचा काय उपयोग? पण मी या वेळी निराळीच 'ट्रिक' केली.

पहिल्यांदा खेळताना जे पत्ते हातात येत त्यांना नखानं ठराविक ठिकाणी ओरखडून मी खुणा करायला सुरुवात केली. एक्क्यापासून गुलामपर्यंत प्रत्येक रंगाची चार पानं आलटून पालटून माझ्या हाती येऊन गेली; पण त्या तिघांना मुळीसुद्धा शंका येणार नाही, इतक्या हळुवारपणे त्या पत्त्याच्या डिझाईनवर मी नखानं निरनिराळ्या ठिकाणी खुणा केल्या. अर्थात पहिले आठ-दहा डाव मला हरावं लागलं; पण जेव्हा त्या तिघांच्या हातातील खुणा केलेली ती पानं मी अचूक ओळखायला सुरुवात केली तेव्हा मात्र ते सगळे एकामागून एक बाद व्हायला लागले. मी दोनशे रुपये हरलो होतो, पण एकदा पत्त्यांची ओळख पटल्यावर मी त्या तिघांनाही साफ केलं.

साडेअकरा वाजले. चिक्कीवाल्यानं कपाटातली बाटली काढली. फौजदार मला म्हणाले, "समर बाबू मान लिया! माझा आजपर्यंत असा समज होता की फ्लशमधे मला कोणीच हरवू शकत नाही; पण आज तुम्ही अगदी कमाल केलीत?"

चिक्कीवाल्यानं ग्लास भरले. डॉक्टरांनी सोडा ओतला. सोड्याच्या बाटल्या उघडल्याचा आवाज येताच खालून पोऱ्यानं फरसाणाची प्लेट आणून समोर ठेवली. प्यायला सुरुवात झाली तेव्हा चिक्कीवाला म्हणाला, "हा स्टफ तुम्ही कधीच चाखला नसेल!"

"का! विशेष काय आहे यात?"

"ही शुद्ध केळ्यापासून बनवलेली दारू आहे, आमच्या माथेरानच्या आसपास जे वारली लोक रहातात ते या धंद्यात अगदी एक्सपर्ट आहेत." त्या मद्याला खरोखरच पिकलेल्या केळ्यासारखा वास येत होता.

फौजदारांनी फारच थोडं मद्य घेतलं, तेव्हा मी त्यांना विचारलं; "असं हात राखून का चाललंय?"

"त्याचं काय आहे, एक तर आम्ही हे करताच कामा नये, आणि दुसरं म्हणजे कोणत्या वेळी काय लफडं आऊटपोस्टला येईल त्याचा भरवसा नाही. तेव्हा आपण जागरूक असलेलं बरं!"

"दॅटस् व्हेरी फाइन!"

"पण समरबाबू, तुम्ही एकटेच माथेरानला आलात हे आम्हाला थोडं खटकतं! तुमच्यासारखा जवान माणूस एकटा हॉटेलवर रहातो म्हणजे थोडं विचित्र वाटतं; नाही?" डॉक्टर टकलावरून हात फिरवीत सर्वांकडे पहात म्हणाले व त्यांनी समोरच्या प्लेटमधला फरसाणचा एक बोकणा भरला.

मला काहीतरी थाप ठोकणं भाग होतं. मी म्हणालो, "मिसेस कॉलेजात शिकते आहे. तिची परीक्षा अवघी दोन महिन्यांवर आलेली आहे. तेव्हा मी तिथं घरी असलो की तिच्या अभ्यासात 'डिस्टर्बन्स' निर्माण होतो; म्हणून मीच एकदोन महिने बाहेर फिरून काढायचे असा निर्णय घेतलेला आहे."

"व्हॉट ए सॅक्रिफाइस!"

बैठक रंगत होती. अर्ध्या पाऊण तासाने माडीवरच जेवणाची ताटं आली. टेबलाभोवताली खुर्च्या ओढल्या गेल्या. मला कल्पना नव्हती की, या कंपनीच्या इतक्या जवळ मी जाईन!

अतिशय उत्कृष्ट असं सामिष भोजन होतं ते. चिकन करी, फिशप्रâाय, बिर्याणी!

मी विचारलं, "हा नित्याचाच कार्यक्रम असेल?"

"छे: हो! कधीतरी गेस्ट आले म्हणजे हे असं चालतं! अजून एक कार्यक्रम व्हायचा आहे!"

"कसला?" मी आश्चर्यानं विचारलं.

"गाण्याचा! तुम्हाला शास्त्रीय संगीत आवडतं ना?"

"हो, आवडतं; पण त्यातलं फारसं समजत नाही!"

"आम्हीही तुमच्याच प्रकारातले आहोत!"

चिक्कीवाला भलताच रसिक होता. त्याच्या माडीवरून मागच्या जिन्याने उतरून आम्ही अंधारातून एक फर्लांगभर गेलो. डॉक्टर डुलत होते, चिक्कीवाले या कडेहून त्या कडेला जात

होते. मी आणि फौजदार पिऊन न प्याल्यासारखे चाललो होतो.

गाणारी तरुणच होती; पण बैठकीला बसण्यापूर्वी तिनं बराच वेळ मेकअपसाठी खर्ची घातला असावा, हे मला स्पष्ट जाणवत होतं. सलिमाचं असली सौंदर्य अनुभवलेला मी, मला तोंडावर लाली आणि पावडर चोपडलेल्या त्या तरुणीत काहीच 'चार्म' वाटला नाही. पण तिनं जेव्हा गायला सुरुवात केली तेव्हा मात्र त्या तिघांबरोबर मीही मान डोलवू लागलो. विशेषत: तिनं गायलेल्या गझलांना एक आगळा ताल होता. त्या तालाबरोबर नकळत आम्हा श्रोत्यांची हातावर टाळी वाजत होती. प्रत्येकानं गाणं संपल्यावर दहा-दहा रुपये "दौलतजादा' केली. मी एक शंभराची नोट टाकली. तिनं ती उचलून कपाळाला लावली व नोटेचं चुंबन घेऊन माझ्याकडे आपल्या काजळभरल्या नजरेनं पाह्यलं, पण मी कसल्याच अपेक्षेनं इतकी "दौलतजादा' केलेली नव्हती, फुकटचा पैसा दान करून मोठेपणा मिळवणारी माणसं आजपर्यंत मी खूप पाह्यली होती. पण त्यांच्या दातृत्वामागे स्वार्थ असे, प्रसिद्धीच! मला प्रसिद्धी नको होती, अन् शंभर रुपये दौलतजादा करण्यामागे 'तो' हेतू देखील नव्हता.

हॉटेल रूबीवर आलो तेव्हा रात्रीचे दोन वाजले होते. चिक्कीवाल्यानं गौरवलेली 'केळ्यांची' धुंदी केव्हाच उतरली होती. पण माथेरानसारख्या या अनोख्या प्रदेशात या लोकांची ओळख झाल्यानं मला थोडं समाधान वाटत होतं. एक तर मनसोक्त फ्लश खेळायला मिळणार होतं आणि दुसरं म्हणजे माथेरानच्या निसर्गरम्य परिसरात अलकानं माझ्या हृदयावर केलेली खोल जखम भरून यायला थोडी मदत होणार होती. मघाशी ती गाणारी मी पैसे टाकल्यावर माझ्याकडे अशा नजरेनं पहात होती की, मला त्या पैशाच्या मोबदल्यात तिच्याकडून काही हवं आहे की काय? आज मला ती वासनाच नव्हती. सलिमाला उपभोगल्यानंतर दीर्घकाळ दुसऱ्या कुठल्याही स्त्रीकडे त्या नजरेनं पहायची मला इच्छाच होणार नव्हती!

अकरा वाजले उठायला. लछमन खोलीत येऊन म्हणाला, "साब, आपल्याला काही पेपर आणायचे आहेत? मी स्टेशनला जाणार आहे!"

"आण एकदोन मराठी पेपर!"

काल रात्रीची कमाई मोजतमोजत मी चहा घेतला. त्या तिघांचे तसे फारसे पैसे मी जिंकले नव्हते, फक्त अडीच हजार!

दाढी करत होतो तेव्हा लछमन पेपर घेऊन आला. गालाला साबण फासलेल्या अवस्थेत मी 'सकाळ' वरून नजर टाकली.

अरे बाप रे! काय भयंकर बातमी ही! हॉटेल हेवर्डसमधे राहणाऱ्या मुस्लिम तरुणाने आपल्या सोबत असलेल्या तरुणीला जंबियाने भोसकून ठार केले व स्वत: आत्महत्येचा प्रयत्न केला. त्याची प्रकृती चिंताजनक असून त्याला ससूनमध्ये ॲडमिट करण्यात आले आहे. पोलीस अधिक तपास करीत आहेत!

हा तरुण म्हणजे दौलतखान, आणि ती सलिमाच असली पाहिजे, याबाबत माझ्या मनात शंकाच नव्हती. मी तिथून परागंदा झाल्यावर दौलतखान सलिमाला थोडाफार छेडेल असा माझाही अंदाज होता; पण तो तिचा खून करील असं मात्र स्वप्नातदेखील वाटलं नव्हतं! त्या बातमीतल्या खालच्या ओळीनं माझी छाती धडधडू लागली- 'पोलीस अधिक तपास करीत आहेत!'

मी एक गाढवपणा केलेला होता. त्या हॉटेलच्या मॅनेजरला माझ्या सहीने शंभर रुपये पाठवले! शिवाय दौलतखान आणि सलिमा तिथं असताना मीही बाजूच्या खोलीत होतो. हे पोलिसांना नक्कीच समजलेलं असणार! का कुणास ठाऊक, सलिमाच्या मृत्यूला मीच कारणीभूत आहे, असं उगाच वाटू लागलं. खरं पाह्यलं तर परत पुण्याला जाऊन मला पोलिसांशी संपर्क साधणं अत्यावश्यक होतं. माझं मन द्विधा झालं होतं. कशाला उगाच कोर्टखटल्यात स्वत:ला गुंतवून घ्यायचं? असं वाटत होतं.

बाराच्या सुमारास माथेरानचे फौजदार माझ्याकडे आले आणि म्हणाले,-

"समरबाबू, तुम्हाला तत्काळ पुण्याला घेऊन यावं असा आदेश आलेला आहे!"

"कशाबद्दल?"

"ते कुणास ठाऊक! पण समर धीरजलाल ठाकूर हा प्रवासी पोलिसांना ताबडतोब चौकशीसाठी हवा आहे, असा आदेश आहे!"

"ठीक आहे. मी एक अर्ध्या तासात तयार होतो."

मी क्षणभर विचार केला. इतकी मोठी रक्कम आपल्याजवळ आहे ती घेऊन गेलो तर पोलीस यातून आणखी काही तर्कवितर्क करतील! मला आता पोलिसांना टाळता येणं अशक्यच होतं! एक तर माझं नाव निष्पन्न झालं होतं, दुसरं म्हणजे त्या मध्यरात्री हॉटेलच्या मालकास पैसे न देताच मी लॉज सोडलं होतं! ते का? कशासाठी? ही लांबड लागणारच होती. बरं, खुनासारखा गुन्हा घडला आहे म्हटल्यावर लोकात मोठ्या प्रमाणावर चर्चा ही होणारच! काय घोटाळा होऊन बसला हा? मी लछमनला हाक मारली! तो तात्काळ आला.

सलिमा! सलिमाचा खून? अरेरे...! अशा स्वरूपसंपन्न तरुणीवर हत्यार उगारावं असं वाटलं तरी कसं त्या मूर्खाला? कारण काय घडलं असेल तिला मारायला? खेळताना सर्व पैसे हरलो तेव्हा मला चक्क म्हणाला होता. या शेवटच्या डावातही जर मी हरलो तर तू सलिमासोबत झोप! इतक्या निर्लज्जपणे सांगणाऱ्या दौलतखानाने सलिमाला का मारावं याचं मलाही गूढ वाटू लागलं. माझ्यासोबत दोन हवालदार आले. मला पुण्याच्या पोलिसांच्या स्वाधीन करून ते परतले. पुण्याच्या इन्स्पेक्टरनी माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती सुरू केली.

"मिस्टर ठाकूर, तारीख पंचवीसला तुम्ही हॉटेल हेवडर्सवर रूम नंबर तेवीसमधे राह्यला होता?"

"होय!"

"तुमच्या शेजारी दौलतखान आणि सलिमा हे हैद्राबादचे दोन प्रवासी उतरले होते, त्यांना तुम्ही पाह्यलेलं आहे. दौलतखानासोबत तुम्ही ड्रिंकही घेतलेलं आहे. पत्तेही खेळला होता!"

"होय!"

"त्या दिवशी तुम्ही दोघे रेसकोर्सवर गेला होता!"

"बरोबर!"

"दौलतखान त्या दिवशी हरला की जिंकला?"

"दीड-दोन हजार जिंकले त्यानं!"

"त्या दिवशी सलिमा शॉपिंगला गेली तेव्हा तुम्ही अन् दौलतखान फ्लश खेळत होता?"

"हे तुम्हाला कसं समजलं?"

"कसं समजलं हे नंतर पाहू, प्रथम माझ्या प्रश्नाचं उत्तर?"

"खेळलो!"

"कोण हरलं? कोण जिंकलं?"

"मी जिंकलो!"

"किती?"

"दोन-तीन हजार असतील. मी ते काही मोजले नाहीत!"

इन्स्पेक्टरनं माझी समोरची सूटकेस मला उघडायला सांगितली. मी ती उघडली. इन्स्पेक्टरनं कपडे, टॉवेल सारं उचलून पाह्यलं. माझ्या खिशांत दोन-अडीच हजार होते ते मी टेबलावर ठेवले!

"मिस्टर ठाकूर, तुमच्याकडे आणखी पैसे असायला हवेत."

"हे आहेत एवढेच!" हात हवेत उडवून मी म्हणालो. इतक्यात इन्स्पेक्टर आपल्या हाताखालील सब-इन्स्पेक्टरला म्हणाले, "प्लीज बुक अ कॉल टु माथेरान, ॲण्ड आस्क द लोकल पी. एस. आय. टु सर्च द् रूम इन विच धिस मॅन वॉज स्टेइंग!"

"येस् सर."

पुढे ते माझ्याकडे वळून म्हणाले, "मिस्टर ठाकूर, तारीख सव्वीसला तुम्ही भल्या पहाटे हॉटेल सोडायला काय कारण घडलं?"

हा प्रश्न मला अगदीच अनपेक्षित असा होता. पण आता काहीतरी उत्तर द्यायला हवं हातं.

क्षणभर विचार करून मी म्हणालो,-

"मी हवा पालटण्यासाठी बाहेर पडलो आहे. दोन दिवस माथेरानला रहावं म्हणून मी तिकडे गेलो!"

"खोटं सांगता आहात तुम्ही! नेरळपुढे तुम्ही ज्या स्टेशनवर उतरलात, त्या स्टेशनमास्तरला तुम्ही दिलंत ते तिकिट मुंबईचं होतं. याचा अर्थ तुमची मन:स्थिती द्विधा होती! मुंबईला जायच्या हेतूनं तुम्ही गाडीत चढलात; पण ऐन वेळी माथेरानला जायचा निर्णय घेतलात, ॲम आय राइट?"

त्या पोलीस अधिकाऱ्याच्या बुद्धीचं मला खरोखरच कौतुक वाटलं. याला सर्व गोष्टी समजल्या तरी कशा? आलं लक्षात! मी ती त्या स्टेशनवरून केलेली शंभर रुपयांची मनीऑर्डर! हॉटेलवाल्याला डुबवायला नको म्हणून चांगल्या हेतूनं मी ती मनीऑर्डर केली; पण त्यामुळं माझ्या साऱ्या हालचालींचा पोलिसांना सुगावा लागला होता.

"असा निर्णय का बदललात? तुमची मन:स्थिती अस्थिर झाली होती म्हणूनच?"

"नाही, मला माथेरान पहायचं होतं. यापूर्वी कधीच पाह्यलं नव्हतं!"

"आपला व्यवसाय?"

"सध्या काहीच नाही! काही काळ मी आर्मीत होतो!"

"दॅट आय नो!"

"तेसुद्धा तुम्हाला कळलं?" मी आश्चर्यानं विचारलं.

"ऑफ कोर्स! बरं, व्यवसायाबद्दल काही बोलत नाही तुम्ही? एवढ्या महागड्या हॉटल्समध्ये उतरणं तुम्हाला कसं काय परवडतं? एनी वे, दॅट इज नॉट माय कन्सर्न! मला एवढं सांगा, दौलतखानानं सलिमाला ठार मारायचं एखादं कारण तुम्ही सांगू शकता?"

"मला मुळीसुद्धा कल्पना नाही, साहेब! पण एक गोष्ट निश्चित तो ड्रिंक फार घेत होता. कदाचित् नशेत असताना बेभान होऊन त्यानं तिला मारलं असेल!"

"तो त्या वेळी प्याला होता हे तर निश्चितच; पण आम्हाला त्याचा मोटिव्ह- हेतू कळायला हवाय! वाटलं, कदाचित् तुमच्याकडून काहीतरी क्ल्यू' मिळू शकेल!"

"आय ॲम् सॉरी! आय कान्ट गिव्ह यू एनी क्ल्यू!"

"इट्स ऑल!"

तो आहे कुठं?"

"ससूनमधे. यू वॉन्ट टु सी हिम?"

"हो, दोन दिवस एकत्र होतो. अशी अवस्था आहे तर भेटून यावं म्हणतो!"

"ओ के ऽ! पण कृपा करून तुम्ही आमची परवानगी घेतल्याशिवाय पुणं सोडू नका. इथला तुमचा लोकल ॲड्रेस?"

चटकन् मी विलास जॉकीच्या घरचा पत्ता सांगितला, "बंडगार्डन रोड नंबर तीन, बंगला नंबर तीन."

"अच्छा!"

मी माझी बॅग घेऊन उठलो. पोलिसांच्या गाडीतूनच मला दवाखान्यांत पाठवण्याची इन्स्पेक्टरनी व्यवस्था केली. इन्स्पेक्टर इतक्या तयारीचा होता की पुणं सोडल्यापासून ते नेरळला पोहोचेपर्यंत त्यानं माझी सर्व बारीकसारीक माहिती काढली होती, तेव्हा मी अन् दौलतखान काय बोलणार यावर तो पाळत ठेवून असणार याचीही मला खात्री होती.

दौलतखानाला ज्या वॉर्डमधे ठेवण्यात आलं होतं त्या वॉर्डबाहेर बंदुकधारी शिपाई होता. आत एक नर्स होती. मला पहाताच दौलतखान म्हणाला,-

"आवो भाई समर, देखो ये क्या हो गया?"

"क्या हो गया?" मी उलट त्याला विचारलं.

तेव्हा तो म्हणाला, "गॅलरीकी दिवार खुली थी. रातको कोई आदमी गॅलरीमें चढकर आया और रूममें इधरउधर ढूंढने लगा. सलिमाने उसको देखा और वो चिल्लाई, तो उसने सलिमाको

स्टॅग किया! मैं उठकर उसको पकडा, लेकिन सालेने मेरे उप्पर भी दो 'स्टॅग' किया! ये पुलिसवालोने मुझे खालीपिली गिरफ्तार कर लिया है!''

दौलतखानानं मला निराळीच हकीकत सांगितली! जवळ उभी असलेली नर्स बाहेर गेल्यानंतर माझा हात हातात घेऊन दौलतखान म्हणाला,-

''समर, अभी मुझे अकेला तू रिहा कर सकता है!''

''वो कैसा?''

''तुम बोल देना पुलिसवालोंको, दौलतखान सलिमाको बहोत प्यार करता था!''

दौलतखान धादांत खोटं बोलत होता. त्याचं सलिमावर मुळीसुद्धा प्रेम नव्हतं. तसं असतं तर तो मला शेवटच्या डावात हरल्यानंतर तू तिला उपभोग असं निर्लज्जपणे म्हणाला नसता! दौलतखानानं स्वत:च्या बचावासाठी निराळीच हकीकत पोलिसांसमोर आणि माझ्यासमोर सांगायला सुरुवात केली होती. पण त्याच्या सांगण्याला दुजोरा देणारा पुरावा मात्र मिळत नव्हता. दौलतखानानं मी त्याला फ्लशमध्ये साफ केल्याचं पोलिसांना अजिबात सांगितलं नव्हतं! ते त्यानं का सांगितलं नसेल? जुगारी माणसाच्या शब्दावर लोक किती विश्वास ठेवणार? मी मात्र पोलिसांना थोडेफार पैसे जिंकल्याचं सांगितलं ते माझा प्रामाणिकपणा सिद्ध व्हावा या हेतूनं!

दौलतखानावर दोन आरोप ठेवण्यात येणार होते, एक सलिमाच्या खुनाचा आणि आत्महत्येच्या प्रयत्नाचा! या प्रकरणी खरं म्हणजे दौलतखानाला सहानुभूती दाखवावी असं मला मुळीच वाटलं नाही. त्या प्रकरणाशी माझा काही संबंध जोडला जाऊ नये आणि पोलिसांनी माझ्याबद्दल तर्कवितर्क करू नयेत म्हणून मी डॅडींना तार करून बोलावून घ्यायचं ठरवलं.

दवाखान्यातून मी सरळ विलास जॉकीच्या घरी गेलो. त्याच्या बायकोनं मला ओळखलंच नाही. विलास बाहेर गेलेला होता. त्याच्या व्हरांड्यांत बराच वेळ घोड्यांचे आणि विलासनं जिंकलेल्या रेसेसचे फोटो पहात उभा होतो, इतक्यात विलास आला.

''समर! अरे, काय भानगड आहे ती हॉटेलातली?''

दारातून आत येतायेताच त्यानं मला विचारलं, ''त्या दिवशीचा तो नबाब दौलतखान- त्यानं आपल्यासोबत आणलेल्या बाईला भोसकून ठार मारलं, आणि स्वत:च निरपराधित्व दाखवण्यासाठी पोटावर दोन ठिकाणी जंबियानं वार करून घेतलेत म्हणे! तू त्या हॉटेलात कशाला कडमडलास, हे घर का तुला परक्याचं होतं? आणि काय रे, नुकतंच सहा महिन्यांपूर्वी तुझं लग्न झालंय आणि तू गावोगाव असा बोंबलत फिरतोस,ही काय भानगड आहे?''

''माझ्या आयुष्याची 'ट्रॅजेडी' झालीय, विलास! सवडीनं सांगेन, पण या नबाबाच्या लफड्यांत मला अडकून उपयोगाचं नाही. मी तार करून डॅडींना बोलावून घ्यावं म्हणतोय!''

''घे ना! काकासाहेब आले की, आपोआपच पोलिसांचा तुझ्या मागचा ससेमिरा थांबेल!''

''तू कुठे गेला होतास?''

''अरे, काय सांगू माझे हाल, समर! सकाळी प्रॅक्टिसला कोर्सवर जातो, तिथून परत येतो न येतो तोच पोरांना शाळेत पोहोचवायला जायचं. पुन्हा दुपारी लंच घेऊन जायचं! आणि संध्याकाळी परत त्यांना आणायला!''

''पण ही कामं एखादा नोकर ठेवून करता येत नाहीत तुला?''

''नोकर?'' डोक्यावरची फेल्ट खुंटीला टांगून कपाळावरचा घाम रुमालानं टिपत विलास म्हणाला, ''गेले वर्षभर मला विश्वासू ड्रायव्हर मिळत नाही. घरी कामाला कोणी बाई टिकत नाही!''

''का?''

स्वयंपाकघराकडे पहात विलास हळू आवाजात म्हणाला, ''आमच्या हिचा स्वभावच 'क्रॅक' आहे. अगदी आठ दिवसांच्या वर कोणी नोकर, ड्रायव्हर टिकत नाही. माझी मात्र कुत्तरओढ होत आहे! तेव्हा लग्नानंतर सहा महिन्यांत तू घर सोडून पळालास याचं मला फारसं आश्चर्य वाटलं नाही!'' कोचावर बसून बूट काढताकाढता विलास म्हणाला.

''पण विलास, एक वेळ वहिनीसारख्या विचित्र स्वभावाची बायको मिळाली असती तर

मी नक्कीच पटवून घेतलं असतं रे!''

''आपली सुखदु:ख सवडीनं बोलू! तू जेवायचं असशील ना? हातपाय धुऊन घे!''

विलास जेवताजेवता आपल्या पत्नीला सांगत होता, ''हे बघ इंदू, हा समर आपल्या भवानीनगरचाच आहे? याचे वडील भवानीनगरच्या महाराजांचे कायदेशीर सल्लागार होते. याचे आजोबा आणि माझे वडील एके ठिकाणी होते. हा मात्र फारसा माझ्याशी मिसळत नव्हता. नेहमी वरच्या सर्कलमधे वावरायचा. रॉयल फुटबॉल टीमचा कॅप्टन ना! फार भाव होता याचा एके काळी भवानीनगरात!''

''पण वहिनी, विलासनं भवानीनगर सोडलं हे फार बरं केलं!''

''कसलं बरं केलं?'' मला चपाती वाढता वाढता विलासची बायको म्हणाली, ''या पुण्यांत घरात ठेवायला एकही प्रामाणिक माणूस मिळत नाही! सगळे एकजात चोर! ड्रायव्हर ठेवला तर चोरून पेट्रोल काढून बाहेरच्या बाहेर विकून टाकतो! घरी कामाला बाई ठेवली तर बघता बघता चपात्यांचा जुडगा कमरेला गुंडाळून घेऊन जाते! आमच्या घरी कायम रहाणारी एखादी अनाथ मुलगी हवी - हे घरच आपलं समजून रहाणारी!''

''बघू या. आपल्या राधापूर, विरळे, नाधवडे या भागातल्या खूप गरिबांच्या मुली भवानीनगरमध्ये कामाला आहेत. मी गेलो म्हणजे लक्ष ठेवीन, आणि तूर्तास विलासची जर आडकाठी नसेल तर त्याचा ड्रायव्हर-कम-प्रायव्हेट सेक्रेटरी म्हणून रहाण्याची माझी तयारी आहे! तसा मीही बेकारच आहे!''

''काय? तू माझा ड्रायव्हर होणार?''

''प्रायव्हेट सेक्रेटरी म्हण! ड्रायव्हर म्हणू नकोस! मी असा गावोगाव भटकूनभटकून किती भटकणार? शिवाय अशा आगापिछा नसलेल्या माणसाबद्दल केवळ समाजच नव्हे, तर पोलिससुद्धा उगाच काहीतरी संशय घेत राहतात! संध्याकाळी मला तास दोन तास कुठंतरी फ्लश खेळायला जायला मिळालं की पुरे!''

''त्यासाठी बाहेर कशाला जायला हवं?'' विलासनं हसत-हसत मला विचारलं.

''मी आपल्या माणसाशी कधी खेळत नसतो!''

''अच्छा अच्छा!''

डॅडींना तार केली अन् दुसऱ्या दिवशी डॅडी पुण्यात हजर!

डॅडींना सर्व परिस्थिती सांगून म्हटलं की, ''केवळ मी एक रात्र त्या हॉटेलात मुक्कामाला होतो, म्हणून पोलिसवाले मला त्या प्रकरणात गुंतवू पहात आहेत!''

माझे डॅडी केवढे तयारीचे! मी सांगितलेलं सारं त्यांनी शांत चित्तानं ऐकून घेतलं आणि ते म्हणाले, ''मला कल्पना आली सगळी! तू अधिक काही सांगायची गरज नाही, त्या पहाटेलाच तू हॉटेल का सोडलंस याचाही मला अंदाज आला. पण मला सांग, तो दौलतखान आहे कुठं?''

''ससूनमधे!''

''ओऽके! मी अंघोळ उरकतो आणि आपण सरळ त्यालाच भेटू!''

''त्याला इन्स्पेक्टरच्या परवानगीविना भेटता येणार नाही, डॅडी. ही इज् स्टील इन् पोलीस कस्टडी?''

''अस्सं! मग प्रथम त्या इन्स्पेक्टरला भेटू, काटकरच ना? ऐकलंय मी त्याच्याबद्दल! फार हुशार पोलीस अधिकारी आहे तो! केस बिल्डअप करण्यात त्याचा कोणी हात धरणार नाही!''

डॅडींनी अंघोळ उरकली. चहा घेतला आणि आम्ही सरळ पोलीस स्टेशनला गेलो.

डॅडींनी इन्स्पेक्टरना अस्खलित इंग्रजीत आपली ओळख सांगितली, तेव्हा काटकरनी उठून त्यांना बसायची विनंती केली.

''वेल! मिस्टर काटकर, मी माझ्या मुलासाठी जरी इकडे आलो असलो तरी मला दौलतखानाच्या वतीनं वकीलपत्र दाखल करायचं आहे! आय वॉण्ट टु टॉक टु हिम!''

काटकरनी माझ्याकडे मिष्किलपणे पहात म्हटलं, ''समरबाबू, तुम्हाला आम्ही यांत काही गुंतवणार नव्हतो; पण ठाकूरसाहेबांना दौलतचा बचाव करण्यासाठी कशाला आणलंत!''

डॅडी ताडकन् म्हणाले, ''हाऊ कॅन यू डेअर टू से सो? या देशात प्रत्येकाला आपला बचाव करायचा हक्क आहे!''

पोलीस खात्याला लाख अधिकार असतील, पण फौजदारी कायदा निर्माण करणाऱ्यांनी आरोपींनाही एक लाख एक अधिकार दिलेले आहेत! काटकर डॅडींना दौलतखानाची भेट नाकारू शकत नव्हते! डॅडींना बोलावल्यामुळं माझ्या पाठीशी एक मुरब्बी कायदेपंडित उभा आहे, याची पोलिसांना जाणीव झाल्याविना राह्यली नाही,

दौलतखानाशी माझी अन् डॅडींची एकांतात भेट झाली. दौलतखानानं घेतलेला 'स्टँड' अतिशय उत्तम आहे, असा निर्वाळा डॅडींनी दिला. त्यातून तो सुरा हॉटेलपासून शंभर फुटांवर मिळाला होता. हल्लेखोरानंच जाताना तो तिथं फेकला असला पाहिजे, असा अंदाज करण्यास भरपूर वाव होता.

पोलिसांनी मला त्या खटल्यात गुंतवण्याचा प्रयत्न केला नाही, पण एक महत्त्वाचा साक्षीदार म्हणून माझे तपासटिप्पण घेण्यात आले होते.

दुसऱ्या दिवशी मी माथेरान गाठलं. हॉटेल रूबीवर गेलो.

लछमननं मला विचारलं, ''समर साहेब! काय भानगड करून ठेवली तुम्ही? माझ्याजवळ कशाला ते विष दिलंत?''

''तू उघडून पाह्यलीस ती बॅग?'' मी घाबरून विचारलं.

''तर काय! सगळ्या नोटाच नोटा! माझ्या बापानंच काय, आज्यानंदेखील कधी इतक्या बघितल्या नसतील!''

''कुठं ठेवलीस ती बॅग?''

''आमच्या घराच्या परड्यांत, म्हशीचा गोठा आहे त्या गोठ्यांत!''

''कोणाला सांगितलं नाहीस ना?''

त्यानं स्वत:च्या गळ्यावर हात ठेवून आईबापाची शप्पथ खाल्ली.

''बरं, पळ. ते घेऊन ये, मला लगेच दुपारच्या गाडीला खाली जायचं आहे!''

''साहेब, हितं पोलिसांनी तुमची ही खोली धुंडाळली. गाद्याउशा फाडून बघितल्या, बाथरूम तपासलं. पण त्यांना कसं काय मिळणार? मला बोलवून धमकी दिली, पण मी कानांवर हात ठेवले. आपल्या 'आयच्यान' इस्वासघात होनार नाय, सायेब!''

मी त्याच्या पाठीवर थाप देऊन म्हणालो, ''ती खात्री होती म्हणूनच तुझ्याजवळ विश्वासानं दिले. जा पळ! घेऊन ये लौकर!''

जगात सगळेच काही माझ्यासारखे लफंगे आणि विश्वासघातकी नाहीत म्हणून तर जग चाललंय, नाहीतर केव्हाच जगबुडी झाली असती. त्या बॅगमधे हजारो रुपये होते. पण एक नोट देखील कमी झालेली नव्हती. लछमनला त्यात काय होतं हे ठाऊक होतं. त्यानं ते घेऊन पोबारा केला असता तर मी काय करू शकणार होतो? समाजातल्या खालच्या थरांतला हा प्रामाणिकपणा, नि:स्वार्थीपणा मी आयुष्यात अनेक वेळा अनुभवलेला आहे. उलट उच्चभ्रू थरातील माणसांइतकी स्वार्थी, लबाड आणि कारस्थानी माणसं दुसऱ्या कुठल्याही थरांत नसतील अशी माझी प्रामाणिक समजूत आहे! मी स्वत:च पाहा ना! त्या दौलतखानाला फ्लशमधे बघता-बघता लुबाडलं. एवढंच नव्हे तर सलिमाशी... गेली बिचारी! माझी शैय्यासोबत करून मगच मरण्यासाठी ती पुण्याला आली होती की काय, न कळे!

लछमनला मी शंभर रुपये द्यायला लागलो तर तो ते काही केल्या घेईना! शेवटी बळेबळेच मी ते त्याच्या खिशात कोंबले.

परत पुण्याला पाहोचलो.

डॅडी कॅंपमधे हॉटेलात उतरले होते. 'सिंग सियांग' चायनीज हॉटेल!

सलिमाचा खून झाल्यानंतर तिची आई हैद्राबादवरून आली आणि पोस्टमॉर्टेम करून प्रेतागारांत ठेवलेलं तिचं प्रेत दफन करण्यासाठी हैद्राबादला घेऊन गेली. मला तिचं प्रेतदेखील पहायला मिळालं नाही.

सलिमानं मला दौलतखानाच्या स्वभावाची थोडीफार कल्पना दिली, म्हणून मी सहीसलामत बचावलो. त्यानं मनात आणलं असतं तर मला देखील उडवायला कमी केलं नसतं! उंच, धिप्पाड रोहिल्यासारखा दौलतखान जर माझ्यावर तुटून पडला असता तर मी त्याच्याशी कसला मुकाबला करणार होतो? त्यांत एका पायानं मी दुबळा!....सलिमा! तू आता पैगंबरवासी झालीस. पण मी तुझ्या उपकाराची परतफेड केल्याविना राहणार नाही. केवळ तू मला निघून जायची सूचना केलीस म्हणूनच मी बचावलो! दौलतखानाला या खटल्यात मी मुळीसुद्धा साह्य करणार नाही!....

एकीकडे मला हे असं वाटत होतं आणि दुसरीकडे डॅडींनी त्याचं वकीलपत्र घेऊन केस जिद्दीनं लढवायची तयारी सुरू केली होती! माझी अवस्था मोठी विचित्र झाली!

डॅडी पुण्यातल्या काही मित्रांना भेटून हॉटेलवर परतले. मी वेड्यासारखा त्यांच्या खोलीत फेऱ्या मारत होतो. मला पहाताच डॅडी म्हणाले,

"कुठं बेपत्ता झाला होतास कालपासून?"

"जरा माथेरानला जाऊन आलो!"

"का? तिथं आणि कोणाला नेऊन ठेवलंयस की काय?"

"छे ऽ! काहीतरीच!"

डॅडी हसले. आत आल्यावर त्यांनी कोट काढला. टायची गाठ सोडली बूट काढले आणि बॅगेतली व्हिस्कीची बाटली बाहेर काढली. मी टेबलावर एक ग्लास ठेवला. तेव्हा डॅडी म्हणाले, "टेक वन् मोअर ग्लास!"

"कशाला?"

"तुझ्यासाठी! तू पितोस हे मला ठाऊक आहे. आजपर्यंत तू माझ्यासमोर सिगारेटदेखील ओढलेली नाहीस. पण आज तू माझ्यासोबत ड्रिंक घेणार आहेस आणि स्मोकही करणार आहेस! कम् ऑन, लेट अस नॉट वेस्ट प्रेशस मोमेंटस ऑफ अवर लाइफ!"

मी डॅडींच्या त्या उद्गारानं सर्द झालो होतो! ते बाहेरूनच एक-दोन 'पेग' मरून आलेत की काय, अशी शंकाही मनात डोकावली.

जन्मदाता बाप मित्राप्रमाणं दारू पिण्याचा अन् सिगारेट ओढण्याचा आग्रह करीत होता अन् विचित्र मानसिक अवस्थेत सापडलेला मी चक्क त्यांच्या ग्लासाला ग्लास भिडवून आज पहिल्यांदा त्यांच्यासमोर मद्य पिणार होतो.

-o-o-o-

१३

दोन पेग्ज घेतल्यावर डॅडींनी मला विचारलं, "समर, मला खरं खरं सांग, दौलतखानानं सलिमाला मारायला काय कारण घडलं असावं?"

"मला काहीएक कल्पना नाही, डॅडी!"

"खोटं बोलतोस? अरे, आज मी तुझा बाप म्हणून विचारत नाही एक मित्र म्हणून विचारतो आहे, सांग?"

"खरंच नाही, डॅडी!"

"यू आर ए फर्स्ट क्लास स्काँड्रल!"

डॅडी ड्रिंक घेताना कधी कधी असे भडकायचे हे मला ठाऊक होतं. पण अशा वेळी समोरच्या माणसानं शांत रहाणं आवश्यक असे!

"समर, त्या रात्री तू त्याला फ्लशमध्ये लुबाडलंस आणि भ्याडासारखा रात्रीतून पळून गेलास. जाताना तू सरळ गेला नसशील; त्या सलिमाशी काहीतरी भानगड करून गेला असला पाहिजेस!"

"कशावरून म्हणता तुम्ही हे?"

"दौलतखान चिक्कार प्याल्यानंतर तू त्याला फ्लशमध्ये भरपूर लुबाडलंस! सलिमाला ठाऊक होतं की, दुसऱ्या दिवशी दौलतखानाला आपण नशेत पैसे हरल्याचं समजलं की, तो तुला सहजासहजी तिथून जाऊ देणार नाही! सलिमानंच तुला तिथून जायचा सल्ला दिला असला पाहिजे आणि तोदेखील कसल्यातरी मोबदल्यात! समर, मी तुझा बाप आहे, लक्षात ठेव!"

"पण कशावरून तुम्ही हा तर्क केलात, डॅडी?"

"तुझ्या साऱ्या हालचाली संशयास्पद वाटल्यावरून? तू माथेरानला का गेलास?" हसत हसत डॅडींनी मला विचारलं.

"उभ्याउभ्या मला पोलीस इकडे घेऊन आले होते; माझे कपडे सामानसुमान सारं तिथंच राह्यलं होतं!"

"आय सी ऽ!" डॅडी माझ्याकडे तिरकी मान करून पहात म्हणाले.

"पण काही झालं तरी डॅडी, हा प्रकार घडायला नको होता!"

"ते खरंय; पण हे असं घडतं! बाई, बाटली आणि जुगार या तिन्हीत एकाच वेळी रममाण होणाऱ्याच्या नशिबी दुसरं काय येणार? माणसानं छंद जरूर करावा! पण एका वेळी एकच! बाई हवी ना? तर बाईच! खुश्शाल कुठंतरी तिला घेऊन जावं! बाटली हवी तर फक्त प्यावं! जुगार हवा तर केवळ जुगारच खेळावा! पण ही तिन्ही एकत्र आली की, असा घोटाळा झालाच! दौलतखानानं हाच मूर्खपणा केला! पण, बेटा हुषार आहे! उद्या कोर्टात मी कोणता डिफेन्स घ्यायचा हे त्यानं अगोदरच ठरवून ठेवलं आहे!"

"ते खोटं आहे, डॅडी! तो म्हणतो तसं मुळीच घडलेलं नाही." त्यांवर डॅडी हसले आणि म्हणाले, "ते मलाही ठाऊक आहे; पण दौलतखान हा आता माझा पक्षकार आहे. त्याच्या सुटकेसाठी मला सर्व प्रयत्न करायला हवा!"

"जरूर करा. पण माझी मात्र काही मदत होणार नाही!"

"व्हॉट डु यू मीन?"

"माझी साक्ष या कामी पोलिसांनी घेतलेली आहे. कोर्टातही मला साक्षीसाठी बोलावलं जाईल. पण मी दौलतखानाला उपयोगी पडेल, असा जबाब मात्र देणार नाही!"

"म्हणजे?"

मी काहीएक न बोलता उठलो. माथेरानवरून आणलेली माझी सूटकेस उघडली आणि त्यातले पाच हजार रुपये डॅडींच्या समोर ठेवीत म्हणालो, "दौलतखानाची केस तुम्ही जरूर चालवा, त्याबद्दलची ही फी! पण कोर्टात साक्षीसाठी जेव्हा येईन तेव्हा मी त्याच्याविरुद्ध साक्ष देईन!"

"आर यू ए फूल? मूर्खासारखा काय बरळतोस, समर? या तुझ्या दुटप्पी वर्तनाला काही अर्थ आहे का? त्याचा खटला चालवण्यासाठी फी देतोस आणि कोर्टात त्याच्याविरुद्ध साक्ष देणार म्हणतोस, याचा अर्थ काय?"

"अर्थ काय समजायचा तो तुम्ही समजा! सलिमा जरी मेली असली तरी मी तिच्याशी कृतघ्न होणार नाही! डॅडी, तुम्ही सलिमा कोण होती, कशी होती, पाह्यलेलं नाही! फक्त एकदाच! एकदाच ती माझ्याशी-"

मद्यामुळं मी थोडा बहकत चाललो असं मला वाटलं, नको ती गोष्ट कदाचित् माझ्या तोंडून जाईल, अन् तीही जन्मदात्या बापासमोर! मी स्वत:ला आवरलं आणि म्हणालो, "डॅडी, दौलतखानाला दवाखान्यात भेटलो तेव्हा तो मला म्हणाला, कोर्टात सांग की दौलतखानाचं सलिमावर खूप प्रेम होतं!"

"हो! आणि तू तसं सांगितलंस तरच त्यानं पुढं केलेला जबाब ग्राह्य मानला जाईल! चोरट्यांनी तिच्यावर हल्ला केला तेव्हा दौलतखान सुटकेसाठी धावला तर त्यालाही चोरट्यांनी भोसकलं!"

"हे साफ झूट आहे, डॅडी! त्याचं सलिमावर मुळीसुद्धा प्रेम नव्हतं!" समोरच्या ग्लासातली व्हिस्की संपवून मी रुमालानं ओठ टिपले.

त्या वेळी डॅडींनी आपली सिगारेट-केस माझ्यासमोर उघडून म्हटलं, "घे! ड्रिंक घेतलंस, आता सिगारेटही घे; पण मनातलं खरं काय आहे ते एकदा बोलून टाक!"

मद्याच्या नशेतदेखील मी डॅडींच्यापुढे सिगारेट ओढायला थोडा कचरलो; पण आज ते मला आपल्या इच्छेप्रमाणं सर्व गोष्टी करायला भाग पडत होते.

"समर, बोल! मन मोकळं कर! अशी एखादी गोष्ट फार काळ मनात ठेवून रहाणं बरं नाही. यू मस्ट रील आउट!" असं म्हणत डॅडींनी माझ्या संपलेल्या ग्लासात पुन्हा व्हिस्की ओतली.

सिगारेट आणि मद्य! सिगारेटस् कितीही ओढल्या तरी त्या मद्याची नशा आणू शकत नाहीत आणि सिगारेटविना अर्धी अर्धी बाटली व्हिस्की रिचवली तरी ती खोबडीला भिनत नाही पण पितापिता सिगारेटचे झुरके मारले की एकदम माणूस तरळायला लागतो. प्यालो होतो, पण आता सिगारेट ओढल्यानंतर मात्र ज्या गोष्टींची वाच्यता करायची नाही असं कटाक्षानं ठरवलं होतं त्याही गोष्टी नकळत बोलून गेलो, "डॅडी, तुम्ही म्हणता दौलतखानाचं सलिमावर प्रेम होतं असं कोर्टात सांग, पण हे साफ खोटं आहे हो!"

"कशावरून म्हणतोस?"

"तो जेव्हा त्या रात्री सर्व पैसे फ्लशमधे हरला तेव्हा मला म्हणाला, शेवटचा डाव तू जिंकलास तर सलिमा-"

"डॅडी माझे शब्द एकाग्रतेनं ऐकत होते. चेहऱ्यावर गांभीर्य होतं. मद्य पिऊन न प्याल्यासारखे ते मला म्हणाले, "बोल बेटा, बोल! आज मी तुझा मित्र आहे! शेवटचा डाव हरलो तर सलिमा तुझी, असंच म्हणाला ना तो?"

मी खाली मान घालून 'हो' म्हणालो.

"दॅटस् इट्! आणि त्यामुळंच हा सारा प्रकार घडला!"

"कसला?"

"तुला तिनं तिथून निघून जायला मदत का केली याचं मला कोडं होतं; पण आता ते सुटलं! एका सुखद संभोगासाठी सम्राज्ञीदेखील आपल्या ऐश्वर्यावर लाथ मारते! अशी इतिहासातही उदाहरणं आढळतात! दौलतखान चांगला देखणा आहे; भरपूर पैसा होता त्याच्याजवळ; पण 'त्या' शास्त्रांत मात्र तो कच्चा असला पाहिजे, यात वाद नाही! नाऊ आय

कॉट द् पॉइंट! पण समर, मला हे तुझं 'कॉन्ट्रॅडिक्टरी' वागणं पसंत नाही! तिनं तुला त्या रात्री सुख दिलं किंवा तुम्ही दोघांनी परस्परांना दिलं असं आपण क्षणभर समजू; पण आता ती जिवंत नाही! आणि जर या केसमधे दौलतखानाला मदत केली नाहीस, तर तोही कदाचित् फाशी जाईल, कोर्टानं दया दाखवली तर जन्मठेप होईल!''

''माझ्याकडून मदत अशक्य आहे, डॅडी!''

''एका रखेलीबद्दल तुला इतका आदर? आणि तीसुद्धा ती मरून गेल्यावर? धिस इज समथिंग स्ट्रेंज!''

''आय डोंट नो व्हॉट एक्झॅक्टली इट् इज! पण मी दौलतखानाचं तिच्यावर प्रेम होतं असं मुळीच सांगणार नाही! तिचा आत्मा मला जन्मभर सतावेल!''

''आत्मा? तू फारच खोलात शिरलास बेटा, समर! माणसानं इतकं सेन्सिटिव्ह असून चालत नाही! तू एक रात्र तिच्याशी मजा केलीस, ठीक झालं, पण आता ती गेल्यानंतर या बिचाऱ्या दौलतखानाला तू अडकवण्याचा प्रयत्न करावास हे काही बरं नाही!''

''असं नका समजू! मी जे सत्य आहे तेच सांगणार. त्या रात्री फ्लशमध्ये हरल्यावर तो काय बोलला हे मी सांगितल्याशिवाय राहणार नाही! तुम्हाला त्याचा बचाव करण्यासाठी आणखी पाच हजार हवेत तर सांगा! पण मला मात्र कसलीच भीड घालू नका, डॅडी?''

डॅडी माझ्याकडे पहात चमत्कारिकपणे हसले आणि म्हणाले, ''स्ट्रेंज! समथिंग व्हेरी स्ट्रेंज! पण मला तुझा उलटतपास करावा लागेल! दौलतखानाच्या विरुद्ध कोर्टात साक्ष द्यायला उभा ठाकलास की मी तू माझा मुलगा आहेस हे साफ विसरून जाणार आहे, लक्षात ठेव! तू जसा सलिमाच्या स्मृतीशी एकनिष्ठ रहाण्याचा अट्टाहास करतो आहेस, तसा मीही माझ्या व्यवसायाशी एकनिष्ठ असतो हे तुला ठाऊक आहे!''

''तसे तुम्ही आहात, आणि त्याच्या बचावाचा प्रयत्न व्हावा म्हणून तर तुम्हाला बोलवण्याची त्वरा केली मी! आणखी फी हवी असली तर सांगा!''

डॅडींनी बाटलीत होती नव्हती तेवढी व्हिस्की आपल्या ग्लासात ओतून घेतली, सोडा संपला होता, तसाच 'स्ट्रेट' घोट घेतला आणि मला म्हणाले, ''अलकानं व्यभिचार केला या संशयानं तू तिच्याशी बोलणं बंद केलंस, आणि इथं एका रखेलीसाठी तू ही तत्त्वनिष्ठा दाखवतोस, याचं मला आश्चर्य वाटतं!''

''यात आश्चर्य वाटण्यासारखं काही नाही, डॅडी! अलका पातिव्रत्याचं ढोंग करत होती, पण सलिमानं तसलं काही ढोंग केलं नव्हतं. ती उघडउघड आपण हा व्यवसाय करत असल्याचं सांगून गेली! तरीही सलिमाच श्रेष्ठ!''

डॅडी हवेत हात उडवून 'तुझ्याशी अधिक बोलण्यात काही अर्थ नाही,' अशा आशयाचे हातवारे करीत मला म्हणाले, ''लेट अस् गो फॉर डिनर!''

आम्ही दोघे जेवताना काहीच बोललो नाही. जेवण झाल्यावर मी डॅडींना म्हणालो,-

''मी जातोय!''

''कुठं?''

''विलासकडे!''

''का?''

''मी त्याला येतो असं सांगितलंय!'

''ठीक आहे!''

डॅडींच्या सोबत मला त्या हॉटेलवर रहायला कोणतीच हरकत नव्हती; पण मला तिथं रहावंसं वाटलं नाही! पुन्हा त्या केसच्या संदर्भात बोलणं निघालं असतं, अन् मला ते मुळीच नको होतं!

रात्री साडेदहाच्या सुमारास मी विलासकडे पोहोचलो.

विलास आणि त्याची बायको इंदू दोघे घरासमोर वेताच्या खुर्च्यांवर बोलत बसली होती. मला जवळ येण्यापूर्वीच त्यानं ओळखलं.

"समर! अरे, तुझा पत्ता कुठंय? मला वाटलं, तू त्या सलिमाच्या फ्यूनरलसाठी हैद्राबादला गेलास की काय?"

"खरं म्हणशील तर जायला हवं होतं! वहिनी, तुम्ही बसा, मी घेतो आतली खुर्ची!"

उठून उभ्या राह्यलेल्या इंदूवहिनीला मी म्हणालो.

"आणते ना?" असं म्हणत वहिनींनी आतून आणखी एक वेताची खुर्ची आणली. विलासनं आपली खुर्ची किंचित् बाजूला घेतली. माझ्याकडे पहात त्यान विचारलं, "खरी काय भानगड रे ही?"

"खरं खोटं, ईश्वर जाणे बाबा! पण दौलतखान असा उलट्या खोबडीचा निघेल याची मला कल्पना नव्हती! निष्पाप होती बिचारी सलिमा!"

"काका काय म्हणतात?" विलासनं सिगारेट शिलगावून मला विचारलं.

"ते म्हणतात, या खटल्यातून दौलतखान जर सुटायचा असेल तर मी त्यांना हवी तशी साक्ष द्यायला हवी!"

"तुझं म्हणणं काय?"

"मी जे खरं तेच सांगणार!"

"म्हणजे बाप-बेट्यांची लढत रंगणार तर!"

"तशी चिन्हं दिसताहेत खरी!"

"दौलतखान तुरुंगात जावा असं तुला वाटतं?"

"तसं नाही विलास! मी जे खरं आहे ते सांगणार आणि त्यातूनही तो सुटला तरी मला आनंद आहे!"

"पण भावजी, तुमचं लग्न होऊन जेमतेम सहा महिनेदेखील झाले नाहीत, आणि तुम्ही घरदार सोडून गावोगाव हिंडता आहात, याचं कारण काय?"

"ते आपोआप समजेल तुम्हाला, वहिनी!"

समोरच्या बंगल्यातून 'धा ऽ ड' असा मोठा आवाज आला, तसा मी दचकलो. पण विलास आणि इंदूवहिनींनी त्या आवाजाची दखलच घेतली नाही.

"हा काय प्रकार आहे, विलास? आवाज कसला हा?"

"अरे, हे आऊटहाऊस ज्या मालकाचं आहे, त्याचाच हा बंगला आहे. तोच या बंगल्यात रहातो. साला एकटाच आहे; पण भयंकर विक्षिप्त माणूस आहे. बंगल्याच्या आवारात कोंबडी, कुत्री आली की बेधडक गोळी घालतो. बंगल्यासमोर बाग आहे त्या बागेला प्राण्यांची कलेवरं घालून त्यानं झाडं वाढवलेली आहेत. चिक्कू-पेरूला आता बहर आला आहे. वटवाघूळ झाडावर आलं असेल, त्याला गोळी घातली असेल, झालं!"

"चमत्कारिक माणूस दिसतो!"

"अरे, आम्ही कोंबड्या पाळल्या होत्या. त्या पक्ष्यांना काय समजतं रे! पण बागेत गेल्या की धाडकन् गोळी घालून मारून टाकतो! बरं, अशा अर्ध्या डोक्याच्या माणसाबरोबर बोलायचं तरी कसं?"

"घरी कोण-कोण असतं?"

"एकटा भुतासारखा रहातो. सकाळी मार्केटला जातो, अर्धा किलो बीफ घेऊन येतो. दोन्ही वेळेला तेवढं उकडून खातो! मोठा विक्षिप्त माणूस आहे! मी म्हणालो, रहायला जागा अपुरी आहे, बंगल्यातल्या मागच्या खोल्या रिकाम्या करून दे, पण त्यानं ऐकलं नाही! आम्हीही दुसरी जागा शोधतो आहो, पण या येड्यानं थोडं को-ऑपरेशन दिलं असतं तर बरं झालं असतं!"

"ठीक आहे. मी आता बघतो, माझी नि त्याची दोस्ती जमते का!"

"बघ, पण ते अशक्य आहे. त्याच्या जातीजमातीतलंसुद्धा कोणी त्याच्याकडे येतजात नाही! माणूसघाणा आहे मुलखाचा!"

बराच वेळ इकडच्या-तिकडच्या गप्पा झाल्या. खरं म्हणजे विलासला त्या आऊटहाऊसमधे रहाणं फारच अडचणीचं होतं. त्यात मी घुसणं काही बरं नव्हतं. पण मला का

कुणास ठाऊक, त्या नवराबायकोबद्दल लोभ वाटत होता. मुलंही गोजिरवाणी होती. इंग्लिश स्कूलमधे जायची अन् सुरेख इंग्रजी बोलायची. धाकटा अजय अत्यंत बंडखोर होता. थोरली दीपा आणि मधला सतीश समजुतदार मुलं होती.

मी त्या कुटुंबाशी लौकरच समरस झालो. मार्केटिंग करणं, मुलांना गाडीतून शाळेत पोहोचवणं-आणणं, क्वचितप्रसंगी इंदूवहिनीला मार्केटिंगसाठी घेऊन जाणं, हीही कामं मी करू लागलो. आश्चर्य असं की, ज्या घरात कोणीही नोकरचाकर टिकत नव्हता तिथं पूर्वीचा फारसा सलोखा नसलेला मी त्या कुटुंबीयात एकरूप होऊन गेलो. धाकट्या अजयची अन् माझी खास दोस्ती जमली. 'अंकल अंकल' करीत तो माझ्याभोवती घुटमळत असे. एकदा संध्याकाळी मी त्याला जवळ घेऊन बसलो होतो, आणि मला माझ्या आईची आठवण आली. तिला घरात लहान मूलं यावं असं वाटत होतं. मीही लग्नाला तयार झालो, पण नाशिकला जाऊन अलकाला गळ्यात बांधून घेऊन आलो. अलका जर चांगली असती तर माझ्या घरातही अशी दोन-तीन बछडी बागडली नसती?....

मध्यंतरी दौलतखानाच्या केसची तारीख पुढे पडली असल्याने डॅडी परत भवानीनगरला गेले. पण केस चालायच्या वेळेला ते परत येणार होते. 'पब्लिक मेमरी इज व्हेरी शॉर्ट' असं म्हणतात ते अगदी खरंय! ज्या वेळी सलिमाचा खून झाला, दौलतखानाला जखमी अवस्थेत पोलिसांनी अटक करून इस्पितळात ठेवला, तेव्हा पुण्यांत चारआठ दिवस चर्चेला दुसरा विषय नव्हता. पण हळूहळू लोक तो विषय विसरले.

अधूनमधून मी विलासबरोबर रेसकोर्सवर जात होतो. मी विलासच्या घरी रहातो हे बऱ्याच रेस-शौकिनाना ठाऊक झाल्यानं माझी दोस्ती करण्यासाठी बरेचजण टपून होते. पण विलासनं मला बजावून ठेवलं होतं. 'मला कोणी टिप विचारलेली आवडत नाही. तू कोणाला काही सांगत जाऊ नकोस!' जरी त्यानं मला अशी ताकीद दिलेली असली तरी कळत नकळत त्याच्या बोलण्यातून कोणतं घोडं 'फॉर्मात' आहे, कोणतं घोडं फ्ल्यूक होण्याची शक्यता आहे, हे मला समजत असे. रेसच्या जगताची मला अंत:र्बाह्य माहिती होत होती. अलकानं माझ्या आयुष्यात जे फस्ट्रेशन' निर्माण केलं होतं ते विसरायला मला रेससारखं दुसरं ठिकाण कुठं मिळणार होतं?

विलासचं वागणं अत्यंत संयमशील असं होतं. तो सिगारेटस ओढायचा त्या अगदी मोजून! दिवसातून दहा-म्हणजे दहाच! अकरावी व्हायची नाही! संध्याकाळी दोन पेग्ज म्हणजे दोनच, त्यातही तो गुरुवार, शनिवार आणि सोमवार हे तीन दिवस मद्याला स्पर्श करीत नसे!

मी त्याच्या घरी आल्यापासून तो थोडा समाधानी दिसत होता. त्याचा प्रापांचिक भार मी माझ्या डोक्यावर घेतला होता. मलाही माझं जवळचं या पुण्यात कोणीतरी आहे असं स्थान हवंच होतं. विलासच्या घरी आल्यापासून मला 'फ्लश' खेळायला कुठं सवडच मिळत नव्हती.

त्या दिवशी समोरच्या म्हाताऱ्यानं फुलपाखराच्या मागे धावत गेलेल्या अजयच्या गालावर चापट मारली. मी गाडीचा कॉर्बोरेटर खोलून साफ करीत होतो. तो रडतरडत माझ्याजवळ आला. त्याच्या गालावर उमटलेली बोटं पाहिली आणि माझा भेजा भडकला. तेलानं भरलेले हात घेऊन मी तसाच म्हाताऱ्यासमोर गेलो. म्हातारा कसलंसं पडलेलं रोपटं पुन्हा उभं करत होता. मी गळ्याला धरून विचारलं,-

"क्यूँ बे कुत्ते! बच्चे को क्यूँ मारा?"

खरं म्हणजे आजपर्यंत कोणी त्याला मुंडक्याला धरून जाब विचारलाच नव्हता. गळा माझ्या हातून सोडवून घेत तो म्हणाला, "सालेने ये मेरा प्लँट खराब कर दिया!"

मी रोपटं डाव्या हातानं उपसून घेतलं आणि कंपाउंडबाहेर फेकून दिलं. तो थेर्डा माझ्या अंगावर खुरपं उगारून धावला, मी त्याचा हात पिरगळून ते त्याला खाली टाकायला भाग पाडलं. म्हातारा माझ्या हातातून आपला हात सोडवून घेऊन बंगल्यात जाऊ पहात होता. मी ओळखलं, हा बंदूक घेऊन येणार; म्हणून मी त्याला तसाच ओढत विलासच्या घरी आणला. इंदूवहिनी या प्रकारानं घाबरून गेल्या. मी त्याला विलासच्या स्वयंपाकखोलीत कोंडला अन् सरळ पोलीस स्टेशनला फोन केला. दहा मिनिटांतच इन्स्पेक्टर जीप घेऊन आले. त्यांना मी सर्व प्रकार

समजावून सांगितला अन् म्हणालो, "हा बंदूक लायसेन्स धारण करतो. पण शहरात गोळ्या उडवणं बेकायदेशीर आहे. यानं आजपर्यंत शेजारच्या लोकांच्या कोंबड्या, कुत्री गोळ्या घालून मारली. पण कोणी आक्षेप घेतला नाही. आज त्यानं या लहान मुलाच्या थोबाडीत मारली. हे पहा-" अजूनही अजयच्या गालावर बोटं उमटली होती. इन्स्पेक्टरनी त्याला बाहेर काढला आणि सोबत घेऊन त्यांनी त्याच्या तीन बंदुका जप्त करून घेतल्या. मी जोर केला म्हणून शेजारचे बंगलेवालेही मला दुजोरा द्यायला पुढं झाले. म्हाताऱ्यावर पोलीस स्टेशनला मी एन्. सी. दाखल केली. इन्स्पेक्टरनी त्याचे बंदूक परवाने रद्द व्हावेत असा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटकडे रिपोर्ट धाडला.

संध्याकाळी विलास आल्यानंतर त्याला सर्व प्रकार समजला. तो म्हणाला,-

"बरं केलंस समर! केव्हातरी माझंच मस्तक भडकणार होतं! त्या वेळी केवळ त्याला कोंडून घालण्यावर थांबलं नसतं!"

म्हाताऱ्यानं त्या दिवसापासून माझी दहशतच खाल्ली. मला पाहून तो दातओठ खायचा! पुढे आठ दिवसांनी तो मार्केटला गेला असताना एका सायकलस्वाराला धडकून खाली पडला. गुडघ्याला जखम झाली. रोज रिक्षातून दवाखान्यात जायचा ड्रेसिंगसाठी. पण आता त्याची वेळच फिरली. त्याची जखम खोल हाडापर्यंत गेली आणि त्याला गँगरीन झालं. त्या वयात गँगरीन म्हणजे कठीण होतं; पण प्राण वाचवण्यासाठी पाय कापावा लागला. सहा महिने दवाखान्यांत पडून होता.

दौलतखानाची केस पुण्याच्या सेशन कोर्टात चौकशीसाठी लागली. मला समन्स लागले. डॅडींचे वकीलपत्र रद्द करून दौलतखानानं हैद्राबादेवरून एक वकील आणला. त्याचा बडेजावच मोठा. दिसायला फार रुबाबदार होता. पण तेवढंच भांडवल! त्याला क्रिमिनल लॉ कशाशी खातात याची माहिती नव्हती! यामुळं एक गोष्ट चांगली झाली. बाप-बेट्यांची झुंज थांबली! माझी सरकारपक्षातर्फे साक्ष झाली. त्यात मी सलिमाशी केलेला तो प्रसंग आणि दौलतखानाचे सतराअठरा हजार रुपये जिंकल्याचं सोडून बाकी सर्व सांगून टाकलं. सलिमाच्या किंचाळण्यानं शेजारच्या खोलीतली माणसं धावली. खोलीचा दरवाजा फोडला तेव्हा त्यांनी तो भीषण प्रकार पाह्यल्याचं सांगितलं. त्या नबाबी थाटातल्या हैद्राबादी वकिलानं उलटतपास केला. पण त्याची 'लाइन ऑफ डिफेन्स' काय होती ती खुद्द आपल्या जातीचा म्हणून एखादा वकील देण्याचा गाढवपणा करतात आणि मग जन्मभर पस्तावतात तशीच पाळी दौलतखानावर आली. रात्री खोलीत चोरटे शिरले, आपली-त्यांची झटापट झाली, हा त्याचा बचाव कोर्टानं साफ धुडकावून लावला, आणि दौलतखानाला जन्मठेपेची शिक्षा सुनवली. माझ्या आयुष्यात अकल्पितपणे आलेल्या सलिमा आणि दौलतखान प्रकरणावर शेवटी कसा कायमचा पडदा पडला.

कोर्टात तो निकाल ऐकून मी घरी आलो, तो इंदूवहिनीनं माझ्या हाती एक चिठ्ठी दिली. म्हाताऱ्या पारशानं मला दवाखान्यात बोलावलं होतं. तसाच आल्यापावली गेलो. म्हातारा पार मरायला टेकला होता. माझ्याकडे केविलवाणा चेहरा करून पहात म्हणाला, "आय बेट द् चाइल्ड, सो गॉड हॅज पनिश्ड मी!"

मी मनात म्हणालो, तेवढं एकच कारण नसावं, शेकडो निरापराध कुत्री, मांजरं, कोंबड्या मारल्यास तेही कारण असेल!

"चाचाजी, मैं आपकी क्या सेवा कर सकता हूँ?"

"मुझे घर ले चल! मैं इधर मरना नहीं चाहता!"

मला दया आली. म्हाताऱ्याला टॅक्सी करून घरी आणलं. त्याला कॉटवरून उठता येत नव्हतं. त्याची सगळी उसाभर मला आणि इंदूवहिनीलाच करावी लागली. पुढं चार महिन्यांनी तो मेला आणि आश्चर्य असं की, त्यानं मृत्युपत्रानं ते घर, आऊटहाऊस; सर्व काही अजयच्या नावावर केलं होतं!

पुण्यासारख्या शहरांत एवढा मोठा बंगला, बागबगीचा, फळझाडं यासहीत मालकीहक्कानं ती जागा विलासला मिळाली. मग मी बंगल्याचं 'रीओरिएंटेशन' केलं. त्याचं सारं स्वरूपच पालटून टाकलं, आणि विलास बंगल्यात रहायला गेल्यावर आपोआपच आऊटहाउसवर

मी कबजा केला.

विलासच्या कुटुंबाचा मी आता एक अविभाज्य घटक बनलो होतो. बघताबघता एक वर्ष कसं सरलं हेदेखील समजलं नाही. पुण्यात माझ्या बऱ्याच ओळखीपाळखी झाल्या होत्या; नवीन नवीन होत होत्या आणि या नव्या ओळखीतून एक नाजुक प्रकरण निर्माण होत होतं.

अजयला मी ज्या प्रायमरी स्कूलमधे सोडायला- आणायला जात होतो, तिथली मास्तरीण उल्का माझ्या परिचयाची झाली. तिचा भाऊ अवी 'नेव्ही' त होता. तो रजेवर येण्याच्या सुमाराला रेस सीझन असला की, त्याचा मुक्काम नेहमी बाहेर! जॉकींच्या ओळखी करायच्या, त्यांना पार्टीला बोलवायचं, गिफ्टस् द्यायच्या, फळांच्या करंड्या पाठवायच्या, अशी सदोदित त्याची टिप्स् मिळवण्यासाठी धडपड चालू असे.

त्याला ज्या वेळी उल्काकडून समजलं की, विलासचा मुलगा ती शिकवते त्या शाळेत आहे, तेव्हा तर त्यानं आपण होऊनच माझी ओळख करून घेतली. फारच प्रसन्न व्यक्तिमत्त्व होतं त्याचं! वडिलांची ट्रान्सपोर्ट कंपनी होती. दुसरे दोघे भाऊ वडिलांना धंद्यांत मदत करीत होते. घरी अफाट ऐश्वर्य होतं, आणि असं आबादी आबाद झालं की कोणाचा पायपोस कोणाच्या पायात रहात नाही असं होतं. घरी कोणी कोणाची चौकशी करीत नव्हते. उल्का मॉंटेसरीचा कोर्स करून आली होती. मी कोण, कुठे रहातो, हे तिला ठाऊक झालं होतं.

त्या दिवशी मी अजयला आणण्यासाठी शाळेत गेलो तर तिथं तिचा नेव्हीतला भाऊ मॉरिस गाडी घेऊन थांबलेला. तो उल्काला न्यायला आला होता की, मी त्या सुमारास अजयला घ्यायला येतो हे ठाऊक होतं म्हणून तिथं मुद्दाम येऊन थांबला होता, कोणास ठाऊक! पण उल्केनंच माझी अन् त्याची ओळख करून दिली.

"मीट माय ब्रदर, अवी-नेव्हल ऑफिसर! अवी, ही इज मिस्टर समर ठाकूर!"

आम्ही दोघांनी एकमेकाशी हस्तांदोलन केलं. पहिल्या भेटीत जे काही औपचारिकपणे बोलायचं असतं ते बोललो. पण पुढे लौकर हा औपचारिकपणाचा बुरखा फाटला गेला. अवी दोन महिने पुण्यात होता, पण या दोन महिन्यात आम्ही परस्परांना भेटलो नाही असे दोन दिवसही गेले नाहीत.

मुलांना शाळेतून परत आणले की बहुधा माझं घरी काहीच काम नसे. वेळ होणार असेल तर इंदूवहिनीला बाहेर जाताना सांगावं लागे, 'जेवायला येणार नाही, वाट पाहू नका.'

अवी एक अजब वल्ली होती. त्याला गतिमान आयुष्य कंठण्याचा षौक होता. त्याच्या आयुष्याचं सूत्र होतं, 'Whatever you want, must be obtained today and now !' या त्याच्या स्वभावामुळं त्याला 'उद्या' हे ठाऊकच नव्हतं. 'आज आणि आत्ताच' हेच त्याच्या जीवनाचे सूत्र होते. माझं आणि अवीचं जमायला दुसरं एक कारण घडलं आणि ते म्हणजे तोही फ्लशबहाद्दर होता. त्याला फ्लशमध्ये लुबाडावं असं मात्र मला कधी वाटलं नाही. असं न वाटण्याचं दुसरं कारण म्हणजे उल्का!

उल्काची अन् माझी रोज नजरभेट व्हायची. अवीशी मैत्री झाल्यापासून तिची अन् माझी मैत्रीच जमली. माझ्या आवडीनिवडी, माझा पूर्वेतिहास उल्काला जेव्हा समजला तेव्हा या मैत्रीचं प्रेमात रूपांतर व्हायला वेळ लागला नाही. उल्काच्या घरातलं वातावरण पाश्चात्य पद्धतीचं. कोणी कोणाची चौकशी करायची नाही, जो तो आपआपल्या कामात दंग! अफाट पैसा होता, आणखी मिळवण्याची हौस उल्काच्या वडिलांना आणि दोन भावांना स्वस्थ बसू देत नव्हती. या घरांत अपवाद होते अन् ते म्हणजे उल्का अन् अवी! उल्काला आपण समाजाचे काहीतरी ऋण लागतो याची जाणीव अन् या जाणीवेपोटी तिनं ग्रॅज्युएट झाल्यानंतर लग्न न करता मॉंटेसरीचा कोर्स पूर्ण केला होता. चाइल्ड सायकॉलॉजीवर ती अधूनमधून पेपरमधून आर्टिकल्स लिहीत असे. तिचं लग्नाचं वय होऊन गेलं होतं, पण घरांत कोणाला त्याची फिकीर नव्हती. लग्न कोणाशी अन् केव्हा हे तिचं तिनंच ठरवायचं होतं.

अवीला एके ठिकाणी बसून राहण्याचा मनस्वी तिटकारा होता; म्हणून तो व्यापारात न पडता नेव्हीत दाखल झाला. वर्षांतून दोन महिने तो यायचा, पण त्या मुदतीत घरी त्याची भेट होणं

दुर्मिळ! त्याचं फ्रेंड सर्कल फारच मोठं होतं. समाजातल्या सर्व स्तरातील तरुण त्याचे मित्र होते, त्यांत मोटार मेकॅनिक्स, टिनमेकर, पानपट्टीचे दुकानदार, रेस पंटर यांच्यापासून ते अगदी वकील-डॉक्टर मंडळीसुद्धा त्याचे मित्र होते. अवीशी माझी मैत्री झाली, पण त्यानं कधी जिव्हाळा लावला नाही. मलाही त्याच्याकडून ती अपेक्षा नव्हती.

उल्का आणि मी एकमेकांच्या प्रेमात पडलो हे विलासला, इंदूवहिनींना जसं समजलं, तसंच ते तिच्याही घरी समजलं.

विलास त्या दिवशी मला म्हणाला, - "उगाच गावात चर्चेचा विषय होऊ देण्यापेक्षा सरळ लग्न का करून घेत नाहीस तिच्याशी?"

इंदूवहिनी अजयसाठी लोकरीचा स्वेटर विणत होत्या. त्या माझ्याकडे पहात म्हणाल्या, "देखणी आहेच, शिवाय मिळवतीही आहे!"

"अहो वहिनी, मला तिच्याशी लग्न कसं करता येईल?"

"का नाही?"

"माझं पहिलं लग्न झाल्याचं विसरून कसं चालेल? ती अलका, आम्हा दोघांना द्विभार्याप्रतिबंधक कायद्याखाली कोर्टात खेचेल ना?"

"मग तिला घटस्फोट द्यायचा?"

"तिथंच तर सगळा वांधा आहे! आमच्या घराण्यांत घटस्फोट देण्याची प्रथा नाही! त्यासाठी तर घर सोडलं."

"मग जन्मभर असेच राहणार?"

"काय पुढं होईल ते होईल! मी विचार करायचंच सोडून दिलं आहे. आजचा दिवस गेला की मिळवली! उद्याचं उद्या!"

"तुला सांगू समर!" विलास सिगारेटची राख झाडत म्हणाला, "तुझ्यापेक्षा कितीतरी पटीनी अधिक अशा मोहमयी दुनियेत मी वावरलो आहे. पण शेवटी आपली बायको आणि मुलं यांच्यापासून लाभणारं सुख अन् समाधान कशातही नाही!"

"ते या जन्मी मला लाभेल असं वाटत नाही!" मी आकाशाकडे पहात उद्गारलो.

"मग हे असंच किती दिवस चालायचं?"

"मरेपर्यंत!"

विलासनं संपत आलेली सिगारेट चिमटीत धरून दूर फेकून दिली आणि तो खांदे उडवून म्हणाला,-

"यातून कसा मार्ग निघणार आहे, कुणास ठाऊक!'

-o-o-o-

१४

विलासच्या दोन मोटारी होत्या. एक मोठी शेव्हरोलेट आणि दुसरी बेबी फोर्ड! खरं म्हणजे त्या शेव्हरोलेट गाडीची विलासच्या कुटुंबाला काहीसुद्धा गरज नव्हती. विलास इतका कर्तबगार माणूस, पण तो कमालीचा अंधश्रद्धाळू होता. त्याला वाटायचं, आपण ही शेव्हरोलेट गाडी घेतल्यापासून आपली भरभराट झाली, जॉकीचं लायसेन्स मिळालं, मोठमोठ्या रेसेस जिंकल्या. लक्ष्मी दाही दिशांतून आपल्याकडे आली ती त्या गाडीमुळं; म्हणून तो या गाडीला लक्ष्मी म्हणायचा; मी मनातून त्या गाडीला 'हत्ती' म्हणायचो! त्या वेळी पेट्रोलची इतकी टंचाई नव्हती, किंवा ते महागही झालेलं नव्हतं, तरीही ते गाडीचं भलंमोठं धूड केवळ अंधश्रद्धेपोटी घरी बाळगणं माझ्या बुद्धीला पटत नव्हतं. ती गाडी विकून हवी तर एखादी 'फियाट' घे असं कितीतरी वेळा मी त्याला सुचवलं. पण त्याची त्या लक्ष्मीवरची श्रद्धा अढळ होती. असेना का, माझ्या बापाचं काय नुकसान होणार होतं. नुकसान जरी होत नसलं तरी विलास बेबी फोर्ड घेऊन बाहेर गेला असला आाणि त्याच वेळी मलाही बाहेर जायचं असलं तर ती 'लक्ष्मी न्यावी लागे आणि ते पुण्यातले मशहूर रस्ते! आमच्या भवानीनगरचे बोळ यापेक्षा मोठे! एकदा काही कामासाठी मला जिमखान्यावर जायचे होते. प्रथम वँâपातले काम आटोपून मग लक्ष्मी रोडने मी ती 'लक्ष्मी' चालवत निघालो. बाप रे बाप! काय ती गर्दी! बेपर्वाईनं सायकली चालवणारी माणसं, बायका, पोरी - छे: छे:! पुण्यात जो कुशलतेनं गाडी हाकायला शिकतो, त्याला लंडन-पॅरिसमधे गाडी चालवण्याचं लायसेन्स बेशक देऊन टाकावं! पुन्हा म्हणून मी 'लक्ष्मी' चालवली नाही.

आज संध्याकाळी उल्कानं मला पर्वतीवर यायला सांगितलं होतं. विलास घरी होता. काम नसेल तेव्हा तो कुठंच बाहेर जात नसे. म्हाताऱ्या मालकानं बरीच मोठी बाग, फळझाडं मागे ठेवली होती. विलास त्या बागेतच असायचा.

विलास गुलाबाच्या कलम केलेल्या झाडावर हातपंपानं कीटकनाशक द्रव फवारत होता. मी तिथं गेलो अन् म्हटलं, "मला जरा बाहेर जायचं आहे!"

"जा!"

"तू बाहेर जाणार असलास तर बसनं जाईन!'

"रात्री केव्हा येणार?"

"अकरा तरी वाजतील!'

"पार्टी आहे काय कुठं?"

"तसं काही नाही. पण बहुतेक जेवायला बाहेर कुठंतरी जायचं असं म्हणत होती!"

"कोण उल्का?"

"मग दुसरं कोण मला बोलावणार?"

"काय सांगावं? लग्नाचं बंधन न स्वीकारणाऱ्याला एकाच मैत्रिणीची संगत आवडेल असं कशावरून ठरवायचं? जा, पण ड्रिंक वगैरे जास्त घेऊ नको. मला गाडीची काळजी नाही; पण तुझी चिंता वाटते!"

मी हसलो. तसं पाह्यलं तर विलास मला आपल्या सख्ख्या भावाचं प्रेम देत होता. मी वयानं त्याच्यापेक्षा चार वर्षांनी मोठा होतो, पण म्हणतात ना, कर्तबगारी हीच माणसाला ज्येष्ठता प्रदान करते! विलास मला अजय किंवा सतीशला समजावून सांगावं अशा सुरांत सांगायचा. मला त्यात काही गैर वाटत नव्हतं. कारण घर सोडल्यानंतर कटलेल्या पतंगासारखा मी कुठं भरकटत जाणार होतो, हे माझं मलाच ठाऊक नव्हतं. पण अशा वेळी विलासनं मला आसरा दिला होता. मीही त्या कुटुंबाचा एक घटक या पद्धतीनं रहात होतो.

अलका आणि उल्का! किती साधर्म्य वाटतं या दोन नावात? 'अलका' मधल्या 'अ' चा 'उ' केला आणि ते नाव एकदम उच्चारलं तर ती 'उल्का' व्हायला वेळ लागणार नव्हता! पण उल्काची अलका कधीही होणार नाही याची मला खात्री वाटत होती. दोघीही सुस्वरूप होत्या, सुविद्य होत्या, पण अलकाजवळ जे नव्हतं ते उल्काजवळ नक्कीच होतं, -'चारित्र्य'! इतकी शिकलेली, घरी दोन्ही वेळा जेवून आरामात कथाकादंबऱ्या वाचत लोळत पडली असती तरी कोणी विचारलं नसतं, पण मॉंटेसरीचा हा क्लास चालवायची जबाबदारी तिनं स्वत: होऊन स्वीकारली! एक लहान मूल सांभाळायचं म्हणजे नाकी नऊ येतात, तर हिनं चक्क पन्नास लहान मुलं शिकवायची जबाबदारी स्वीकारलेली. मी खूप वेळा त्या मॉंटेसरीच्या वर्गातली गम्मत बघत बसायचो! एकमेकांविषयी कागाळ्या अखंड चालू असत. 'बाई, हा प्रदीप मला चिमटा घेतो,' 'बाई! ही सरिता माझी पेन्सिल लपवून ठेवते' मध्येच कुणाला 'शी' लागायची!

मी उल्काला कित्येक वेळा म्हणायचो, ''तुझ्या सहनशीलतेचं आणि चिकाटीचं कौतुक करावं तितकं थोडं आहे.''

ती हसून म्हणायची, ''अरे,यांत एक निरागस आनंद आहे! चाइल्ड सायकॉलॉजी हा एक अत्यंत मनोरंजक आणि समाजाच्या दृष्टीनं उपयुक्त असा विषय आहे. कुणीतरी याला वाहून घ्यायला हवंच ना?''

''ही चिल्लीपिल्ली संभाळण्यापेक्षा कॉलेजमध्ये प्राध्यापिका झाली असतीस तरी बरं झालं असतं!''

''छट्! अरे, इथं कितीही मनस्ताप झाला तरी ही मुलं निष्पाप असतात! त्यामुळं मनाचा तोल जात नाही; पण आजकाल शाळाकॉलेजातल्या मुलांचा वाह्यातपणा पाहून मी-मी म्हणणाऱ्या प्राध्यापकांनी हात टेकले आहेत!''

''केवळ विद्यार्थ्यांचाच दोष असतो असं नाही उल्का, प्राध्यापक मंडळींचीसुद्धा निष्ठा तपासून पहावी लागेल! मला आयुष्यातून उठवायला असाच एक प्राध्यापक कारणीभूत झाला आहे!''

माझा पूर्वेतिहास उल्काला इंदूवहिनीकडून समजला होताच; ती त्याबद्दल मला फारसं विचारतही नसे. उलट तसा विषय निघाला तर ती मोठ्या कुशलतेने विषय बदलायची. मला चाइल्ड सायकॉलॉजीचे सिद्धांत समजावून द्यायची.

आजपर्यंत एकत्र फिरणं, गप्पा मारणं, हास्यविनोद करणं, इथपर्यंतच मजल गेली होती. ती सुजाण होती, मीही जबाबदारी ओळखून तिच्याशी वागत होतो; पण कधी ना कधी मला या मर्यादा ओलांडाव्या लागणार होत्या. पाय अधु झाला म्हणून तारुण्य अधू झालेलं नव्हतं.

आज उल्कानं बाहेर कुठंतरी जेवायला जायचं असा फोन केला होता. 'संध्याकाळी पाच वाजता पर्वतीवर ये' असं जेव्हा तिनं सांगितलं तेव्हाच मी ओळखलं की, उल्काला आज आपल्याशी काहीतरी गंभीर विषयावर बोलायचं आहे.

पाच वाजता उल्कानं सांगितलेल्या ठिकाणी मी गेलो, तर तिथं कोणीच नव्हतं. मग वेळ घालवण्यासाठी देवीचं दर्शन घेतलं, देवळाभोवती एकदोन फेऱ्या घातल्या. देवळासारख्या ठिकाणी माझ्यासारख्यानं उगाच रेंगाळत राहण्यापेक्षा देवळाभोवती फिरत राह्यलं तर कोणाला शंका घेण्याचं कारण रहात नाही, मग अशा कितीही फेऱ्या मारा. जितक्या अधिक फेऱ्या माराल तितका भक्तिभाव दृढ असा शिक्कामोर्तब. मग असा देवळाभोवती फेऱ्या मारणारा डोक्यात एखाद्याचं वाईट चिंतत असो किंवा मटक्याचा आकडा लागावा म्हणून फेऱ्या मारत असो. लौकिकदृष्ट्या तो भक्तिमार्गीच.

माझ्या तिसऱ्या फेरीलाच देवी पावली. खालून वर पायऱ्या चढत येणारी उल्का मला दिसली. मी फेऱ्या थांबवून तिच्या दिशेनं काही अंतर चालून गेलो. पायऱ्या चढून तिला दम लागला होता. उरोज वरखाली होत होते. कपाळावरचा घाम रुमालानं टिपत उल्का म्हणाली,-

''बाई ग! सवय नसली की पायात गोळे येतात.''

''तू धडशी तरी आहेस, मी आहे एका पायानं अधु. तुझी वाट पाहून प्रदक्षिणा घातल्या,

पण असा तुझ्यासारखा दमलो नाही मी!''

''वेळ झाला रे यायला जरा! अवीचा मित्र आला एक ऐन वेळी. मग त्याच्याशी एक दहा मिनिटं बोलत रहावं लागलं.''

''घरी कोणी दुसरं नव्हतं वाटतं.''

''अरे, तुला ठाऊक नाही समर! आमच्या घरी जी माणसं आहेत त्यांना फायद्याच्या कामाशिवाय कोणाशी बोलायला बरं नाही वाटत. आमच्या घरांतल्या माणसांच्या एक-एक तऱ्हा माहीत नाहीत तुला.''

''तशा थोड्याफार समजल्या आहेत, पण तू आणि अवी मात्र भिन्न कशी याचंच राहूनराहून आश्चर्य वाटतं.''

बराच वेळ उल्का मला गंभीर अशी दिसली. सूर्यास्ताचा समय होत आला होता. सिंहगडाची निळसर रेघ मारल्यासारखी सरळ अशी बाजू जांभळी झाली होती.

आम्ही दोघे चालत चालत काही अंतर गेलो. थोडी सपाट जागा पाहून उल्का म्हणाली, ''आपण इथंच बसू!''

''आज मला तुझ्यांत काहीतरी फरक जाणवतोय, उल्का! काय प्रकार आहे?''

''तसं विशेष असं काही नाही; पण-''

''बोल ना?'' मी तिचा हात हातात घेऊन म्हटलं.

''समर, हे असं किती दिवस चालणार? काल रात्री पप्पा मला विचारत होते!''

''काय?''

''तुझ्याबद्दल माहिती विचारत होते?''

''सांगितलीस?''

''हो, पण तुझं पहिलं लग्न झाल्याचं मात्र मी त्यांना सांगितलं नाही.''

''का नाही सांगितलंस?''

''ते सांगितलं असतं तर त्यांना बरं वाटलं नसतं.''

''बरोबर आहे.''

''पण आता यातून काहीतरी मार्ग काढायला हवा.''

''तूच सुचव ना?''

''आपण लग्न करू.'' ती क्षणभर विचार करून म्हणाली.

''ते कायदेशीर ठरणार नाही.''

''मलाही ठाऊक आहे ते; पण मी ज्या माँटेसरीत शिकवते तिथल्या संचालिका मला म्हणाल्या, लग्नाशिवाय मी तुझ्या सहवासात राहणं बरं नाही.''

मी विचारात पडलो. उल्का म्हणत होती त्यात तथ्य नव्हतं असं नाही; पण जाणूनबुजून एखादी बेकायदेशीर गोष्ट करायची कशी? पण काय हरकत आहे? अलकानं माझी फसवणूक केलीय. ती मुळातच बदफैली होती, पण लग्नाआगोदरचा बदफैलीपणा मी एखाद वेळेस क्षम्य मानला असता; लग्नानंतर ठोंबऱ्याशी तिनं केलेली लगट केव्हाही समर्थनीय ठरणारी नव्हती! अलकाची पर्वा कशाला करायची?...

तिच्यासाठी किंवा तिला घाबरून मी उल्काशी लग्न करू नये हा कुठला न्याय?....

मी उल्काचा हात घट्ट दाबून म्हणालो, ''माझी तयारी आहे. यदाकदाचित् मला त्रास देण्याच्या उद्देशानं अलकानं काही कारवाई केलीच तर त्याला तोंड देण्याची तुझीही तयारी असावी!''

''ती आहे म्हणूनच म्हणते, की आता जास्त काळ थांबण्यात अर्थ नाही!''

आमच्या लग्नाचा जास्त गाजावाजा करायचा नाही असं आम्ही दोघांनीही ठरवलं. लोणावळ्याला एका पुरोहिताच्या घरी विलास, इंदूवहिनी यांच्या उपस्थितीत मी उल्काशी विवाहबद्ध झालो, उल्कानं आपल्या घरी लग्न झाल्यानंतर कळवलं. एरव्ही तुझं तू बघ म्हणणारे वडील आणि दोघे भाऊ नसत्या वेळी काहीतरी खेकटं निर्माण करतील की काय अशी तिला भीती

वाटली असावी. आम्ही जास्त गाजावाजा न करता लग्न केलं खरं; पण ते लौकरच सर्वांना ठाऊक झालं. अवीला आमचं लग्न झाल्याचं समजल्यानंतर त्याची अभिनंदनाची तारही आम्हाला आली. उल्का आउटहाऊसमधे रहायला आली. ती महिन्याकाठी तीनचारशे रुपये कमवत होती. माझ्याजवळही दौलतखानाच्या डल्ल्यातले आठ-दहा हजार शिल्लक होते. शिवाय कुठंही नोकरी करायचं म्हटलं तर मला तीनचारशे रुपये कमवणं कठीण गेलं नसतं! एखाद्या मोठ्या फॅक्टरीत किंवा इंडस्ट्रियल कन्सर्नमध्ये सिक्युरिटी ऑफिसर म्हणून नोकरी मिळवणं मला कठीण नव्हतं. बरेचसे उद्योगपती रेस पंटर होते. विलासनं माझ्यासाठी शब्द टाकायचाच अवकाश होता; पण उल्का नोकरी करते म्हटल्यावर मला नोकरी करायलाच हवी अशी गरज नव्हती.

मी लग्न केल्याची वार्ता भवानीनगरला पोहोचली आणि डॅडींचं मला पत्र आलं, 'तू असा मूर्खपणा करशील याची मला कल्पना नव्हती! निदान हे करण्यापूर्वी तू माझा सल्ला तरी विचारायचा होतास?' पण यांचा सल्ला विचारायच्या भानगडीत पडलो असतो तर कोणता सल्ला मिळणार होता, हे मला ढळढळीत दिसत होतं. तेव्हा त्यांच्या सल्ल्याची अपेक्षा केली नाही हे एका अर्थी बरंच केलं होतं मी!

मी लग्न केल्यानं मला थोडं स्थैर्य प्राप्त होईल, ही इंदूवहिनींची आणि विलासची कल्पना होती; पण उल्काला विलासच्या बंगल्यामागे आऊटहाऊसमधे रहाणं कमीपणाचं वाटू लागलं. मी विलासच्या मुलांना शाळेत सोडणं-आणणं करीत होतो तेही तिला बरं वाटेना! चाइल्ड सायकॉलॉजीचा अभ्यास केलेल्या उल्काच्या स्वभावाचा मला अंदाजच लागेना. लग्नानंतर एक महिन्यानं मी तिला विचारलं, "तुझं म्हणणं सांगून टाक पाहू!"

"आपण इथून दुसरीकडे रहायला जाऊ!"

"का?"

"आपण कोणाच्या मेहेरबानीवर जगतो आहोत असं कोणी म्हटलेलं मला आवडत नाही!"

"अरेच्चा! यात मेहेरबानीचा प्रश्न येतो कुठं? विलास मला भावासारखा मानतो; त्याच्या घरची देखभाल मी पहातो. मुलांना शाळेला नेतो-आणतो. त्याच्या मोबदल्यात आपण त्याच्या आऊटहाऊसमधे रहातो! कमाल आहे तुझी! तुला यात कमीपणा वाटण्यासारखं काय घडलंय?"

"ते तुला समजायचं नाही, समर! बायकांना एकमेकीची सायकॉलॉजी न बोलता समजते! इंदुबाईंच्या वागण्यातून ते मला जाणवतं आहे! शिवाय, तू त्यांचा काय घरगडी आहेस?"

"उल्काऽ!"

"होऽ! मी पुन्हा विचारते, मुलांना शाळेत नेतोस, परत आणतोस, घरचं धान्य-भाजीपाला आणतोस, विलास-जॉकीची इतरही कामं करतोस, आणि या सर्वांच्या मोबदल्यांत त्यांनी तुला ही जागा फुकट रहायला दिलीय, इतकंच! मला माझ्या आई-वडिलांचं डॉमिनेशन कधी आवडलं नाही. नव्हे, असं कुणाकडून अधिकार गाजवून घेणं माझ्या स्वभावातच नाही! बाहेर शेदीडशे भाडं द्यावं लागलं तरी चालेल! एखादी खोली मिळाली तरी मी तुला संसार थाटून दाखवेन!"

मी कपाळावर हात मारून घेतला. उल्काची विचारसरणी मला बिलकुल पटली नव्हती. कारण त्या घरी मला जी वागणूक मिळत होती ती मी त्या कुटुंबातलाच एक अशी. ग्रॅज्युएट होऊनही उल्काला इतकी समज असू नये, याचा मला खेद वाटला!

"मला वाटतं, तू थोडा समजूतदारपणा दाखवलास तर बरं होईल!' मी म्हणालो.

"याचा अर्थ तुला हे घर सोडून बाहेर जाणं पसंत नाही. इतकाच!"

माझी मोठीच पंचाईत झाली. उल्का सुशिक्षित, समजूतदार आणि सुसंस्कृत; म्हणून कोणत्याही प्रसंगी तिच्या विवेकाचा तोल सुटणार नाही ही मला खात्री वाटत होती; पण माझा भ्रमनिरास झाला. दुनियेत कुठंही जरी फिरलांत तरी बायकांच्या स्वभावाचा अंदाज लागायचा नाही, हेच खरं! विलास आणि इंदूवहिनी यांना, उल्काला काय वाटतं हे समजलं तर काय वाटेल या जाणिवेनं मला खूपच दु:ख आणि यातना झाल्या.

विलासकडे अधूनमधून पार्ट्या होत. रॉयल वेस्टर्न टर्फ क्लबचे एक सदस्य सेवामुक्त होणार होते, त्यांच्या सन्मानार्थ विलासनं पार्टी आयोजित केली होती. जेवणासाठी 'कूक्स'

आणले होते; पण देखरेख करण्याचं काम अर्थात माझ्यावरच होतं. संध्याकाळी एक-एक गाड्या येऊ लागल्या. विलास आणि मी निमंत्रितांचं स्वागत करू लागलो. बाहेरच्या हिरवळीवर टेबलखुर्च्या मांडल्या होत्या. इंदूवहिनी निमंत्रितांतील स्त्रियांशी हसतखेळत गप्पा मारू लागल्या. त्या एकट्याच आहेत हे लक्षात येताच विलासनं उल्काची चौकशी केली. मी उल्काला बोलवायला गेलो, तर तिनं चक्क मला उत्तर दिलं, "तुझ्यासारखा खुषमस्करीपणा करायला मला नाही येत! शिवाय आज माझी तब्येत बरी नाही!"

माझं डोकं एकदम आउट! ज्या विलासनं माझ्या आयुष्याला स्थिरपणा दिला, आपल्या घरी ठेवून घेतला, कुटुंबातला एक घटक मानला त्या विलासबद्दल उल्काला तिळमात्र आदर वाटू नये!

"तुला यावं लागेल, उल्का!" मी किंचित् आवाज चढवून म्हणालो,

"हे बघ समर, मी अशा धमकीला घाबरणार नाही. तुला मी अडवलंय का?"

"अगं, पण विलास तुला बोलावतो आहे. तिथं एकटी इंदूवहिनी आहे. त्या आठदहा बायका आहेत. ती एकटी त्या सर्वांशी बोलूनबोलून बोलणार काय? असा हट्टीपणा करू नको!"

"तब्येत बरी नाही म्हणून सांगितलं ना!" असं म्हणून उल्का उठली आणि सरळ कॉटवर जाऊन पडली.

त्या दिवशी मी खूप प्यालो. मनस्ताप घालवण्यासाठी मुद्दाम प्यालो. पार्टी केव्हा संपली आणि माणसं केव्हा परतली, मला कळलंदेखील नाही. मी बागेतल्या खुर्चीवर पडून आकाशातल्या चांदण्या मोजत होतो. त्या अंतराळात गरगर फिरत असल्याचा भास होत होता.

विलास माझ्याजवळ आला आणि माझ्या खांद्याला धरून म्हणाला, "समर, आज असं का केलंस? असा बेतालपणे कधी वागला नाहीस आजपर्यंत?"

जीभ जड झाली होती, डोकं गरगरत होतं, तरीही मी म्हणालो, "मला जगायची इच्छा नाही!"

"असा का वैतागलास?"

"याला कारण तूच! तूच लग्न करायला लावलंस मला उल्केशी! मी नोकर आहे का या घरचा?"

विलास अचानक गंभीर झाला. पार्टीला बोलावूनही उल्का न आल्याचं कारण त्याला समजलं. पण त्या वेळी तो त्या विषयावर अधिक काही बोलला नाही. मला हाताला धरून त्यानं आऊटहाऊसच्या दारापर्यंत आणून पोहोचवलं आणि तो तसाच मागे गेला. मी दार ठोठावलं. उल्कानं कडी काढली.

दुसऱ्या दिवशी हँगओव्हर! डोकं गच्च झालेलं, तोंडाला कोरड पडत होती. स्कॉच झाली तरी ती शेवटी दारूच! साडेनऊला उठलो. उल्का गाणं गुणगुणत शाळेला जायच्या तयारीत होती. माझ्या अस्तित्वाची दखलच घ्यायला ती तयार नव्हती! मीही अंथरुणावर पडल्या पडल्या तिचं निरीक्षण करीत होतो. पाठीवर केस मोकळे सोडलेले. पांढऱ्या शुभ्र साडीत ती फारच सुंदर दिसत होती.

"उल्का!" मी पडल्यापडल्याच हाक मारली.

"मला शाळेला जायचं आहे. काय हवंय तुला?"

"तू हवी आहेस! जवळ ये!"

"हूंऽ! मी न्हालेय! उपवास आहे आज माझा. तू ऊठ, दात घास आणि अंघोळ करून घे!"

मलाही फारसा संघर्ष वाढवायची इच्छा नव्हती! अलकापेक्षा उल्का लाखपटींनी चांगली होती. स्त्रीस्वभावाच्या मर्यादा ती ओलांडू शकत नव्हती हा काय तिचा दोष नव्हता!

"उल्का, आपण दुसरीकडे रहायला गेलो तर खर्चाचं काय करणार?"

"तूही नोकरी बघ! दोघांच्या पगारात भागणार नाही? तुला जबाबदारी नकोय. फुकटची गाडी वापरायला मिळतेय. मुलांना शाळेला नेणं, परत आणणं ही कामं करण्यात किती आयुष्य वाया घालवणार आहेस? आणि हेच जर जन्मभर करायचं होतं तर माझ्याशी लग्न करायला का

तयार झालास? कुणाही स्वाभिमानी स्त्रीला आपला नवरा दुसऱ्या कोणाचा तरी अंकित आहे हे पहायला आवडत नाही! एक वेळ जेवू पण सन्मानानं जगू!''

''पण इंदूवहिनींनी तुझा स्वाभिमान कुठं दुखवला?''

''अरे वेड्या, असं काही शब्दांनी बोलायची गरज नसते. केवळ हालचालीवरून, बघण्या-बोलण्यावरून ते सुज्ञ स्त्रीला समजतं! ऊठ, ब्रेकफास्ट तयार आहे आणि आज मला शाळेला सोडायला त्यांची गाडी नकोय! बसनं जाईन मी!''

इकडे आड तिकडे विहीर! उल्का जे म्हणाली तेही सर्वस्वी चूक असं मला म्हणता येत नव्हतं. विलासचा आणि इंदूवहिनींचा माझ्यावर किती जरी लोभ असला तरी शेवटी जन्मभर त्यांच्या मेहेरबानीवर जगणं अशक्य होतं! माझं पहिलं लग्न झाल्याचं समजूनही माझ्यावर प्रेमाची पाखर घालणाऱ्या उल्काचा दृष्टिकोन खोलवर विचार केल्यानंतर मला चूक म्हणण्याचं धाडस होईना.

''उल्का, आपण एक करू!''

''काय? सांग?''

''आपण पुण्यात दुसरीकडे रहाणं काही मला बरं वाटत नाही. त्यापेक्षा आपण मुंबईला जाऊ! तुला तिथं नोकरी मिळाली तर बघ!''

उल्का माझ्याजवळ येऊन म्हणाली, ''तुला 'इंट्यूशन' झाली की काय?'' असं म्हणत ती कपाटाकडे गेली आणि कपाटातला लाल शाईनं मार्क केलेला 'टाइम्स ऑफ इंडिया'चा अंक माझ्यासमोर धरून म्हणाली, ''हं, हे वाच! कालच मी नोकरीसाठी अर्ज पाठवलाय मुंबईला! इथं पुण्यात लोकांची मापं काढणारी अजून खूप माणसं आहेत. मुंबईत कोण कोणाला ओळखत नाही. ही नोकरी मिळत असेल तर एका पायावर मी यायला तयार आहे.''

''आता तरी जवळ ये!''

उल्का जवळ येऊन माझ्या विस्कटलेल्या केसामधून बोटं फिरवीत म्हणाली, ''अरे, जरा तू माझ्या मनाचा विचार करायला शीक. बायकांचा स्वभाव न ओळखता आल्यामुळं आयुष्यात एकदा फसलास, पुन्हा पुन्हा तीच चूक करत रहाणार आहेस का?''

उल्काच्या हाताला धरून मी जवळ घेतलं तेव्हा ती ओरडली, ''शीऽ! अजून तोंडाला वास येतोय दारूचा! ऊठ!'' तिनंच मला हाताला धरून उठवलं.

-o-o-o-

१५

माझ्या स्वभावातला हळुवारपणा, भावनाविवशता, ही नष्ट करायला त्या दोन स्त्रिया कारणीभूत झाल्या - एक अलका आणि दुसरी उल्का!

अलकानं मला साफ फसवलं, माझ्याशी अप्रमाणिक राह्यली. उल्का मात्र माझ्याशी एकनिष्ठ आहे; पण तिनं मला कधीच ओळखलं नाही! अशी माझी पुणं सोडताना तक्रार होती.

पुणं सोडल्याचा तो दिवस मला आजही स्पष्ट आठवतो. विलास आणि इंदुवहिनी घरीच होती. विलासनं मला पुणं न सोडण्याबद्दल विनवलं. उल्काला तू जर इथं राह्यल्याचं आवडत नसेल, तर तू खुश्शाल दुसरीकडे रहा, असंही सुचवलं. पण उल्का कमालीची दुराग्रही! आता तिनं पुणं सोडण्याचाच हट्ट धरला.

दोन खोक्यांमधे सर्व सामान भरलं. पण हे त्या मुंबईत ठेवायचं कुठं, रहायचं कुठं, कशाचाच पत्ता नव्हता. सामान भरताना मी उल्काला म्हणालो, होतो, ''आपण मुंबईत रहायचं कुठं हे निश्चित नसताना ही खोकी कशाला सोबत? इथंच ठेव किंवा तुझ्या घरी तरी नेऊन ठेव!''

''हे बघ समर, लग्न करताना मी पूर्ण विचार केला होता. माझ्या घरचा संबंध त्या क्षणीच तुटलेला आहे! मी पुन्हा लाचारी पत्करून त्या घरी जाणार नाही!''

''पण अडचणीच्या वेळी जायला काय हरकत आहे?''

''नाही म्हणजे नाही!''

एक घाव दोन तुकडे! वाटाघाटी, चर्चा, समझोता असली काहीच भानगड नाही. मी सामान भरण्याचं संपल्यावर विलास आणि इंदुवहिनीचा निरोप घ्यायला गेलो. विलासच्या कंठातून शब्द उमटत नव्हता. इंदुवहिनींना आपले अश्रू आवरता येईनात. गेले वर्षभर मी ज्या घरात हक्कानं वावरलो, त्या घराला सोडताना मला असंख्य यातना होत होत्या. इतक्यात शेजारी खेळायला गेलेला अजय आला. त्याला मी जवळ घेऊन म्हणालो, ''अजय, मी चाललो हं!''

''कुठं?''

''मुंबईला!''

''परत केव्हा येणार?''

मी काहीच बोललो नाही. तेव्हा तो म्हणाला,-

''मी येणार अंकल, तुमच्यासोबत!'' असं म्हणून तो जवळ येऊन मला बिलगला. इंदुवहिनींनी त्याला ओढून धरलं.

''सोड त्यांना! परत येतील ते!''

विलास ते दृश्य पाहून उठला आणि खिडकीजवळ जाऊन उभा राह्यला. इंदुवहिनी हुंदके देऊन रडत होत्या. आईवडलांचे ते वागणं पाहून छोट्या अजयनं ओळखलं की, मी तिथून चाललो आहे ते परत येण्यासाठी नव्हे!

मला त्या घरी आल्यापासूनचे दिवस आठवू लागले. अजय कधीकधी हट्टाला पेटत असे. अंघोळ करायलाच तयार नसे; मग मी त्याला दादाबाबा करून, गोड बोलून, गोष्टी सांगून बाथरूममध्ये घेऊन जायचो व स्वत: त्याला अंघोळ घालायचो. मग त्या वेळी पाणी किती गरम असावं यावर अंतिम निर्णय अजयचा! डोळ्यात साबण गेला तर परत कधी तुमच्या हातून अंघोळ करणार नाही, अशी धमकीही दिली जायची!

मला स्वत:ला मूल नाही; होण्याची शक्यताही नाही; म्हणून साऱ्या वात्सल्याचा वर्षाव मी विलासच्या तिन्ही मुलांवर करीत होतो. 'अंकल' 'अंकल' करीत माझ्याभोवती घोटाळणारी ही बछडी मला सोडून जावी लागत होती, तीही उल्काच्या हट्टासाठी! चाइल्ड सायकालॉजीचा

अभ्यास केलेल्या उल्कासाठी! 'आयरनी ऑफ इन्सिडेंट' म्हणतात ती ही!

अजयला घरमालकानं चापट मारल्याचा दिवस आठवला. मी म्हाताऱ्याशी दोन हात करून त्याला कोंडून घातलं, पोलिसांच्या हवाली केलं, पुढं त्याच म्हाताऱ्याची अवस्था वाईट झाली, तेव्हा इंदूवहिनींनी आणि मी त्याची सुश्रुषा केली. पण ती वाया गेली नाही. म्हाताऱ्यानं अजयच्या नावे मृत्युपत्रात बंगला लिहून दिला. ते दिवस आठवले. मला बहीण नव्हती, बहिणीचं प्रेम काय असतं याची कल्पनाही करता आली नव्हती. पण इंदुवहिनींच्या स्वरूपात मला खरीखुरी बहीण लाभली होती. अलकामुळं सारी स्त्रीजात कपटी अन् कारस्थानी अशी जी भावना झाली होती ती सर्व इंदुवहिनींच्या स्वभावदर्शनानं निवळली होती.... इंदुवहिनींची राहणी अत्यंत साधी, नवरा एक उदयोन्मुख जॉकी असूनही तिच्या स्वभावात कमालीची विनम्रता होती. इतक्या सधन लोकांच्या बायका घरी यायच्या 'भाभी भाभी' म्हणून त्या इंदुवहिनींची सहानुभूती मिळवण्याचा प्रयत्न करीत. रेसकोर्सवर इतर जॉकींच्या बायका सिनेमा-नट्यांना लाज वाटावी असले 'मेकअप-' करून यायच्या पण इंदुवहिनींनी कधीही नखरा केल्याचं मला आठवत नाही. विलास तिला वारंवार म्हणायचा, 'रेसकोर्सला येताना तरी ओठाला लिपस्टिक लावत जा.' त्यांनी तेदेखील कधी केलं नाही. मी घरी न सांगता गेलो अन् यायला उशीर झाला तर रात्री अकरा-बारा वाजेपर्यंत इंदुवहिनी माझी वाट पहात राहात! कधी कधी मला इंदुवहिनीचं ते वागणं पाहून आईची आठवण यायची. किती साधर्म्य होतं दोघींच्या वागण्यात? पण आता या सर्वांना सोडून मी चाललो होतो. विलास खिडकीतून बाहेर पहात सिगारेट ओढत होता.

"येतो मी!"

"ये!"

"रागावू नकोस."

"राग कशाबद्दल मानू? तू मुंबईला चाललास म्हणजे काही देश सोडून बाहेर जात नाहीस! शिवाय आणखी दोन महिन्यांनी मुंबईचा रेस सीझन सुरू होत आहे. जवळ जवळ पाच महिने मलाही मुंबईतच रहावं लागणार आहे!"

ते ऐकून मला खूप बरं वाटलं. अधून मधून विलासला भेटता येणं शक्य होतं.

उल्का आली. औपचारिकपणे तिने सर्वांचा निरोप घेतला. सामानासाठी मी एक स्टेशन वॅगन ठरवली होती, तिच्यातून आम्ही मुंबईला चाललो होतो.

पुणं हे काही माझं जन्मस्थान नव्हे. पण हेच सोडताना मला असह्य यातना झाल्या.

संगमब्रिज ओलांडून आमची स्टेशन वॅगन मुंबईच्या रोखानं धावू लागली. उल्काच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतं. वाऱ्यानं तिचे केस अस्ताव्यस्त होत होते ते होऊ नयेत म्हणून तिनं मुद्दाम डोक्यावरून पदर घेतला आणि एका हातानं घट्ट धरून ठेवला.

हायवेवरून गाडी पिंपरीची हद्द ओलांडून पुढं निघाली, तेव्हा मी उल्काला विचारलं,

"ही खोकी तू कुठं ठेवणार आहेस? आपण एक चारआठ दिवस, जरूर पडली तर महिना-दोन महिने हॉटेलात राहू शकू, पण ह्या दोन कॉट आणि खोकी यांचं काय करणार आहेस तू?"

"तुला काय वाटतं? मी कसलाच विचार केलेला नाही?"

"काय ठरवलं आहेस!"

"लिलियन मार्टिन नावाची माझी मैत्रीण बांद्र्याला रहाते. खूप मोठी जागा आहे तिची. आपलं सामान ठेवू तिच्याकडे! आपण जागा मिळेपर्यंत तिथं राह्यलो तरी चालण्यासारखं आहे!"

"पुणं सोडताना तू घरी नाही गेलीस?"

"मुद्दाम गेले नाही! नंतर येता येईल की!"

"पण समज, तू ज्या नोकरीसाठी प्रयत्न करणार आहेस ती तुला लगेच नाही मिळाली तर?"

"आजपर्यंतचं सेव्हिंग आहेच की! आणि तुझ्याजवळ आठ-दहा हजार आहेत ते?'

बोलता बोलता स्टेशनवॅगन लोणावळा- खंडाळा ओलांडून घाट उतरू लागली. खोपोली दृष्टीटप्प्यात आली.

"उल्का, विलासच्या मुलांना मी सोडून येताना मला काय वाटलं असेल याची तुला कल्पना आहे?"

"चांगलीच!"

"मला वाटलं, तू त्याबद्दल काहीच विचार केला नाहीस."

"असं कसं होईल! पण तुला ठाऊक आहे, मी तुझ्याशी लग्न केल्यापासून मला किती मन:स्ताप होत होता?"

"कसला मनस्ताप?"

"एक तर तुझं पहिलं लग्न झालेलं, माझ्या ओळखीची माणसं मला म्हणत होती, इतकी वर्षं लग्नाची राह्यलीस तसा जोडीदार तरी चांगला निवडायचा होतास! त्यात त्या दौलतखानाच्या खटल्यात तुझ्याविषयी संशय व्यक्त केला जात होता. अशा स्थितीत पुणं सोडणं हाच एकमेव मार्ग माझ्या डोळ्यांसमोर होता!"

"पण मला विलासच्या मुलांना विसरता येणं फार कठीण आहे!"

ती हसली आणि म्हणाली, "हा तुझ्या स्वभावातला दुबळेपणा आहे समर!"

"काही असेल ते असो; पण काही काळ मी ज्या कुटुंबाशी एकरूप झालो होतो, त्यांना सहजासहजी विसरणं शक्य नाही!"

"आपण आता तो विषयच बंद करू, समर. नो मोअर डिस्कशन ओव्हर दॅट सबजेक्ट!" माझ्या आयुष्याचं हे तारू कुठं स्थिरवणार होतं, कोण जाणे!

खोपोलीत थोडा वेळ थांबल्यानंतर पुन्हा प्रवासाला सुरुवात झाली. डोक्यांत असंख्य विचारांची गर्दी होत होती. उल्काला मुंबईत नोकरी नाही मिळाली तर काय करायचं? तिच्याजवळ थोडे पैसे आहेत. माझ्याजवळही आहेत. पण हे साचलेलं पाणी! किती दिवस पुरणार?....

मुंबई जसजशी जवळ येऊ लागली तशी वाहनांची ये-जा जास्त जाणवू लागली. खाडीचा ओशट वास नाकांत शिरत होता. तुरळक दिसणारे बंगले, कारखाने, फॅक्ट-या आता दिसेनाशा झाल्या. उंचच उंच इमारती- जिकडे पहावे तिकडे इमारती. रस्ते माणसांनी गजबजलेले. इतकी माणसं या गावात कशी राहतात हे कोडं मला कित्येक वर्षं सुटलेलं नाही. कबुतरांच्या खुराड्यांसारखी घरं, काही इमारती आज कोसळतात की उद्या, अशा जीर्ण झालेल्या, तरीही त्यांत निर्धास्तपणे राहणारी असंख्य कुटुंब! याआधी मी मुंबई बघितली नव्हती असे नाही. पण सहज चारसहा दिवसांनिमित्त येणाऱ्यांची मुंबईकडे पहायची दृष्टी आणि कायम वास्तव्य करण्यासाठी येणाऱ्यांची मुंबईकडे पाहण्याची दृष्टी यांत प्रचंड तफावत असते.

भवानीनगरसारख्या गजबजाटापासून अलिप्त अशा शहरांत मी जन्मलो, लहानाचा मोठा झालो. पण जन्मत:च विधात्यानं भाकीत केलं होतं की काय न जाणे, दीर्घ काल एक जागी हे बळ राहणं शक्य नाही.

बांद्र्याला बांद्रा टॉकीज ओलांडून गाडी उल्कानं दाखवलेल्या रस्त्यावरून सेंट अँड्यूज चर्चच्या रोखानं चालली होती. रस्त्यावरून थोडं आत असं पश्चिम बाजूला मिसेस मार्टिन रहात होती. दुमजली घर, पश्चिमेला माडीला व्हरांडा होता आणि व्हरांड्यातून मागे अफाट असा पसरलेला निळाभोर अरबी समुद्र! लिलियन मार्टिन घरी नव्हती. आम्ही आमचं सामान त्या स्टेशनवॅगनमधून उतरून घेतलं आणि गाडीवाल्याचे पैसे भागवले.

थोड्याच वेळात लिलियन मार्टिन आली. उल्काच्याच वयाची, किंचित सावळी, पण अत्यंत रेखीव अशा चेहऱ्याची मिसेस मार्टिन बोलता बोलता खुदकन् हसायची!

उल्कानं तिची अन् माझी ओळख करून दिली. त्या दोघी जुन्या आठवणी उगाळत बसल्या. 'अगं, ती डॉली रुस्तम कुठं असते?...' बीनी डॉक्टरीण झालीय. माहीमला तिनं हॉस्पिटल सुरू केलंय.... तर कोणा मीनल देशपांडेनं म्हणे कुणा पायलट ऑफिसरशी लग्न केलंय!

मी व्हरांड्यात उभा राहून 'ओझोन' वारा खात दूर क्षितिजावरून चाललेल्या गलबताच्या शिडांवर नजर रोखून होतो.

मिसेस मार्टिननं चहा बनवला आणि मला उल्कानं आत बोलवलं. एका बशीत कापलेल्या केकच्या फोडी अन् बिस्किटं होती.

घरात मिस्टर आणि मिसेस मार्टिन यांचे जोडीनं काढलेले आठदहा फोटो होते- निरनिराळ्या पोजमधले. त्या दोघांचा लग्नांतला फोटो मी थोडा निरखून पाह्यला. आजची मिसेस मार्टिन आणि त्या वेळची, यात महदंतर दिसत होतं.

"मिस्टर ठाकूर, कशी काय वाटली तुम्हाला आमची जागा?" लिलियननं विचारलं.

"फारच छान! आता आम्हालाही अशीच एक दोन खोल्यांची जागा पाहून द्या म्हणजे झालं!"

"ते फार अवघड आहे, पण तुम्ही दोघे आमच्याकडे रहा ना जागा मिळेपर्यंत!"

उल्कानं माझ्याकडे पाह्यलं-अशा अर्थानं की, 'बघ मी तुला म्हणत होते की नाही ती असंच म्हणणार!'

संध्याकाळी मिस्टर मार्टिन आले. लिलियन् मार्टिनला अजिबात शोभून न दिसणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. काळे कुळकुळीत, राठ केसांचे आणि जाड ओठांचे मिस्टर मार्टिन हसायला लागले की ढग गडगडल्यासारखा आवाज येई!'

उल्कानं लिलियनला ती ॲडव्हर्टाइज दाखवली. तिनं सांगितलं, ज्या संस्थेनं ही जाहिरात दिली आहे तीत खिश्चन असल्याशिवाय नोकरी मिळणं शक्य नाही. केवळ जाहिरातीत ती अट घालता येणं शक्य नव्हतं, म्हणून घातली नव्हती.

"मग दुसरीकडे कुठं मॉंटेसरीत नोकरी मिळू शकणार नाही?' चार-सहा महिने थांबावं लागेल!"

उल्काचा भ्रमनिरास झाला होता. संध्याकाळी उल्का नि मी समुद्रकिनारी फिरायला गेलो तेव्हा उल्का मला म्हणाली, "आता रे काय करायचं, समर?"

"म्हणून म्हणत होतो की, सगळा बोजा गुंडाळून जाऊ या नको! पण तू ऐकशील तर शप्पथ!"

"तू तरी बघ कुठं मिळते का?"

"मी काही नोकरीवरच अवलंबून नाही, उल्का!"

"म्हणजे?"

दोन्ही हातांचे तळवे तिच्यापुढं पसरून म्हणालो, "हे हात जोपर्यंत शाबूत आहेत तोपर्यंत मी कोणाच्या मेहेरबानीवर जगणार नाही. तुला लौकरच या हातांची किमया दिसेल!"

संध्याकाळी मी माझा तो फ्लश खेळताना घालायचा चष्मा, काचा पुसून स्वच्छ करून ठेवला. रॉबर्ट मार्टिननं उत्तम सुरमई मासा आणला होता. किचनमधे उल्काची अन् लिलियनची गडबड सुरू होती. रॉबर्ट मार्टिननं नाइटसूट चढवला आणि त्यानं दोन खुर्च्या व्हरांड्यात आणल्या. छोटं टेबल मधे ठेवलं. मी नेहमीचाच पिणारा आहे हे आपल्याला ठाऊक आहे, अशा समजुतीनं त्यानं ग्लासेस, सोडा आणि व्हिस्कीची बाटली आणून त्या टेबलावर ठेवली. मी नको कशाला म्हणू?

रॉबर्ट माटिनचं घड्याळ दुरुस्तीचं छोटं दुकान वरळी नाक्यावर होतं. रॉबर्ट दिसायला इतका ओबडधोबड होता की घड्याळ्यासारखी नाजूक यंत्र तो कशी काय हाताळतो, याचंच मला आश्चर्य वाटलं.

रॉबर्टनं मला विचारलं, "तुम्हाला कसल्या नोकरीची आवड आहे?"

"तूर्तास मिळेल ती करायची तयारी आहे; पण नोकरींत मी टिकू शकेन याची शाश्वती नाही!"

रॉबर्ट हसत हसत म्हणाला, "माझीही अशीच अवस्था होती. मलादेखील कोणाचं बॉसिंग नको वाटतं. आता गेली चौदा वर्षं मी हा व्यवसाय करतो आहे. कसं झकास चाललं आहे!"

"मुलं कुठं दिसत नाहीत?"

या माझ्या प्रश्नावर मार्टिन काहीसा गंभीर झाला आणि म्हणाला, "त्या बाबतीत मात्र

आम्ही दुर्दैवी आहोत. तशी लिलियनला दोन मुलं झाली होती; पण ती राह्यली नाहीत! आणि या देशाची लोकसंख्या इतकी झपाट्यानं वाढत असताना आम्हाला मूल झालं नाही म्हणून खेद मानायचं कारण नाही. आता लिलियनला मात्र अजूनही वाटतं, निदान एखादी मुलगी तरी असावी, पण ते काय आपल्या हाती असतं थोडंच?''

''शास्त्र फार पुढं गेलंय, मिस्टर रॉबर्ट. योग्य असा वैद्यकीय सल्ला मिळाला तर तेदेखील कठीण नाही!''

लिलियन आत सुरमई तळत होती. बाहेर त्याचा वास येत होता, दोन दोन पेग घेतल्यानंतर रॉबर्टनं बाटली उचलली आणि तो म्हणाला,

''साली, ही चीज फार काळ डोळ्यांसमोर असू नये. उगाच मोहात पाडते!''

दुसऱ्या दिवशी उल्कानं 'टाइम्स ऑफ इंडिया' त असलेल्या त्या जाहिरातीतल्या पत्त्यावर जाऊन अर्ज दिला. पण लिलियन म्हणत होती तेच शेवटी खरं ठरलं. ती संस्था खिश्चनांची होती, आणि त्यांना माँटेसरीच्या क्लासला शिकवण्यासाठी खिश्चन शिक्षिकाच हवी होती. मग त्या दोघींनी इतरत्र प्रयत्न करायला सुरुवात केली. दरम्यान मी वरळीनाक्याजवळ रॉबर्टस्च्या घड्याळदुरुस्तीच्या दुकानात जाऊन बसू लागलो. पण ते दुकान होतं चार-बाय-तीन फुटांचं. एकटा रॉबर्टच त्यात वावरू शकत होता. त्यात दुरुस्ती. उगाच बसून रॉबर्टचा धंदा कसा चालतो याचं निरीक्षण करीत होतो.... घड्याळ दुरुस्तीसाठी आले की रॉबर्ट त्यात कोणता दोष आहे हे गिऱ्हाईकाला तात्कळ सांगत असे, खर्चाचा अंदाजही देत असे आणि दुरुस्त केलेली वस्तू परत कोणत्या तारखेला न्यायची याची लेखी समजही देत असे. ठरलेल्या मुदतीत ती वस्तू दुरुस्त करून ती व्यवस्थित झालीय की नाही याची 'ट्रायल' घेऊन मगच तो ती वस्तू परत देत असे. या त्याच्या धंद्याशी एकनिष्ठ अन् प्रामाणिकपणामुळे त्याला कामाची कमतरता नव्हती. तो रोज शंभर रुपये मिळवत होता.

रॉबर्टकडे गेलं की त्याच्या दुकानांत त्या छोट्या स्टुलावर बसणं अशक्य असे; म्हणून मी दुकानाच्या बाहेर जी फळी होती त्या फळीवर स्टूल ठेवून सिगारेट ओढत रस्त्यावरची रंगीबेरंगी गर्दी पहात बसत होतो. रॉबर्टच्या दुकानासमोर एक आठ मजली इमारत होती. या इमारतीसमोर रोज सायंकाळी नवीन नवीन गाड्या येऊन उभ्या रहात. त्यातून उतरणारी माणसंही अगदी पॉश असत. कधी सूटबूटवाली, तर कधी तलम धोतर, रेशमी बंद गळ्याचे कोट घालणारी व्यापारी मंडळी!

''हे लोक कोणाकडे येतात, रॉबर्ट?'' मी एकदा रॉबर्टला जिज्ञासेनं विचारलं.

रॉबर्ट हसला आणि म्हणाला, ''तुला बघायचं आहे का कुणाकडे जातात ते?''

''कोण अशी बडी असामी इथं रहाते आहे?''

''तिथं आठव्या मजल्यावर रहातेय-कुमारी! धंदा करते. पण तुझ्या माझ्या सारख्यांचा घास नाही तिथं जायचा! रात्रीला पाचशे ते हजार घेते!''

''हजार पाचशे?''

''हा ऽ! नक्त! हार्ड कॅश!''

''एवढं काय सोनं लागलंय तिला?'' मी म्हणालो.

''अरे बाबा, सारं सांगितलं तर खरं वाटणार नाही. बडेबडे व्यापारी, रेसकोर्सवरचे प्रायव्हेट बुकीज, स्मगलर्स आणि काही पोलीस ऑफिसर्ससुद्धा या कुमारीचे भक्त आहेत! हिच्या सौंदर्यात काही चूक मिळते का पहावं म्हटलं तर शोधून सापडणार नाही. उगाच नाहीत पैसेवाले लोक मॅड होत.''

''तू ओळखतोस तिला?''

रॉबर्ट हसला आणि म्हणाला, ''ती माझी क्लायंट आहे.''

''म्हणजे?''

''सहसा एखादी वस्तू जुनी झाली की ती घरातल्या मोलकरणीला किंवा ड्रायव्हरला बक्षीस देऊन टाकते ती. पण तिनं फ्रान्सवरून एक 'वॉलक्लॉक' आणलेलं होतं. प्रत्येक पंधरा

मिनिटाला टोले देणारं, ते बिघडलं तेव्हा तिनं ते दुरुस्त करण्यासाठी अख्ख्या मुंबईतल्या वॉच रिपेअर्सना दाखवलं, कोणालाही ते पूर्ववत् करता आलं नव्हतं ते मी केलं. आज तीन वर्ष झाली. त्याची काही तक्रार नाही. सहा महिन्यांतून एकदा जाऊन मी त्याला तेलपाणी करून येतो. त्या घड्याळाचं तिनं नाव ठेवलं आहे 'गोल्डा'. 'गोल्डा'ला तेलपाणी केल्याबद्दल मला एक शंभराची नोट देते ती दरवेळी.''

''हे काम भलतंच निराळं दिसतं, रॉबर्ट!''

मला त्या कुमारीला पहायची उत्कंठा लागून राह्यली आता.

''थांब, आणखीन एक आठ दिवसांनी मला तिच्या त्या गोल्डाला तेलपाणी करायला जायचंय तेव्हा घेऊन जाईन मी तुला सोबत; पण एक लक्षात ठेव, तिच्याविषयी मनात कसलाही विचार येऊ द्यायचा नाही.''

''मला काय तू इतका 'हा' समजलास?''

रॉबर्ट आपले पोट गदगद हलवीत हसला आणि म्हणाला, ''अरे, जी माणसं म्हातारपणाकडे झुकलीत, ज्यांची कामवासना संपुष्टात आलीय अशांनीदेखील कुमारीला पाह्यलं की तिच्या अंगावर निदान हात तरी फिरवावा असं वाटतं. पण तू तर बोलूनचालून तरुण. त्यात तुझ हे असं एखाद्या सिनेमा नटासारखं व्यक्तिमत्त्व. हुरळून गेलास तर काय करावं? ती उल्का माझ्या मागे जोडा घेऊन लागेल.''

मी हसलो आणि म्हणालो, ''तू सांगतोस त्या वर्णनावरून ती देखणी असावी असं वाटतं, पण अशीच एक अत्यंत स्वरूपसंपन्न स्त्री मी उपभोगली आहे- सलिमा! पण गेली बिचारी! मर्डर झाला तिचा.''

''अरेरे!''

मी रॉबर्टला दौलतखान आणि सलिमा प्रकरण सांगून म्हटलं, ''इतकी देखणी स्त्री दुसरी असू शकेल असं मला वाटत नाही रॉबर्ट!''

''कुमारीला बघितल्यावर देखील तू असंच म्हणशील?''

''हिची आणि तुझी इतकी चांगली ओळख असेल तर माझं काम नक्कीच होईल!''

''काम कसलं? नोकरीचं?''

''दुसरं कोणतं असणार! मला एखाद्या फॅक्टरीत किंवा गिरणीत सिक्युरिटी ऑफिसरची जागा मिळाली तरी शे-पाचशे रुपये मिळतील. मागे खूप जाहिराती असायच्या आणि त्यात क्वालिफिकेशन म्हणून 'एक्स आर्मी ऑफिसर वुइल बी गिव्हन प्रेफरन्स' अशीही एक ओळ असायची. मीही सैन्यातून निवृत्त झालो आहे.''

''मग तुला काही पेन्शन मिळते का नाही?''

''पेन्शन मिळण्याइतकी नोकरी कुठं झाली होती? दोन वर्षांतच पायाला जखम झाली आणि डिसचार्ज मिळाला.''

''काही जरी असलं तरी तुला थोडीफार का होईना, पण डिसॲबिलिटी पेन्शन ही मिळायलाच हवी. आपण कुमारीला सांगू.''

''ती काय करणार?''

''काय करेल? अरे, दिल्लीपर्यंत मिलिट्रीचे बडेबडे अधिकारी तिला ओळखतात, आहेस कुठे?'

''प्रयत्न करून पहायला हवा; पण ज्या वेळी मला डिसचार्ज दिला तेव्हा माझं 'शीट' फार खराब केलं होतं रे कमांडिंग ऑफिसरनं! लबाड फसवणूक करणारा, जुगारी असे शेरे मारले आहेत त्यानं.''

''तुझ्यावर कधी कोर्टमार्शल झालं होतं का? चार्जशीट देऊन तुझी चौकशी झाली होती का?''

''कधीच नाही.''

''मग त्या 'शीट'ला कोंबडीच्या 'शीट'चं देखील महत्त्व नाही. आपण प्रयत्न करू. उद्याच

जाऊ आपण कुमारीकडे, आज फोन करून अपॉइंटमेंट घेऊ तिची!''

संध्याकाळी घरी आलो. उल्का एकसारखी खोकत होती.

''तू तरी सांग, गेले चार दिवस थोडा खोकला होता; पण आज एक मिनिटभर दम नाही!'' लिलियन म्हणाली.

त्यावर रॉबर्ट म्हणाला, ''खोकल्यावर तू घेतेस ते औषध दे ना!''

''ही कसलं औषध घेते?'' मी विचारलं.

''पंच घेते.''

''पंच म्हणजे?''

''दोन लवंगा जाळून घ्यायच्या, त्यांची बारीक पूड करायची, दोन औंस ब्रँडी, एक चमचा साखर, गरमपाणी आणि अर्धा लिंबू. हे सारं मिश्रण करायचं आणि झोपताना घ्यायचं. दोन वेळात कसलाही खोकला असला तरी जायलाच पाहिजे. माझी आई लहानपणी मला असला पंच तयार करून द्यायची. त्या वेळी 'प्युअर' फ्रेंच ब्रँडी मिळायची.''

माझ्याकडे जे पैसे होते त्यातले रोज दहावीस रुपये मी खर्च करीत होतो. लिलियन् 'तू कशाला मटण-मासे आणतोस' म्हणून मला रागवायची; पण मी ऐकत नसे! त्याच्या घरी फुक्कट रहाणे मला बरं वाटत नव्हते. दरम्यान एक-दोन खोल्या आणि नोकरी शोधायची माझी मोहीम सुरूच होती.

रात्री जेवताना लिलियन म्हणाली, ''समर, या सेंट अँड्र्यूज चर्चपासून डाव्या हाताने जी गल्ली जाते त्या गल्लीच्या शेवटच्या टोकाला दोन खोल्यांचं एक घर आहे. मालकीण माझ्या ओळखीची आहे. भाडंही फार नाही, सत्तर-ऐंशी रुपये ती घेईल! एकटीच आहे. तिला माझ्या परिचयातलं कूळ हवं होतं! तिला पाच हजार डिपॉझिट द्यावं लागेल! उल्काला ती जागा पसंत आहे. पाच हजारात एवढी जागा दुसरीकडे मिळणं कठीण आहे. तू उद्या पाहून ये!''

''तुम्हा दोघींना पसंत असली म्हणजे झालं, मला पहायचं काय कारण आहे?''

''ठीक आहे, पण हिला थोडं बरं वाटू दे, मग जा तुम्ही रहायला! काय ग, उल्का!''

खोकल्याची उबळ थांबताच ती म्हणाली, ''मी रहायलाच जावं म्हणते उद्यापासून! तुला किती त्रास द्यायचा!''

''यू सिली गर्ल!'' असं म्हणत लिलियननं उल्काच्या दंडाला चिमटा काढला.

आठ दिवस झाले. तो रॉबर्टच्या घरी राहण्याचा आमचा शेवटचा दिवस असल्यानं रॉबर्टनं त्या दिवशी आम्हाला पार्टी दिली. तसं म्हटलं तर रोज रात्री काहीतरी सामिष भोजन असायचंच; पण आज जरा खासा बेत होता.

माडीवरच्या व्हरांड्यात मी व रॉबर्ट व्हिस्की पीत बसलो होतो. खरं तर डोक्यात कुमारीची काल्पनिक प्रतिमाच तरळत होती. व्हिस्कीच्या नशेनं ती अधिक स्पष्ट जाणवू लागली. तिच्याबद्दलचेच विचार डोक्यात घोळू लागले.

''रॉबर्ट, पहिल्या भेटीतच आपण तिला माझ्या नोकरीबद्दल किंवा पेन्शनबद्दल सांगणं बरं दिसेल?''

''अरे यार, छोड दो! ते होईल नाही तर नाही होईल! उल्काला थोडं बरं वाटू दे, मी तिच्यासाठी आणखी एका ठिकाणी नोकरीसाठी प्रयत्न करून पहातो!''

''कुठं?''

''आमच्या वरळीला, नानुभाई ज्युवेलर तू ओळखतोस?''

''मी कसा ओळखणार?''

''तर तो माझा 'क्लायंट' आहे. रोटरी आणि लायन क्लबशी त्याचे संबंध आहेत. मॉंटेसरीचा डिप्लोमा झालेल्या माझ्या बायकोच्या मैत्रिणीला कुठंतरी चिकटवून दे म्हटलं तर तो नाही म्हणायचा नाही! माणूस फार चांगला आहे रे! शब्द दिला की काम झालंच म्हणून समज!''

रॉबर्टच्या समाजातल्या सर्व स्तरात ओळखी होत्या. साधा वॉच रिपेअरर; पण त्याची जीभ अत्यंत लाघवी आणि गोड होती. त्यामुळं एकदा ओळख झालेला माणूस सहसा त्याला

विसरत नसे. वरळी नाक्यावरच्या त्या छोट्या दुकानात डोळ्याला लेन्स लावून खाली मान घालून घड्याळं दुरुस्त करणाऱ्या रॉबर्टला मुंबईतल्या अनेक व्यक्तींची, त्यांच्या भानगडींची इत्थंभूत माहिती होती, पण तो स्वत: असल्या भानगडीपासून, अलिप्त असायचा. त्या वेळी दारूबंदी होती. त्यानं दोन युनिटचं परमिट घेतलं होतं; पण ते त्याला पुरायचं नाही. तेव्हा बाटल्या मिळवण्यासाठी त्याला असल्या लोकांकडे जावं लागे, तेवढंच! तो मला नेहमी म्हणायचा 'समर, लफडेबाज माणसाला आपण जगाला फसवतो याचा अभिमान वाटतो, पण खरा फसत असतो तो तोच स्वत:! मी आता घड्याळं दुरुस्त करतो, तर किती लोक माझ्याकडे येतात स्मगलिंगची खपव म्हणून! मी तो धंदा केला असता तर आज बिल्डिंग बांधली असती, गाडी घेतली असती! पण आपल्याला ते नको आहे! काय, खरं की खोटं?''

''बरोबर आहे तुझं म्हणणं!''

''तू बघ, भामटेगिरी करणाऱ्यांचा शेवट कसा होतो?''

''हो, पश्चात्तापाची पाळी येते खरी!''

रॉबर्ट मला माणसाच्या सचोटीविषयी सांगत होता. मी त्याला काही उत्तरं द्यायची म्हणून देत होतो, पण ते सर्व मी ऐकल्याचा बहाणा करीत होतो. तो बोलायचा थोडा थांबताच मी त्याला विचारलं-

''घरी कोणकोण असतं तिच्या?''

''कोणाच्या?''

''अरे, कुमारीच्या!''

''हात्तिच्या! ती आणि तिची एक दूरची मावशी दोघीच! पण मी मघापासून तुझ्याशी बोललो त्याकडे तुझं लक्ष नव्हतं तर?''

''रॉबर्ट, तसं नाही हं.'' मी त्याचा हात धरून म्हणालो, ''तू त्या कुमारीचं असं वर्णन करून बसला आहेस की केव्हा एकदा मी तिला पाहीन असं झालंय मला!''

''उल्काला सांगू का?''

''प्ली ऽ ज डोंट टेल हर! शी वुइल टेक इट सीरियसली!''

रात्री जेवताना रॉबर्ट म्हणाला,

''तुम्ही लोक एक महिनाभर राह्यलात, उद्या चाललात आता आम्हाला करमणार नाही!''

''तुम्ही दोघे आमच्याकडे एक महिनाभर येऊन रहा!''

''बरी कल्पना आहे! पण तुला नोकरी लागू दे, उल्काचीही काहीतरी व्यवस्था होऊ दे; मग खुश्शाल येऊन राहू!''

त्या रात्री झोपताना उल्काला लिलियननं ब्रँडी पंच करून दिली. पण तरीही ती रात्रभर खोकत होतीच!

अशा स्थितीत आम्ही स्वतंत्र रहायला जाणार हे काही लिलियनला पटेना. तिनं आणखी आठ दिवसांनी जा असा आग्रहही धरला. पण हट्टी उल्का काही केल्या ऐकेना. शेवटी जाताना एक अख्खी ब्रँडीची बाटली माझ्या हाती देत रॉबर्ट म्हणाला, ''रोज रात्री झोपताना हिला पंच करून दे!''

''अरे, पण रोज कसं काय द्यायचं ते?''

''त्याला काय होतं? औषध म्हणून द्यायचं!''

सकाळी आमची खोकी-कॉटस् ढकलगाडीतून नव्या जागी नेली. ती नवी जागा फक्त दोनच खोल्यांची होती; पण हवेशीर होती. समुद्रावरून येणारं भिरभिरतं वारं सुखद वाटत होतं. पलीकडेच एक छोटा कोळीवाडा होता.

सामानसुमान व्यवस्थित लावल्यानंतर उल्कानं मला लांबच्या लांब यादी देऊन म्हटलं, ''या वस्तू मला हव्यात.'' त्यात सर्व संसारोपयोगी वस्तू होत्या. पुण्यात आम्ही ज्या वस्तूंची गरज तशीच निभावून नेत होतो, तसे आता करून चालणार नव्हते. दौलतखानाची लुबाडलेली रक्कम अजून संपली नव्हती. उल्कानं दिलेल्या यादीबरहुकूम सर्व वस्तू घरांत आणून टाकल्या आणि

सरळ नाक्यावर गेलो. रॉबर्ट मला आज कुमारीकडे घेऊन जाणार होता.

भडक रंगाचे कपडे वापरण्याचा मला भलता छंदच होता! गडद निळा रेशमी शर्ट आणि पांढरी शुभ्र पँट, डोळ्यांना रॅबनचा गॉगल चढवून मी वरळीनाक्याची बस पकडली.

रॉबर्टनं मला पहाताच विचारलं, "काय म्हणतो उल्काचा खोकला?'

"ठीक आहे! आज रात्रीही पंच देतो करून!"

"दे दे! बरं, मग जायचं ना आज कुमारीकडे?"

"म्हणजे?" शर्ट आणि कडक इस्त्रीची पांढरी पँट दाखवीत मी म्हणालो, "त्या तयारीनंच आलोय मी!"

रॉबर्ट हसला आणि म्हणाला, "अरे दोस्ता! बाई कधी कपड्यावर भाळत नसते!"

"त्यासाठी चाललोय मी? अरे, माझ्या आवडीचा शर्ट घातला, इतकंच!"

"तुझ्या गोऱ्या रंगाला हा निळा शर्ट शोभून दिसतो हं, समर!"

"चल चल! पुरे झालं माझं कौतुक!"

लिफ्ट जशी प्रत्येक माळा वर चढत होती तशी माझ्या छातीची धडधड वाढत होती. आठव्या अन् शेवटच्या माळ्यावर लिफ्ट येऊन स्थिरावताच आम्ही बाहेर आलो. रॉबर्टनं बेल दाबली. एका स्कर्टवाल्या नोकराणीने अगोदरच दाराच्या डोळ्यांतून बाहेर कोण आहे याचा अंदाज घेतला अन् मग दार उघडले.

मी रॉबर्टच्या पाठोपाठ आत गेलो. समोर मोठाच्या मोठा हॉल होता. त्यात उंची फर्निचर आकर्षक रीतीनं मांडलेलं होतं. टी-पॉयवर ताजी रसरशीत विविधरंगी गुलाबाची फुलं होती. नोकराणी मालकिणीला आम्ही आल्याचा निरोप द्यायला गेली, तेव्हा भिंतीवर टांगलेल्या घड्याळाकडे बोट दाखवून रॉबर्ट मला म्हणाला, "समर, हेच बघ ते 'गोल्डा' घड्याळ! आता टोले पडतील साडेअकराचे!" रॉबर्टचे शब्द संपायला आणि घड्याळात छोटा पियानो वाजल्यासारखे सूर उमटायला एकच गाठ पडली. ते सूर हवेत तरळत असतानाच आतून कुमारी हसत हसत बाहेर आली.

पंचवीससव्वीस वर्षांची उमर; पण बांधा कसा सोळासतरा वर्षाच्या मुलीसारखा नाजुक अन् लवचिक होता! अंगावर पांढराशुभ्र पायापर्यंत झगा घातलेला, गुलाबी गोरा रंग, कमानदार कोरलेल्या भुवया, फिक्कट गुलाबी लिपस्टिक लावलेले ओठ विलग झाले आणि ती रॉबर्टला म्हणाली,-

"अपॉइंटमेट घेऊन यायला तू काय परका आहेस?"

रॉबर्ट हात चोळत मान डोलवत म्हणाला, "तसं कसं यायचं!"

"अरे, सकाळी मला काय काम असतं? हे बघ, हे पुस्तक वाचत होते!"

हातातलं इंग्रजी पुस्तक आमच्यासमोर धरून कुमारी म्हणाली, "बसा ना! हे कोण?"

"हा माझ्या बायकोच्या मैत्रिणीचा नवरा!" मला रॉबर्टच्या थोबाडात ठेवून द्यावीशी वाटली. भडव्याला 'हा माझा मित्र' अशी सरळ साधी ओळख करून द्यायला काय झालं होतं? अशा देखण्या बाईला आपण कोणाचा तरी हक्काचा नवरा आहे असं पहिल्याच भेटीत कळावं यासारखं दुर्भाग्य नाही! पण तशी ओळख करून देऊनदेखील कुमारी माझ्याकडे चौकसपणे पहात राह्यली. रॉबर्टनं माझी आणखी ओळख करून दिली, "आर्मीत होता, हॉकी-फुटबॉल फार छान खेळायचा, पण खेळताना पायाला लागलं."

रॉबर्ट माझी ओळख करून देताना वाचता वाचता कुमारीनं टेबलावर ठेवलेलं इंग्रजी पुस्तक मी सहज उचलून घेतलं. त्याचं शीर्षक होतं,-

"A Creeper without a Tree !"

"फार सुरेख पुस्तक आहे! 'वृक्षाशिवाय वेल' असंच त्याचं भाषांतर होऊ शकेल ना?" कुमारीनं मला विचारलं.

"परफेक्टली करेक्ट!" मी कौतुकानं म्हणालो.

"सध्या मुंबईत काय करता तुम्ही?"

त्यावर रॉबर्ट म्हणाला, "बेकार आहे!" आता मात्र रॉबर्टनं मूर्खपणाचा कळस केला होता. घड्याळं दुरुस्त करून करून त्याला कसं बोलावं हेही समजत नव्हतं! विषय बदलण्यासाठी मी म्हणालो,-

"आपल्या सौंदर्याचं वर्णन ऐकून आपल्याला पहावं अशी इच्छा निर्माण झाली होती. खरोखरच--"

माझ्या त्या अर्धवट वाक्याचा पूर्ण अर्थ कुमारीला समजला होता. तिच्याकडे येणारे पुरुष एका विशिष्ट हेतूनं यायचे! आपण पैसे मोजतो ते तुला उपभोगण्यासाठी! तुझ्या सौंदर्याचं गुणगान करायचं कारणच काय?' असा भाव त्या लोकांच्या नजरेत असे. पण आज आपल्याकडे आलेला हा तरुण बेकार आहे आणि तो केवळ जिज्ञासेपोटीच इथपर्यंत आला आहे, या जाणिवेनं कुमारी सुखावली.

"रॉबर्ट, घड्याळ थोडं पुढं जातं रे!"

"पेंड्युलमचा स्क्रू थोडा आवळावा लागेल!"

"ते काय करायचं ते तूच ठरव. मला काय त्यातलं कळतं! पण तू दुरुस्त केल्यापासून बंद मात्र पडलं नाही हं! अरे, बरी आठवण झाली! माझ्याकडे एक ॲटोमॅटिक जेन्टस रिस्टवॉच विसरून राह्यलंय कुणाचंतरी! बहुतेक ते बंद असावं असं वाटतंय!"

"ॲटोमॅटिक घड्याळ हातात बांधलं नाही तर बंदच पडतं!" रॉबर्ट भिंतीवरचं ते फ्रेंच घड्याळ टेबलावर चढून खाली काढताकाढता म्हणाला, "चेक करून बघतो मी आज संध्याकाळी!"

"हवा काय मस्त येते इथं!" मी म्हणालो.

"हो ना! गच्चीत उभं राहून पहा, सगळा सीफेस दिसतो इथून."

मी गच्चीत जाऊन उभा राह्यलो तेव्हा कुमारी माझ्या मागोमाग आली. तिच्या अंगाचा सेंट मला जाणवला. ती माझ्याजवळ येऊन हळूच म्हणाली, "दुपारी एकटाच ये, माझं थोडं काम आहे."

मला मी काय ऐकतो आहे, यावर विश्वासच बसेना. मी 'आ' वासून कुमारीकडे पाहू लागलो तर ती खुदकन् हसली आणि तिनं आत जाताजाता माझ्या दंडाला चिमटा काढला.

एका रात्रीला हजार घेणाऱ्या या कुमारीनं मी बेकार आहे व माझं लग्न झालेलं आहे हे रॉबर्टनं सांगूनही माझ्या हाताला चिमटा का काढावा? 'दुपारी एकटाच ये' असं का सांगावं? ते गूढ मला काही केल्या उलगडेना.

सलिमाही अशीच त्या रात्री गच्चीत उभी होती. मी तिला 'जातो, दार बंद करून घे' असं म्हणालो, तेव्हा ती चक्क माझ्या गळ्यात पडली होती. हिचाही तसा हेतू तर नाही ना? अशी शंका डोकावली.

मी अवाक् होऊन विचार करीत गच्चीतच उभा होतो. रॉबर्टनं हाक मारली, मला आत बोलावले.

"अरे, चहा घ्यायला ये."

रॉबर्टनं ते घड्याळ पुन्हा भिंतीवर अडकवलं आणि हातातल्या घड्याळाबरोबर लावलं तेव्हा पावणेबाराचे टोले पडले.

कुमारीनं ट्रेमधून आणलेला चहा बनवताना मला विचारलं, "साखर किती?"

"एक पुरे!"

"मला मात्र दोन हवेत!" रॉबर्ट आगंतुकपणे म्हणाला.

"रॉबर्ट, या वयात फार साखर खाणं बरं नाही!" असं म्हणत तिनं दोन चमचे साखर त्याच्या कपात घातली.

रॉबर्टनं चहाचा कप ओठांना लावला. एक घोट घेतला आणि तो म्हणाला, "तुमच्या ओळखीनं आमच्या या समरला कुठंतरी चिकटवून द्या!"

त्यावर ती हसून लगेच म्हणाली, "कसली नोकरी हवीय यांना?"

"नो चॉइस, कसलीही चालेल; पण एखाद्या कन्सर्नमधे सिक्युरिटी ऑफिसरची नोकरी मिळाली तर बरं होईल. एक्स-आर्मीमॅन आहे हा!"

"पण दुसरीकडे अशाच जबाबदारीची नोकरी मिळाली तर?"

"म्हणजे?" रॉबर्टनं घाईघाईनं विचारलं अन् त्याला ठसका लागला.

"अरे, म्हणजे जबाबदारी सिक्युरिटी ऑफिसरचीच, पण नोकरीचं स्वरूप मात्र निराळं!"

"तुम्ही काय म्हणता ते मला समजत नाही!" रॉबर्ट म्हणाला.

"माझ्याकडे यांना दुपारी पाठव. मी सांगते यांना!"

"दुपारला आता किती वेळ राह्यलाय? थांबू दे की! तिथं माझ्या दुकानात बसून तरी काय करणार आहे हा? काय रे?"

माझी अवस्था मोठी विचित्र झाली होती. या बाईच्या मनात माझ्याबद्दल केवळ वैषयिक वासना नसून तिचा मला थांबवून घेण्यामागे आणखी काहीतरी उद्देश आहे हे मी तात्काळ ताडलं.

शिवाय उघडउघड धंदा करणाऱ्या या कुमारीनं माझ्याकडे अगदी पहिल्या भेटीत आकर्षलं जावं असं काय होतं?

रॉबर्ट मला तिथंच बसवून निघून गेला. मी हॉलमधे येऊन परत ते पुस्तक हातात घेतलं, तेव्हा कुमारी म्हणाली,-

"प्लीज, कम इन, समर! मार्था ऽ! आता कोणी आलं तर मी कामात आहे म्हणून सांग."

"येस मॅडॅम!"

"आणि समर जेवायला थांबणार आहे, लक्षात ठेव."

"येस मॅडम!"

"मौसी आली तर तिला सांग मी कामात आहे म्हणून!"

कुमारीच्या मागोमाग मी तिच्या बेडरूममधे गेलो. मला कॉटवर बसायला सांगून ती माझ्यासमोर मागे टेकायला उशी घेऊन बसली. बसताना पायावरचा झगा किंचित वर उचलला गेला होता, तो तिनं खाली ओढला, उशाची सिगरेट केस माझ्यासमोर धरली. मी थोडा संकोचलो. पण म्हटलं, आता ही ऑफर करते आहे तर लाजायचं कशाला? तिनंही स्वत: एक सिगरेट शिलगावली. नाकातोंडातून धूर सोडत ती म्हणाली, "समर, रॉबर्टनं बहुतेक तुला माझी माहिती सांगितलेलीच असेल! गिऱ्हाईकाकडून हजार रुपये घेणारी बाई आहे तरी कसली हे पहाण्याच्या जिज्ञासेनं तू इथं आलास हे मी तुला बघितल्याबरोबर ओळखलं! एनी वे, माझं तुझ्याकडे एक काम आहे असं जे मी म्हणाले, ते तुला पाह्यल्याबरोबरच निर्माण झालेलं आहे असं मात्र समजू नको! बरेच दिवस माझ्या डोक्यांत एक कल्पना घोळते आहे!"

"कसली?" मी धिटाईनं विचारलं.

"मला कोणीतरी बॉडीगार्ड हवा! तुला ठाऊक आहे, काही वेळा इथं आलेली गिऱ्हाईकं भलता गोंधळ घालतात. त्यांना आवरणं अशक्य होतं. खूप दारू पितात आणि हवा तसा गोंधळ घालतात. अशा वेळी त्यांना मुंडक्याला धरून खाली खेचत नेणारा असा विश्वासू बॉडीगार्ड हवा मला! मला वाटतं, तुझं व्यक्तिमत्त्व या कामाला अगदी योग्य असं आहे! मी तुझ्या वैवाहिक आयुष्यात कधीही हस्तक्षेप करणार नाही याची खात्री ठेव!'

"या अगोदर कधी असला प्रयोग करून पाह्यला नाही ना?"

"नाही रे! म्हटलं, कोणाला आपल्या संरक्षणासाठी ठेवून घेतलं तर तोच पैशाच्या लोभानं आपल्या जीविताचा घात करायचा!"

"मला तसा मोह होणार नाही याची काय शाश्वती?"

"ते सोडून दे! आता मी माणसं पाह्यल्यापाह्यल्या ओळखण्यात तरबेज झाले आहे!"

मी हसलो. माझ्या स्वभावाची परीक्षा इतक्या अल्पावधीत आजपर्यंत कोणी केली नव्हती. ती या कुमारीनं केली होती.

"मग हे कबूल? दिवसभर तू कसलाही व्यावसाय कर; माझी ना नाही; पण रात्री मात्र वस्तीला इथं हवास!"

मी हसलो आणि म्हणालो, "माझ्या वैवाहिक आयुष्यात हस्तक्षेप नाही होणार यामुळं?"

"मुळीच नाही! तू तुझ्या पत्नीला हे सारं समजावून सांगितलंस, तर तिचाही गैरसमज होणार नाही; किंवा तुझी नोकरी फक्त रात्रीपुरतीच आहे एखाद्या फॅक्टरीत असं सांगून टाक!"

मी म्हणालो, "माझी पत्नी उल्का, आपले आई, वडील, भाऊ सर्व सोडून माझ्यासोबत मोठ्या इर्षेने स्वत:च्या पायावर उभं राहण्यासाठी इकडे आली आहे. तिला मी प्रत्यक्षात कोणती नोकरी करतो हे समजलं तर काय वाटेल? तुम्ही पुरुषाला तात्काळ ओळखता, पण स्त्रीच्या स्वभावाचा अंदाज नाही लागलेला अद्याप तुम्हाला?"

"यू डोंट वरी अबाऊट हर! आणि तशी वेळ पडलीच तर मी आहे जबाबदार!"

नकारार्थी मान हालवीत मी म्हणालो, "एका स्त्रीनं मला फसवलं म्हणून मी दुसऱ्या एका निष्पाप स्त्रीला फसवल्यासारखं होईल, कुमारीजी!"

"यू जस्ट थिंक ओव्हर! तुला हे जमणारच नसेल तर माझा काही अट्टहास नाही, पण मला वाटतं, तू नाकारण्यासारखं काही कारण नाही. मी तुझ्या आधारावर जगेन, जस्ट लाइक ए क्रिपर ऑन ए ट्रि."

आता माझ्या डोक्यात प्रकाश पडला. ती वाचत होती त्या पुस्तकाच्या मथळ्याच्या अर्थ शब्दश: कृतीत आणायचा विचार होता तिचा!

"मला विचार करायला वेळ मिळेल ना?" मी.

"ऑफ कोर्स! आणि खरं सांगू, मी इतका पैसा कमावते; पण मला सुरक्षितताच वाटेनाशी झालीय अलीकडे! जस्ट लाइक ए क्रीपर विदाऊट ए ट्री! पण आणखी सातआठ वर्षं तरी मला जगायला हवं!"

बोलता बोलता मला कुमारीच्या डोळ्यांत अश्रू तरळल्याचा भास झाला. तेव्हा मी म्हणालो, "असं जर वाटतं तर धंदा बंद करून जेवढी कमाई केलीस ती उरलेलं आयुष्यभर खात रहावं!"

"तो सगळा विचार झालाय, समर! मी धंदा बंद केला म्हणून टाहो फोडून सांगितलं तरी कोणाला खरं वाटणार नाही. मला त्यासाठी मुंबई सोडावी लागेल!"

"मग सोडायची!"

"अन् कुठं जायचं? कुठंही गेले तरी मला तारुण्य आहे, सौंदर्य आहे तोवर लोक सुखानं जगू देणार नाहीत! अरे, पॅरिसला गेले तर तिथंही माझ्या व्यवसायाची माहिती असणारा भारतीय निघालाच! ते जाऊ दे, विचार करून बघ."

बाहेरच्या घड्याळात साडेबाराचे टोले निनादले तशी कुमारी म्हणाली,-

"कम ऑन, लेट अस हॅव लंच-" मी उठून तिच्या पाठोपाठ डायनिंग टेबलाकडे गेलो.

-o-o-o-

१६

विचार करण्यासाठी मी कुमारीकडून पंधरा दिवसांची मुदत मागून घेतली. रॉबर्टला तिथं काय घडलं हे सांगावं की सांगू नये, असा संभ्रम निर्माण झाला. न सांगता ती जबाबदारी स्वीकारावी, तर रॉबर्ट त्यातून निराळा अर्थ काढण्याचीही शक्यता होती. मी माझ्या नोकरीचं स्वरूप कितीही दडवण्याचा प्रयत्न केला तरी शेवटी लिलियनमार्फत उल्काच्या कानांवर ते नक्कीच जाणार होतं; म्हणून शेवटी रॉबर्टला सर्व प्रकार सांगून टाकला.

तो घड्याळाचा नाजुक भाग जुळवताना जसा एकाग्र व्हायचा तशीच एकाग्रता चेहऱ्यावर आणून मी सांगत होतो ते तो ऐकू लागला. ऐकून झाल्यावर मला म्हणाला, "काय चमत्कार आहे!"

"कसला चमत्कार?"

"संरक्षक म्हणून तुझ्यासारखा चिकणा तरुण पदरी बाळगण्यापेक्षा माझ्यासारखा रंगानं आफ्रिकी, जाडजूड माणूस ठेवणं तिला अधिक फायद्याचं झालं असतं!" असं म्हणून रॉबर्ट पुन्हा गदगद पोट हलवीत हसला, तेव्हा मी गंभीर होऊन म्हणालो, "रॉबर्ट, हा विषय हसण्यावारी नेऊ नकोस. मला तुझा सल्ला हवाय. मी ही जबाबदारी स्वीकारू का?"

रॉबर्ट लगेच म्हणाला, "समर, तुला नेमका काय सल्ला द्यावा हे मला समजत नाही! ती धंदा करते, पण तरीही एक सुस्वभावी बाई आहे! एवढी बडीबडी धेडं येतात, पण तिनं कधी कुणाला मद्य पाजून लुबाडल्याची तक्रार झाल्याचं माझ्या ऐकिवात नाही. उलट तिच्याकडे असलेला कूक, स्वीपर, माळी हे सर्व आपल्या घरगुती अडचणी सांगून तिच्या चांगुलपणाचा गैरफायदा घेतात. वारंवार तिच्याकडून पैसे उकळतात!"

"माळीदेखील? पण त्या इमारतीत बाग कुठंच दिसली नाही मला!"

रॉबर्ट हसत हसत म्हणाला, "अरे बाबा, टेरेसवर फार मोठी 'रोझरी' आहे तिची! मघा टेबलावरचा तो गुच्छ पाह्यलास तो तिच्या टेरेस गार्डनवरचाच! वर छोटं लॉन आहे. कधी कधी पौर्णिमेची रात्र गाठून येणारी गिऱ्हाइकं वरच्या हिरवळीवर हिला जवळ घेऊन पीत बसतात!"

"ते जाऊ दे, मला सांग, मी ही जबाबदारी स्वीकारू का?"

"तुला यापुढं गावी परत जायचंय की मुंबईतच राहायचं आहे?"

"उल्का तर म्हणते आता इथंच स्थायिक व्हायचं!"

"मग ही नोकरी स्वीकार!"

"का?"

"मुंबईत प्रत्यक्षात काय चालतं, इथली माणसं काय काय लटपटी आणि खटपटी करतात, याची सखोल अशी माहिती व्हावी अशी तुझी इच्छा असेल तर वर्षं दोन वर्ष ही नोकरी खुश्शाल कर!"

"एक अट!"

"बोल!"

"उल्काला हे तू सांगू नयेस!"

रॉबर्ट हसला आणि म्हणाला, "मी न सांगून तिला समजायचं रहाणार आहे असं वाटतं?"

"तिला समजायचं तेव्हा समजो, पण तू मात्र तिला काही कल्पना देऊ नकोस!"

"ओऽके! ओ ऽ के!"

रॉबर्टनं मला एकदोन वर्ष ती नोकरी करण्याचा सल्ला जरी दिला तरी, माझ्या मनाची काही तयारी होईना! अलकानं बदफैलीपणा केला म्हणून मी घर सोडलं आणि इथं मुंबईत

उजळमाथ्यानं वेश्याव्यवसाय करणाऱ्या या कुमारीचा नामधारी पती होऊन राहू? ती गिऱ्हाईकाला आत घेऊन गेली की मी दारावर पहारा करीत बसू? इट इज बिलो माय डिग्निटी! तिच्याकडे असेल खूप पैसा म्हणून काय झालं?....

दोन दिवसानंतरची गोष्ट. मी पायीच महालक्ष्मीकडे चाललो होतो. हाजी अल्लीचा दर्गा चोहोबाजूंनी वेढलेल्या समुद्रात उभा होता. दर्ग्याकडे जाणारी पायवाटही दिसेनाशी झाली. फेसाळलेल्या लाटा किनाऱ्याला येऊन धडक देऊ लागल्या. उडणारे तुषार कठड्यापर्यंत पसरत होते. मागे असंख्य वाहनांची ये-जा सुरू होती. माझ्या डोक्यात अनेक विचार थैमान घालीत होते. समोर खवळलेला सागर मी पहात उभा होतो. निर्णय काही केल्या होत नव्हता.

सूर्य अस्ताला चालला. क्षितिजावर पिवळे सोनेरी रंग तरळले. अगणित लाटांवर त्याचं प्रतिबिंब उमटलं. बघताबघता सूर्य समुद्रात बुडाला. लाटांचं तांडव सुरूच होतं, हाजी अल्लीच्या दर्ग्याजवळ उभी केलेली ट्यूबलाईटची लालभडक जाहिरात लख्खकन् प्रज्वलित झाली.

अन् मला त्याच क्षणी उल्काची आठवण आली. 'सकाळपासून मी बाहेर आहे. तिनं लौकर यायला सांगितलं होतं. आज बाहेर पडल्यापासून मला तिची आठवणदेखील राह्यली नाही.... झटझट चालत बसस्टॉप गाठला आणि बांद्र्याला जाणारी बस पकडली.

उल्का माझीच वाट पहात होती. अधूनमधून तिला खोकल्याची उबळ यायची; पण आज ती मुळीसुद्धा खोकत नाही हे पाहून मला थोडं आश्चर्य वाटलं. शर्ट काढून ठेवण्यासाठी भिंतीतलं कपाट उघडलं, तो रॉबर्टनं दिलेली ब्रँडीची बाटली अर्धी झालेली!

"उल्का, हे काय ग? कशी संपली इतकी ब्रँडी?"

उल्का विचित्र हसली आणि म्हणाली, "संपवली! रोज थोडी-थोडी घेण्यापेक्षा एकदम चार दिवसांचे पंच करून प्यायले. खोकला कमी झाला! आता आणखीन थोडं पंच करून दे!"

बोलताना तिची जीभ जड झाली होती. डोळे लालसर दिसत होते. ती कॉटवर उठून बसली आणि म्हणाली, "समोरच्या हॉटेलातून डबा घेऊन ये. मला आज काही करता आलं नाही."

डबा घेऊन मी हॉटेलकडे निघालो. विचार केला 'काय करून बसली उल्का हे? हे बरं नव्हे. औषध म्हणून दिलेली ब्रँडी प्यायली. कधीही बेताल न वागणारी उल्का आज अशी मनाचा तोल का बरं ढाळून बसली?

डबा घेऊन आलो. पण उल्का जेवायलाच उठली नाही. बाजूला रिकामा ग्लास पडला होता. मी त्याचा वास घेतला आणि झटकन कपाट उघडलं. ब्रँडीची बाटली जवळ जवळ रिकामी झाली होती. उल्काकडून असं वागणं मला कधीही अपेक्षित नव्हतं. मी विलासकडे असताना अधूनमधून मद्य प्यायचो. ते तिला निषिद्ध होतं असं नव्हतं, पण त्याचा अतिरेक केलेला तिला खपत नसे आणि आज तीच उल्का अशी का वागत होती समजत नव्हते. ती जेवायला उठली नाही. मग मलाही जेवावंसं वाटलं नाही. बाटलीत होतीं नव्हती तेवढी एकदीड पेग ब्रँडी मी प्यायलो आणि दार आतून बंद करून कॉटवर आडवा झालो. बाहेरची वर्दळ हळूहळू मंदावत होती. ओहोटी सुरू झाली होती. लाटांचं लयबद्ध विरणं सुरू होतं.

उल्का मध्यरात्री तहान लागली म्हणून पाणी प्यायला उठली. पण अजूनही तिची उतरली नव्हती. जगमधलं पाणी ग्लासात ओतून घेताना पाणी बाहेर पडत होतं. मंद दिव्याच्या प्रकाशांत मी ते पाह्यलं आणि उठून तिला ग्लास भरून दिला. पाणी प्यायल्यानंतर ती माझ्या अंगावर हात टाकून माझ्या शेजारी झोपली. तिच्या श्वासोच्छ्वासातून ब्रँडीचा उग्र दर्प माझ्या नाकात शिरत होता. तिच्या पाठीवर हात फिरवीत मी म्हणालो,-

"उल्का अशी का वागतेस?"

"काय करू? दहावीस ठिकाणी नोकरीसाठी जाऊन आले. प्रत्येकजण नंतर भेटा म्हणतो!"

"बरोबर आहे! आल्या आल्या अशा नोकऱ्या कोणालाच मिळत नसतात! ओळखी व्हायला हव्यात, आपण दुसऱ्यासाठी काहीतरी केल्याशिवाय दुसऱ्यांना आपल्यासाठी काहीतरी

करावंसं वाटत नाही! शिवाय ही मुंबई आहे, हे विसरतेस!''

''मला जगावंसंच वाटत नाही!''

''असं वाटतं माणसाला कधी कधी; पण मनाचा तोल ढळू देता कामा नये!''

''तुला तरी लागेल ना नोकरी?''

''हो, लागेल चांगली महिना-दीड दोन हजारांची एक नोकरी आहे. पण मला ती जमेल की नाही याची शंका वाटते!''

''का? काय अडचण आहे त्यात?''

''रात्रीची ड्यूटी आहे. संध्याकाळी सात ते सकाळी सात!''

''रात्रभर जागरण करावं लागणार?''

''रात्रभर असं नाही. जरूर तेव्हाच जागरण करावं लागेल! पण संध्याकाळी सात वाजल्यापासून तिथं हजर मात्र रहायला हवं!''

''मग तुला दिवसा झोप घ्यायला हवी!''

''हो, दिवसा झोप घेता येईल; पण दिवसाची रात्र आणि रात्रीचा दिवस करण्याची सवय जडायला थोडा विलंब लागेल, त्रासही होईल!''

''एवढा पगार मिळत असेल तर काय हरकत आहे?''

''तोच विचार करतो आहे गेले तीनचार दिवस!''

''काही विचार करू नकोस. सरळ रुजू हो कामावर! कुठं आहे ही नोकरीची जागा?''

''बेलार्ड इस्टेट.''

''इतक्या लांब?''

''हे लांब झालं? कर्जतपासून रोज मुंबईला नोकरीला येणारी असंख्य माणस आहेत. आहेस कुठं तू! मला चिंता वाटते ती फक्त तुझी! रात्रभर तू एकटीच घरी राहणार!''

''मालकीण आहे की शेजारी! तीसुद्धा एकटीच रहाते!''

''मालकीण आणि तू दोघी सारख्या नाहीत! ती साठ-पासष्ट वर्षांची आहे आणि तू आहेस तरुण! शिवाय ही मुंबई आहे. इथं-''

''मला ती सर्व कल्पना आहे, समर! पण आता आपल्याजवळ बसून खाण्याइतके पैसे उरलेले नाहीत. मला मिळत नाही तर निदान तुला तरी नोकरी करावीच लागेल!''

''माझी तयारीच आहे. मला फक्त तुझीच परवानगी हवी होती!''

दुसऱ्या दिवशी सकाळी मी अंघोळ करून कपडे चढवले. शीळ घालीत बाहेर पडलो.

कुमारी सकाळी दहाशिवाय उठत नसे. उठल्यानंतर बेड टी घ्यायची आणि सगळे पेपर्स वाचायची. मुंबईतले घातअपघात, राजकारण, विदेश वार्ता यानंतर ती शेवटी काळजीपूर्वक वाचायची ते रेस रिव्ह्यू. रेस हा तिचा अत्यंत आवडीचा छंद होता. रेसच्या क्षेत्रातली तिला इतकी सखोल माहिती होती की ती रेसबद्दल बोलू लागली की, तिचं म्हणणं चुकीचं आहे असं म्हणायची कोणाची प्राज्ञा नसे! तिच्या बेडरूममधे घोड्यावर आरूढ झालेल्या एका स्वाराचं मोठं थोरलं तैलचित्र होतं. प्रथम वाटलं की तो कोणीतरी तिच्या परिचयाचा असावा. पण तसं काहीच नव्हतं. चित्राखाली नाव लिहिलेलं होतं, 'गॅलोपिंग ग्लोरी!'

अशा तिच्या आवडीनिवडी मला हळूहळू समजू लागल्या होत्या. मार्केटिंग, आणि मुख्यत्वेकरून खायचे जिन्नस ती स्वत: खरेदी करायची. ज्या वेळी ती मार्केटिंगला जायची तेव्हा मेकअप मुळीच करीत नसे. एरव्ही घरी ती प्रâॉक्स, स्कर्ट, ट्राऊजर्स, स्लॅक्स वापरायची; पण मार्केटिंगला चालली की साडी आणि कोपराइतक्या बाह्यांचा ब्लाऊज पांढऱ्यारंगाचा! तिचा गॉगल तीन हजार रुपये किंमतीचा आहे हे जेव्हा मला समजलं तेव्हा मी आश्चर्यचकितच झालो. गॉगलची किंमत इतकी असू शकते हे आयुष्यात प्रथम मला कळलं होतं. माझ्याकडेसुद्धा असाच एक मौल्यवान चष्मा होता. दुसऱ्याच्या हातातले पत्ते पुस्तकाएवढे मोठाले करून दाखवणारा! त्याची किंमत किती असेल? मला तरी काय ठाऊक? मुंबईत आल्यानंतर आणि कुमारीचा हा किंमती गॉगल पाह्यल्यानंतर मला त्या चष्म्याची आठवण आली. पण मध्यंतरी काही महिने मी पत्ते

अजिबात हातात धरले नव्हते. शिवाय पत्ते खेळायला तशी कंपनी कुठं मिळाली होती मला?

मी कुमारीकडे तिचा संरक्षक-कम्-पी. ए. होण्याचं कबूल केलं, तेव्हा तिला फार आनंद झाला. ती मला बाजूला बोलावून घेत म्हणाली,-

"समर, तुला माझ्याकडून कसला त्रास, उपद्रव होणार नाही याची मी दक्षता घेईन. पण माझी 'मौसी' थोडी विक्षिप्त स्वभावाची आहे. ती चुकूनमाकून काही बोलली तर मनावर घेऊ नको म्हणजे झालं! काय?"

"हो, पण मी तुम्हांला काय म्हणून हाक मारायची?"

"तुला काय म्हणायला आवडेल त्या नावानं हाक मार. कुमारी म्हण हवं तर!"

"नाही, मी फक्त कुमारीजी म्हणेन!"

"ओ के! अरे, पण मला एक सांग, तू ड्रायव्हिंग करतोस ना!"

"हो, पण मुंबईत गाडी चालवायला भीती वाटते!"

कुमारी त्यावर हसत हसत म्हणाली, "मुंबईत गाडी चालवणं सोपं्! या महाराष्ट्रात मुंबईतल्या लोकांइतका ट्रॅफिक सेन्स कुठंच दिसणार नाही तुला!'

"मौसी आहेत कुठं सध्या!"

"यात्रेला गेलीय्. माझ्यामागे लागली होती, तुम्ही चला म्हणून. पण खरं सांगू, मला यात्राकंपनीतून जायला कुठंच आवडत नाही. शिवाय एकदा प्रâान्स, इंग्लंड पाहून आल्यानंतर कुठं बाहेर फिरावंसंच वाटत नाही!"

"कुमारीजी, तुम्हाला रेस इतकी कशी आवडते?"

"रेस हा माझा विक पॉइंट आहे, समर! रेस म्हणजे जुगार, संपत्तीचा नाश असला काही उपदेश मला कोणी करायच्या भरीला पडू नये, त्याचा काही उपयोग नाही व्हायचा!"

"मी कशाला उपदेश करायला जाऊ! मलासुद्धा रेस आवडते; पण फारसं त्यातलं कळत नाही. कळावं असंही वाटत नाही!"

"माझ्यासोबत आलास कोर्सवर की वाटेल हळूहळू!"

कुमारीकडची माझी नोकरी सुरू झाली होती. नोकरी तरी कसं म्हणायचं? केवळ ती एक स्त्री आहे म्हणून तिच्या असहाय्यतेचा कोणी फायदा घेऊ नये, यासाठी माझं बुजगावणं तिला उभं करायचं होतं. ते तिनं केलं होतं!

दारू झोकून उगाच कुमारीची गंमत करण्यासाठी आलेल्या चारचौघांना मी धक्के मारून घालवून दिलं होतं. खिशात दमडा नसताना येणाऱ्यांचं काय हात जोडून स्वागत करायचं होतं थोडंच? हजार रुपये म्हणजे काय चेष्टा आहे? पण या एक हजारात येणाऱ्या गिऱ्हाईकाचं आवडीचं ड्रिंक आणि भोजन यांचाही समावेश असे. मी याबाबत तिला विचारलं, "हा त्रास कशासाठी घेता?"

त्यावर ती म्हणाली, "अरे, इथं येणारी काही गिऱ्हाईकं ड्रिंकला बाहेर चल म्हणतात, कोणी ड्रिंक आणले तर जेवायला बाहेर जाऊ म्हणतात! कुठं असल्या लोकांच्या हातात हात घालून गावभर भटकायचं? आय डोंट लाइक दॅट! त्यापेक्षा त्या दारूसाठी आणि जेवणासाठी दोन-तीनशे रुपये खर्च झाले तरी पर्वा नाही!"

त्या दिवशी कुमारी आणि मी मार्केटला जाण्यासाठी लिफ्टमधून खाली आलो. लिफ्टमधून बाहेर पडण्यापूर्वी तिनं आरशात एकवार पाहून घेतलं आणि म्हणाली, "समर, तुला इतके दिवस वाटत होतं ना, मला हिनं कशासाठी नोकरीला ठेवून घेतलं म्हणून! आज रात्री त्याचा उलगडा होईल!"

"तो कसा काय?"

लिफ्टमधून बाहेर पडल्यावर ती गाडीत बसताबसता मला म्हणाली, "आज रात्री गडकरी यायचा आहे!"

"कोण हे गडकरी?"

"मुंबईत येऊन दोन महिने झाले तरी तुला गडकरी कोण हे समजलं नाही? कम्माल

आहे!''

''काय करतात हे?''

''पोलीस इन्स्पेक्टर आहे तो! डेअर डेव्हिल! सारं रेसचं जगत् त्याला ओळखतं. एखाद्याला माणसांतून उठवायचं त्यानं मनात आणलं तर क्षणात ते केल्याशिवाय रहात नाही! रेसकोर्सवर चोरून बेटिंग घेणारे काही लोक असतात, त्यांच्याकडून हा प्रत्येक रेसला दहापाच हजार उकळतो. अट्टल गुन्हेगार लोक त्याचं नाव काढलं की थरथर कापतात. खात्यात तो फारच हुशारं समजला जातो. कमिशनर ऑफ पोलिसदेखील कधी कधी त्याचा सल्ला विचारतात. त्याचे गुणदोष खात्याला ठाऊक असूनही त्याचं खात्यात वजन आहे!''

''आज हे गृहस्थ येणार आहेत?''

''हो, कधी कधी लहर लागली की येतो. दुपारी त्याचा फोन आला होता. फिशकटलेटस् आणि चिक्कन् करी हवीय त्याला! रॉयल सॅल्यूट व्हिस्की पाह्यजे त्याला!'

''पैसे देतो तो?''

''पैसे देतो?'' गाडी पेडर रोडकडून ग्रँटरोडकडे वळवीत कुमारी म्हणाली, ''येतो, पितो, जेवतो, झोपतो आणि जाताना हजार-पाचशे घेऊन जातो!''

''का?''

''का म्हणजे? आमच्या जिवावर धंदा करतेस तर आम्हाला काही नको? असा सवाल करतो!''

''फार वाईट हे! देह विक्रय करणाऱ्याकडून पैसा घेणं यासारखं महापाप नाही!''

''पाप आणि पुण्य! समर, तू या पुण्याच्या विचारांत गुरफटलास की संपलास! मुंबईत जगायचं तर प्रथम पाप-पुण्याच्या विचाराला चौपाटीच्या समुद्रात सोडायला हवं! तो आज ऑफ नाही झाला म्हणजे मिळवली!''

''ऑफ होतो म्हणजे काय करतो?''

''मारतो! हात पिरगळतो! केस ओढतो! तुला 'सॅडिस्ट' माणूस म्हणजे काय ठाऊक आहे ना?''

''नाही? कोणाला सॅडिस्ट म्हणतात?''

''ज्या बाईला उपभोगायचं आहे तिच्याशी प्रथम क्रूरपणा केल्याशिवाय त्याला एंजॉयमेंटच मिळत नाही!''

''माय गॉड -'' मी कपाळाला हात लावला.

''एकदा त्यानं थोबाडात दिली होती तर दोन दिवस गालावरचे वळ गेले नव्हते!''

''पण मी म्हणतो, तो इतका जर नालायक आहे तर त्याला घरात घ्यायचाच कशाला?''

''काय सांगायचं तुला, समर! सगळं ठाऊक असूनही सार निमूटपणानं सहन करावं लागतं!''

''पण मी एक सांगतो, त्यानं तुम्हांला मारपीट सुरू केली की आपण गप्प बसणार नाही! माझा देखील भेजा एकदम तापतो!''

'मग तू आज रात्री थांबूच नकोस! तसा काही प्रत्येक वेळा तो छळतोच असं नाही, कधीकधी बायकोचा बदफैलीपणा आठवून रडतोदेखील!''

''काऽय? त्याची बायको बदफैली आहे?''

''हो, अशीच माणसं पुढं पुढं क्रूर होतात. 'सॅडिस्ट' होतात. काहीजणांना जी बाई उपभोगायची आहे तिला मारून तिच्या तोंडातून रक्त आलेलं बघितल्याशिवाय बरं वाटत नाही, तर काहीजणांची क्रूरतेशिवाय कामवासना प्रदीप्त होत नाही म्हणे! असाच एक नावाजलेला नाटक सिनेमातला नट माझ्याकडे यायचा. तो आला की चळचळ कापायला व्हायचं. काय सांगायचं तुला समर, त्याच्या एकएक तऱ्हा! मेला बिचारा परवा. मेलेल्याची निंदा करू नये म्हणतात म्हणून गप्प रहायचं!''

फिश मार्केटजवळ कुमारीनं गाडी पार्क केली. मी तिच्या मागोमाग मार्वेâटात गेलो. पण

माझं मन कुमारीनं सांगितलेल्या हकिकतीमुळे बेचैन झालं होतं. मासळी बाजारात कट्टयार मांडलेल्या मासळ्या जाळ्यातून बाहेर काढल्यानंत कशा तडफडल्या असतील हा विचार त्या वेळी मनात डोकावला. कारण परिस्थितीच्या फेऱ्यात सापडलेली रुपेरी कांतीची नव्हे तर सोनेरी कांतीची एक चालती-बोलती 'मासळी' तडफडते आहे, हे मला दिसत होते. मासळी घेतल्यानंतर तिनं गाडी सुरू केली आणि ती मरीन ड्राइव्हजवळ एका बोळाच्या तोंडाशी आणून उभी केली. मीही तिच्या मागोमाग उतरू लागलो, तर ती मला इशारा करून म्हणाली,

"समर, यू प्लीज वेट हिअर!"

"का?"

"अरे, हे स्मगलर लोक भलते संशयी आहेत. तू सोबत आलास तर मला आज हवी ती रॉयल सॅल्यूटची बाटलीदेखील मिळायची नाही. आलेच मी एक पाच मिनिटांत!"

हातात कागदात गुंडाळलेली बाटली घेऊन कुमारी स्मित करीत आली आणि म्हणाली, "मिळाली बरं का! मागच्या खेपेला त्याला 'किंग जॉर्ज द फिफ्थ' व्हिस्की हवी होती. ती मिळाली नाही तेव्हा एकदम ऑफ झाला होता. बरं, सगळ्या प्रकारच्या बाटल्या घरी ठेवाव्या म्हटलं तरी शक्य नाही!" गाडीत बसल्या बसल्या स्टार्टर दाबत ती म्हणाली, "कुठल्या तरी जन्मीचा हा माझा देणेकरी असला पाहिजे!"

"पण मला ही लाचारी वाटते, कुमारीजी!"

"वाटते कसली? आहेच! पण म्हणतात ना, एकदा या दुष्टचक्रात सापडलं की सुटका नाही!"

"मला काही पटत नाही हे!"

"कोणालाही हे पटण्यासारखं नाहीच! पण मला मात्र ते पटवून घ्यावंच लागतं!"

"काय होईल तुम्ही त्याला दार बंद केलंत तर?"

"काही ना काही आरोप माथी लादून तुरुंगात डांबेल! अशा कामात त्याचं डोकं फार चालतं! पारेश रोडवर रहाणारी चंचला असंच म्हणाली होती. पण पुढं चार महिनेदेखील ती जिवंत राह्यली नाही. गुंडांनी हल्ला केला तिच्यावर भर रस्त्यावर! दवाखान्यात नेईपर्यंत संपली! मला बाई जगायचं आहे! येईल, दोन थोबाडात देईल, हात मुरगळेल, कमरेत लाथ घालील, या सर्व गोष्टी मी गृहित धरून चालते आहे! मला त्याचं आता काही वाटत नाही! तू आज असं कर, थांबूच नकोस! काय?"

"मला एकदा त्या गडकऱ्याला पहायचा आहे. तुम्ही इतकं त्याचं वर्णन केलंय म्हटल्यावर मला त्याला पहायची फार उत्कंठा लागून राह्यली आहे."

गाडी वरळी नाक्याजवळ आली असताना थांबली. लाल दिव्यानं रस्ता रोखला होता. घर पाच मिनिटांच्या अंतरावर आलं होतं. स्टीअरिंगवर हात धरून मला कुमारी पुन्हापुन्हा विचारीत होती,-

"मग जातोस ना?"

"हे पहा, मी जातो. पण त्याला पहातो नि मग जातो! काही हरकत नाही ना?"

"मुळीच नाही! तू काहीतरी बोललास तर तो भडकून उठेल म्हणून म्हणते जा!"

मी तो सद्गृहस्थ कसा आहे हे पहायला आतुरलो होतो, कुमारीसोबत मी लिफ्टमधून वर गेलो. बेल दाबली. मार्थानं दार उघडलं, तर समोर एक जाडजूड गृहस्थ पंख्याखाली खुर्ची घेऊन बसलेला. गोरापान, समोरचे केस थोडे विरळ झालेले. रेशमी नेहरू शर्ट, आणि पायजमा घातलेली व्यक्ती, इन्स्पेक्टर गडकरी आहे हे मी त्याच्या डोळ्यांवरूनच ताडलं.

"अं ऽ- कुमारी, हा कोण कुमार सोबत आणलास? का हाच तुझा तो नवीन बॉडीगार्ड? आयला! गम्मत करतेस बघ! तू धंदा करायचा राजरोस, मग हा काय 'गार्ड' करीत राहणार? येणाऱ्या-जाणाऱ्यांचे जोडे, चप्पल, बूट? पँâटॅस्टिक! काय रे नाव तुझं?"

खरं म्हणजे त्याच्या वक्तव्याने माझं डोकं भडकलं होतं. पण कुमारी माझ्याकडे पहात नजरेनं मला गप्प बसण्याविषयी खुणावत होती!

"कुठं गेली होतीस?" त्यानं विचारलं.

"मार्केटिंगला!"

"हा सारखा सोबत लागतो वाटतं?"

"समर, तू जातोस ना?" कुमारीनं मला विचारलं.

"अरे वा! समर काय नाव तुझं? नाव छान आहे, बंगाली आहेस वाटतं? ये! पितोस की नाही?"

"साहेब, आज त्याला घरी जायला हवंय. त्याच्या बायकोची प्रकृती थोडी बरी नाहीय!"

"तुझ्या बॉडीगार्डला बायको आहे तर! वा! जायचं असेल तर जा, पण मला आश्चर्य वाटतं, तुझ्या बॉडीगार्डला आपल्या बायकोची आठवण यावी याचं!" असं म्हणून तो खो: खो: हसत राह्यला.

त्यानं बॉडीगार्ड या शब्दाचा जो अर्थ लावला होता त्यामुळं माझं डोकं गरम झालं होतं. आता तो माझ्या बायकोचा उल्लेख करतो आहे हे पाहून माझं मस्तक आणखी भडकलं. माझ्या चेहऱ्यावरून कुमारीनं ते तत्काळ ओळखलं आणि ती मला हाताला धरून बाहेर ओढत आणताआणता म्हणाली, "तुझ्या पाया पडते समर, तू घरी जा."

"या हरामखोराला जरा अद्दल घडवली असती, म्हणजे मला जरा बरं वाटलं असतं!"

"प्लीज, समर, प्लीज गो!"

मी नाईलाजानं लिफ्टमधे शिरलो, लिफ्टचं लोखंडी दार बंद करताना मला कुमारीचादेखील राग आला होता. अशा मग्रूर आणि सत्तेच्या बळावर एका वेश्येवर हुकूमत गाजवणाऱ्या अधिकाऱ्याला धडा शिकवण्याऐवजी ही इतकी लाचार का बनते हे मला समजत नव्हतं. अशा प्रसंगी मला जर घरातून घालवून द्यायचं होतं, तर मला बॉडीगार्ड म्हणून घरी ठेवून घ्यायचं तरी काय कारण होतं?

लिफ्ट तळमजल्यावर आली तेव्हा तिची प्रतिक्षा करीत पाचव्या मजल्यावरचा अकौटंट जनरलच्या ऑफिसमधे काम करणारा अय्यंगार उभा होता. त्यानं मला पाहून स्मित केलं आणि विचारलं, "काय, बाहेर चाललास?'

"हां, थोडं काम आहे. जाऊन यायचं आहे!"

बिल्डिंगमधल्या कुटुंबांना मी रात्री मुक्कामाला वर असतो हे समजलं होतं. चार-सहा वेळा दारू झोकून कुमारीचं दार ठोठावणाऱ्यांना मी मानगुटीला धरून तळमजल्यावर आणून धक्के मारून बाहेर घालवल्याचं लोकांनी पाह्यलं होतं.

मी बांद्र्याची बस पकडली. उल्का आतून दार बंद करून झोपली होती. मी दार ठोठावलं तरी हालचाल नाही. शेवटी मोठ्यानं ओरडलो, तेव्हा कुठं तिनं येऊन दार उघडलं. पण तिनं दार उघडताक्षणीच मला तिच्या तोंडाचा आंबूस उग्रट असा वास आला. अगोदरच माझं गरम झालेलं त्यात ती प्याल्याचं पहाताय मी ओरडून म्हणालो,-

"काय चालवलंयस् हे? रोज पितेस?"

"हो ऽ रोज! त्याशिवाय चैनच पडत नाही. झोप लागत नाही!"

"उल्का ऽ!" मी तिचे खांदे धरून गदगदा हलवीत म्हणालो, "तू काय करते आहेस, समजतं का तुला?"

"मला काही समजत नाही, तू आज का आलास? ड्यूटी नाही तुला?"

"डयुटी गेली खड्ड्यात! खोकल्यासाठी पंच करून तुला चार-आठ दिवस ब्रँडी दिली तर तू चक्क दारूचं व्यसन लावून घेतलंस?"

"समर! मी तुला पुणं सोडायला लावलं, मला इथं चांगली नोकरी मिळेल, तूही काहीतरी कमावशील, दोघं सुखानं राहू, असं माझं स्वप्न होतं, पण आता माझा भ्रमनिरास झालाय. काल मी एका संस्थेत नोकरीच्या शोधासाठी गेले होते, तर तो अध्यक्ष मला म्हणाला, 'नोकरीशिवाय पगार मिळाला तर राहशील का?"

"काय म्हणाला?" ती काय बोलते हे मला न समजल्यानं मी विचारलं.

''नोकरीशिवाय पगार का देतो म्हणाला, नाही समजलं तुला?''

''समजलं!''

''तुलाही नोकरीशिवाय पगार मिळतोच की!''

''उल्का ऽ!''

ती हात हवेत झटकावीत क्षीण हसली आणि म्हणाली, ''तुला काय वाटलं, मी अगदी कुक्कुलं बाळ आहे? मला सारं समजलं! पण मला काही बोलायचा अधिकार नाही! मीच हट्टानं तुला इथं घेऊन आले!''

''पुरे झालं! मी जेवायचा आहे, अजून! ऊठ!''

''आज मालकिणीनं जेवण दिलं नाही? नोकरीवरून काढून टाकलं की काय?''

तिचा तोल जात होता. तशा अवस्थेत ती स्टोव्ह पेटवायला निघाली, तेव्हा मी तिला हाताला धरून कॉटवर बसवत म्हणालो,-

''आपलं काय होणार आहे, समजत नाही! उल्का, मी फार मोठा घोटाळा करून बसलो आहे. पश्चात्ताप वाटतोय, सुटकेचा मार्ग दिसत नाही-''

उल्काला छातीशी घट्ट धरून मी ज्या परिस्थितीच्या भोवऱ्यात सापडलो होतो त्यातून सुटका करून कशी घ्यायची या विचारात गढून गेलो असताना माझं दार बाहेरून कोणीतरी ठोठावत होते. अशा रात्री-अपरात्री माझ्याकडे कोण आलं असेल याचा अंदाज करीत मी उठून दार उघडलं; तर दारात निळा गणवेष घातलेले मुंबईचे चार पोलिस आणि एक सबइन्स्पेक्टर उभे! मी दार उघडल्याक्षणीच सबइन्स्पेक्टरनं माझ्या हातात बेडी ठोकली. मी त्या लोकांना विचारलं,-

''कशासाठी?''

''खून! खुनाचा आरोप आहे तुझ्यावर!''

''कोणाचा खून झालाय?'' मी आवंढा गिळत त्यांना विचारलं.

''इन्स्पेक्टर गडकरींना आठव्या मजल्यावरून खाली फेकून दिलंस आणि इथं येऊन बसलास?''

''काय सांगता काय?''

''तुला सांगायची गरज काय! चल, तू आणि कुमारीनं, दोघांनीच हा खून केलेला आहे. आमची खात्रीच झालीय आता!''

''कशावरून?''

''तू काय बोललास मघा? 'आपलं काय होणार आहे समजत नाही! उल्का मी फार मोठा घोटाळा करून बसलो आहे. पश्चात्ताप वाटतो. सुटकेचा मार्ग दिसत नाही' असं म्हणालास ना? हे तुझं बोलणं जसंच्या तसं टेप करून घेतलंय आम्ही!''

''माय गॉड! अहो, पण ते निराळ्या संदर्भात होतं, इन्स्पेक्टर गडकरी कुमारीकडे आल्याचं मला ठाऊक होतं. पण मी तिथून निघून आलो!''

''निघून आला नाहीस! अय्यंगार भेटले तेव्हा त्यांना म्हणालास, जरा बाहेर जाऊन येतो!''

''तसं म्हणालो, पण मी परत गेलो नाही.''

''आता तुझं काय म्हणणं असेल ते कोर्टात सांग.''

उल्काची नशा झटक्यात उतरली होती. घरमालकीण आणि आजूबाजूचे लोक माझ्या हातात बेड्या पडल्याचं पाहून घाबरून गेले होते. एक गृहस्थ म्हातारीला सांगत होते, ''तरी आम्ही तुला सांगत होतो, पूर्वपरिचय असल्याशिवाय कोणाला जागा देऊ नकोस! साला खुनी निघाला तो.''

माझ्या प्रारब्धाला दोष देत मी पोलिसांच्या गाडीत चढलो.

-o-o-o-

१७

मी कुमारीचा फ्लॅट सोडल्यानंतर सुमारे दीड तासानंतर ही भयानक घटना घडली होती. आठव्या मजल्यावरच्या गच्चीवरून इन्स्पेक्टर गडकरी खाली कोसळले होते. डोकं फुटून पार चेंदामेंदा झाला होता. ते वरून पडल्याचं काहीजणांनी पाह्यलं आणि ते पुढं धावले; पण क्षणार्धात सारं आटोपलं होतं. पोलीस आले, तपासाला सुरुवात झाली. कुमारीला त्यांनी त्या प्रकाराबाबत विचारलं असता तिनं काहीही सांगितलं नव्हतं! गडकऱ्यांच्या मानेजवळ, कानाजवळ नखानं ओरखडल्याच्या खुणा मात्र स्पष्ट दिसत होत्या. त्यांच्या प्रेताच्या उत्तरीय तपासणीत त्या जखमा मृत्यूपूर्वीच्या होत्या असा निर्वाळा शवविच्छेदन करणाऱ्या डॉक्टरांनी दिलेला होता. याचा अर्थ स्पष्ट होता की, वरून खाली पडण्यापूर्वी त्यांच्याशी कोणीतरी झटापट केली होती.

त्या वेळी फ्लॅटमधे कुमारी आणि मार्था या दोघीच होत्या. 'मौसी' अजून यात्रेवरून परत आलेली नव्हती. पोलिसांनी मार्थाला विचारलं, तेव्हा तिनं सांगितलं, मालकिणीची किंकाळी ऐकून मी तिच्या खोलीकडे धावले तेव्हा खोलीचं दार आतून बंद होतं. पण दारावर जोरजोरानं धडका देताच दार उघडलं गेलं, त्या वेळी कुमारी संपूर्ण नग्नावस्थेत होती. भयभीत होऊन वेड्यासारखी माझ्याकडे पहात होती. मी तिच्या अंगावर कॉटवरची बेडशीट टाकली आणि विचारलं, काय झालं? तेव्हा तिनं काहीही न बोलता फक्त गच्चीकडे बोट दाखवलं! मी गच्चीत जाऊन खाली पाह्यलं. मर्क्युरी लाइटच्या प्रकाशात गडकरी इन्स्पेक्टरांचं प्रेत पडलं होतं. खाली गोल वर्तुळाकार गर्दी जमली होती. काही क्षणांत पोलीस वर येणार हे जाणून मी तिला कपडे करायला सांगितलं. पण तिला कशाचंच भान नव्हतं. ती वेड्यासारखी डोळे मोठे करून माझ्याकडे पहात होती. मीच तिला कपडे चढवले! पाच मिनिटातच पोलीस वर आले. त्यांनी कुमारीला विचारलं, 'हे कसं घडलं?' पण ती काहीही बोलू शकली नाही. भ्रमिष्टावस्थेत असल्यासारखी हवेत बोटं उडवीत होती. मार्थाकडून अगर कुमारीकडून काहीच निष्पन्न न झाल्याने दुसऱ्या दिवशी मला पोलीस इन्स्पेक्टर साखरे यांनी विचारायला सुरुवात केली,-

"समर ठाकूर नाही का आपण?"

"हो!"

"आपण या कुमारीकडे मुक्कामालाच रहात होता अलीकडे!"

"होय! बॉडीगार्ड म्हणून!"

"ते कसंही असा, पण रहात होता हे खरं?"

"हो!"

"मग काल रात्री तुम्ही घरी बांद्र्याला तातडीनं जायचं कारण काय घडलं?"

"कारण असं काही घडलं नाही. इन्स्पेक्टर गडकरी आल्यानंतर कुमारीनंच मला घरी जायला सांगितलं!"

"ते का? तिच्या सरंक्षणासाठी तुम्हाला तिनं खास नेमून घेतलं असताना तुम्ही तिथून निघून जा असं तिनं सांगावं याचं कारण काय?"

"तसं खास काही कारण नव्हतं! कुमारी म्हणाली, आज तुला सुट्टी!"

"मिस्टर ठाकूर, हा प्रकार घडल्यानंतर तुम्ही बांद्र्याला तातडीनं गेलात याचा निष्कर्ष एकच-- तुम्ही खुनी आहात."

"तो खोटा आहे!"

"अकौंटंट जनरलच्या ऑफिसांतले अय्यंगार यांना तुम्ही ओळखता?"

"हो, ओळखतो. त्या रात्री साडेआठच्या सुमारास लिफ्टमधून मी बाहेर आलो, तेव्हा

अय्यंगारच मला भेटले होते!''

''त्यांना तुम्ही सांगितलंत की, मी थोडं बाहेर जाऊन येतोय म्हणून!''

''म्हणालो असेन, पण मी परत आलो नाही हे नक्की!''

''परत येणार नव्हतात तर मग असं खोटं सांगायचं कारण काय होतं?''

''सहज बोललो. खोटं सांगावं असा हेतू नव्हता, साहेब!''

''पाचव्या मजल्यावरचे हे अय्यंगार, चौथ्या मजल्यावरचे दोशी, तिसऱ्या मजल्यावरचे देशिंगकर ही सर्व मंडळी सांगतात की कुमारीची किंकाळी ऐकल्यानंतर तात्काळ वरून लिफ्ट खाली गेली आणि तुम्ही टॅक्सी स्टँडकडे पळत गेलात!''

''हे साफ खोटं आहे! अय्यंगार, दोशी, देशिंगकर या कुटुंबाची कुमारीनं ती जागा सोडावी अशी बऱ्याच दिवसांपासूनची इच्छा हाती. कुमारीकडे येणारी गिऱ्हाईकं कधी कधी आपली दारं ठोठावतात अशा लेखी तक्रारीही त्यांनी पोलीस स्टेशनला केल्या होत्या!''

''कुमारीबद्दल त्यांची तक्रार असेल; पण तुमचं नाव या प्रकरणी का गोवलं जावं?''

''कुणास ठाऊक?''

''मिस्टर ठाकूर!'' इन्स्पेक्टर साखरे सिगारेट पेटवून एक मोठा झुरका घेऊन म्हणाले, ''पुण्यात हॉटेल हेवर्डस्मध्येही असाच काहीसा प्रकार घडला होता नाही?''

मी साखरेंच्याकडे आश्चर्यचकित होऊन पहात म्हणालो, ''तो प्रकार घडण्यापूर्वी एक दिवस अगोदर मी पुणं सोडलं होतं.''

''ते ठाऊक आहे, पण तुम्ही पुणं सोडलं तेदेखील संशयास्पद स्थितीत पहाटे. वॉचमनच्या उशाची किल्ली घेऊन दार उघडून बाहेर गेलात, नंतर मनीऑर्डरनं पैसे पाठवलेत, तो सर्व वृत्तांत मला समजलेला आहे!''

''त्या प्रकरणाचा या प्रकरणाशी काय संबंध?''

''फार साम्य आहे. तुम्ही ज्या ठिकाणी असता तिथून अचानक निघून जाता आणि मग तिथे असा काहीतरी भीषण प्रकार घडतो!''

इन्स्पेक्टर साखरे सिगारेट ओढताओढता हसले आणि म्हणाले; ''मिस्टर ठाकूर, तुम्ही त्या वेळी तिथं होता की नव्हता याबाबत मी कोणताही अंतिम निष्कर्ष काढलेला नाही. पण एक गोष्ट मला खटकते, तुम्ही जिथं जिथं जाता तिथं तिथं असा भीषण प्रकार का घडावा?''

''गॉड नोज! मी काहीच कल्पना करू शकत नाही!''

''गडकऱ्यांच्या अंगावर नखानं ओरबाडलेल्याच्या खुणा होत्या, शिवाय गडकरी हे एकाच वेळी दोन-तीन माणसांना लोळवू शकले असते, इतक्या भक्कम शरीरयष्टीचे होते!''

''हो, पण दारू त्यांना लोळवू शकत होती!''

साखरे हसले आणि म्हणाले, ''तुम्ही कायद्याचा अभ्यास केलेला दिसतो. मिस्टर ठाकूर!''

''मी अभ्यास केलेला नाही; पण मी एका कायदेपंडिताचा मुलगा आहे.''

''आय नो दॅट! म्हणूनच प्रत्येक ठिकाणी तुम्ही तुमची 'ॲलिबी प्रूव्ह' करू शकला!''

''मी नव्हतोच, तर ॲलिबी प्रूव्ह करायचा प्रश्न कुठे निर्माण होतो?''

''अच्छा! पण मला आपण एक सांगा, रोज रात्री आपण मुक्कामाला कुमारीच्याकडे असता; मग कालची रात्रच बाहेर का गेलात?''

''त्याचं कारण कुमारीलाच तुम्ही विचारा!''

''आम्ही विचारलेलं आहे. ती बोलत नाही. पुन्हाही विचारू, पण तुमच्याकडून काही खुलासा मिळतो की काय हे पहायचं होतं!''

माझ्या हातातल्या बेड्या काढण्यात आल्या. इन्स्पेक्टर साखरे मला सिगारेट ऑफर करीत म्हणाले, ''मिस्टर ठाकूर, तुम्ही त्या वेळी फ्लॅटवर नव्हता याबद्दल माझी खात्री झाली आहे. या फ्लॅटमधल्या लोकांना कुमारीनं इथं राहू नये असं वाटणं स्वाभाविक होतं. त्यांनी तुमचं नाव घेतलेलं नाही. मघा मी उगाच तुमचा अंदाज घेण्यासाठी खोटं सांगितलं त्या वेळी लिफ्ट खाली गेली असं! एनी वे, यू आर प्रâी टू गो.''

कल्पना नसताना पोलिसांनी माझ्या बेड्या काढल्या; पण कुमारी मात्र पोलिसांच्या ताब्यातच होती. गेले दीड-दोन महिने मी तिच्या सहवासात होतो. तिच्या स्वभावातले गुणदोष मला ठाऊक झाले होते. ती उघड उघड धंदा करीत होती; पण माझ्याशी वागताना ती अत्यंत संयमानं आणि जिव्हाळ्यानं वागते आहे हे मी ओळखलं होतं. हळव्या मनाच्या कुमारीच्या हातून खुनासारखा घोर गुन्हा घडेल अशी अपेक्षाच नव्हती. त्यात गडकरी हा माणूस चार माणसांच्या ताकदीचा. तो काय एखादं जुनाट मोडकं खेळणं वरून फेकावं तसा वरून फेकला जाणार होता थोडाच! पण त्या नखानं ओरबाडल्याच्या खुणा कोणी केल्या? कुमारी त्या वेळी संपूर्ण विवस्त्र होती, ती का?... नेमकं काय घडलं, हे मलाही समजत नव्हतं.

माझ्या आयुष्यात इतकी उलथापालथ होईल याची मुळीसुद्धा कल्पना नव्हती. एक तर उल्का मद्याच्या आहारी गेली होती. मुंबईत आपण स्वत:च्या पायांवर उभं राहून दाखवू ही तिची उमेद साफ धुळीला मिळाल्यानं तिला वैफल्यानं ग्रासलं होतं. म्हणून मद्याचा आश्रय घेणं हा काही त्यावर तोडगा नव्हता. उल्काची चिंता वाटत असतानाच कुमारीच्या या प्रकरणांत मी गोवलो होतो.

इन्स्पेक्टरनी मला 'तुम्हाला मोकळं केलं आहे' असं सांगितलं खरं; पण मुंबईच्या पोलिसांची करामत मला ठाऊक होती. पकडलेल्या माणसाला तुला सोडलेलं आहे, जा म्हणायचं आणि त्याच्या हालचालींवर पाळत ठेवायची. तो कुठे जातो, कोणाशी बोलतो, हे साध्या वेषातील गुप्त पोलिसांची टेहळणी ठेवून 'वॉच' करीत रहायचं. कधी कधी गुन्ह्याशी निगडित असलेल्या इतर व्यक्तींची माहिती या पद्धतींनं मिळू शकते. माझ्यावरदेखील त्यांनी तोच डाव टाकला असण्याची दाट शक्यता होती. मला त्या प्रकरणातलं काहीही ठाऊक नव्हतं; मग माझ्यावर वॉच ठेवून काय उपयोग होणार होता?

चौथ्या दिवशी रॉबर्टच्या दुकानी आलो. तो रॉबर्टनं मला पाहून न पाह्यल्यासारखं केलं. मी माणसांच्या डोळ्यांवरून त्याचं आपल्याविषयी काय मत आहे हे अजमावतो. रॉबर्टची ती नजर मी तात्काळ ओळखली आणि त्याला म्हणालो,-

"जिजस शपथ घेऊन सांगतो, मला यातलं काहीसुद्धा ठाऊक नाही. मी निरपराध आहे. मला पोलिसांनी सोडून दिलं. रॉबर्ट, माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस!"

"मेहेरबानी कर आणि इथून जा!"

"माझं ऐक रॉबर्ट, मला काहीसुद्धा ठाऊक नाही रे!"

"लिसन! प्लीज गो!"

मी तसाच त्याच्या दाराच्या पायरीशी उभा होतो, तेव्हा त्यानं भिंतीवरच्या एका घड्याळाकडे पाह्यलं आणि तो स्वत:च उठला आणि त्यानं दुकान बंद केलं. तो वरळीनाक्याच्या रोखानं चालू लागला.

मी आवंढा गिळला. ज्या वेळी मला लोकांनी समजून घ्यावं, ओळखावं ही इच्छा होती, त्या वेळी माणसं मला पाहून पाठ फिरवून निघून जात होती. फार विचित्र असा परिणाम माझ्या स्वभावावर घडत होता. या जगात कोणाचीही फिकीर करू नये, मन मानेल तसं वागावं, पापपुण्याच्या भेकड कल्पनांना डोक्यात थारा देऊ नये. उजाडलेला दिवस आणि आत्ता आत्ताचा क्षण इतकाच आपला. या नंतरच्या क्षणी आणि उद्या काय घडणार आहे याची चिंता मुळीसुद्धा करू नये, असले विचित्र विचार माझ्या डोक्यात शिरत होते.

अलका, सलिमा, उल्का आणि कुमारी या चारजणींनी माझ्या जीवनात प्रचंड खळबळ माजवली होती. माझ्या आयुष्याचं हे तारू अलकानं या विचित्र जीवनसागरात लोटलं. पुढे पुढं ते सलिमा, उल्का आणि कुमारी अशा स्त्रियांच्या सहवासांत वर-खाली होत राह्यलं. पर्वतप्राय लाटा नजरेसमोर दिसत होत्या. यातून मी सुखरूप एखाद्या किनाऱ्याला लागेन, असा काही भरवसा देता येत नव्हता....

डोक्यातले विचार मला चालवत होते की मी चालत होतो म्हणून विचारचक्रही धावत होतं, समजत नव्हतं! वरळी नाक्यावरून मी सातरस्त्याला लागलो. सातरस्त्यावरून डिलाईल रोडला जाताना वाटेत तो तुरुंग लागला. याच तुरुंगात कुमारीला ठेवलेलं होतं, 'अंडर ट्रायल प्रिझनर'

म्हणून! गडकरी इन्स्पेक्टर यांना गॅलरीतून ढकलून देऊन ती त्यांच्या मृत्यूस कारणीभूत झाली असा तिच्यावर आरोप होता, जाबजबाबाचं सत्र सुरूच होतं. पोलिसांनी कुमारीच रिमांड लांबवली नव्हती.

मी जेलरला अर्ज दिला. मला कुमारीला भेटायचं होतं. जेलरनं मी कोण, कशासाठी आलो हे विचारून घेतलं, आणि मला भेटायची परवानगी दिली.

भकास झालेल्या चेहऱ्यानं कुमारी लोखंडी गजाआड बसली होती. कपाळावर केसांची एक बट लोंबत होती. तिनं माझ्याकडे आपादमस्तक पाह्यलं आणि ती म्हणाली, "घरी गेला होतास?"

"कोणाच्या घरी म्हणालीस? माझ्या की तुझ्या?"

"माझ्या रे?"

"नाही गेलो!"

"आज जा, मौसी बहुतेक आली असेल. कोणीतरी वकील गाठून मला जामिनावर खुलं करायचा प्रयत्न कर, इथं रात्रभर ढेकणं फोडून खातात, इथलं अन्न जनावरंदेखील खायची नाहीत! हा खटला चालायला किमान तीन ते चार महिने लागतील! या खटल्यातून जामिनावर जर नाही सुटले तर फुक्कट मरून जाईन! मौसीकडून जरूर तितके पैसे घे आणि एखादा बऱ्यापैकी वकील दे!"

वकील म्हटल्याबरोबर मला डॅडींची आठवण आली. मागे पुण्यांत दौलतखानावर झालेल्या केसमधे मी डॅडींना बोलावून घेतलं होते; पण दौलतखानाने आपल्या नात्यातला कोणीतरी वकील मधेच घुसडला आणि दौलतखान जन्मठेपेला गेला. डॅडींना ती केस शेवटपर्यन्त चालवणं अशक्य झालं होतं. निदान कुमारीवरचा खटला तरी डॅडींनी चालवावा असं वाटल्यानं मी त्यांना पत्र पाठवले. पत्रात साद्यंत हकीकत लिहिली.

कुमारीची, 'मौसी' यात्रेवरून परत आली होती. मी तिला अद्याप काळी की गोरी पाह्यलेली नव्हती. मी तिला भेटायला गेलो.

माझ्याकडे संशयानं पहात ती म्हणाली,-

"मुंगीदेखील कधी तिनं मारली नाही, माणूस कसा मारेल? हा कुणाचातरी डाव आहे तिला अडकवायचा!"

"कोणाचा डाव असेल?"

"कुणास ठाऊक! पण असं तिच्या हातून घडणार नाही!"

मौसी चाळीसपंचेचाळीस वर्षांची, गोरी, किंचित् स्थूल होती. चेहऱ्यावर देवभक्तीचा आव आणलेला असला तरी ती कमालीची कामासक्त वाटत होती. माझ्याकडे ती टक लावून पहातानादेखील तिच्या नजरेतली ती कामासक्ती जाणवली. कुमारी उघड धंदा करत असून तिच्या नजरेत हे भाव मला कधीच दिसले नव्हते.

"मौसी, कोण जबाबदार आहे ते आता खटला संपल्यावर समजेल. आता ती चर्चा करीत बसण्यात अर्थ नाही. वकीलपत्र द्यायला हवंय! कुमारीला जामिनावर सोडवून घ्यायला हवं आहे!"

"पण अय्यंगार म्हणत होते, खुनाचा आरोप असलेल्या आरोपीला जामिनावर सोडता येत नाही!' मौसी.

"अय्यंगारांना कशाला विचारायला गेलात? ते कुमारीला पाण्यात पहातात! सगळेच - अय्यंगार, दोशी आणि देशिंगकरदेखील!"

मौसी माझ्याकडे रोखून पहात म्हणाली, "तू तिला भेटायला गेला होतास?"

"हो, आत्ताच तिथून येतोय. मार्थाच्या घरी जाऊन तिला बोलावून आणायला हवं!"

"मार्था?" मौसी माझ्याकडे उगाच संशयानं पहात म्हणाली, "तू आज इथं रहाणार आहेस?"

"हो! कुमारीनंच तसं सांगितलंय!"

"ठीक आहे!"

तुमच्याकडून खर्चासाठी दोन हजार रुपये हवे आहेत!''

''दोन हज्जार?'' मौसी जवळजवळ चित्कारलीच.

''कुमारीला जामिनावर खुलं करायला हवंय!''

''माझ्याजवळ कुठले पैसे रे?''

''तुमच्याकडे आहेत असं सांगितलंय तिनं!''

''बरं, उद्या सकाळी ये!''

मौसी ही कुमारीची सख्खी मावशी नव्हतीच! तिच्या दूरच्या नात्यातली होती. कुमारीला आधारासाठी कोणीतरी पोक्त व्यक्ती घरी हवी होती; म्हणून तिनं तिला बोलावून घेतलं होतं! पण ही बाई अत्यंत कारस्थानी होती. कारस्थानी माणसं देवभक्तीचं ढोंग अती करतात, त्याला मौसी अपवाद नव्हती. कुमारीच्या पैशावर चारीधाम यात्रा करून आली होती. अधूनमधून कुमारीची भरभराट व्हावी म्हणून अभिषेक, महापूजा असले प्रकार करीत होती. कुमारी तशी भाबडीच होती; तिला वाटायचं, आपण अनैतिक मार्गानं पैसे कमावतो, त्यामुळं पापसंचय होतो; मौसी म्हणते त्याप्रमाणं अभिषेक अन् महापूजा यांच्या साहाय्यानं पापक्षालन होईल.

कुमारीकडून हा गुन्हा घडला आहे, तिला या कामी शिक्षा होणार आणि तिचा फ्लॅट, फर्निचर, पैसाअडका, दागिने आपल्यालाच मिळणार या कल्पनेत मश्गुल असलेल्या मौसीला मी कुमारीला जामिनावर सोडवून आणणार हे ऐकल्यानं सखेद आश्चर्य वाटलं!

तिनं मला दुसऱ्या दिवशी भेटायला सांगितलं म्हणून मी दुसऱ्या दिवशी फ्लॅटवर गेलो. तर मार्था डोकं धरून बसलेली!

''काय झालं ग, मौसी कुठंय?''

''अरे, रात्री तिजोरी उघडून कुमारीचे दागदागिने पैसे घेऊन पळाली!''

''काय, सांगतेस! किती पैसे होते! दागिने कोणते होते!''

''मला तरी काय ठाऊक?''

''हे काही बरं झालं नाही! पोलिसांत कळवायला हवं!''

''पण त्या तिजोरीत काय होतं हे समजल्याशिवाय काय कळवणार तू?''

''तेही खरंच आहे. मी जातो, परत जेलमधे जाऊन कुमारीला भेटतो!''

जेलमधे भेटून मी कुमारीला ती वार्ता सांगितली तेव्हा ती हसली. मला चमत्कारिक वाटलं.

''माझा अंदाज खरा ठरला, समर!''

''कसला अंदाज?'

''मौसी असा मला एक ना एक दिवस दगा देणार हा! पण तीच फसली!''

''ते कसं काय?''

''पैसे बँकेत आहेत माझे. खरे दागिने लॉकरमधे ठेवलेत. जे खोटे, दिखाऊ होते तेच घरी होते. फार उपकार झाले तिचे. केव्हा केव्हा तिला घालवून द्यावं असं मला वाटे; पण माझा स्वभाव पडला भिडस्त, तिला 'जा' म्हणणं अगदी जिवावर येई माझ्या!''

फिर्याद द्यायला नको?''

''मुळीच नको! स्वत: होऊनच ती तिथनं गेली हे फार बरं झालं!''

''मग तुम्ही पैसे आणायला कसं सांगितलंत?''

''तसे पाचसहा हजार तिच्यापाशी ठेवले होते मी! पण आता त्याचा विचार नको. माझं चेकबुक ड्रेसिंग टेबलाच्या खालच्या खणांत आहे, ते घेऊन ये. चेक देते मी!''

तिसऱ्या दिवशी सकाळी डॅडींना आणायला मी बोरीबंदरवर गेलो. गाडीतून उतरताच माझ्या हातात हात देऊन ते म्हणाले,

''हॅलो समर! जिथं जाशील तिथं असा काहीतरी प्रकार घडतो, ही काय भानगड?'

''मला काहीच समजेनासं झालंय, डॅडी!''

''बरं, उतरायची व्यवस्था कुठं केलीयस?''

"फ्लॅटवरच!"

"कोणाच्या?"

"तुम्हाला ज्या कुमारीची केस चालवायची आहे, तिच्याच!"

"अच्छा!"

डॅडींची बॅग मी हातात घेतली. ते किंचित कृश दिसत होते. चालता चालता मी विचारलं, 'आई कशी आहे?"

"ठीक आहे! अजून तिची आठवण येते?"

"आई आहे ती माझी!"

"अलका ग्रॅज्युएट झाली, बी. टी. ला नाव दाखल करते आहे! शी इज कंप्लिटली चेंज्ड! तू ओळखणार नाहीस इतका बदल झालाय तिच्यात?"

"आचारात की विचारात?"

"दोन्हीत!

"पण तुम्ही तिला एलएल. बी. करणार होता ना?"

"हो, तशी माझी इच्छा होती; पण तिनंच बीटी.ला जायचा निर्णय घेतला, मग काय करणार! पण काय रे, तू पुण्यातल्या कोणा पोरीशी लग्न केलंस म्हणून माझ्या कानांवर आलं होतं, ते खरं का?"

"होय! त्याबद्दलही पस्तावतो आहे आता! या आयुष्यात कोणतीही स्त्री प्रदीर्घ काळ मला सहवास देऊ शकणार नाही असा कदाचित् नियतीचा हेतू असावा!"

टॅक्सीत बसताबसता डॅडी म्हणाले, "यू आर लकी!"

त्यांच्या शेजारी बसताबसता मी म्हणालो, "जीवनसाथी म्हणून जी स्त्री निवडावी ती मन:स्ताप देते, मग मी लकी आहे असं कसं म्हणता!" ड्रायव्हर प्रश्नार्थक मुद्रेनं माझ्याकडे पहात होता, त्याला मी म्हणालो, "वरळी नाका!"

माझ्या मांडीवर हात ठेवून डॅडी म्हणाले, "जाऊ दे, सोड तो विषय. तुझ्या आईनं या खेपेला मुंबईला माझ्यासोबत येण्याचा खूप हट्ट धरला होता; पण मी तिला वचन देऊन आलो आहे!"

"कसलं!"

"तुला चार दिवस भवानीनगरला सोबत घेऊन येईन असं!"

"मी!"

"हो, का! अडचण कसली आहे!"

"डॅडी, ही केस संपल्यावर आईलाच चार दिवस इकडे बोलावून घेईन?"

"ती दमेकरी! तिला मुंबईची हवा बिल्कुल मानवणार नाही. तूच चार दिवस येऊन गेला असतास तर! अलकाही-"

डॅडींचा हेतू मी तात्काळ ओळखला, माझी व अलकाची दिलजमाई करायचा विचार दिसला त्यांचा! खरं म्हणजे तिच्याबद्दलचा माझ्या मनांतला तिरस्कारही काही प्रमाणात कमी झाला होता; पण तरीही तुटलेली तार परत सांधणं शक्य नव्हतं.

"बाये हात से लो!"

ड्रायव्हरनं परवीन व्हिलाजवळ गाडी आणताच मी त्याला थांबण्याची सूचना केली.

लिफ्टनं वर येताच डॅडी म्हणाले, "लहानपणी मी शिकायला होतो ती मुंबई आणि आजची मुंबई यात केवढा प्रचंड फरक पडलेला आहे!"

"माणसंसुद्धा बदलली आहेत!"

"पॉप्युलेशनचं असं भरमसाट कंजक्शन झालं की, अनेक समस्या निर्माण होतातच!"

बेल दाबताच मार्थानं दार उघडलं.

"मार्था, मीट माय डॅडी!" मार्थानं कमरेत वाकून डॅडींना अभिवादन करून स्मित केलं.

डॅडींनी सारा फ्लॅट फिरून पाह्यला, आणि मला विचारलं, "ही व्यवसाय काय करत

होती?''

मला संकोच वाटला; म्हणून मी म्हणालो, ''सुखवस्तू होती!''

डॅडी त्यावर माझ्याकडे पहात म्हणाले, ''समर, एखादा माणूस घरचा सधन असला आणि काही उद्योगधंदा करीत नसला की लोक त्याला सुखवस्तू म्हणतात. पण या कुमारीसारखी तरुण सुंदर स्त्री काही न करता रहात असेल, तेव्हा एकच निष्कर्ष निघतो!''

''कसला!''

''ती धंदा करते!''

मी काहीच न बोलतां समुद्राकडे पहात उभा होतो. डॅडी उठून माझ्याजवळ येऊन उभे रहात म्हणाले, ''मर्डर झाला म्हणतात ती जागा हीच का!''

''हो, याच गॅलरीतून ते खाली कोसळले!''

डॅडींनी त्या गॅलरीच्या उंचीचा अंदाज घेतला. तिथं उभ्या असलेल्या माणसाचा तोल जाऊ शकेल का हे अजमावलं. आल्या क्षणापासूनच त्यांनी मला माहिती विचारायला सुरुवात केली होती. त्या प्रकरणी मला जे जे ठाऊक होतं ते ते सर्व मी डॅडींना सांगून म्हटलं, ''गडकरी इथून तोल जाऊन खाली पडले अशी थिअरी आपल्याला मांडता येणं शक्य होतं डॅडी; पण त्यांच्या अंगावर नखानं ओरबाडल्याच्या खुणा होत्या, त्यांचं काय करायचं? त्या जखमा कशामुळे झाल्या! आपल्याला त्याचा खुलासा करावा लागेल ना!''

''निश्चितच करावा लागेल! पण माझ्या दृष्टीनं त्यात फारसं कठीण काही नाही!''

''मला कठीण वाटतं!''

डॅडी हसत हसत म्हणाले, ''त्या ओरबाड्यांचा उपयोग बचावासाठी करता येणं शक्य आहे.''

-o-o-o-

१८

त्या रात्री डॅडींनी माझ्याकडून व मार्थाकडून कुमारीची माहिती विचारायला सुरुवात केली. मार्था गेली चार वर्षं कुमारीकडे नोकरीला होती. कुमारीचा तिच्यावर नितांत विश्वास होता. तिच्यावर घर सोपवून ती खुशाल बाहेर जात असे. पण 'मौसी'वर मात्र तिनं असा कधीही विश्वास टाकला नव्हता. डॅडींनी मार्थाला विचारलं,-

"हे गडकरी इन्स्पेक्टर, तो प्रकार घडण्याआधी किती वेळा आल्याचं तुला ठाऊक आहे?"

"ते काही वारंवार येत नसत; दोनतीन महिन्यातून एकदा यायचे. पण ते यायचे असले की अगोदर सूचना देत. जेवायलाच ते रहात असत. शिवाय जेवणात कोणते पदार्थ हवेत याबद्दल फोननं आगाऊ सूचना देत!"

"असे आणखी कोणी सूचना देऊन येत?"

"कोणी नाही! हेच एकटे येत!"

"ते येणार आहेत असा फोन आला की कुमारी आनंदित होत असे की भीत असे?"

"भ्यायच्या! फोन आला की प्रथम ग्लासभर थंड पाणी प्यायच्या! कोरडच पडायची त्यांच्या तोंडाला."

"ते मुक्काम करायचे ना?"

"हो! पहाटे जायचे!"

"रात्री काय प्रकार घडायचा?"

"कधी कधी ती रडल्याचा आवाज यायचा; कधी फक्त हुंदके!"

डॅडींनी सिगारेट शिलगावली आणि ते मला म्हणाले, "समर, सायकोपाथ-सेक्स ज्याला म्हणतात तसलाच प्रकार हा गडकरी करत असेल! टेरिबल! ही एक लैंगिक विकृतीच आहे. ज्या स्त्रीशी रत व्हायचं त्या स्त्रीचा छळ करायची ही वृत्ती काही लोकात असते. गडकऱ्याला हे मरण आलं यात वाईट असं काहीच घडलं नाही."

"पण कुमारी सापडली ना!"

"डोंट वरी! शी वुइल बी ॲक्विटेड!"

"मला कठीण वाटते तिची सुटका!"

डॅडी हसतहसत म्हणाले, "बरे, ड्रिंकची व्यवस्था आहे का बाहेर जायचं?"

"ती सारी व्यवस्था आहे. जेवणदेखील तयार आहे!"

"धिस इज मॅनरलेस! मी ड्रिंकची व्यवस्था आहे का विचारतो आहे तर तू जेवण तयार आहे म्हणून सांगतो आहेस!"

हसतच मी उठलो आणि कुमारीच्या कपाटातून व्हिस्कीची बाटली घेऊन येतायेता म्हणालो, "तसा उद्देश नव्हता डॅडी. बराच वेळ झाला आहे म्हणून म्हणालो!"

"दॅटस ऑल!"

ग्लास ओठाला लावून एक सिप घेऊन डॅडींनी मला विचारलं, "पुण्यातली कोण पोरगी आणलीयस?"

"नंतर ते सर्व सांगतो डॅडी!"

"याचा अर्थ तिच्याबद्दल काही सांगायची इच्छा नाही!"

"आज तरी नाही! कुमारीला प्रथम जामिनावर सोडवून घ्यायचं काहीतरी पहायला हवं."

"डोंट वरी! उद्या संध्याकाळपर्यंत तिला घरी आणू!"

"पण मर्डरचा आरोप असला तर जामिनावर सोडायला सेशन कोर्ट थोडी खळखळ करतं

ना?''

''करू देत ना!''

''डॅडी, हे गडकरी इन्स्पेक्टर होते ना, हे बऱ्याच बायकांना असे छेडायचे; त्यांचा काही उपयोग करून घेता येईल?''

''केस चालू झाल्यानंतर कोणता डिफेन्स घ्यायचा हे ठरवू! आता याबद्दल वाटाघाटी नको, पण गडकरी इन्स्पेक्टर असे एखाद्या वेश्येकडे जात असल्याबद्दलची माहिती मिळाली तर बरं होईल! पण काय रे, पोस्टमॉर्टेम करणाऱ्या डॉक्टरांनी 'व्हिसेरा' प्रीझर्व्ह केला आहे का?''

''हो, तो केमिकल ॲन्लायझरकडे पाठवलाय म्हणे! अद्याप रिपोर्ट आलेला नाही.''

''गडकरी प्याला होता ना?''

''नेहमीच जाम प्यायचा! रात्री जवळजवळ सहा बडे पेग प्याला होता म्हणे!''

''दॅटस् गुड!''

''पण त्या ओरखड्यांचं काय करायचं डॅडी?''

डॅडी हसले आणि म्हणाले, ''तू ती ओरखड्यांची भीती डोक्यातून काढून टाक!''

मार्था किचनमधलं सारं आटोपून आमचं बोलणं ऐकत बाजूला स्टुलावर बसली होती. कुमारीच्या सुटकेसाठी कोणकोणते मार्ग अवलंबिले जाणार आहेत हे ऐकायला ती उत्सुक होती.

इतक्यात डॅडी सिगारेटची राख ॲशट्रेमधे झटकताना त्यांचा व्हिस्कीचा ग्लास लवंडला, ''असू दे! मार्था, ते टेबल जरा घे इकडे!'' मी म्हणालो.

मार्था बसलेल्या ठिकाणी एक शिसवीचं जाड आडवं टेबल होतं. ते मार्थानं एकटीनं उचलून आणून आमच्यासमोर ठेवलं. डॅडींनी व्हिस्की पुन्हा ओतून ग्लास त्या टेबलावर ठेवण्यापूर्वी त्या टेबलाचं वजन किती आहे हे थोडं उचलून अजमावलं. टेबल उचलून आणताना मार्थाच्या दंडाचे स्नायू डॅडी अवलोकन करीत होते. टेबल ठेवून झाल्यावर ते मार्थाला म्हणाले,--

''पाच मिनिटांत आम्ही येतो. मला खूप गरम लागतं बरं!''

त्यांनी मार्थाला तेथून आत पाठवायचं होतं हे मी लगेच ओळखलं. मार्था आत गेल्यानंतर डॅडी मला म्हणाले,''आता कोडं उलगडलं!''

''कसलं?''

''गडकऱ्याला गॅलरीतून खाली फेकायला एकटी कुमारी असमर्थ होती. या मार्थानं तिला निश्चित मदत केली असली पाहिजे! हे टेबल हलवून बघ किती जड आहे? एकटीनं अगदी सहज आणलं!''

''पण मार्थानं पोलिसांना सांगितलं की, ती त्या खोलीत नव्हती!''

''तसं सांगणंच इष्ट होतं! कुमारी विवस्त्र होती, आपण तिच्या अंगावर बेडशीट गुंडाळली वगैरे वगैरे हे सर्व कपोलकल्पित आहे. या दोघींनीच त्याला गॅलरीतून खाली फेकलं असलं पाहिजे! आय ॲम शुअर!''

''माय गॉड? असं कसं शक्य आहे, डॅडी?''

''अरे, गळ्यापर्यंत पाणी आलं की माकडीण पाठीवरचं आपलं पोर पायाशी घेऊन त्यावर उभी रहाते, मग इथं हा नेहमीच येऊन छळणारा राक्षस! असह्य झाल्यावर काय करणार? मार्थाची कुमारीवरची भक्ती म्हण, निष्ठा म्हण संशयातीत आहे, तिनंच सहा पेग प्यालेल्या गडकऱ्याचे पाय हे टेबल उचल्यासारखे उचलून त्याला फेकून दिलं असल्याची दाट शक्यता आहे!''

''बाकी मार्थाची ताकद मोठी आहे हे मी दोनतीन वेळा पाह्यलं आहे. एकदा लिफ्टमधलं कोळशाचं भरलेलं पोतं तिनं उचलून आत आणलं, तर दुसऱ्या वेळी क्रॉफर्ड मार्केटमध्ये बागवानाशी भांडण झालं त्या वेळी बागवानाला तिनं जेव्हा ढकलून दिलं तेव्हा तो चक्क खाली कोसळला!''

''का भांडण काढलं?''

''कुमारीनं आंब्याची पेटी घेतली होती आणि शंभर रुपयांची नोट त्याला दिली. त्यानं ती गल्ल्यात टाकली आणि परत पैसे मागू लागला. कुमारी पैसे दिल्याचं वारंवार सांगूनही तो ऐकेना;

म्हणून मार्था भडकली आणि तिनं त्याला गल्ल्यावरून ओढून रस्त्यावर ढकलला! ही गर्दी जमली, पोलीस आले; पण मार्थाच्या अंगाला हात लावायची हिंमत झाली नाही कोणाला!''

''व्यायामबियाम करते काय रे?''

''तिचा बाप बॉक्सर होता, ती व्यायाम करताना मी काही पाह्यलं नाही, पण तिची शरीरयष्टी अत्यंत मजबूत आहे यात वाद नाही!''

''मघाशी तिनं टेबल उचलून ठेवताना तिचे दंड बघितले तेव्हाच मला वाटलं! एनी वे, धिस इज ए व्हेरी इंटरेस्टिंग मर्डर केस! एक तर गडकऱ्यासारखा जबाबदार पोलीस अधिकारी एका वेश्यकडे जातो, पितो, मुक्कामाला रहातो, या गोष्टी त्याच्याबद्दलची सहानुभूती नष्ट करणाऱ्या आहेत. दुसरी गोष्ट, तो गच्चीत उभा असताना तोल जाऊन खाली कोसळण्याचीही शक्यता पटवता येण्यासारखी आहे!''

''पण ते ओरखडे!'' मी पुन्हा माझी शंका व्यक्त करीत उद्गारले,

''असू देत रे, ओरखडे आपण एक्सप्लेन करू. गडकरी आणखी जिच्याकडे जात होता अशी एखादी धीट वेश्या मदत करायला तयार होते का पहा!''

रात्री जेवताना मी एकसारखा मार्थाच्या हालचालीकडे पहात होतो. डॅडींचं म्हणणं मला पटत चाललं. मार्थाची मनगटं, दंड, अगदी पुरुषी थाटाचे मला वाटू लागले.

दुसऱ्या दिवशी डॅडींनी कोर्टात कुमारीच्या जामिनाचा अर्ज सादर केला. सरकारी वकिलांनी नियमाप्रमाणे हरकत नोंदवली. पण डॅडींनी मद्रास व अलाहाबाद इथल्या हायकोर्टांचे जामिनाबाबतचे काही महत्त्वाचे निकाल कोर्टाच्या निदर्शनला आणून म्हटलं, ''कुमारी ही या खटल्यातून संपूर्णत: निर्दोष मुक्त होण्याची दाट शक्यता आहेच, शिवाय कायद्यानं देखील खुनाच्या आरोपाखाली पकडलेल्या स्त्रीला योग्य व लायक जामीन दिल्यास मुक्त करावं अशी तरतूद केलेली आहे. तिला जामिनावर सोडल्यास सरकारतर्फेचे साक्षीदार फितुर केले जाण्याची सुतराम शक्यता नाही. कारण या खटल्यात प्रत्यक्ष बघणारा एकही साक्षीदार नाही. जो पुरावा आहे तो मुख्यत: परिस्थितिजन्य असा पुरावा आहे. तो फितुर करण्याचा प्रश्नच निर्माण होत नाही!''

कुमारीला पाच हजारांच्या जामिनावर मुक्त करण्याचा आदेश देण्यात आला. कुमारीतर्फे पाच हजार रुपये रोख कोर्टात भरण्यात आले. संध्याकाळी आम्ही तिघे टॅक्सीने 'परविन व्हिला' वर परतलो.

फ्लॅटवर आल्यानंतर कुमारीनं डॅडींचे आभार मानून म्हटलं, ''आपले फार उपकार झाले, डॅडी!'' त्यावर डॅडी म्हणाले, ''अजून तुला संपूर्ण निर्दोष बाहरे काढायचं आहे, तेव्हा हे थँक्स थोडे दिवस रिझर्व्ह ठेव!''

मार्थाकडे संशयानं पहायची मला खोडच लागली होती. मार्थानं ते ओळखलं आणि मला किचनमधे बोलावून तिनं विचारलं,

''समर, गेले दोन दिवस माझ्याकडे तू असा विचित्र नजरेनं का पहातोस?''

''विचित्र नजरेनं? काहीतरीच! तू काय केलं आहेस तसं पहायला?''

''ते मला काय ठाऊक?''

''तू आणि तुझे डॅडी परवा रात्री माझ्याबद्दल काय बोललात ते ऐकलंय मी!''

''बरीच पक्की आहेस की! खोटी आहे डॅडींची शंका?''

मार्था हसतहसत म्हणाली, ''तुझे वडील तुझ्यापेक्षा निश्चितच हुशार आहेत?''

''मार्था, खरं काय घडलं ग?''

''कोणाला सांगणार नाहीस?''

''तुझी शप्पथ, कोणाला सांगणार नाही!''

''वा म्हणे माझी शप्पथ! मी मेले तर तुला सुतकच लागणार जसं काही!''

''आईची शप्पथ घेतो. कुणालाही सांगणार नाही?''

''मग ऐक तर, त्या रात्री तुला कुमारीनं घरी जा म्हणून सांगितलं. तू गेलास. मग मी दार

बंद करून आत आले. कुमारीला गडकऱ्यांनी प्यायचा आग्रह केला. पण ती प्यायली नाही. कारण प्यायल्यानंतर तो तिचे भलते हाल करायचा. हात पिरगळायचा, गालावर, थोबाडात मारायचा. अगदी ती केविलवाणी होऊन रडेपर्यंत छेडायचा.

"त्या रात्री तिनं त्याच्या आग्रहास्तव नंतर उगाच प्यायचं नाटक केलं. तो मात्र जाम प्यायला. कुमारीला म्हणाला, नग्न होऊन डान्स कर! आता कपड्यात ती नाचली असती. वेश्या झाली म्हणून काय झालं, तिला लाजलज्जा काही असतेच की! तिनं नकार दिला. यानं तिची साडी फाडली. परकर फाडला. ब्लाऊजच्या चिंध्या-चिंध्या केल्या आणि म्हणाला, 'आता तरी नाचशील की नाही?'

"नेहमी शांत राहणारी कुमारी असं त्यानं जबरदस्तीनं नग्न केल्यामुळं चिडली आणि त्याच्या अंगावर धावून गेली. नखानं त्याला ओरबाडलं तिनं, पण तो नराधम तिला ऐकतो थोडाच? तो तिला खाली पाडून लाथा घालू लागला, तिचं ओरडणं ऐकून मी धावले. मी पराठे बनवता बनवता किचनमधून आले होते. हातात लाटणं तसंच होतं, ते मागून येऊन त्याच्या टाळक्यात घातलं. घाव वर्मी बसला तसा तो खाली कोसळला. कुमारी म्हणाली, 'मार्था, नुसत्या लाटण्यानं भागणार नाही; याचा कायमचाच निकाल लावू.' तीही रागानं थरथरत होती. तो अर्धवट बेशुद्धावस्थेत असताना आम्ही दोघींनी त्याला गच्चीत ओढत आणला, दोघींनी त्याला खाली फेकला. पोलीस लगेच वर येणार ही कल्पना होती. म्हणून तिला कपडे करायला सांगितलं. किचनचं दार आतून बंद करून घ्यायला सांगितलं! कुमारीला एकटीला खोलीत बसणं अशक्य झालं, ती मोठ्यानं ओरडू लागली, 'मार्था मार्था ऽ!' मग मी परत आत गेले. खाली गर्दी जमत होती. बेल वाजली, तेव्हा मी दार उघडलं. कुमारीनं काहीच सांगितलं नाही. मी किचनमधे होते. काय घडलं, मला ठाऊक नसल्याचं नाटक मी केलं! झालं एवढंच!"

"तरी डॅडी म्हणालेच! हे काम कुमारीच्या एकटीच्या हातून होणं अशक्य!"

"पण आता माझं नाव निष्पन्न होणार नाही ना?"

"शक्य नाही! गडकऱ्यांनी खूप दारू झोकली होती असं डॉक्टरांनी पोस्टमॉर्टेम नोटसमधे लिहिलं आहे, शिवाय त्यांच्या पोटातला अन्नांश तपासणीसाठी केमिकल ॲनलायझरकडे पाठवलेला आहे. त्यातही ते मद्य प्याले होते असा रिपोर्ट येईल! गडकरी मद्य पिऊन सिगारेट ओढत गॅलरीला टेकून हवा खात उभे होते, आणि अचानक तोल जाऊन खाली पडले, असाच बचाव डॅडी घेतील! तुझं नाव निष्पन्न करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही!"

"मग हरकत नाही! पण काय रे, मला कसं काय त्यांनी आरोपी केलं नाही?"

"तुला घाबरले असतील!" चेष्टेनं मी म्हणालो.

"मस्करी नको करू हं, समर!"

"तुझी अन् मस्करी?"

मार्थानं सांगितलेली हकीकत सत्य होती. पण मार्थाला त्यात गोवणं हिताचं नव्हतं. कारण गडकरी अडीचशे पौण्डाचे तर कुमारी अवघी पंचाण्णव-शंभर पौण्ड! तिला त्यांना उचलून टाकणं अशक्य होतं हीच थिअरी डॅडींना पुढे करायची होती, वरून खाली टाकल्यामुळं त्यांच्या डोक्याची कवटी साफ फुटली होती, तीवर लाटण्याचा प्रहार झाल्याचा मागमूसही दिसण्यासारखा नव्हता. तेव्हा गडकरी मद्याच्या नशेत तोल जाऊन खाली पडले हाच बचाव योग्य व बुद्धीला पटण्यासारखा होता. प्रश्न होता तो फक्त ओरखड्यांच्या खुणांचा! पण डॅडींना त्याचं काहीच वाटत नव्हतं. त्यांच्याजवळ त्याबाबत काहीतरी उत्तर तयार होतं! पण ते त्याबद्दल माझ्याशी बोलत नव्हते!

परिस्थितिजन्य पुराव्यावर आधारित तो खटला असल्यामुळं लौकरच सेशन कोर्टाकडे धाडण्यात आला. साक्षीदारांना समन्सेस निघाली आणि चौकशीची तारीख निश्चित झाली,

अधूनमधून मी घरी बांद्र्याला जाऊन येत असे. पण उल्काला मी आलो काय अन् गेलो काय, दोन्ही सारखंच होतं. ती संपूर्णत: मद्याच्या आहारी गेली होती. बोलली तर एखादा चांगला शब्द बोलायची, नाहीतरी काहीतरी कुजकट बरळायची! "तुला काय आता सोन्याचं अंडं घालणारी

कोंबडी सापडलीय्, माझी कशाला चिंता करतोस?''

त्यावर मी म्हणायचो, ''उल्का, अगं तू माझी पत्नी आहेस!''

''पत्नी? ही ऽ! ही ऽ! बेकायदेशीर पत्नी! दुसऱ्या लग्नाची! पहिली बायको जिवंत असताना दुसरं लग्न करता येतं का?'' असं काहीतरी मन:स्ताप करणारं ती बोलायची.

सकाळी एक वेळ भातचपाती, एखादी भाजी करून ठेवायची, नाहीतर चर्चसमोरच्या बोळात मासळी यायची विकायला, ती आणून एकदाच भांडंभर कालवण करून ठेवायची. तेच दोन्ही वेळ खायची. जवळचे सारे पैसे संपले तसे मी तिला खर्चाला देऊ लागलो. एका सुस्वरूप, विद्यासंपन्न मुलीचा ऱ्हास होतोय हे मी उघड्या डोळ्यांनी पहात होतो; पण मला यातून तिला बाहेर काढणं अशक्य होते, उल्काची प्रकृती अल्कोहोलिक बनली होती. मद्य न घेतलं तर तिचे हातपाय थरथर कापू लागत! हळूहळू तिच्या शरीराचं आकर्षणही नाहीसं होऊ लागलं. तिच्या डोळ्यांभोवती काळी वर्तुळं दिसू लागली. डोळे भकास आणि निर्जीव वाटू लागले. मला तिच्याबद्दलचं आकर्षणच वाटेनासं झालं. यात माझ्यावर मेहेरबानी एवढीच होती की, ती मद्याच्या नशेत गल्लीत अगर शेजारी कोणाला उपद्रव देत नव्हती! अलका बदफैली निघाली तर उल्का मद्यपी! दोघीही माझ्या आयुष्यात येऊन न आल्यासारख्या! कुमारीशी माझा तसला संबंध येणं शक्य नव्हतं! मी तिला अन्नदाती मानली होती. तिचा माझ्यावर नितांत विश्वास होता. जिचे चार घास खाल्लेत ती संकटात सापडल्यानंतर तिला त्यातून बाहेर काढणं, एवढं एकच मला ठाऊक होतं. डॅडींना इथंपर्यंत आणण्यामागे तो एकच हेतू होता!

कुमारीवर झालेल्या खटल्यामुळे माझ्याकडे लोकांची पहाण्याची दृष्टीही बदलली. काही लोकांचा समज होता की, मीच गडकऱ्यांना खाली फेकून दिलं आणि त्या वेळी तिथं नव्हतो, असं पोलिसांना भासवलं. पण अशा अफवा पसरवणाऱ्यांना ठाऊक नव्हतं की, इन्स्पेक्टर साखरेंच्यासारखा मातब्बर पोलीस अधिकारी केसचा तपास करीत होता. त्यांच्या काकदृष्टीतून मी जर गुन्हेगार असतो तर सुटणं शक्यच नव्हतं! मी वरळी नाक्यावरून चाललो की, लोक आपआपसांत कुजबुजत आणि माझ्याकडे भितीयुक्त नजरेनं पहात. बांद्र्यालाही तोच प्रकार! मी घरी गेलो की गल्लीत कोपऱ्यावर चकाट्या पिटणारं तरुण पोरांचं टोळकं गप्पगार पडत होतं. गडकरी इन्स्पेक्टर उभ्या मुंबईला परिचित होते. गुन्हेगार जगतात त्यांची जरब होती. धिप्पाड शरीरयष्टीच्या गडकरी इन्स्पेक्टरांचा खून मीच केला, असं खुद्द बांद्र्याच्या गल्लीबोळातले दादा समजत होते. गडकऱ्यांनी अनेक लोकांना सतावलं होतं, तेव्हा गडकऱ्यांचा काटा काढणारा म्हणून गुन्हेगारही माझ्याकडे भितीयुक्त आदरानं पाहू लागले. फुक्कट भाव मिळत होता, तर मग सोडा तरी का? अशीच माझीही वृत्ती बनली.

डोक्यला फेल्ट, डोळ्यावर काळा गॉगल, चौकड्याचे शर्टस, वुलनच्या गडद रंगाच्या पँटस् आणि पायात जोधपुरी बूट घालून मी चालू लागलो की वरळी नाका आणि वांद्रा येथील मला ओळखणारे लोक उगीचच स्मित करीत, माझी ओळख असणं हे काहीजणांना मोठेपणाचं वाटू लागलं, तर काहीजण उगाचच माझ्यापासून चार हात दूर राहू लागले.

मोठेपणा मिळवायला माणसाच्या अंगी काहीतरी कर्तृत्त्व लागतं म्हणतात, पण इथं काहीही न करता मला हा मोठेपणा मिळत होता. गुंडांचा कर्दनकाळ अशा गडकरी इन्स्पेक्टरला आठव्या मजल्यावरून फेकून देणारा बहाद्दर वीर म्हणून 'दादा' लोक मला ओळखू लागले. मीही त्यांना सत्य काय आहे हे सांगण्याचा खटाटोप केला नाही.

उल्का एकटी बांद्र्याला रहात होती, ती तरुण होती. बांद्र्याला तिला एकटीला ठेवताना मला सुरुवातीला भीती वाटली होती. पण हे गडकरी प्रकरण घडल्यानंतर माझी जरब वाढली. उल्काच्या वाट्याला कोणी जाणं शक्य नव्हतं!

सेशन कोर्टात ज्या दिवशी तो खटला उभा राह्यला त्या दिवशी कोर्टात पाय ठेवायला जागा नव्हती. मी कुमारीसोबत गेलो म्हणून मला आत प्रवेश मिळाला.

सरकारतर्फे वरळी नाक्यावरचा पोलीस हवालदार रावराणे यानं फिर्याद नोंदवली होती, त्यात त्यानं परवीन व्हिलावरून कोणीतरी खाली पडून मयत झाल्याचं समजल्यावरून आपण

तिकडे गेलो व खाली पडलेलं प्रेत इन्स्पेक्टर गडकऱ्यांचं आहे हे ओळखल्याचं सांगितलं, त्यानं इराण्याच्या हॉटेलातून कमिशनर ऑफिस आणि संबंधित पोलीस स्टेशन्सना फोन केल्याचंही सांगितलं. इन्स्पेक्टर साखरे घटनास्थळी दहा मिनिटांत हजर झाले आणि त्यांच्यासोबत आपण आठव्या माळ्यावर कुमारीच्या फ्लॅटमधे गेल्याचंही रावराणेनं सांगितलं.

डॅडींनी त्याला काही मोजकेच प्रश्न विचारले.

"हे पहा रावराणे, इन्स्पेक्टर गडकरी हे खाली पडलेले दिसले, त्यांना तुम्ही ओळखलंत, होय ना?"

"हो ऽ!"

"पण ते वरूनच पडले हे तुम्हाला कसं समजलं?"

"कारण ते अधूनमधून कुमारीकडे यायचे!"

"अच्छा! म्हणजे कुमारीला तुम्ही ओळखता तर!"

"म्हणजे? पोलिसांना आपल्या हद्दीतल्या गुंड, गुन्हेगार, वेश्या यांची माहिती असतेच!"

"माझं म्हणणं, तुम्हाला वेश्यांची काहीही माहिती नाही!"

"ते का? आमच्या हद्दीतल्या पाचपन्नास वेश्यांची माहिती आहे!"

"अरे वा! काही नावं सांगाल?"

"जरूर! नादिरा, शहाजबी, रायना, मिलो, मिस वुइल्सझी-"

"पुरे पुरे! तुम्ही त्यांना ओळखता हे एकदम कबूल!"

"पण हे इन्स्पेक्टर गडकरी त्या रात्री कुमारीकडे कशासाठी गेले होते हे तुम्हाला ठाऊक नाही?"

"ठाऊक का नाही? वेश्येकडे माणसं कशाला जातात?" कोर्टात किंचित् खसखस पिकली.

"पण माझं म्हणणं आहे की, गडकरी तशातले नव्हते!"

"मला गडकऱ्यांची जास्त माहिती की तुम्हाला? गडकरीसाहेबांना हा छंदच होता!"

"असं असं!"

डॅडींनी रावराणेंचा उलटतपास एवढ्यावरच संपवला. त्यानंतर खटल्यातले महत्त्वाचे साक्षीदार म्हणून गडकऱ्यांच्या प्रेताची तपासणी करणारे डॉक्टर साक्षीदाराच्या िंपजऱ्यात येऊन उभे राह्यले. त्यांनी गडकऱ्यांना वरून पडल्यामुळे स्कल प्रâॅक्चर आणि 'इंपॅक्ट ऑफ ग्राऊंड' यामुळं तात्काळ मृत्यू आल्याचं सांगितलं. त्यांच्या अंगावर ओरखडे होते आणि ते ओरखडे 'अँटी-मॉर्टेम' म्हणजे मरणापूर्वी झाले होते असं सांगितलं.

डॅडींनी त्यांच्या उलटतपासाला सुरुवात केली-

"डॉक्टर, तुम्ही गडकऱ्यांच्या अंगावर, मानेवर नखानं ओरबाडल्यासारख्या खुणा होत्या म्हणता, पण त्या मरण्यापूर्वी किती वेळ अगोदर झाल्या असाव्यात हे र्सिटफिकेटमधे नमूद नाही!"

"नसेल, पण त्या खुणा अँटीमॉर्टेम नक्की होत्या!"

"हे पहा, मला अशी उडवाउडवीची उत्तरं नको आहेत. ओरबाडल्याच्या जखमा मरणापूर्वी किती वेळ अगोदर झाल्या असाव्यात, याबद्दल तुम्हाला काहीही निश्चित सांगता येणार नाही, आय मीन् एज ऑफ दोज इंज्युरीज!"

"पण त्या जखमा फ्रेश होत्या!"

"फ्रेश म्हणजे बारा तासांच्या आतल्या!"

डॉक्टरांना डॅडी कोणत्या मुद्यावर उलटतपास करताहेत याचा अंदाजच करता येत नव्हता. काही क्षण विचार करून ते म्हणाले-

"त्या जखमा तीनचार तासांच्या आतल्यादेखील असू शकतील!"

"आर यू शुअर अबाऊट इट?"

"येस!"

"मग तुम्ही त्या ओरखड्यांचे 'एज' आपल्या र्सिटफिकेटमधे का नमूद केलं नाही?"

"त्या ओरखड्यांचा मृत्यूशी काही संबंध नव्हता म्हणून!"

"पण खुनासारख्या महत्त्वाच्या केसमधे बारीक जखमांचे 'एज' व 'कॉज' नमूद करावं लागतं हे आपल्याला ठाऊक आहे ना?"

"होय."

"प्रेत रात्रीच हॉस्पिटलमधे आणलं तेव्हा त्यांच्या तोंडाला दारूचा वास येत होता?"

"मी काही वास घेतला नाही!"

"व्हिसेरा तरी घेतला? हे सर्टिफिकेट पहा, केमिकल ॲनलायझरकडून प्रथम तुमच्याकडेच आलं होतं?"

"येस! आलं होतं!"

"त्यांच्या अन्नांशात अल्कोहोल आहे असं म्हटलं आहे!"

"हो, म्हटलं आहे!"

डॅडींनी डॉक्टरांचा उलटतपास संपवल्यानंतर गुन्हा ठिकाणचे पंच, इन्क्वेस्टचे पंच, फ्लॅटमधे गडकऱ्यांचे शर्ट, बनियन् जप्त करून घेतलेले पंच, त्यानंतर अय्यंगार, देशिंगकर अशा परवीन व्हिलामधे रहाणाऱ्यांचे जबाब झाले. डॅडींनी त्यांचा फार काही उलटतपास केला नाही!

त्या दिवसाचं कामकाज संपल्यानंतर आम्ही फ्लॅटवर परतलो. डॅडींनी थंड पाण्याची अंघोळ केली आणि ते हॉलमधे पंख्याखाली येऊन बसत मला म्हणाले, "एक छोटा भर! आज केस छानच रंगली."

मी डॅडींच्यासाठी व्हिस्कीचा एक पेग भरून घेऊन आलो, तेव्हा कुमारीही वॉश घेऊन मधल्या हॉलमधे येऊन बसली. डॅडींनी एक घोट घेऊन सिगारेट शिलगावली आणि कुमारीला विचारलं,-

"कुमारी, तुला मदत करील अशी एखादी समव्यवसायी मैत्रीण तुझ्या बाजूनं साक्ष द्यायला तयार होईल?"

क्षणभर विचार करून कुमारी म्हणाली, "हो, तशा दोनतीन मैत्रिणी आहेत माझ्या; पण कोणत्या मुद्द्यावर तुम्हाला त्यांची साक्ष हवी?"

"ते आता मी सांगत नाही; फक्त अशी एक साक्षीदार मला हवी!"

त्यावर कुमारीनं लगेच कोपऱ्यातला फोन उचलला, आणि रिंग फिरवली.

"हॅल्लो! कोण? मिली ऽ? गुड इव्हिनिंग! मी कुमारी बोलतेय!"

"बोल बोल! अगं, काय झालं आज खटल्याचं?" पलीकडून येणारा फोनमधला आवाज मला स्पष्ट ऐकू येत होता.

"एक काम आहे तुझ्याकडे! तू येऊ शकशील का?"

"व्हाय नॉट?"

"पण एंगेज्ड नसलीस तर ये!"

"असले तरी तू बोलावलं म्हटल्यावर येणंच भाग आहे!"

"ये मग!" कुमारीनं रिसीव्हर खाली ठेवला आणि ती डॅडींच्याकडे पहात म्हणाली, "ही मिली गेल्या वर्षी खूप आजारी होती टॉयफॉइडनं! जगेल की नाही, याची शाश्वती नव्हती. माझ्याकडून तिच्या आईनं एक हजार रुपये उसने नेले होते. बरं, वाटल्यानंतर मिली पैसे घेऊन आली होती; पण मी ते पैसे घेतले नाहीत. एवढंच म्हणाले, माझ्यावर वेळप्रसंग आला तर तुला हाक मारीन! त्या वेळी मला कल्पनाही नव्हती, की माझ्यावर असा काही प्रसंग ओढवेल याची!"

"व्हेरी नाईस! कुमारी, ही मिली दिसायला कशी आहे?" डॅडींनी विचारलं.

"आता आल्यानंतर पहालच की! एक्स्ट्रीमली ब्युटीफुल!"

"ती या गडकऱ्यांना ओळखत होती!"

"अर्थात्! गडकरी नेहमी सुस्वरूप अशाच वेश्यांकडे अधूनमधून जायचे! खायचे, प्यायचे, मारहाण करायचे आणि सकाळी उठून जाताना हजारपाचशे घेऊन जायचे!"

"टेरिबल मॅन!"

"म्हणून सांगते काय! कधी कधी वाटतं, कित्येक पोरींची त्यांच्या छळापासून सुटका केल्यानं पुण्य तरी लाभेल मला!"

डॅडी हसले आणि म्हणाले, "पाप-पुण्य हा सगळा कल्पनेचा खेळ आहे, कुमारी! आय डोंट बिलीव्ह इन इट!"

पंधरा मिनिटांतच मिली आली, गोरी किंचित् गिड्डी, पंजाबी ड्रेसमधली मिली खरोखरच आकर्षक दिसत होती. डॅडींशी तिची ओळख करून देताना कुमारी म्हणाली,-

"मिली, मीट माय ॲडव्होकेट मिस्टर ठाकूर!"

मिलीनं डॅडींच्या हातातच हात दिला. डॅडींनी प्रथम तिची नखं निरखून पाह्यली. निमुळती अन् नेलपेंट लावलेली नखं पहात डॅडी म्हणाले, "अगदी अश्शी साक्षीदार मला हवी होती!"

मला आणि मार्थाला डॅडींनी हॉलमधून बाहेर जायची खूण केली. आम्ही दोघे उठून गेल्यानंतर त्या तिघांत बराच वेळ काहीतरी खल चालला होता. त्या रात्री मला किंवा मार्थाला त्याचा पत्ताच लागला नाही; पण कोर्टात जेव्हा मिली कुमारीतर्फे डिफेन्स विटनेस म्हणून उभी राहिली, तेव्हा तो खल कशाबद्दल चालला होता याचा उलगडा झाला.

-o-o-o-

१९

सरकार पक्षातर्फे अशी केस रंगवण्यात आली होती की, इन्स्पेक्टर गडकरी हे थोडे मद्य घेऊन गॅलरीत उभे असताना कुमारीनं त्यांना खाली ढकलून दिलं. मद्याच्या अमलामुळे त्यांना तोल सावरता येणं अशक्य झालं आणि ते कोसळले. त्यांना ढकलून देण्यापूर्वी कुमारीनं त्यांच्याशी झटापटही केली आणि त्यामुळंच त्यांच्या मानेजवळ, गळ्यावर नखानं ओरबाडल्याच्या खुणा दिसत होत्या.

सरकारतर्फेचे शेवटचे साक्षीदार म्हणून इन्स्पेक्टर साखरे साक्षीदाराच्या पिंजऱ्यात येऊन उभे राहिले. त्यांनी सरकारतर्फेच्या पुराव्याचे सर्व दुवे जोडले आणि मनुष्यहत्येबद्दल कुमारी कशी दोषी आहे, हे दर्शवलं. डॅडींनी त्यांचा उलटतपास करताना सूचित केलं की, कुमारीला जर इन्स्पेक्टर गडकऱ्यांचा खून करायचा असता तर अशा पद्धतीनं करायचं कारण नव्हतं. ते तिच्या घरी रात्रभर मुक्कामाला रहाणार होते, रात्री ते झोपले असताना केव्हाही त्यांचा प्राण घेता येणं तिला शक्य होतं; त्यासाठी अशा अघोरी उपायाची काही जरूरी नव्हती.

सरकारतर्फेचा पुरावा संपल्यानंतर कुमारीला कोर्टानं झालेल्या पुराव्याबद्दल तिचं म्हणणं विचारलं, तेव्हा तिनं सांगितलं-

"त्या रात्री इन्स्पेक्टरसाहेब खूप प्यायले होते. माझ्याकडे येण्यापूर्वीच ते पिऊन आले होते. माझ्या घरी आल्यानंतर त्यांनी पुन्हा प्यायला सुरुवात केली. तेव्हा मी तसं न करण्याबद्दल त्यांना विनवलं, तेव्हा ते म्हणाले, "साल्या तुम्ही वेश्या फार मातल्या आहात! मघा त्या मिलीकडे गेलो होतो तर सालीनं जवळदेखील घेतलं नाही. ओढून जवळ घेताना बोचकारलंन्! मांजराच्या अवलादीची! तिला फोरास रोडला हाकलून देतो! म्हणे मी आज एंगेज्ड आहे! वेश्या कधी एंगेज्ड असते? घरी येईल तो तिचा मालक! त्यांनी शर्ट काढून मला मानेजवळचे ओरखडे दाखवले. मी त्यावर हळूवार हात फिरवून म्हणाले, "पण आता तुम्ही प्यायचं बंद करा!" त्यावर ते म्हणाले, "तू मला शिकवतेस? इथं गच्चीत उभा राहून पिईन!" असं म्हणत त्यांनी मला हाताला धरून ओढलं! त्या झटापटीत त्यांच्या हातातला ग्लास फुटला. मला म्हणाले, 'दुसरा ग्लास आण.' मी ग्लास आणण्यासाठी आत चालले होते, तोच गच्चीत तोल जाऊन ते खाली कोसळले. ते कोसळल्याचं माझ्या ध्यानात येताच मी जोरानं ओरडले. मार्था धावत आली. तिला मी काय प्रकार घडला ते सांगितलं."

कुमारीनं हा जो खुलासा केला तो धादांत खोटा होता; पण डॅडींच्या सुचनेनुसार तिनं हा बचाव पुढं केला होता. कुमारीच्या म्हणण्याला दुजोरा देण्यासाठी आरोपीतर्फेची साक्षीदार म्हणून मिली कोर्टात आली होती. तिने त्या संध्याकाळी गडकऱ्यांच्या मानेवर ज्या ओरबाडल्याच्या जखमा होत्या. त्या स्वत:च केल्याचं शपथप्रतिज्ञेवर सांगितलं. त्यानंतर सरकारी वकिलांनी तिचा खूप छेडून उलटतपास केला, पण मिली बधली नाही. उलट तिनं गडकरी हे अनेक वेश्यांना कसे छेडत, त्यांच्याकडून पैसे उकळीत, यांचं रसभरीत वर्णन केलं.

शेवटी दोन्ही बाजूंच्या वकिलांनी आपापल्या बाजू मांडल्या. सरकारी वकिलांनी आरोपी कुमारीनंच त्यांना गॅलरीतून ढकलून दिलेलं आहे आणि तो निव्वळ अपघात आहे असं भासवण्याचा जो प्रयत्न केला आहे तो कपोलकल्पित आणि खोटा असल्याचं प्रतिपादन केलं.

त्यानंतर डॅडी उठले, त्यांनी आपली बाजू मांडण्यास सुरुवात केली. ते म्हणाले, "वैâलासवासी गडकरी हे पोलिसखात्याला एक लांछन होते, तथापि मृत्यूनंतर त्यांची अधिक बदनामी न करता मला म्हणावंसं वाटतं की, गडकरी कोण होते, कसे होते याचा विचार इथं न करता, आपणाला या खटल्यात कुमारी ही मनुष्यवधाबद्दल दोषी ठरते की काय हे पहायचं आहे!

प्रथम ते मिलीकडे गेले होते. मिली एंगेज्ड होती. आपण आत्ताच तिचा शपथप्रतिज्ञेवरचा जबाब ऐकला. तिनं या खटल्यात खोटी साक्ष देण्याचं थोडंसुद्धा कारण नाही! गडकरी तिच्याकडे गेले होते. तिची छेड काढण्याचा प्रयत्न त्यांनी केला. वेश्या जरी झाली तरी, तिलाही काही स्वातंत्र्य आहे. त्या संध्याकाळी तिनं त्यांच्या इच्छेला मान्यता न दिल्यानं ते उखडले जबरदस्ती करायचा प्रयत्न केला, त्यातच त्यांच्या मानेवर, गळ्यावर ओरखडे निघाले. ओरखडे मिलीनं काढले होते.

"नंतर गडकरी कुमारीकडे आले. संतप्त झालेले गडकरी कुमारीकडे प्यायला मागू लागले. तेव्हा ते गच्चीत उभे होते. गच्चीचा कठडा अडीच फूट उंचीचा आहे असं पंचनामा दर्शवतो. तेव्हा खूप प्यायलेले गडकरी तोल जाऊन पडले हा कुमारीचा बचाव अगदी सुसंगत असा वाटतो! बरं, त्यांना जबरदस्तीनं ढकलून द्यावं असं जर कुमारीनं मनात आणलं असतं तर तेही अशक्य होतं. गडकऱ्यांनी जोराची चापट लगावली असती तर कुमारी भुईसपाट झाली असती आणि अशा धिप्पाड शरीरयष्टीच्या माणसाला कुमारीनं गच्चीतून ढकलून दिलेलं आहे असं मानणं, म्हणजे तर्क, बुद्धी आणि व्यवहार यांना तिलांजली देण्यासारखं होईल!

"कुमारी पूर्णत: निर्दोष आहे! गडकऱ्यांचा खून झाला नसून त्यांना अपघाती मृत्यू आला आहे! पण केवळ ते एक पोलीस अधिकारी होते, म्हणून ही खोटी केस रचण्यात आली आहे. या केसमधे तथ्य काही नाही. आरोपी कुमारी निर्दोष आहे. तिला दोषमुक्त करण्यात यावं!"

डॅडींनी डॉक्टरांचा जो उलटतपास केला होता, त्याची न्यायाधीशांना आठवण करून देताना म्हटलं, "अंगावरचे ओरखडे केव्हा झाले हे डॉक्टर निश्चित सांगू शकले नाहीत. यावरून ते कुमारीच्याच हातून झाले असं म्हणता येत नाही, उलट मिलीनं ओरखड्यांबद्दल दिलेला खुलासा अधिक सुसंगत आणि पटणारा वाटतो! गडकऱ्यांच्या अन्नांशांत अल्कोहोल आढळल्याचं केमिकल ॲनलायझर यांनी म्हटलेलंच आहे! तेव्हा ते भरमसाट प्याले आणि त्यांचा तोल गेला हेच खरं!

"आता जर कुमारीला गडकऱ्यांचा हेतु:पुरस्सर खूनच करायचा होता तर तिच्या घरी समर ठाकूर नोकरीला होता, मार्था होती, तिसरी ती स्वत:, या तिघांनी मिळून त्यांचा खून अगदी बिनबोभाट केला असता आणि प्रेताची विल्हेवाटही लावली असती!

"सरकारपक्षाची केस ही निखालस खोटी आणि काल्पनिक आहे. ही केस म्हणजे पोलीस खात्याचा आपल्या एका गेलेल्या अधिकाऱ्याला जाता जाता हौतात्म्य देण्याचा केविलवाणा प्रयत्न आहे असं मला अगदी खेदानं म्हणावं लागतं.... कुमारीच्या हातून असा भीषण प्रकार घडणंच शक्य नाही! तिला दोषमुक्त करावं ही विनंती!"

न्यायाधीशांनी दोन्ही बाजूंच्या वकिलांची भाषणे ऐकताना कसलीच प्रतिक्रिया व्यक्त केली नव्हती. गंभीर मुद्रेनं त्यांनी दोघांचंही म्हणणं ऐकून घेतलं. निकाल कोणत्या दिवशी जाहीर केला जाईल हे सांगण्याअगोदर न्यायाधीश सरकारी वकिलांना म्हणाले, "मिस्टर प्रॉसिक्युटर, आय वॉण्ट टु सी द् फ्लॅट प्रâॉम व्हेअर डिसीज्ड फेल डाउन! ॲड दॅट टू जस्ट नाऊ!"

डॅडींनादेखील न्यायाधीश कुमारीचा फ्लॅट, गच्ची पहाण्याचा निर्णय घेतील याची कल्पना नव्हती.

न्यायाधीश, सरकारी वकील, डॅडी, कुमारी, साखरे इन्स्पेक्टर आणि मी फ्लॅटवर आलो. न्यायाधीशांनी सर्व फ्लॅट बारकाईनं फिरून बघितला आणि नंतर ते गच्चीत आले. गच्चीच्या कठड्याला धरून त्यांनी खाली पाह्यलं वरून खाली पहाताना डोळे फिरत होते. "मिस्टर साखरे, या गच्चीच्या कठड्याची उंची अगदीच कमी आहे असं नाही वाटत तुम्हाला?"

"होय सर!" कठड्यावर हात ठेवून साखरे इन्स्पेक्टर म्हणाले, "पण तरीही तोल जाऊन पडणं अशक्य आहे!"

"दॅट आय वुइल डिसाइड!" हसतहसत न्यायाधीश म्हणाले.

सोबत आलेल्या शिरस्तेदाराला त्यांनी फ्लॅटचा पंचनामा रेकॉर्डमधून काढून द्यायला सांगितला. त्या पंचनाम्यात गॅलरीजवळ एक फुटका ग्लास असल्याचा उल्लेख होता.

न्यायाधीशांनी कुमारीचंही अगदी जवळून निरीक्षण केले. मार्था मात्र पुढं आली नाही.

सरकारतर्फे तिची साक्ष घेण्यात आली नव्हती. कारण तिला जर तपासलं असतं तर कदाचित तिनं कुमारीच्या सुटकेला पोषक अशीच जबानी दिली असती.

सर्व मंडळी निघून घेतल्यानंतर डॅडी म्हणाले, "बरं झालं, कोर्टानं समक्ष जागा बघितली!"

"पण काय होईल असं वाटतं?" मी डॅडींना विचारलं.

"केस फिफ्टी-फिफ्टी रंगली आहे! बेनेफिट ऑफ डाउट देता येणं शक्य आहे! पाहू आता. चार दिवसांनीच निकाल लागेल! बरं, तू आज माझं रिझर्व्हेशन करून ये पाहू. कोणत्याही स्थितीत मला आज निघायला हवं!"

"तुम्ही जाणार? निकाल होईपर्यंत तरी रहा!" मी म्हणालो.

"नो नो! इतके दिवस राहिलो हेच जास्त झालं!"

"पण हिला शिक्षाबिक्षा झाली तर?"

"तर अपील करायचं हायकोर्टाला!"

"डॅडी, प्लीज तुम्ही चार दिवस रहा ना!" मी डॅडींना अजीजीच्या स्वरात म्हणालो.

तेव्हा ते माझ्या पाठीवर थाप देऊन म्हणाले,-

"समर, मला जायला हवं, आणि शिक्षा झालीच तर इथला कोणीतरी वकील देऊन हिला जामिनीवर सोडवून घे अन् मला तार दे! हायकोर्टातदेखील मी येईन. पण उद्या मला जायलाच हवं!"

कुमारीलाही डॅडींनी चार दिवस रहावं असं वाटत होतं; पण डॅडींना तिनं फारसा आग्रह केला नाही. होईल तो परिणाम भोगायला ती तयार होती.

बोरीबंदरवर डॅडींनी निरोप देतेवेळी कुमारीनं त्यांच्या हाती एक पाकीट दिलं.

"हे काय?" डॅडींनी विचारलं.

"काहीतरी आहे, पण असू द्या!"

डॅडींनी ते उघडून पाह्यलं, त्यात शंभराच्या तीस नोटा होत्या.

"बस्स्! इतकीच फी दिलीस?" असं म्हणत डॅडींनी ते पाकीट परत तिच्याकडे देत म्हटलं, "महिना सव्वा महिना रोज स्कॉच व्हिस्की आणि वेस्टर्न जेवण घेतलं असतं तर पाच हजार पुरले नसते बेबी, प्लीज कीप इट!"

डॅडींनी फीचे पैसे परत केले. भोंगा वाजला तसे डॅडी मार्थाकडे पहात म्हणाले,-

"तुझी बाकी कमाल आहे हं, मार्था! अगदी सहीसलामत सुटलीस! पण यापुढं अशी कोणाला उचलून फेकू नकोस हं!"

डॅडी गेल्यानंतर मी, कुमारी आणि मार्था फ्लॅटवर परतलो. कुमारी मला म्हणाली,

"डॅडींनी पैसे का नाही घेतले? कमी वाटले का त्यांना?"

"छट्! त्यांची इतकी बडदास्त ठेवली होती की, तुमच्याकडून पैसे घेणं त्यांना प्रशस्त वाटलं नाही!"

"समर, तुझ्यातला औपचारिकपणा अद्याप जात नाही. अजून मला अहोजाहो संबोधतोस ते बंद कर! बरं, तुझी बायको काय म्हणते? काही कमी केलंय का प्रमाण पिण्याचं?"

"काल संध्याकाळी डॉक्टर चोक्सींकडे घेऊन गेलो होतो. तिनं सांगितलंय की, अल्कोहोल बंद नाही केलं तर लिव्हर अबसेस होईल! आणि एकदा लिव्हर डॅमेज झाली की काही उपयोग नाही व्हायचा!"

"मग तिनं उपाय कोणता सांगितला आहे?"

"ती म्हणते अल्कोहोलची सवय सुटण्यासाठी थोडे दिवस मिर्फियाची इंजेक्शन्स द्यावी!"

"मार्फिया? अरे, पण ती सवय लागली तर दारूपेक्षा वाईट!"

"काय करू सांग?"

"मला एकदा तिला भेटव!"

"तुला भेटवू? तुझ्याबद्दल चांगलं मत नाही तिचं!"

"ते साहजिकच आहे. पण तरीसुद्धा मला वाटतं, तिच्यासाठी काहीतरी करायला हवंय!"

''थँक्स! पण तिला भेटण्याचा प्रयत्न करू नकोस!''

उल्का बदलण्याच्या पलीकडे गेली होती. माझ्यामुळं तिच्या आयुष्याचा ऱ्हास झाला असं मला एकसारखं वाटत होतं. विलासच्या मुलांना शाळेत सोडायला- आणायला जाताना झालेली उल्काची ओळख तिच्या अन् माझ्या आयुष्यात अशी काहीतरी गुंतागुंत निर्माण करील याची यिंत्कचितही कल्पना नव्हती. आता कुमारी तिला भेटायचं म्हणत होती, पण ते शक्य नव्हतं. उल्का तिला काहीतरी फट्दिशी बोलणार आणि....! नकोच या दोघींनी एकत्र यायलाच नको!

चौथ्या दिवशी केसचा निकाल लागला. कुमारीची निर्दोष सुटका झाली. तिला न्यायाधीशांनी संशयाचा फायदा दिला. कोर्टात निकाल ऐकायला खूप गर्दी झाली होती. शेवटी पोलीस बंदोबस्तात मला व कुमारीला बाहेर यावं लागलं. बाहेर येतायेता चार-दोन 'फ्लॅशगन्स' झळकल्या. एक वृत्तपत्राचा वार्ताहर कुमारीला विचारू लागला,-

''आपली या निकालावर प्रतिक्रिया काय?''

''मला काहीही सांगायची इच्छा नाही!'' गर्दीतून बाहेर पडता-पडता ती म्हणाली, तरीही तो चिवट वार्ताहर म्हणाला, ''आता काही सांगायची इच्छा नसेल तर नका सांगू, पण मला घरी येण्याची परवानगी दिलीत तर तिथं येईन!''

कुमारीच्या दंडाला धरून मी तिला टॅक्सीत बसवलं आणि ड्रायव्हरला म्हणालो, ''वरळी नाका-परवीन व्हिला!''

मार्था कुमारीला कडकडून भेटली. दोघींच्याही डोळ्यांना धारा लागल्या होत्या. केवढं मोठं संकट निवारण झालं होतं.

''समर, मिठाई घेऊन ये!'' मार्थानं वीस रुपये माझ्यापुढं केले.

पण कुमारीनं तिचा हात पकडून म्हटलं, ''समर, मिठाई-बिठाई काही नको. आपण काही मोठा दिग्विजय गाजवलेला नाही. आपल्या हातून एक माणूस मारला गेला आहे. त्याबद्दल आनंद व्यक्त करायची गरज नाही!''

मला कुमारीचं म्हणणं पटलं होतं. हा खटला झाल्यापासून मला तिच्या स्वभावात काहीसं परिवर्तन घडतं आहे याची चाहूल लागली होती. ती एकटीच तासन् तास समुद्राकडे पहात राही. छानछोकीचे कपडे वापरणं तिनं बंद केलं होतं. अधूनमधून ती मद्य घ्यायची; पण त्या घेण्यामागे आसक्ती दिसून येत नव्हती.

हा खटला झाल्यापासून तिच्याकडे कोणी गिऱ्हाईक येत नव्हतं. गडकऱ्यासारख्या जबरदस्त पोलीस अधिकाऱ्याचा खून करणाऱ्या कुमारीची तिच्या चाहत्यांनी धडकीच घेतली होती. एका अर्थी जे घडत होतं ते चांगलं होतं. कुमारीला त्या व्यवसायात फारशी गोडी होती, असं नाही. तिला इच्छा असून बाहेर पडायचा मार्ग दिसत नव्हता. तो या केसमुळं आपोआपच तिला मिळाला. तिचं गिऱ्हाईक बंद झालं होतं.

निकालानंतर माझा भाव आणखी वाढला. ''गडकऱ्यांचा खून करून स्वत: केसमधे अडकला नाही ते नाही, उलट कुमारीलाही त्यानं त्या खटल्यातून निर्दोष बाहेर काढलं!''

''समर!'' कुमारीनं मला आपल्या खोलीत बोलावलं. मी जाऊन तिच्यापुढे उभा राह्यलो.

''कुठल्याही गावी चार दिवस जाऊन रहावंसं वाटतंय! भवानीनगरला जाऊ या चार दिवस?''

''भवानीनगर?''

''हो! केस चालू असताना मी मनात ठरवलं होतं, यातून मुक्त झाले की भवानीच्या दर्शनाला जायचं.''

''जायला हरकत नाही कुमारी, पण मी तुझ्यासोबत येणं म्हणजे...''

मी पुढं काय बोलावं हे न सुचल्यानं थांबलो. पण मलाही आईला पाहून जवळ जवळ वर्ष होत आलं होतं. तशी मी भवानीनगरला परत न येण्याची प्रतिज्ञा घेतलीच नव्हती. माझे जुने दोस्त, धोंडू मास्तर यांनाही भेटावं, त्यांच्या सहवासात चार दिवस घालवावेत, असं वाटल्यानं मी म्हणालो, ''जाऊ या! पण इथं उल्काची मला काहीतरी व्यवस्था लावायला हवी.''

"म्हणून म्हणत होते की, तिला एकदा भेटव मला. इथं माझ्या घरी जरी ती राहिली असती तरी चाललं असतं. मार्था होती इथं."

"ते अशक्य आहे! निघायचं कधी? मी तिची व्यवस्था लावून येतो."

"परवा निघू."

बांद्र्याला मी आलो तेव्हा उल्का शेजारच्या एका मुलीला काहीतरी शिकवत बसली होती. नशीब तोंडाला दारूचा वास येत नव्हता. "हे बाकी बरं झालं. या गल्लीतल्या मुलांना शिकवायचा क्लासच काढ तू. नोकरीची गरजच नाही लागणार."

"अरे, इतके दिवस मला हे का सुचलं नाही, समजत नाही. पलिकडे तिथं कोळ्यांची वस्ती आहे. कितीतरी मुलीबायका आहेत. मी लिहायला वाचायला शिकवते म्हटल्यावर म्हणाल्या, आमच्या कोळीवाड्यात या."

"तुझ्यामागे काहीतरी व्याप हा हवाच. तो नव्हता म्हणून तुला भलत्याच गोष्टी सुचत होत्या."

समोरच्या मुलीला उद्देशून उल्का म्हणाली, "आता उद्या ये."

बूट काढून मी मोरीत जाऊन हातपाय धुतले. पँट काढून लुंगी लावली आणि पुढच्या खोलीत उल्काशेजारी बसत म्हणालो, "उल्का, तू मन असं कशात तरी रमवलंस की तुला मद्याची आठवणदेखील येणार नाही!"

"आता यापुढं येणारच नाही!"

"का?"

"चोक्सीबाईंकडून मार्फियाचा स्लाइट डोस घेऊन आलेय! बरं वाटतं, धुं ऽ द'!"

मी कपाळाला हात लावला.

"उल्का, मार्फियाची सवय एकदा जडली की मरेपर्यंत जात नाही म्हणतात. शिवाय व्यसन खर्चाचं आहे."

"खर्च?" विकट हास्य करीत उल्का म्हणालो, "अरे, तू एवढ्या श्रीमंत मालकिणीची नोकरी करीत असताना मला पैशाची काय कमतरता? एका रात्रीला हजार घेते ना कुमारी?"

"फर्गेट इट! कुमारीनंच धंदा बंद केला आहे!"

"काहीतरी सांगतोस! ती का म्हातारी झाली धंदा बंद करायला?"

"तुला खटल्याबद्दल काही ठाऊक नाही वाटतं?"

"काहीतरी ऐकल्यासारखं वाटतंय. तिला कोणी इन्स्पेक्टरनं मारलं, म्हणून त्याच्यावर खटला झाला होता!"

"उल्का, हा मार्फियाचा प्रताप! खटला झाला होता तो कुमारीवर आणि तोही इन्स्पेक्टरचा खून केला म्हणून!"

"आय सी ऽ! मग काय झालं त्या खटल्याचं?"

"निर्दोष सुटली!"

"छान! आता दर वाढव म्हणावं!"

उल्का अशी तोंडाला येईल ते बरळत होती. माझं डोकं भडकत होतं.

"उल्का, मी चार-आठ दिवस भवानीनगरला जाणार आहे!"

"मग मीही येते!"

मला काय बोलावं समजेना. क्षणभर विचार करून मी म्हणालो, "परवा डॅडी आले होते ते सांगत होते, आई माझी खूप आठवण करते. चार दिवस येऊन जा."

"मग मला सोबत घेऊन चल ना! अडचण काय आहे? मी बाहेर राहीन, घरी येणार नाही तुझ्या."

"उल्का, उगाच जा-जा ये-ये कशासाठी करतेस? शिवाय तू आल्यामुळं-"

"काय होईल?"

"तिथल्या लोकांना एक चर्चेला विषय मिळेल."

मी उल्काला असं म्हणालो खरं; पण माझंच मन मला खाऊ लागलं. मी कुमारीला सोबत घेऊन भवानीनगरला जाणार होतो; त्यामुळे लोकांना चर्चेला विषय मिळणार नव्हता? पण आताशी मला हळूहळू सफाईदारपणे खोटं बोलायची सवय जडली होती.

"त्याचं काय आहे उल्का, भवानीनगर हे मुंबईच्या मानानं अगदी लहान गाव आहे. चांगली हॉटेल्सही नाहीत. शिवाय मला ते उभं गाव ओळखतं. तू न आलेली बरं."

"तू लगेच येणार काय परत?"

"चार दिवसांच्या आत."

"पैसे देऊन जा थोडे."

"देतो, पण चोक्सीबाईंकडून मार्फिया मात्र घेऊ नको. एक सोडण्यासाठी दुसरं व्यसन नको लागायला!" दीडशे रुपये उल्काकडे देत मी म्हणालो, "जपून खर्च कर."

"का?"

"कुमारीनं धंदा बंद केला आहे. यापुढं कदाचित् मला नोकरी वा दुसरा व्यवसाय शोधायला हवा!"

"मला कल्पना नव्हती ही!"

"अशा बऱ्याच गोष्टींची तुला कल्पना नव्हती आणि आजही नाही. दिवसभर दारूच्या धुंदीत असायचीस."

उल्का हसतहसत म्हणाली, "मला बाकी तुझं कौतुक वाटतं, समर! तू कसा दारूच्या आहारी जात नाहीस?"

"मी दारूला फार लहानपणापासून ओळखतो, उल्का! या दारूनं माझ्या डॅडींची प्रॅक्टिस एके वेळी साफ रसातळाला नेली होती. या दारूनं माझ्या आईला मनस्ताप दिलेला होता. ही माणसातली राक्षसी वृत्ती जागवते आणि माणसाला माणसातून उठवायला नेहमी तत्पर असते."

"कुठल्या नाटकातली वाक्यं ही?"

"अनुभवाचे बोल आहेत हे! नाटकातली वाक्यं नाहीत, लक्षात ठेव? जातो मी."

उल्का हातातल्या नोटा चाळवत म्हणाली, "ये!"

उल्काविषयी मला पुण्यांत जे आकर्षण वाटलं होतं ते इथं मुंबईत आल्यानंतर नष्ट झालं होतं. एकतर मला तेव्हा तिच्या हट्टी स्वभावाची ओळख नव्हती, आणि दुसरं कारण म्हणजे तिला खोकला झाल्यापासून तिनं स्वत: लावून घेतलेलं मद्याचं व्यसन! तिच्या चारित्र्याविषयी मला कधीही शंका येणार नव्हती; पण स्वत: पदवीधर माँटेसरीचा डिप्लोमा धारण करणारी ही उल्का काही बाबतीत दुराग्रही निघेल याची मला कल्पनाच नव्हती. उल्काकडे मी आकर्षिला गेलो तेव्हा मला अलकावर सूड उगवायचा होता. विलासच्या घरी असताना मला काही भविष्यकाळच नव्हता तो उल्कानं दाखवला. अलकाशी माझं लग्न झालेलं ठाऊक असूनही ती माझा स्वीकार करायला तयार झाली. घरी या लग्नाला सम्मती मिळणार नाही म्हणून तिनं घराचाही त्याग केला. मुंबईत येऊन आपण स्वत:च्या पायावर उभं राहू हे तिचं स्वप्न साफ धुळीला मिळालं. मला कुमारीची नोकरी धरावी लागली ती त्यामुळंच!

पण आता मागचं सारं आठवून काय उपयोग? जे जे होणार होतं ते झालं! मी बांद्रा टॉकीजजवळ येऊन बसची प्रतीक्षा करीत उभा होतो तोच माझ्यासमोर एक गाडी येऊन उभी राहिली. मी पाह्यलं तर, जॉकी विलास. "चल बस!" आपल्या शेजारचं दार उघडत तो म्हणाला, "तू काय इन्सान आहेस का हैवान?"

त्यानं गाडी परत सुरू केली आणि ती रस्त्यावरून धावणाऱ्या असंख्य गाड्यांच्या रांगेत धावू लागली.

"काय झालं?" मी विचारलं.

"इकडे आल्यापासून एक बोटभर पत्र तरी पाठवायचं होतंस? असतोस कुठं? उल्का कशी आहे? नोकरी मिळाली का तिला?"

"नाही! माझ्याबद्दल सांगण्यासारखं असं काही खास घडलेलं नाही. मुलं कशी आहेत?"

"आज मुलांची आठवण आली तुला?"

"नाही रे. मला वारंवार आठवण यायची; पण काय करू? माझ्याभोवताली अशी काही चमत्कारिक स्थिती निर्माण झाली होती की; त्यातून बाहेरचा विचारदेखील करायला सवड मिळाली नाही!"

"बरं बरं! मुलं आज मुंबईत आहेत! सीझन सुरू होतोय ना येत्या रविवारपासून! मुलांना घेऊन आलोय! तू कुठं चाललास आता?"

"वरळीला!"

"वरळीला? कुठं रे?"

"वरळीला 'परवीन व्हिला'मधे!"

"परवीन व्हिला!" गाडी चालवता चालवता विलास माझ्याकडे नजर टाकून लगेच पुढं पहात म्हणाला, "त्या बिल्डींगमधे माझ्या ओळखीची एक व्यक्ती रहाते!"

"कोण?"

"कुमारी! अरे यार! काय सांगू तुला, समर! रेसकोर्सवर आमच्यासाठी जीव टाकणाऱ्या आजपर्यंत असंख्य बायका-पोरी पाह्यल्या; पण कुमारीची सर कोणालाच येणार नाही. परवा तिच्यावर एक खोटी केस झाली होती! पण सुटली, तू आता कोणाकडे चाललाहेस?"

मलाही विलासची थोडी गम्मत करायची लहर आली. मी म्हणालो, "अय्यंगारसाहेबांकडे, अकौन्टंट जनरलच्या ऑफिसात असतात!"

'काय, करतोस काय सध्या?'"

"रिकामाच आहे!"

"इतके दिवस?"

"हो, तू मघा म्हणालास ती कोण?"

"कुमारी! बघितलीय का तिला कधी? अरे, रेसकोर्सवर आली की सारे सारे पंटर विन झालेली तिकिटं कॅश करायची सोडून तिच्याकडे पहात रहायचे! मी जायचो कधी कधी! पण माझ्याकडून तिनं कधी घेतले नाहीत हं!" स्वभावानं विलास थोडासा रंगेल होता हे मी पुण्यात त्याच्या घरी असताना ताडलं होतं. पण कुमारीची आणि त्याची तशी ओळख असेल याची मला मुळीसुद्धा कल्पना नव्हती. "चहा प्यायला जायचं का तिच्याकडे?" विलासनं मला विचारलं.

"चल! बघू तरी कसली आहे ती? इतकं वर्णन करतो आहेस तर!" विलास सराईतासारखा मुंबईच्या त्या वाहनांमधून गाडी हाकत होता. गाडी चालवता चालवता तो म्हणाला, "गडकरी इन्स्पेक्टरला तिनं गच्चीवरून ढकलून दिलं म्हणून तिच्यावर आरोप होता! पण गडकरी म्हणजे एक आग होती आग! अरे, रेसकोर्सवर आला की प्रायव्हेट बुकीजना घाम फुटायचा! जितका कडवा तितकाच हुषार! सगळे गुन्हेगार त्याला वचकून असत! कुमारीच्या घरी गेला तिथंच तो खाली कोसळला म्हणे. प्यायचा चिक्कार!"

मी चेहऱ्यावर उत्कंठा दर्शवीत म्हणालो, "कुमारीनंच त्याचा शेवट घडवला नसेल?"

"छे: रे! ते शक्य नाही! रेड्यासारखा धिप्पाड होता तो! मला एकदा त्यानं पार्टीला बोलावलं होतं, आमचं ठरलं, जेवण आणि ड्रिंक्स घेऊन मुंबईच्या बाहेर जायचं! जावं कुठं? पवईला गेलो! आताचं आय. आय. टी. आहे ना त्याच्या डाव्या बाजूला! स्पॉट फर्स्ट क्लास होता. सोबत गडकऱ्यानं तीन पोरी आणल्या होत्या. पंधरा-सोळा वर्षांच्या! तुला कल्पना येणार नाही समर, नुकत्या वयात आलेल्या त्या पोरींच्या अंगाला हात लावताना भीती वाटली मला! आम्ही तिघेजण आणि त्या तिघी पोरी. प्यायला सुरुवात केली आणि ते दोघेही बेटे लंबे झाले. त्या पोरी माझ्या भोवताली जमल्या. रात्र झालेली. मी सोबर होतो. पण पोरींच्या अंगाला हात लावण्याची इच्छा नाही झाली. पण गडकरी दुसऱ्या दिवशी मला म्हणाला, "यू रोड थ्री हॉर्सेस ॲण्ड वन् ऑल द रेसेस!" असा परव्हर्ट डोक्याचा माणूस होता गडकरी! पोरींना छळायचा फार! चिमटे घ्यायचा, हात पिरगळायचा. काही धंदेवाल्या पोरींना त्यानं सिगारेटचे चटके दिल्याचं देखील माझ्या कानांवर आलं होतं. कुमारीच्या घरी त्याचा मृत्यू लिहिला होता."

'परवीन व्हिला'जवळ गाडी थांबवून आम्ही दोघे लिफ्टमधे चढलो. विलासनंच दारावरचं बटन दाबलं. मार्थानं दार उघडलं.

"कुठं आहे तुझी मालकीण?"

मार्था हसतहसत म्हणाली, "आहेत, सांगते त्यांना!"

मार्था आत गेली. मी नखरेपणाचं नाटक करून विलासशेजारी खुर्चीच्या मुठीवर तबल्याचा ठेका धरावा तसा टिचक्या मारत बसलो.

पांढऱ्याशुभ्र साडीतली कुमारी आत आली. तिनं विलासला पाहून विचारलं, "कधी आलात?"

"मुंबईत आलो परवा! रेस सीझन सुरू होतोय ना येत्या रविवारपासून!"

"हो, बरोबर आहे!" आठवण झाल्यासारखी करीत कुमारी म्हणाली.

"मला समजलं केसचं! संकटच होतं ते!"

कुमारीनं फक्त स्मित केलं.

"कुमारी, तुझी ओळख करून देतो, हा माझा मित्र समर ठाकूर! आम्ही दोघेही भवानीनगरचे!"

विलासच्या वक्तव्यानं कुमारी आश्चर्यचकित झाली. कारण माझ्याबद्दल विलासला काहीच कल्पना नसावी अशी तिची खात्री झाली होती.

"मोठा डॅशिंग माणूस आहे, पण काय लक म्हणतात ना ते त्याच्यावर नाराज आहे!" विलासला माझ्याबद्दल काय बोलायचं ते बोलू द्या, अशा समजुतीनं मी छताकडे पहात राह्यलो.

"काय घेणार? चहा, कॉफी की कोल्ड्रिंक?"

"काही चालेल, पण मला बीअर एक ग्लास मिळाली असती तर बरं झालं असतं!" विलास म्हणाला.

"बीअर? बरं! समर, खालून दोन बीअर घेऊन ये!" सवयीनुसार कुमारी बोलून गेली! मी उठलो आणि बास्केट घेऊन खाली गेलो. बीअर घेऊन आलो, तेव्हा विलास माझ्या पाठीवर थाप देऊन म्हणाला, "आयला - चांगलाच मुंबईचा मवाली बनला आहेस की! थांगपत्ता सुद्धा लागू दिला नाहीस तो?"

मी हसतहसत बीअरच्या बाटल्या फ्रीजकडे घेऊन निघालो. मार्था मला म्हणाली, "तू आज निराळंच स्वरूप दाखवलं?"

"कसलं?"

"तुला उत्तम अभिनय करता येतो ते!"

"पण तुझ्यापेक्षा कमी! मुंबईच्या पोलिसांनादेखील तू चकवलंस! अगदी निष्पाप चेहऱ्यानं साऱ्यांना बनवलंस! तुझ्या सहवासामुळं हे अभिनयकौशल्य माझ्यात उतरलं!"

मार्था कृतककोपानं माझ्या अंगावर धावली. ओपनर घेऊन मी हॉलमधे आलो. विलास सिगारेट ओढत कुमारीशी गप्पा मारत बसला होता.

"तू काही जरी सांगितलंस तरी मला हे काही पटत नाही. तू रेस सोड, धंदा बंद कर; पण मुंबई सोडायची कल्पना काही मला पटत नाही." विलास कुमारीला म्हणाला.

"नेरळला मिलिट्री ऑफिसरनं शेतात बंगला बांधलेला आहे. सभोवार चारसहा एकर जमीन आहे. तो पावणेदोन लाख मागतोय; मी सव्वापर्यंत ऑफर दिलीय."

"पण मी म्हणतो तू मुंबईला वैतागलीस का?"

"त्या केसपासून मला मुंबईत रहावंसं वाटत नाही. पोलिसखातं मला सुखानं जगू देणार नाही, विलास! काल संध्याकाळीच मला एक सबइन्स्पेक्टर येऊन धमकी देऊन गेला."

"काय म्हणून?"

"काय सांगायचं तुला? या जगात स्त्री म्हणून जन्माला येणं हेच पाप आहे! आणि त्यातल्या त्यात एकदा पाय घसरलेली स्त्री दिसली, की ती मरेपर्यंत कोणी तिच्याकडे चांगल्या नजरेनं पहात नाही!"

"फर्गेट इट!" बीअरच्या बाटलीचं टोपण ओपनरचं उडवून विलास म्हणाला, "या रविवारी कोर्सवर ये, 'कोलंबिया प्रिन्सेस' वर तुला किती लावता येतील तितके लाव. मी माउंट करतोय ती घोडी!"

"आय ॲम व्हेरी सॉरी, विलास! मी उद्या तुझ्याच गावी चाललेय!"

"माझ्या गावी?" विलास माझ्याकडे पहात म्हणाला, "काय रे समर, काय ठरवलंयस काय?"

"मी काही ठरवलेलं नाही! हिलाच देवीला जायचं आहे!"

"जा जा! पण निदान 'नेक्स्ट' संडेला तरी कोर्सवर या!"

"मी नक्की येईन! मुलं रहाणार आहेत ना तोवर?"

"हो, आठदहा दिवस राहतील! आल्यानंतर ये. मी पेडर रोडला रहातोय, महालक्ष्मी मंदिराजवळच! नरिमन अपार्टमेंटस्!"

-o-o-o-

२०

जवळजवळ एक वर्षानंतर मी भवानीनगरला परत जात होतो. सोबत कुमारी होती. केसमधून निर्दोष सुटूनदेखील ती आनंदी दिसत नव्हती. फर्स्ट क्लासच्या डब्यात आम्ही समोरासमोर बसलो होतो. ती खिडकीतून बाहेर पहात होती. गाडी सुटल्यानंतर ती मला म्हणाली, "येताना नेरळला उतरून ती जागा पाहू! जमलं तर तो व्यवहार पूर्ण करून टाकू."

"ठीक आहे!"

"विलासला तू किती वर्षं ओळखतोस?"

"तसा मी बरीच वर्षं त्याला ओळखतो; पण पुण्यात त्याच्या घरी राह्यल्यापासून घसट वाढली! का? त्याच्याबद्दल काही माहिती हवी आहे?"

"तसं काही नाही, पण माणूस चांगला आहे वागायला! आत एक बाहेर असं काही नसतं त्याचं!"

"तुझी किती दिवसांची ओळख?"

"बरीच जुनी ओळख आहे! त्याला पहिला माऊंट मिळाला अन् तो विन झाला त्या दिवशी मी स्वत: त्याच्याकडे जाऊन त्याचं अभिनंदन करून आले!"

"अरे व्वा!"

"अधूनमधून तो इथं असला की येतो. काही खात्रीच्या टिपा देतो!"

"माझ्याशी इतक्या मोकळेपणानं वागत होता, पण कधी तुझ्या नावाचा ओझरता उल्लेखही केला नाही त्यानं!"

कुमारी हसली आणि म्हणाली, "उल्लेख करण्यासारखी व्यक्ती आहे का मी?"

"तसं नाही, पण मित्र म्हटल्यानंतर अशा गोष्टी एकमेकांजवळ बोलायच्या नाहीत?"

"मला मात्र वाटतं, माझी अन् त्याची पुण्यात भेट झाली नसती तर बरं झालं असतं!"

"का? असं वाटतं?"

"उल्काची - माझी ओळखच झाली नसती!"

दादर ओलांडून गाडी वेगानं पुण्याच्या रोखानं धावू लागली. मुंबईची दाट वस्ती आता काहीशी विरळ दिसू लागली. बाजूच्या रस्त्यावरही वाहनांची संख्या कमी दिसू लागली. सांताक्रूझच्या रोखानं येणारं एक भलं मोठं विमान आकाशात एकाच जागी स्थिर असल्यासारखं दिसत होतं.

कुमारी माझ्याकडे टक लावून पहात म्हणाली, "आताशी तू थोडा उतरल्यासारखा दिसतोस, समर!"

"विवंचना!"

"कोणाची?"

"एक उल्काची आणि दुसरी तुझी!"

"माझी विवंचना कशासाठी?"

"खरं सांगू, ती केस झाल्यापासून माझी झोपच उडाली होती, काय होईल अन् काय नाही यायचा एकसारखा विचार डोक्यांत घोळत असे!"

"असं माझ्याबद्दल का वाटावं?"

"कुणास ठाऊक!"

"असं वाटणं बरं नव्हे!"

"तेही कळायचं, पण वाटत रहायचं मात्र!"

कुमारी हसली आणि मला म्हणाली, "भवानीनगरला रहायची व्यवस्था काय आहे?"

"एकच उत्तम हॉटेल आहे; गावच्या मध्यवस्तीत, व्हेज-नॉन व्हेज फार सुरेख जेवण बनवतो मालक! तिसऱ्या मजल्यावर रहायची व्यवस्था आहे!"

"अच्छा! बघण्यासारखं काय-काय आहे?"

"गावांत खास बघण्यासारखे असे दोन राजवाडे आहेत. पण गावापासून चौदा मैलांवर एक प्राचीन दुर्ग आहे. तिथं मात्र हवा फारच छान असते!"

"रहायची व्यवस्था आहे तिथं?"

"हो ऽ! हॉलिडे होम्स आहेत. गव्हर्मेंट रेस्ट हाऊसही आहे. तिथला कूक सांगेल त्या पद्धतीचं जेवण बनवतो. आम्ही कॉलेजांत असताना दुर्गावर जायचो! आपण असंच करू, कुमारी!"

"कसं?"

"भवानीनगरमधे जास्त रहायलाच नको! मी गेल्यागेल्या आईला भेटून घेतो. उद्या संध्याकाळीच आपण मुक्कामाला दुर्गावर जाऊ!"

"चालेल! कुठंतरी अशा निवांत जागी जावंसं वाटतंय की, तिथं मोटारीचा हॉर्नदेखील कानांवर पडू नये."

"मग माथेरान उत्तम होतं, मी राह्यलोय तिथं. कोणतंही यांत्रिक वाहन आणायला बंदी आहे तिथं!"

"पण आपल्याला देवीचं दर्शन घ्यायचं होतं ना!"

"तेही खरंच!"

"तू देव मानतोस, समर?"

"खरं म्हणशील तर कधी कधी वाटतं, देव असावा आणि कधी कधी वाटतं देवधर्म या सर्व भोंगळ कल्पना आहेत."

"तो नसावा असं केव्हा वाटतं?"

"ज्या वेळी अलकानं माझ्याशी अप्रामाणिकपणा दाखवला तेव्हा! देवब्राह्मणासमोर आमचं लग्न झालं, माझ्याशी एकनिष्ठ रहाण्याचं आणि माझ्या सुखदुःखात सहभागी व्हायचं व्रत तिनं घेतलं सप्तपदीच्या वेळी. पण त्याच अलकानं ठोंबऱ्याशी सलगी केली; तेव्हा वाटलं देवधर्म सब झूट है!"

"आणि तो असावा असं कधी वाटलं?"

"तुझी निर्दोष सुटका झाल्या वेळी!"

"एका वेश्येबद्दल इतकं प्रेम वाटणं बरं नाही, समर!"

"खरं म्हणशील तर तू वेश्या आहेस असं मला वाटतच नाही!"

"असं वाटण्यात धोका आहे!"

"हे बघ, दोन लग्नं झाली, पण एकीनंही मला खरंखुरं प्रेम दिलं नाही, मी तुझ्याकडे आलो ते एका विशिष्ट हेतूनं, नोकरीसाठी म्हणून! पण नंतर नंतर वाटू लागलं—"

"काय?"

"तू कोणाही परक्या पुरुषाला घरात घेऊ नयेस!"

कुमारी हसली, हसताना तिच्या डाव्या गालाला खळी पडायची! डोळे बारीक करून ती हसायची आणि खूप हसली की तिचे डोळे पाणवायचे! आताही ती तशीच हसली.

रुमालानं डोळे टिपत म्हणाली, "तुझ्या डोक्यांत असं काही निर्माण होईल, याची मला सुरुवातीला कल्पना नव्हती!"

"मला तरी सुरुवातीला कुठं होती? पण तुझ्यावर तो खटला झाला ना, तेव्हापासूनच हे वाटायला लागलं!"

"खटला संपला! आता ते वाटायचं कारण नाही!"

मी हसत हसत म्हणालो, "कुमारी, आयुष्यांत आलेल्या दोन स्त्रियांनी माझा भ्रमनिरास केला. म्हणून मी तुझ्याकडे आकर्षला गेलो."

"सांगितलंस ते बरं केलंस!"

"का?"

"तुझी कल्पना तरी आली!"

त्यानंतर बराच वेळ कोण कोणाशी बोललं नाही. गाडी कल्याण ओलांडून कर्जतच्या रोखानं चालली होती. वारली लोकांची गवती घरं अधांतरी लाकूडफाट्यावर ठेवलेल्या भातांच्या पिंजराचे ढीग आणि ताडाची झाडं दिसली. त्यांचं दर्शन दुर्मिळ होत होत गाडी कर्जतच्या स्टेशनांत येऊन स्थिरावली.

"समर, या गाडीला केटरिंग कार आहे का रे?"

"हो, काय हवंय?"

"मला मुंबई सोडली की भूकच लागते बघ?"

"पण तू आता काही खाल्लंस तर रात्री जेवणार काय? पुणे स्टेशनवर जेवण तयार असेल आपलं. निघण्यापूर्वीच मी स्टेशनमास्तरकडून इंटिमेशन पाठवलंय!"

"चहा तरी घेऊ?"

"ओ ऽ के! चल! या गाडीला कोणी वेटर फिरत नाही वाटतं!"

मी आणि कुमारी गाडीच्या दुसऱ्या शेवटाला असलेल्या केटरिंग कारमधे आलो. येताना दोन डब्यांचा सांधा ओलांडताना कुमारीचा तोल गेल्यासारखा वाटल्यानं मी तिच्या दंडाला धरून सावरलं. तिच्या दंडाला स्पर्श करण्याची ही दुसरी वेळ होती... पहिल्यांदा केसचा निकाल लागलेल्या दिवशी गर्दीतून टॅक्सीत बसताना. केटरिंग कारमधे आम्ही जवळजवळ बसलो. वेटरनं मेनू आणून ठेवला. मी त्यावरून उगीचच नजर फिरवली आणि म्हणालो, "दो चाय!"

"समर, तू इतके दिवस घरी राह्यलास, पण आपल्याला मनमोकळेपणानं बोलायची संधीच कधी मिळाली नाही!"

"वेळ यावी लागते!"

वेटरनं 'ट्रे' आणून पुढ्यातल्या टेबलावर ठेवला. कपात साखर घालताना तिनं मला विचारलं,—

"सकाळी किती वाजता गाडी भवानीनगरला पोहोचते?"

"करेक्ट सहाचं टायमिंग आहे; पण वेळेवर पोहोचली तर मग ती रेल्वे कसली?"

कुमारीचं सौंदर्य असं होतं की, कुणालाही तिच्याकडे एकदा पाहून समाधन होत नसे. केटरिंग कारमधे बसलेल्यांच्या नजरा कुमारीवर स्थिरावल्या. त्याची जाणीव असूनही ती कोणाकडे पहात नसे; पुरुष जातीबद्दल कसलंच कुतूहल तिच्यात शिल्लक नव्हतं, अनेक पुरुषांच्या सहवासामुळे असेल अगर तिनं पत्करलेल्या पेशामुळे असेल! तिच्या नजरेत कमालीची तटस्थता जाणवत होती. केस झाल्यापासून तिची ही वृत्ती मला अधिकच जाणवत होती.

"समर, खरं म्हणजे कोणी कोणाच्या खासगी बाबतीत डोकावू नये; पण मला राहूनराहून आश्चर्य वाटतं ते तुझ्या पहिल्या बायकोचं! तुझ्यात काय उणेपणा आढळला म्हणून ती दुसऱ्यांकडे आकर्षली गेली?"

चहाचा मोकळा कप ट्रेमधे ठेवून मी हवेत हात उडवले; "देव जाणे! इतकंच नव्हे, तर मी तिच्या कॉलेजजीवनासंबंधी जे काही ऐकलं तेदेखील विसरायची तयारी दर्शविली होती; पण ती साली शेण खायला गेलीच! मी तिचा खून कसा केला नाही याचंच मला आता आश्चर्य वाटतं."

"नको रे बाबा तो विचार!" कुमारी उठताउठता म्हणाली, "माणूस किती जरी वाईट असला तरी त्याचा खून करणं हा काही मार्ग नव्हे!"

माझ्या सोबत ती चालताचालता माझा हात धरून म्हणाली, "तुझ्या बायकोची अन् माझी एकदा भेट घालून दे. तिला सांगते मी व्यभिचारी स्त्रीचा शेवट काय असतो ते! खरं म्हणजे असलं काही तिला शिकवायचा मला अधिकार नाही; पण वाटतं की तुला संसारा सुखाचा व्हावा!"

आम्ही जागेवर येऊन बसलो. गाडी खंडाळ्याचा घाट चढत होती. ती जसजशी वर चढत गेली तसतशी थंडी जाणवू लागली. कुमारीनं खिडकीची काच चढवली आणि ती मला म्हणाली,

उन्हाळ्यात तू लोणावळ्याला राह्यलास का कधी?''

''नाही! का?''

''फार बरं वाटतं! या उन्हाळ्यात येऊ आपण!''

''बऱ्याच योजना तुझ्या डोक्यात आहेत. नेरळची ती शेती घ्यायची, तिथं राह्यला जायचं, लोणावळ्याला यायचं!''

हसतहसत ती म्हणाली, ''योजना बऱ्याच आहेत; पण त्या कितपत साध्य होतात ते आता पहायचंय!''

''तू ते शेत आणि बंगला विकत घेतलास तर मी काय करावं?''

''रहा की माझ्याजवळ!'' सहज ती बोलून गेली.

''एकदा म्हणतेस तुझा संसार सुखाचा व्हावा, एकदा म्हणतेस माझ्याजवळ रहा. याचा अर्थ काय?''

कुमारी स्मित करून म्हणाली, ''तेही खरंच आहे!''

''काय खरं आहे?''

''तुला दीर्घ काळ माझ्याजवळ रहाता येणं अशक्य आहे!''

इतक्यात एक गोला लठ्ठसा टी. सी. 'टिकेट टिकेट' करत आला. मी त्याला तिकिटं दाखवली. त्यानं हातातल्या बॉलपेननं त्यावर काहीतरी गिरमिटलं आणि जाताना तो कुमारीकडे एक चोरटी नजर टाकून जाता झाला. कुमारी त्यावर म्हणाली, ''तू सोबत आहेस तरी लोकांना अशा नजरेनं पहावंसं वाटतं; मग मी एकटी प्रवास करताना काय होत असेल याची कल्पना कर!''

''अगं, तुझं रूपच तसं आहे, त्याला लोक तरी काय करणार?''

''पण मी तुझ्याशिवाय स्वतंत्रपणे यापुढे राहू शकत नाही, समर!''

कुमारीनं शेवटी आपलं स्पष्ट मत मांडलं. मला त्यात अनपेक्षित असं काही नव्हतं. पण माझ्या आयुष्यात आलेल्या दोन स्त्रियांनी माझा चांगलाच भ्रमनिरास केला होता. आता परत तिसरीचा आणि तो उघडउघड वेश्या व्यवसाय करणाऱ्या स्त्रीचा स्वीकार करून माझ्या आयुष्याचं अक्षरश: त्रांगडं होणार होतं. नकळत मनाला वाटत होतं. जे त्या दोघी देऊ शकल्या नाहीत ते कुमारी नक्कीच देईल! मला प्रेम हवं होतं. शुद्ध प्रेम, वासनाविरहित! कुमारीनं आपला सुकुमार देह अनेकांच्या पुढे उघडा केला होता हे मी विसरणं अशक्य होतं, पण मला तिच्या देहाशी काहीएक कर्तव्य नव्हतं; मला हवं होतं ते तिचं प्रेम!... पण ते तरी कसं शक्य होतं! एका सुंदर स्त्रीचा फक्त सहवास किंवा तिचं प्रेम! मला तिच्या देहाशी काही कर्तव्य नाही, असं मानणं किंवा म्हणणं, दोन्हीही भोंगळपणाचं ठरणारं होतं. ज्या कुणाचा असल्या 'प्लेटॉनिक लव्ह'वर विश्वास असेल तो असो, माझा मात्र असल्या 'प्लेटॉनिक लव्ह'वर काडीमात्र विश्वास नाही...

निदान आजपर्यंत तरी मला तिच्याबद्दल तसं आकर्षण वाटलं नव्हतं. केस झाल्यापासून तिनं जसा धंदा बंद केला, तशी मला तिच्याविषयी निराळीच ओढ वाटू लागली. व्यवहारी जगाच्या दृष्टीनं असं काही वाटणं हास्यास्पद ठरणार होतं याची मला जाणीव होती.

घाटमाथ्यावरून गाडी लोणावळा ओलांडून सपाट भागावरून धावू लागली. लोणावळ्याला एक गृहस्थ आणि म्हातारी आमच्या कूपेमध्ये चढली. आजीबाई बसल्याबसल्या पेंगायला लागल्या आणि चक्क कुमारीच्या खांद्यावर मान टाकून डुलक्या घेऊ लागल्या.

कुमारी मला म्हणाली, ''समर, तू इथं बस. मला तुझी जागा दे!''

''हा चांगला न्याय आहे. तूच इथं ये!'' कुमारीनं हलकेच आजीबाईंची मान उचलली आणि ती माझ्या शेजारी खिडकीजवळ येऊन बसली.

वाऱ्यानं भुरूभुरू उडणारे तिचे केस माझ्या गालावर मोरपंख फिरवल्याची जाणीव करून देत होते. हलकेच मी तिच्या कमरेभोवती हात टाकला आणि तिनं माझ्या खांद्यावर मान टेकली. अंधार पडला होता.

पुणे स्टेशनवर गाडी बदलावी लागली. ब्रॉडगेज बदलून मीटरगेजमधे जावं लागणार होतं. त्यापूर्वी 'रेस्तोराँ'मधे जाऊन जेवण घेतलं.

मीटरगेजच्या फर्स्ट क्लास कूपेमधे आम्हा दोघांशिवाय तिसरं कोणीच नव्हतं! अशा वेळी माझ्यासारख्याच्या हातून जे घडणं स्वाभाविक होतं तेच घडलं; पण ते घडल्यानंतर एकदम आठवली ती सलिमा! दौलतखानाची सलिमा! ती स्वरूपसंपन्न स्त्री डोळ्यांसमोर उभी राह्यली! तो प्रसंग आठवला! माझ्या सहवासात अशा अशा तऱ्हेनं आलेल्या प्रत्येक सुंदर स्त्रीचा अंत कोणत्या तरी हृदयद्रावक रीतीनं तर होणार नाही ना, अशी पुसट शंकाही डोक्यात तरळून गेली. माझ्या अंगावर हात टाकून, मला बिलगून झोपलेली कुमारी कसलाच विचार करत नव्हती. गाडीच्या लयबद्ध आवाजानं मलाही डोळ्यांवर झापड आल्यासारखं वाटू लागलं.

सकाळी डोळे उघडले, तेव्हा गाडी भवानीनगर स्टेशनमधे येऊन थांबलेली. खिडकी उघडून पाह्यलं, तर सारे प्रवासी उतरून गेलेले. तरी बरं, भवानीनगर हे शेवटचं स्टेशन होतं. अधलंमधलं असतं तर केव्हाच गाडी पुढच्या स्टेशनात गेली असती.

कुमाराली मी हलवून जागं केलं.

"अं ऽऽ" जांभई देऊन तिनं विचारलं, "आलं भवानीनगर?"

"हो. बराच वेळ झाला गाडी थांबून." सामानाची आवराआवर करीत मी म्हणालो, "उजाडायचं आहे, तोवर लॉजवर जायला हवं!"

"का?" केसावर कंगवा फिरवीत तिनं विचारलं.

"या गावात मला ओळखणारे असंख्य लोक आहेत!"

"पण मला कोणीच ओळखत नाही ना!"

"बरं बरं, आटप! एखादे वेळेस इंजिन गाडी ओढून पलीकडे नेऊन ठेवील!"

हॉटेलच्या तिसऱ्या मजल्यावरची खोली मिळाली. मी अंघोळ आटोपली आणि कपडे बदलले. केसांवरून कंगवा फिरवताना मी आरशातून कुमारीकडे पहात म्हणालो, "शेवटी व्हायचं ते झालंच!"

"कशाबद्दल म्हणतोस!"

"रात्रीचा तो प्रकार इतक्यात विसरलीस?"

"ते होय!" हसत हसत ती म्हणाली, "अशा गोष्टी कुठं दुसऱ्या दिवशी आठवायच्या असतात? बरं, तू परत केव्हा येणार, सांग? नाहीतर मला इथं अडकवून ठेवून तू गावभर भटकत राहशील."

"छे: छे:! असं होणार नाही; पण एक कर, फारवेळ माझी वाट पाहू नकोस; जेवून घे. आता आठ वाजता स्टॉल उघडला की पोऱ्या पेपर आणून देईल. तुला काही मासिकं हवी असली तर सांग!"

रस्त्यावरून जाताना मी विचार करीत होतो, "काय होणार आहे माझं भविष्यात? हे तारू कुठल्या किनाऱ्याला सुरक्षित लागण्याची काही चिन्हं दिसत नाहीत... आयुष्यांत किती स्त्रिया येणार आहेत आणि त्या काय-काय करणार आहेत, पत्ताच लागत नाही!..."

घरी आलो तेव्हा अमर समोरच पेपर वाचत उभा होता. मला पाहून त्यानं पेपर बाजूला ठेवला अन् मला मिठी मारली, "दादा ऽ!"

मी त्याच्या मिठीतून स्वत:ला सोडवून घेत विचारलं, "आई कुठंय?"

"देवघरात!"

"डॅडी?"

"माडीवर आहेत!"

अमरला वाटलं, मी अलकाबद्दलही विचारीन, तो त्या अपेक्षेनेच माझ्याकडे पहात होता; पण तिच्याबद्दल विचारायचं अगदी कटाक्षानं टाळलं. बूट काढून मी आत गेलो. पाय धुतले आणि देवघराच्या दारासमोर उभं राहून हाक मारली, "आई ऽ!"

माझ्या हाकेसरशी आई देवघरातून बाहेर आली. मी तिचे पाय स्पर्शून नमस्कार केला. आई माझ्या पाठीवर हात फिरवत राह्यली. तिचे डोळे पाणावले. वर्ष-सव्वा वर्षांनंतर मी आईला भेटत होतो. मनात भावनांची एकच गर्दी उसळली होती. मलाही काय बोलावं, हे सुचत नव्हतं.

मी देवघराच्या दाराशेजारी आईजवळ बसलो. अमरही तिथं उभा होता. तो म्हणाला, "दादा, तुझा मुंबईचा पत्ता विचारण्यासाठी परवा रत्नापूरचे एक गृहस्थ आले होते!"

"रत्नापूरचे गृहस्थ?"

"हो ऽ! रत्नापूरच्या राजकन्या नवऱ्याशी भांडून मुंबईला निघून गेल्या आहेत. त्यांना कोणी सांगितलं की, त्या मुंबईला असतील, तर समरकडून त्यांचा ठावठिकाणा समजेल!"

"काय सांगतोस काय?"

"हो, मलासुद्धा पहिल्यांदा खरं वाटलं नाही. दोन महिन्यांपूर्वी त्या निघून गेल्या आहेत!"

"कमाल झाली!" मी कपाळाला हात लावून म्हणालो.

"राजकुमार अमरेंद्रही इथं भवानीनगरला तुला भेटण्यासाठी आले होते!"

"पण हे असं कसं काय घडलं?"

"कुणास ठाऊक! लग्न झाल्यापासून त्या नवराबायकोत खूप धुसफुस होती म्हणे. डायव्होर्स मागण्यापर्यंत प्रकरण गेलं."

तेव्हा आई शांतपणे म्हणाली, "अमर, अरे आल्याआल्या कशाला सांगितलंस याला?"

"हे बघ आई, असल्या प्रकरणांचं मला आताशी काही वाटत नाही. उलट एखाद्याचं वैवाहिक आयुष्य अगदी सुरळीतपणे चाललं आहे असं समजलं तरच काहीतरी विचित्र घडल्यासारखं वाटतं! बरं, अलका कुठंय?"

"कॉलेजला गेलीय. बी.टी. चे तास सकाळी घेतात आताशी!" अमरनं माहिती पुरवली.

"समर, आता आला आहेस तसा इथंच रहा बाबा! तीही समजूतदार झालीय! कुशाबा म्हणत होता, शेती आपल्याला काही निभवत नाही. मी आता तुला इथून कुठं जाऊ देणार नाही! तू सरळ शेतावर जाऊन रहा!"

मी फक्त हसलो. मुंबईच्या गतिमान जीवनाशी एकरूप झालेल्याला शेती कर म्हणून सांगणे किती हास्यास्पद आहे, याची आईला कल्पना नव्हती.

त्यानंतर मी डॅडींना जाऊन भेटलो, "हॅल्लो! अरे, तुला साधा शिष्टाचारदेखील पाळता येत नाही?" डॅडी मला पहातापहाताच उखडले.

"काय झालं?"

"कुमारी सुटल्याचं मला तारेनं कळवणंदेखील झालं नाही तुला? पेपरमधे वाचलं तेव्हा समजलं!"

"लक्षात राह्यलं नाही."

"बरं, आता कसं काय येणं केलंस?" एखाद्या त्रयस्थाला विचारावं अशा थाटात मला डॅडींनी विचारलं.

"सहज आलो!"

"कुमारी कशी आहे?"

"ठीक आहे." ती सोबत आल्याचं मी मुद्दाम सांगण्याचं टाळलं.

"अरे, त्या रत्नापूरच्या राजकन्येचं काय प्रकरण ते?"

"मलाही काही कल्पना नाही, डॅडी. आता अमरकडून समजलं त्या नवऱ्याशी भांडण करून मुंबईला गेल्या आहेत असं! मला कुठं त्या भेटल्या नाहीत मुंबईत?"

"लौकरच भेटतील!" डॅडी सिगारेट शिलगावून म्हणाले.

"ते कसं काय?"

"रेस सीझन सुरू होतोय ना? नवऱ्याशी झगडे करून निघून गेलेल्या बऱ्याच राण्या आणि राजकन्या रेसकोर्सवर हमखास भेटतात. एक कुमारी जवळ आहेच, त्यात आणखी एक!"

"तुमच आपलं काहीतरीच असतं डॅडी!"

"काहीतरीच कसं? तू शपथ घेऊन सांगतोस. तुझा अन् कुमारीचा तसा संबंध आला नाही म्हणून?"

"तुम्ही काय समजायचं ते समजा." असं म्हणून मी तिसऱ्या मजल्यावर माझ्या खोलीकडे

गेलो. अलकानं खोली अगदी व्यवस्थित लावलेली होती. टेबलावर एका बाजूला पुस्तकं मांडून ठेवलेली होती. कपाटांत साड्या-ब्लाऊज लटकावलेले होते. खोलीत वातावरण एकदम प्रसन्न होतं. अलकाविषयीचा राग बराच कालावधी लोटल्यामुळं थोडा थंडावला होता. मला अलकाला पहायची तीव्र इच्छा झाली आणि त्याच क्षणी जिन्यावर पावलं वाजली. अलका कुठल्याशा मराठी सिनेमातलं गाणं गुणगुणत वर आली. मला खुर्चीवर बसलेलं पहाताच ती दचकली. कोपऱ्यात वहाणा काढल्या आणि टेबलावर पुस्तकं ठेवून ती खिडकीजवळ जाऊन उभी राहिली. माझ्याशी बोलावं की नाही याबाबत तिचा निर्णय होत नव्हता. सुरुवात कोणी करायची हाच प्रश्न होता. अशीच दोन-पाच मिनिटं गेली. खरं म्हणजे तिला बाहेरून आल्यानंतर साडी बदलायची होती. लग्न झाल्यानंतर तिनं माझ्यासमोर कितीतरी वेळा कपडे बदलले होते. परकर आणि ब्लाऊजमधे मी तिची छेड काढायलाही कमी केले नव्हते. पण आज तीच अलका माझ्या समोर कपडे बदलायला तयार नव्हती. याचाच अर्थ तिच्या दृष्टीनं मी परपुरुष होतो, असा तर नाही ना?... अशी शंका मनात डोकावली. मी खुर्चीवरून उठलो आणि खाली गेलो.

-o-o-o-

२१

खाली आई जिन्याजवळ उभी होती. मी अलकाशी बोललो असेन, आमच्या दोघांतला अबोला संपुष्टात आला असावा, अशा आशेनं ती तिथं उभी होती.

"बोललास तिच्याशी?" आईनं विचारलं.

"हो!" उपाहासानं मी म्हणालो.

"बरं झालं! तिच्यात बदल झाल्याचं आढळलं ना?"

"काडीचा बदल झालेला नाही! तिचा ताठा अजून तसाच आहे. कशाची घमेंड वाटते, कुणास ठाऊक!"

आईचा चेहरा खाडकन् पडला.

"बोलली नाही तुझ्याशी?"

"नाही!"

आईच्या डोळ्यांत टचकन् पाणी तरळलं. डॅडी इतके विक्षिप्त असूनही ते गावाला जाताना व गावाहून परत आल्यानंतर आई त्यांचे पाय स्पर्शून नमस्कार करायची, तिला वाटलं होतं, अलकानं मला पहाताच त्याच पद्धतीनं नमस्कार केला असेल.

"बरं आई, मी बाहेर जाऊन येतो!" बुटाची लेस बांधताबांधता मी म्हणालो.

"जेवायला उशीर करू नकोस. मी वाट पहाते!"

"ठीक आहे!"

माझा जुना दोस्त धोंडू मास्तर मला पाहून जवळ आला आणि माझा हात हातात घेत म्हणाला, "समर, किती दिवसांनी भेटतोस रे? कुठं असतोस? काय करतोस?"

"मुंबईला असतो."

"सर्व्हिस कुठं करतोस?"

"सर्व्हिस अजून कुठं नाही लागली!" हसतहसत मी म्हणालो.

"मग करतोस तरी काय?"

"ते नंतर सांगतो. धोंडू, मला एक टॅक्सी हवीय. दुर्गावर जायचंय!"

"टॅक्सी मिळेल की! कोण खास पाव्हणा घेऊन आला आहेस वाटतं?"

मी फक्त हसलो.

"बाकी तू सुधारलास हं, समर!" माझ्याकडे नखशिखांत न्याहाळून पहात मास्तर म्हणाला.

"कशावरून म्हणतोस?"

"चेहऱ्यावरून मला ते जाणवतं!"

"आणि काय विशेष इकडे?"

"विशेष कसलं आलंय? तू इथून गेलास त्या ठोंबऱ्यामुळं. मग आम्ही तालमीतल्या पोरांनी त्या ठोंबऱ्याला धुतला! बदली करून घेऊन औरंगाबादला गेला! तुझी बायको मास्तरीण होतेय वाटतं?"

"हो, बी. टी. करते आहे."

"घेऊन जा आता तिला मुंबईला. तरण्याताठ्या बायकोपासून फार काळ दूर रहाणं बरं नाही."

"जाऊ दे, सोड तो विषय! फुटबॉल टीम काय म्हणते, सांग?" विषय बदलण्याच्या हेतूनं

मी विचारलं.

"तू गेलास आणि टीमचाच 'फुटबॉल' झाला. सगळी चारी दिशांना पांगली. पॅलेसची टीम होती, पण तिच्यातही काही दम राह्यला नाही. टीममधून तू गेल्या दिवसापासून खिडांर पडायला सुरुवात झाली म्हणेनास! काय, करतोस काय सध्या मुंबईत? विलास जॉकीकडे होतास असं समजलं होतं मध्यंतरी!"

"मास्तर, तू दुर्गावर येशील तर तुला सगळं सांगेन!"

"येतो की!"

"ये उद्या, मग आपण बसू."

बरीच जुनी मित्रमंडळी भेटली. प्रत्येकजण माझ्या व्यवसायासंबंधी विचारत होता; पण माझ्याजवळ त्यांना देण्यासारखं समाधानकारक उत्तर नव्हतं. कुमारी या प्रख्यात वेश्येच्या घरी असतो असं उजळ माथ्यानं सांगायचं धाडस तेव्हा माझ्यात नव्हतं.

घरी येताना मला राजकन्या रत्नप्रभाची आठवण झाली. खरंच, ही राजकन्या कुठं बेपत्ता झाली असेल?... तरी मला तिचं एक पत्र आलं होतं की, "ज्या राजकुमाराशी माझं लग्न होतं आहे ती माणसं जुनाट विचारसरणीची आहेत. माझं-त्यांचं पटणं कठीण आहे;" पण त्यावरून राजकन्या त्यांना सोडून परागंदा होईल असं चुकूनही वाटलं नव्हतं! राजकन्येनं माझ्यावर फार मोठ्या उपकारांचं ऋण करून ठेवलं होतं. तिने धाडस करून माझी सुटका केली नसती. तर समर धीरजसिंग ठाकूर ही व्यक्ती केव्हाच नाहीशी झाली असती. राजकन्या कुठं परागंदा झाली होती कुणास ठाऊक! पण तिच्यासंबंधी बोलताना माझे डॅडी मात्र म्हणाले, 'नवऱ्यांना टाकून गेलेल्या राजकन्या आणि राण्या हमखास रेसकोर्सवर भेटतात!'

काही अंशी त्यांचं बरोबर होतं. परंतु मी बायकांच्या जंजाळात पुरता सापडलो होतो, त्यामुळं राजकन्येचा ठावठिकाणा शोधावा असं काही वाटलं नाही. जगात कुणाची म्हणून चिंता वहायची? अलकाची, उल्काची, की कुमारीची? त्यात या राजकन्येची आणखी भर पडायला नको!...

घरी आलो तेव्हा आई माझीच वाट पहात होती. आईचे डोळे रडूनरडून लाल झाले होते. बहुधा तिनं अलकाला 'ब्रेन वॉश' देण्याचा प्रयत्न केला असावा! तिनं न ऐकल्यामुळंच आईनं मनाला लावून घेतलेलं असणार, असा मी अंदाज केला.

आईनं माझ्यासाठी ताट केलं. बदाम, काजू घालून शेवयाची खीर बनवली होती. बटाट्याची भाजी, कोबीची कोशिंबीर, मसालेभात इत्यादी पदार्थ आईनं माझ्यासाठी खास बनवले होते. मी जेवताना आई बाजूला बसली होती.

"तूही घे ना माझ्याबरोबर!"

"नको, तू जेव पोटभर!" आईच्या डोळ्यांत पुन्हा अश्रू तरळले.

"आई, काय प्रकार घडला आहे?" मी भात कालवता कालवता विचारलं.

"काही नाही. तू जेवून घे!" पदरानं डोळे टिपत ती म्हणाली.

"तुला एक सांगतो, तू बिलकूल वाईट वाटून घेऊ नकोस! अलकाशिवाय माझं काहीही अडून राह्यलेलं नाही. अन् ह्यापुढं राहणार नाही. तू आणि डॅडी दोघांनी हट्ट धरलात म्हणून मी गप्प बसलो; नाहीतर हिची वाट लावायला मला फार विचार करावा लागला नसता."

"अरे, त्या मार्गाला जायला नको म्हणून तर तुलाच बाहेर जायला सांगितलं."

"मी आता बाहेर पडलोच आहे. नि:संग झालोय मी! मला कशाचंच काही वाटत नाही!"

मी नि:संग झालेलो आहे हे दाखवण्यासाठी मी जेवायला सुरुवात केली. पण आईचे पाणावलेले डोळे आणि तिला माझ्याविषयी वाटणारी चिंता पाहून माझ्या तोंडातला घास घशातून खाली उतरत नव्हता.

"तू स्वत: होऊन तरी बोलून बघ!" आई म्हणाली.

"बरं आहे! पण तू अगोदर जेव!" आई जेवली नाही.

मी कसेतरी चार घास पोटात ढकलले आणि हात धुवायला मोरीकडे निघालो. आई माझं

ताट आवरताना म्हणाली, "समर, तुला दुसरं लग्न करायचं असलं तर खुश्शाल करून घे."

हात धुता धुता मी मागे वळून आईकडे पहात म्हणालो, "लग्न?"

"हो, लग्न केल्याशिवाय तुझ्या आयुष्याला स्थिरता प्राप्त व्हायची नाही!"

हात धुवून टॉवेलला पुसतापुसता मी म्हणालो, —

"तेही करून पाह्यलं, आई! पण मला पत्नीकडून कसलंच सुख मिळू नये अशी नियतीची इच्छा दिसते! डॅडींनी माझ्या दुसऱ्या लग्नाबद्दल नाही सांगितलं?"

"अरे, त्यांच्या दृष्टीनं मी एक निर्बुद्ध आणि जुनाट वळणाची बाई आहे. कधीच त्यांनी मला विश्वासात घेतलेलं नाही. कुणाशी केलंस लग्न?"

"केलं एका सुसंस्कृत घराण्यातल्या पोरीशी, पण त्याबद्दलही पस्तावतो आहे!"

"का?"

"काय सांगू तुला माझी कर्मकहाणी, आई! ती व्यसनाधीन झालीय! दिवसभर धुंदीत असते!"

"अशा पोरीशी कशाला लग्न केलंस?"

"आता ते काय मला ठाऊक होतं? चांगली देखणी आहे, ग्रॅज्युएट आहे, मॉंटेसरीचा कोर्स केलेला आहे तिनं. मुंबईला नोकरी करून आम्ही दोघांनी सुखानं जगायचं ठरवलं; पण तिला नोकरी मिळाली नाही; म्हणून वैफल्यानं ग्रासलं आणि मद्याबद्दल मनस्वी तिरस्कार असणारी ती आज एक नंबरची दारुडी झालीय! सांगतो ना, लग्न न करता मात्र सहवासात येणारी स्त्री मला जितकी बरी वाटते, तितकी लग्न झालेली नाही! वास्तविक तुझ्यासमोर या गोष्टींची वाच्यता मी करू नये; पण आज तूच विषय काढलास म्हणून हे सर्व तुला सांगून टाकणं भाग आहे."

आई माझ्याकडे अवाक होऊन पहात राहिली. मी बरणीतली चिमूटभर बडीशेप हातात घेऊन चोळली. तळहातावर घेऊन थोडीशी फुंकर मारली, अन् तोंडात टाकून म्हणालो, —

"मी जरा बाहेरगावी जातो आहे. एक-दोन दिवसांनी परत येईन!" मुंबईला जाण्यापूर्वी तुला निश्चित भेटेन! माझी काहीएक चिंता करू नको! आयुष्यात येणाऱ्या कसल्याही कठीण समस्येचा प्रतिकार करायची ताकद माझ्या निर्माण झालेली आहे! लग्नाच्या बायकांनी मला खूप काही शिकवलं आहे."

मी घराबाहेर पडलो, तेव्हा दोन वाजून गेले होते. मास्तरनं हॉटेलवर बरोबर तीन वाजता टॅक्सी पाठवतो, म्हणून सांगितलं होतं.

हॉटेलच्या दारात टॅक्सी उभी होती. गोरा अहमद टॅक्सी घेऊन आला होता. हा मागे फुटबॉल खेळायचा; पण पुढं पुढं प्यायला लागला अन् त्याचा 'कोथळा' सुटला. त्याच्या पोटाचाच मोठा फुटबॉल झाला, मग तो कसला बोडक्याचा फुटबॉल खेळतो? त्याला रोहिल्या अहंमद म्हणत. त्याचा बाप रोहिलखंडात रहात होता, यावरून त्याचं नाव रोहिला अहमद असं पडलं होतं.

मला पहाताच त्यानं हात वर केला.

"काय समरबाबू?"

"ठीक! तुझं कसं काय चाललंय?"

"बेस्ट, दोन टॅक्स्या केल्या, एक भाऊ चालवतो, एक मी!"

"फुटबॉलच्या मॅचेस तरी बघायला जातोस की नाही?"

"हां ऽ जरूर! पण खरं सांगू समरबाबू, तुम्ही भवानीनगर सोडून गेलात आणि फुटबॉलच्या खेळातली रंगत गेली. आता अधूनमधून मॅचेस होतात? पण खेळात दम नाही! काय तुमचा तो हमखास कॉर्नर? तोफेच्या गोळ्यासारखा बॉल गोलमध्ये शिरायचा. गोलीच्या बापाला अडवता यायचं नाही."

अहमदनं केलेल्या स्तुतीमुळं मी थोडासा सुखावलो हे खरं! त्याच्या पाठीवर थाप देऊन म्हणालो, "पण आता मला पळता येत नाही अहमद! पाय अधु झाला आहे."

"कशानं?"

अहमदला तो गुमानसिंगचा किस्सा सांगायला मला वेळही नव्हता आणि तो सर्वांना

सांगत सुटावं असंही मला वाटत नसे. मी हसत हसत म्हणालो, "पडलो अन् कायमचा पाय दुखावला! बरं निघायचंय ना दुर्गावर?"

"मी केव्हाचा येऊन थांबलो आहे. तुमचंच आवरा!" मी हॉटेलच्या लाकडी जिन्यावरून बेताबेतानं वर चढलो. दारावर टकटक केलं. कुमारीनं दार उघडलं.

"जेवलीस की नाही?"

"अं ऽ हं!"

"का?"

"मला एकटीला जेवण जात नाही हे ठाऊक नाही तुला?" मी हसलो आणि म्हणालो, "त्या पूर्वीच्या सवयी आता सोडून दे! बरं, खाली टॅक्सी येऊन थांबली आहे. चल!"

कुमारीनं लगेच तयारी केली. तिनं अंगावरची साडी सोडली. परकरावरच दुसरी साडी चढवली. मला घरातला प्रसंग आठवला. हेच करायला अलका, माझ्या लग्नाची बायको, माझ्यासमोर तयार नव्हती. तिला परकेपणा वाटला माझ्याबद्दल! कुमारीला कसा वाटेल? बोलूनचालून ती वेश्या! स्वत: देहविक्रय करून जीवन जगणारी! पण का कुणास ठाऊक, कुमारी स्वत:चं पूर्वायुष्य आता आठवत नव्हती. तिला एका नवीन जीवनाची ओढ लागून राह्यली होती. तिनं वेश्याव्यवसाय सोडून दिल्यातच जमा होता.

साडी बदलल्यानंतर पावडरचा पफ तोंडावरून फिरवताना तिनं मला विचारलं,—

"भेटलास बायकोला?"

सहजपणे मला तिनं तो प्रश्न विचारला : पण त्या प्रश्नाचं उत्तर देताना मला काय बोलावं हेच सुचलं नाही. ती भेटून न भेटल्यासारखं वाटत होतं. देहानं दोन माणसं एकत्र आली की भेट झाली असं लोक मानतात. पण ज्या दोघांच्या मनामधे दोन ध्रुवांइतकं अंतर पडलेलं आहे अशी दोन माणसं एकत्र आली की त्यांची भेट झाली असं का मानावं?...

कुमारीसमोर ही चर्चा करायचं काही प्रयोजन नव्हतं; मी तिची सूटकेस उचलली. तिनं आपली व्हॅनिटी बॅग घेतली आणि आम्ही टॅक्सीत येऊन बसलो. अहमदनं कुमारीला पाह्यलं आणि तो तिच्या सौंदर्यानं चकित झाल्यासारखा दिसला. माझ्याकडे पाहून त्यानं फक्त भुवया उंचावल्या — "आहे बुवा!" अशा अर्थानं!

भवानीनगरची हद्द ओलांडून टॅक्सी दुर्गाच्या रस्त्यावरून धावू लागली. दुतर्फा हिरवळ दाटली होती. वडांच्या आणि पिंपळाच्या दाट सावलीतून टॅक्सी भरधाव वेगानं चालली होती. कुमारीनं माझा हात हातात घेतला अन् ती मला म्हणाली, —

"नेरळऐवजी या भागांत जरी चारसहा एकर जमीन मिळाली तरी चालेल!"

"इकडे जमिनीचं मोल कमी आहे असं समजू नकोस! एकरी पंधरा-वीस हजार मोजावे लागतील."

"माय गॉड!"

"मग? समजलीस काय तू? एकर-दीड एकर जमीन असलेला शेतकरी आताशी अँबॅसेडरमधून फिरत असतो! साखर कारखान्यांनी या भागाचं सगळं स्वरूपच पालटून टाकलं आहे."

"हा भाग फारच छान वाटतो, समर!"

"पूर्वी इथं भात पिकायचा, ज्वारी पिकायची; पण आता उसाशिवाय काही करत नाहीत. लोकांना फक्त पैसा हवा, पैसा!"

कुमारी म्हणाली, "पैसा जरूर हवा, समर; पण किती हवा हे समजण्याची अक्कल असली पाहिजे. तो एकदा का भरमसाट मिळू लागला की बुद्धिभ्रंश होतो. अन् असा सोप्या मार्गानं मिळालेला पैसा माणसावर सूड उगवतो, नाना तऱ्हेची व्यसनं लावतो, लाख लफडी करायला लावतो. माझ्याकडे येणारी लक्षाधीश गिऱ्हाईकं मी जवळून पाह्यलेली आहेत, पैसे कमावणारी ती जातच मला आवडत नव्हती."

"पण तुझा व्यवसाय चालायचा तो त्यांच्याच जिवावर. तू कशाला त्यांना दोष देतेस?"

"मी जगण्यासाठी पैसे कमवत होते. पण ते पैसे कमावण्यासाठी जगत नव्हते. हा फरक होता माझ्यात अन् त्यांच्यात! विसरू नकोस हा फरक!"

गाडी घाट चढत होती. अहमदनं डाव्या बाजूला स्टीअरिंग वळवलं तेव्हा माझ्या उजव्या बाजूला बसलेली कुमारी चक्क माझ्या अंगावर कोसळली. मी हसतहसत तिला उचलून बाजूला केली. पण गाडी धावणाऱ्या अहमदला मात्र नक्कीच वाटलं असणार की, आम्ही मुद्दामच धिंगाणा घालतो आहो! भवानीनगरची काही बडी धेंडं दुर्गावर केवळ हेच करण्यासाठी जात असत.

दुसऱ्या वळणावर त्यानं उजव्या बाजूला स्टीअरिंग फिरवलं तेव्हा मी कुमारीकडे झुकलो खरा; पण कोसळलो मात्र नाही.

घाट ओलांडून गाडी दुर्गाच्या परिसरात आली अन् दुर्गावरची थंड हवा तात्काळ जाणवली. ऐतिहासिक वास्तूचं रक्षण करण्यासाठी दुर्गावरच्या इमारतीपुढं एनॅमलच्या बोर्डावर सूचना दिलेल्या होत्या. पण पुराणवास्तूंचं संरक्षण करणारं खातं अस्तित्वात नसावं असं वाटणारी दशा त्या इमारतीची झालेली होती.

गाडी सरकारी रेस्ट-हाऊससमोर येऊन थांबताच तिथला वॉचमन बाळू पळत आला.

"सूट आहे का रिकामा एखादा?"

"होय, एक रिकामा आहे."

"दुसऱ्यात कोण आहे."

"आत्ता कोणी नाही; पण संध्याकाळी येणार आहेत."

"कोण?"

"सावर्डेकर सरकार आणि त्यांचे मित्र!"

"अच्छा! रात्री पत्त्याचा अड्डा पडणार वाटतं रेस्ट-हाऊसवर!"

बाळू हसतहसत म्हणाला, "सरकार लोक आहेत, आम्ही काय बोलावं."

"ठीक आहे. कुमारी, चल. निदान एक सूट तरी मिळाला."

"अरे समर, कोणी माणसं येणार असतील, तर आपण कशाला त्यांची प्रायव्हसी डिस्टर्ब करायची? दुसरीकडे कुठेतरी जाऊ."

"त्यांची प्रायव्हसी डिस्टर्ब होण्याची शक्यता थोडी, उलट आपलीच प्रायव्हसी ते लोक रात्रभर धिंगाणा घालून डिस्टर्ब करतील! फारच त्रास वाटू लागला तर आपण त्या ॲनेक्स सूटमधे जाऊ! पण इथून जे सृष्टीसौंदर्य दिसतं ते तिथून दिसत नाही, एवढंच!"

माझ्या मागोमाग कुमारी आत आली. वेताच्या फर्निचरवर जाडजूड गाद्यागिरद्या घातलेल्या होत्या. खाली मोठा जामखाना पसरला होता. आतल्या खोलीत दोन कॉटस होत्या. शुभ्र भट्टीच्या बेडशीटस अंथरलेल्या. सरकारी निवासस्थान म्हटलं की, गचाळपणाची परिसीमा असते; पण आमच्या या दुर्गावरचं विश्रामधाम त्याला अपवाद होतं. पूर्वी भवानीनगरच्या महाराजांच्या फुटबॉल टीमचा कप्तान असताना मी कित्येक वेळा या रेस्ट-हाऊसवर येऊन राहिलो होतो. इथले नोकर-चाकर त्यामुळंच माझ्या चांगल्या परिचयाचे होते.

"कुमारी, इकडे गच्चीत ये!" आत ड्रेसिंग टेबलासमोर उभं राहून विस्कटलेले केस व्यवस्थित बसवत असलेल्या कुमारीला मी बाहेर बोलावलं.

"अहाहा! काय वंडरफुल साइट आहे रे! समर, मला कल्पना नव्हती हं, हे ठिकाण इतकं सुरेख असेल याची!"

"अगं, पूर्वी इथं इंग्रज रेसिडेंट येऊन महिना महिना मुक्काम ठोकत. आमचे महाराजही काही खास पाहुणे आले तर या दुर्गावर येऊन रहायचे, राणीसाहेबांच्या समोर 'हे' चालायचं नाही." अंगठा ओठांजवळ नेऊन मी खुणेनंच तिला सांगितलं.

"काही म्हण, पण अशा ठिकाणी आल्यानंतर न पिणाऱ्यालासुद्धा पिण्याचा मोह होईल."

गच्चीच्या पोलला धरून कुमारी दूरपर्यंत पसरलेला दुर्गाचा परिसर पहात होती. वरून कोकणात जाणारा डांबरी रस्ता अजस्त्र अशा अजगरासारखा वाकडातिकडा गेलेला दिसत होता. भातशेतीचे वाफे, शेतकऱ्यांच्या इवल्या-इवल्या झोपड्या आणि बोटांइतकी माणसं!

आम्ही दोघे एकमेकांजवळ उभी होतो, तोच एक माकडाचं जोडपं तिथल्या छपरावर आलं. ते इतकं धीट होतं की, आम्ही दोघे समोर असूनही त्यांनी चक्क आपला प्रणय सुरू केला. कुमारीकडे पहात मी म्हणालो, "त्यांना काही लाजबीज वाटते का बघ!"

कुमारी हसली आणि म्हणाली, "त्यांना काय कळतं रे!"

"माणसांचे पूर्वज ना ते?" मी सिगारेट शिलगावून म्हणालो,

"माणसांनी तरी कुठं लाजलज्जा ठेवली आहे? गडकऱ्यासारखा स्वत:ला सुशिक्षित समजणारा माणूस कसा वागत होता?"

"त्याचं नाव आता कशाला काढतेस? त्या प्रकरणावर आता पडदा पडलेला आहे ना! फर्गेट इट!"

इतक्यात वॉचमन बाळू दाराजवळ येऊन अदबीनं म्हणाला, "संध्याकाळी जेवणाला काय करायचं? पवार गावात जाणार आहे."

"पवार अजून आहे इथं? बरं झालं. कुमारी, तू आजपर्यंत मुंबईच्या मोठमोठ्या हॉटेलमधे चिकन् खाल्ली असशील; पण या पवारच्या हातची चिकन् एकदा खाऊन पहा. वर्षानुवर्षे तू या चिकन्ची चव विसरणार नाहीस! जा बाळू, पवारला चिकन् करी आणि राइस बनवायला सांग."

बाळू गेल्यानंतर कुमारी म्हणाली, "तुझं गाव आणि हा परिसर इतका चांगला असताना तू त्या बकाल मुंबईत कशाला रे आलास?"

"सुखासुखी कोण येतो कुमारी? तसे प्रसंगच घडत गेले! बरं, आपण थोडे पाय मोकळे करून यायचं का?"

"हो."

कुमारीनं आणि मी वॉश घेतला. कपडे बदलण्यासाठी मी माझी बॅग उघडली तर कप्प्यांत समोर तो चष्मा दिसला, तो सुप्रसिद्ध चष्मा हैद्राबादच्या नबाबाला धुळीला मिळवणारा! पण इथं दुर्गावर याचं काय काम? पण लगेच मला आठवलं, आज रात्री भवानीनगरची जहागीरदार, सरकार मंडळी खास पत्ते खेळायला दुर्गावर येत आहेत. त्यांची जरा गम्मत करावी!

चष्मा तसाच परत बॅगेत ठेवून दिला आणि मी दुर्गावरचे पॉइंटस पहायला बाहेर पडलो.

दुर्गावर थंड हवा पडली होती. जांभळाच्या मोठमोठ्या वृक्षांना मोहोर आला होता. अधूनमधून करवंदीच्या काही जाळ्याही दिसत होत्या. दुर्गावरच्या लाल मातीतून चालताना कुमारीची गौरकाया पिवळीधमक दिसत होती. तिच्या सिल्कच्या साडीचा पदर हवेत लहरत होता. चालताचालता तिनं माझा हात हातात घेतला अन् म्हणाली, "इथं एखादी जागा मिळते का बघ. घर बांधून टाकू छोटंसं!"

मी हसलो. "तुझ्या मनात काय वाट्टेल ते येतं. नेरळला शेत घ्यायचं, शेतात बंगला बांधायचा! वाटेत हिरवीगार शेती दिसली की लगेच तिथंही तुला शेत हवंहवंसं वाटतं. आत्ता इथं रहायचं म्हणतेस! याचा अर्थ काय ठाऊक आहे?"

"काय?" हसतहसत तिनं साडी सावरीत मला विचारलं.

"याचा अर्थ तुझ्या हातून एकही योजना पूर्ण होणार नाही."

"तू काही म्हण समर, पण मला आताशी मुंबईच्या जीवनाचा उबग आलाय! यापुढं मुंबईचं तोंड पहावंसं वाटत नाही. धंदा तर बंद झालेलाच आहे."

"तो करावा असं वाटतं का?"

"अरे, मला वाटतं का हा प्रश्न आता गौण आहे. गडकऱ्यांचा खून करणारी म्हणून सारे माझ्याकडे पहाताहेत. कोण येईल रे आता माझ्याकडे? मलाच आता त्या जीवनाची शिसारी आलीय!"

बोलत बोलत आम्ही पश्चिमेच्या टोकावर आलो. तिथून पलीकडे मैल दीड मैलावर नरसाईचे पठार होते. विमान उतरू शकेल इतका मोठा माळ होता. अन् त्यापलीकडे क्षितिजाला जाऊन भिडलेली सह्याद्रीची असंख्य लहान-मोठी शिखरे निळीभोर दिसत होती.

पहातापहाता सूर्य क्षितिजाला येऊन भिडला. लालभडक सोनेरी गोळा! कुमारी त्याकडे

एकाग्र होऊन पहात होती. मी तिला सहज विचारलं,—

"कुमारी, तुला अस्ताला जाणारा सूर्य बघितला की कशाची आठवण येते?"

"मला किनई, तो सुहासिनीनं कपाळावर लावलेल्या कुंकवाच्या टिळ्यासारखा भासतो! समर, मला मात्र आयुष्यात असा कोणाच्या नावानं भाळी कुंकवाचा टिळा लावता आला नाही, याचं दु:ख वाटतं!"

अस्ताला जाणाऱ्या सूर्याचे दोन ठिपके मला कुमारीच्या अश्रूंत प्रतिबिंबित झालेले दिसले.

दैव काय चमत्कारिक असतं! मी लग्न करून पस्तावलो होतो, तर ही कुमारी आपलं लग्न झालं नाही, संसार करता आला नाही, म्हणून दु:खी अन् कष्टी झाली होती. शेवटी माणूस हा अतृप्तच! जे मिळालं नाही त्याबद्दल हळहळत राहणार!

"कुमारी, चल ऊठ! अंधार पडायच्या आत रेस्ट हाऊसवर जायला हवं!"

कुमारी उठली. तिनं डोळे टिपले. मला म्हणाली, "मघा सांगितलं त्याचं काय केलंस?"

"कशाचं?"

"ड्रिंकचं रे?"

"आज तुला ड्रिंक हवंय?"

"येस, लेट मी एंजॉय माय व्हिजिट टु धिस ब्युटिफुल प्लेस!"

"ओ ऽ के! मला थोडं जाऊन यावं लागेल! एक गोवेकर नावाचे 'परमिट होल्डर' ओळखीचे आहेत! भेटतात का पहातो!"

"मला रेस्ट-हाऊसवर सोडून जा!"

"अर्थात! तुला अशी रस्त्यावर सोडून नाही जाणार!"

कुमारी हसत हसत म्हणाली, "हेच वाक्य जन्मभर न विसरशील तर बरं होईल!"

प्रथम ती काय म्हणू इच्छिते हे मला समजलं नाही; पण थोडासा विचार केल्यानंतर मात्र तिच्या बोलण्यातला गर्भितार्थ समजला.

कुमारीला रेस्ट-हाऊसवर सोडून मी दुर्गावर गोवेकरांच्याकडे गेलो. गोवेकर फुटबॉलच्या मॅचमधे अधूनमधून अंपायरकी करीत. तेव्हापासूनची ओळख. त्यांना केवळ फुटबॉलचंच ज्ञान होतं असं नाही, तर टेनिस, क्रिकेट, बॅडमिंटन् या खेळांतलेही ते जाणकार होते. बरीच वर्षं ते हॉलंडला राह्यले होते. तिथून परतल्यावर त्यांना भवानीनगरची हवाही उष्ण वाटू लागली; म्हणून ते दुर्गावर छोटासा बंगला बांधून राहू लागले. मी त्यांच्या घरी गेलो तेव्हा ते म्हणाले, "ओ ऽ हो ऽ हो! समर, इकडे कुठे?"

नमस्कार करून मी त्यांच्या शेजारी बसलो. इकडच्या तिकडच्या गप्पा झाल्या. पण नेमका मुद्याला हात कसा घालायचा हेही काही समजेना. तेव्हा एकदोन वेळा खोकल्याची उबळ आल्यासारखे करून मी म्हणालो,—

"एक मित्र आलाय मुंबईहून सोबत. त्याला अन् मला दोघांनाही खोकल्यानं सतावलं आहे!"

"असं, माझ्याकडे पेप्स आहेत, देतो तुला!" माझी दांडीच उडाली.

"सर, काय आहे—" मी थोडासा घसा साफ करून म्हणालो, "एक-दोन पेग ब्रँडी मिळाली असती तर बरं झालं असतं!"

दोन्ही भुवया उंचावून ते म्हणाले, "हा खोकला आहे होय? समजलो! मग असं का करीत नाहीत?"

"कसं?"

"तुझ्या मित्रालाच घेऊन ये ना! गप्पा मारत बसू."

पुन्हा त्रिफळा उडाला!

"त्याचं काय आहे सर, तो मित्र थोडा लाजाळू आहे!"

"अच्छा अच्छा! समजलं!"

गोवेकर उठले आणि आत गेले. येताना गोवळकोंडा ब्रँडीचे चांगले बडे चार पेग्ज असलेली

बाटली घेऊन आले. मी खिशातून पंचवीस रुपये काढले, तेव्हा ते म्हणाले, "ठेव ठेव. मी काही मद्यविक्रीचा धंदा करीत नाही!"

"पण सर—"

"हे बघ समर, मी या सगळ्या अवस्थेतून गेलेलो आहे. तुम्ही तरुण पोरं आमच्यासारखं काय करणार आहात?"

"सर, आपली अडचण नाही ना होणार?"

"होऊ दे झाली तर, यू गो अँड एंजॉय!"

मला आयुष्यात जशी खत्रूड माणसं भेटली आहेत तशीच भयंकर दिलदारही भेटलेली आहेत. आता इतक्या वर्षांनी मी जुनी ओळख काढून गोवेकरांकडे गेलो होतो; त्यांनी हात जोडून 'एक्सक्यूज मी' किंवा 'आय ॲम सॉरी' म्हटलं असतं तर मी काय करणार होतो?

बाटली घेऊन मी रेस्ट-हाऊसवर आलो तो जहागीरदार लोकांच्या गाड्या लागलेल्या. ते बाळूला बहुतेक कुमारीबद्दल काहीतरी विचारीत असावेत. मला पहाताच ते म्हणाले, "अरे! हॅलो समर, व्हॉट ए प्लेजर टु सी यू हिअर!"

मी त्या सरदार-जहागीरदारांना पुरता ओळखत होतो. पॅलेसच्या टीममधे मी कप्तान असताना महाराजांची माझ्यावर खास मर्जी म्हणून हे लोक मनातून माझा हेवा करायचे. माझा पाय मोडल्याचं जेव्हा यांना समजलं तेव्हा या लोकांनी माझी टिंगलटवाळी केल्याचंही माझ्या कानांवर आलेलं होतं. यांना केव्हातरी चांगली अद्दल घडवायचं माझ्या मनात होतंच; पण तशी संधी आजपर्यंत आली नव्हती.

सावर्डेकर सरकार मला म्हणाले, "मुंबईहून 'पाखरू' आणलं आहेस म्हणे! बाकी तू नशीबवान हं, समर!"

खरं म्हणजे मला त्यांचा राग आला होता; पण चेहऱ्यावर न दाखवत मी म्हणालो, "शी इज माय फ्रेंड! शी कम्स फ्रॉम ए गुड फॅमिली!"

"आम्हाला तिच्याशी काही कर्तव्य नाही! तू फ्लश खेळायला येतोस का सांग?"

"पण मला 'फ्लश' कुठे खेळता येतो, सरकार?"

"अरे व्वा! मुंबईत राहून फ्लश खेळता येत नाही, असं कधी झालंय? चल कम ऑन!"

"असं करतो, मी बरोबर नऊला जॉइन होतो, चालेल?"

"बाय ऑल मीन्स!"

कुमारी पलीकडच्याच सूटमधे होती. मी आत येताच ती म्हणाली, "मिळालं?"

"अर्थात! पण तू मघा भवानीनगरला नाही का आठवण करायची?"

"अरे, मला काय ठाऊक इथं दुर्गावर असं रम्य वातावरण असेल! एरव्ही कधी रोज पिते का मी? असंच केव्हातरी, ऑकेजनली!"

मी ग्लास भरले. सोडा मागवणं शक्य नव्हतं. पलीकडे बसलेल्यांना चर्चेला विषय देण्याची इच्छा नव्हती; म्हणून पाण्यावरच भागवलं.

पवारनं जेवण आणलं. कुमारीनं भरपूर चिक्कन् खाल्लं. शेवटचा तंगडीचा पीस हातात धरून ती मला म्हणाली, "खरंच हं, समर, व्हेरी डेलिशियस प्रीपरेशन! असं माफक ड्रिंक, असं चवदार जेवण आणि तुझ्यासारखी कंपनी लाभल्यावर मला आज जरी मरण आलं तरी पर्वा नाही!"

हाताला लिंबू अन् मीठ चोळताचोळता मी म्हणालो, "एकदम मरणाचीच भाषा बोलायला लागलीस."

"कधी कधी मला असं वाटतं! हे आजच वाटतं असं नाही समर, तर मी धंद्यात लाखो रुपये मिळवले तेव्हादेखील मला वाटायचं, आत्मघात करून घ्यावा!"

"इट इज स्ट्रेंज!"

"काय असेल ते असो; बऱ्याच वेळा मला असं वाटून गेलं आहे खरं!"

"गोवेकरांना आणि पवाराला धन्यवाद देत आम्ही जेवण उरकलं. सिगारेट शिलगावून मी

कुमारीला म्हणालो, "मला पलीकडे खेळायला बोलावलं आहे, जाऊन येतो!"

"हे रे काय? मला एकटीला इथं सोडून तू जाणार?"

"अगं पलीकडे!"

"पण मला आज..."

"रात्री खेळ संपला की येईन ना मी!"

"मी जागी राहीन का तोपर्यंत!"

"झोपलीस तरी चालेल!"

कुमारीच्या मनात मी खेळायला जाऊ नये असं होतं. इतकं सुंदर जेवण झाल्यानंतर तिला माझ्या कुशीत शिरून झोपावंसं वाटणार हे साहजिक होतं. पण मला या सरदार लोकांना एकदा माझा इंगा दाखवायचा होता. आज अनायासे संधी चालून आली होती. ती मला दवडायची नव्हती.

सिगारेटचे झुरके घेतघेत मी त्यांच्या सूटमधे गेलो. मला पहाताच एक खवचट सरदार म्हणाले, "पलीकडचा खेळ अपुरा ठेवून इकडे खेळायला आलास की काय!" त्या विनोदावर बाकीची सर्व मंडळी अगदी मनापासून हसली. मीही खोटं खोटं हसलो आणि गोल टेबलाजवळची एक खुर्ची पुढं ओढून खेळायला बसलो.

सावर्डेकरांनी माझ्या डोळ्यावर चष्मा पाहून विचारलं, "चष्माही लागला काय?"

"हो, अगदी थोडा नंबर आहे. डॉक्टर म्हणाले, नेहमी चष्मा वापरला तर आहे तोही नंबर जाईल!"

"अच्छा अच्छा!"

खेळायला सुरुवात झाली. नेहमीप्रमाणं मी आठ-दहा डाव हरलो, तेव्हा सरदार कंपनी फारच खूष झाली. पण मी मात्र मनात म्हणत होतो, "घी देखा, लेकिन बडगा नही देखा!"

(पूर्वार्ध समाप्त)

-o-o-o-